म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. १८१३

तुफानाचा नंदादीप

गो. दि. माडगूळकर

REFBK-0015125

(21)

# तुपाचा नंदादीप

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 94920

लेखक :

ग. दि. माडगूळकर

REFBK-0015125

प्रस्तावना :

वा. कृ. चोरघडे

प्रकाशक :

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे २

क :
ज. प्रभू
दर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार : पुणे २

© ग. दि. माडगूळकर

प्रथमावृत्ती १९६६

मूल्य रु. ३=५०

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.
४०५ नारायण पेठ : पुणे २

निबंध ९८३
दा. क्र. ७५९२५
शाखा

# प्रकाशकाचे निवेदन

' साहित्याचे मानबिंदू ' या नावाखाली आम्ही मराठी-मधील काही उत्कृष्ट साहित्याचे नमुने प्रकाशित करावयाचे ठरविले आहे. कथा-काव्य-ललितनिबंध इत्यादी ललित साहित्यप्रकारांतील उत्कृष्ट लेखकांच्या उत्कृष्ट कलाकृती या मालेतून प्रकाशित कराव्यात असा आमचा मानस आहे. त्या दृष्टीने आम्ही ग. दि. माडगूळकर यांच्या निवडक कथांचा संग्रह प्रकाशित करून या क्षेत्रात पहिले पाऊल टाकले आहे. ग. दि. माडगूळकर हे कवी, पट-कथाकार व कथाकार या नात्याने सर्वांना चांगलेच परिचित आहेत. या तीन पैलूंपैकी त्यांचा सर्वांत विलोभनीय पैलू कोणता अशी शंका निर्माण होण्याइतके यश या तीनही क्षेत्रांत त्यांनी मिळविले आहे. आणि तरी त्यांचे व्यापक अनुभवविश्व, त्यांची सहृदयता आणि त्यांची सर्वंकष सहानुभूती यांमुळे त्यांच्या कथाच जास्त डोळयांत भरतात. त्यांच्या निवडक कथांचा हा संग्रह याची साक्ष सहज देईल.

प्रा. वामनराव चोरघडे यांच्यासारखा दुसरा व्युत्पन्न कथाकार या संग्रहाला प्रस्तावना द्यावयास लाभला हाही एक मोठा योग. ग. दि. माडगूळकर आणि वामनराव चोरघडे या ज्येष्ठांच्या व श्रेष्ठांच्या साहाय्याने या ' साहित्या-च्या मानबिंदू 'च्या नव्या क्षेत्रात आम्ही पदार्पण करीत आहोत याचा आम्हाला आनंद वाटतो.

' तुपाच्या नंदादीपा 'प्रमाणेच उत्कृष्ट साहित्यिकांच्या निवडक व वेचक कृती घेऊन आम्ही लवकरच वाचकांच्या भेटीला येऊ असे आम्ही आश्वासन देतो.

— प्रकाशक

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | शलाका – | ७ |
| १ | ऋणानुबंध | १७ |
| २ | बोलका शंख | ३३ |
| ३ | निर्वाण | ४८ |
| ४ | मोती | ६४ |
| ५ | नेम्या | ७४ |
| ६ | औंधाचा राजा | ८९ |
| ७ | गावरान शेंग | १०६ |
| ८ | वसुली | १२५ |
| ९ | वेडा पारिजात | १३८ |
| १० | पंतांची किन्हई | १४८ |
| ११ | नागूदेव | १६३ |
| १२ | तुपाचा नंदादीप | १८१ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
ग्रंथ शाखा

# शलाका

गरज नाही पण असो, म्हणून नंदादीपाची वात सारायला ही स्नेहस्निग्ध शलाका !

माझे निकट स्नेही श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या या ‘नंदादीपा’मध्ये चमचाभर साजुक तूप टाकण्याची माझी ऐपत नाही, हे मी मनोमन जाणतो. स्नेहाचेही एक भय असते; ते नसते तर माझ्याकडून ही अनधिकार चेष्टा घडती ना !

ग. दि. मां. च्या कथा मला फार आवडतात. ग्रामीण जीवनाचे कलात्मक दर्शन आपल्या प्रतिभेने साकार करणाऱ्या लेखकांपेक्षा, मानवी मनाचा ठाव घेणाऱ्या, मानस सरोवरातील सुखदुःखांचे रजतकण वेचून कथा सजविणाऱ्या लेखकांपेक्षाही मला ग. दि. मां. च्या कथा आवडतात. त्यांच्या कथांमध्ये दोष आहेत, उणीवा आहेत. माझ्या त्यांच्या स्नेहापोटी मी ते दोष त्यांच्याजवळ व्यक्त करू शकतो. स्नेहाचा तोल त्यामुळे बिघडत नाही. पण ग. दि. मां. चे नशीब असे उजवे, की त्यांच्या कथांतील दोषही

शोभून जातात – एखाद्या रूपगर्वितेला सुग्रास मुखी धरून बोलायची सवय असावी अन् ते बोलणेही गोड वाटावे, तसे !

प्रस्तुत संग्रहातील बारा कथांपैकी चार कथा आत्मचरित्रपर, संस्मरणात्मक अशा आहेत. त्या कथा नाहीत, कलाकृती आहेत. 'नेम्या', 'औंधाचा राजा', 'वेडा पारिजात', 'पंतांची किन्हई' या चार आत्मकथनांतून ग. दि. मां. नी एका संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. 'नेम्या'चे निरपेक्ष इमान, 'औंधाच्या राजा'ची माणुसकी व राजधर्म, 'वेड्या पारिजाता'चा सुगंध आणि 'किन्हई'तील गंगेची झुळझुळ मनाला धरून ठेवते. चरित्रवजा मजकूर वापरावा की नाही, अशा लिखाणाला कथा म्हणावे की नाही, हा विवाद्य मुद्दा आहे. ज्याच्या चरित्रात लपविण्याजोगे काही नसते त्याला ते चरित्र कथाविषय म्हणून वापरायला प्रत्यवाय नसावा. साहित्य हे 'जाणिजे यज्ञकर्म' म्हणून जीविकेचे आलंबन मानल्यानंतर साहित्यनिष्ठा ही येशू ख्रिस्तासारखी, 'हे माझे रक्तमांस घ्या व खा' असे म्हणू लागली तर त्यात विपरीत

वावगे काही नाही. उलट, असे म्हणायला फार मोठी ताकद लागते. ग. दि. मां. नी या चार संस्मरणातून कुणा एका घटनेपेक्षा सांस्कृतिक धनाचाच मागोवा घेतला आहे. त्यांच्या मनावर उमटलेला 'औंधाचा राजा' आम्रवृक्षा· सारखा वाटतो. संस्कृतात आंब्याच्या झाडाला सहकारवृक्ष म्हणतात. फलागमाच्या अगोदर सुरेख, सुरंगी, सुंदर मंजिऱ्या, फळेही आंबट गोड ! शिणलेल्याच्या श्रमपरिहारा-साठी गर्द, दाट, डेरेदार सावली! या माणसामुळे सिंहासनाला प्रतिष्ठा की सिंहासनाला त्याच्यामुळे शोभा, असा संभ्रम पडावा !

'वेडा पारिजात'ही तसाच. तात्या हसून म्हणतात – 'ते पारिजातकाचं रोपटं वेडं आहे.' जाणतं झाड असं वाढत नाही. हे वेडंच आहे, वेडं!' एका वेड्याने दुसऱ्या वेड्याला दिलेलं हे प्रशस्तिपत्र ! पण वातावरण असे रंगले आहे, की वाटते, असले चार दोन वेडे जरी गवसले तरी असंख्य शहाण्यांना आपले शहाणपण टिक-वायला आधार होईल ! या चित्रांमधून रंगविलेल्या जगाचे प्रतिध्वनी ऐकू यावेत म्हणून मन आसावते. उदबत्त्यांचा

धंदा करणारी किन्हई – तिचा सुवास मनाच्या अंगणात दरवळतो !

संग्रहातील आठ कथा, कथावस्तू म्हणून चांगल्या आहेत. पैकी ' मोती ' व ' बोलका शंख ' या लिहायला ग. दि. मां. च हवेत असे नाही. ' वसुली ' मात्र इतरांनी लिहिली असती तर औचित्याची शीव ओलांडली गेली असती. ' वसुली ' ही एक लोककथाच आहे. दादा गडबोल्याचे चित्र असे खुबीने रेखाटले गेले आहे, की त्याचे सर्व अवगुण पटूनही त्याच्या शिताफीबद्दल कौतुक वाटावे ! बिरबलासारखी चातुरी या दादा गडबोल्याची !

' निर्वाण ' मधील बावऱ्या महार कथेत वावरतो तो कणा ताठ ठेवून. त्याची निष्ठा खरी असते, समाजाला धरून ठेवणारी असते. त्याचे सगेसोयरे त्याला बदलत्या काळानुरूप जे सांगतात तेही चूक नसते. बावऱ्या निष्ठेपायी प्राण देतो. जगून दाखवितो आणि मरूनही दाखवितो. या कथेला निष्कर्ष नाही. वस्तूचे कलात्मक दिग्दर्शन हे लेखकाचे काम. ते या कथेत छान साधले आहे.

' ऋणानुबंध ' मध्ये मैत्रीचा अहंकार मैत्रीच्या विनयाने

जिरल्याचे एक अती घरगुती कथन आहे. नानाचा ऋणानुबंधी वरवर घुम्या, चीड आणणारा असा असतो. पण एका धनंतर मित्राचा अहंकार तो निमूट जिरवितो. ' गावरान शेंग ' कमळी ज्या परिस्थितीत भिमीवर विश्वास टाकते ती परिस्थिती ग. दि. मां. नी हळुवार हाताने रेखाटली आहे. कित्येकदा असे वाटते, की ग. दि. मां. लेखणीऐवजी कुंचला वापरतात व चित्र काढतात. टिपण साधण्याची किंवा शोधण्याची हातोटी इतकी मातबर, की कॅमेरा घ्यावा व नुसती कळ दाबली की चित्र तयार ! ही सिद्धी ग. दि. मां. ना लाभली आहे. त्यांनी ' नागूदेव ' रंगविला. तो उघड्या डोळयांना दिसतो तसाच मिटल्या डोळयांनाही दिसतो. फरक एवढाच की, डोळे मिटले म्हणजे सह्याद्रीचा नितळ, कणखर पण सतत पाझरणारा कडा दिसू लागतो; ' संतोष, परम संतोष ' असा मंत्रोच्चार ऐकू येतो. सुमनचा जन्मदाता नाना कुळकर्णी वात्सल्यात थिटा पडतो. उन्हाळयात बर्फाचे विमल जल दुथडी भरून समुद्राला पोचविणाऱ्या गंगेने एखाद्या रानझरीला आपल्यात सामावून घ्यावे तसा नागूदेव सुमनला स्वतःमध्ये सामावून

घेतो. त्याच्या पुण्याने ती जगते व तिच्या कलंकाने नागूदेव दूषित होतो. शुद्ध, स्वच्छ मेघजलाने आंघोळ करणारा हा सह्याद्रीचा कडा कोसळतो तोही सर्वसाक्षी ईश्वराच्या पायाशी! देवासारखा वागणारा नागूदेव माणसाच्या मायेने अभिभूत होऊन एकदा माणसासारखा वागतो आणि त्याचा जीवनरथ जमिनीला टेकतो. या देशात रुजलेल्या वैदिक संस्कृतीच्या हविष्यान्नावर ज्याचा पिंड पोसला गेला असाच लेखक ' नागूदेवा 'चे समर्थ चित्र रेखाटू शकतो.

' तुपाचा नंदादीप ' हे देखील येरूचे काम नव्हे! पोटाचा उद्योग म्हणून दामलेमामा मिठाईचे दुकान घालतो. धंद्याचे इमान वेड्यासारखे पाळतो. स्वार्थातून परार्थ साधतो. ' अर्थशुचिः स हि शुचिः 'चा आदर्श पाळतो.

*' किंबहुना दिवस राती । पुढिलांचे सुख*
*उन्नती ।*
*आणीत आणीत स्वार्थी । प्रवेशिजे ॥ '*

हे सूर्यव्रत जणू तो संभाळतो. चोवीस तास तेवणारा तुपाचा नंदादीप हे त्याच्या जीवनाचे प्रतीक! दामलेमामाचा धंदा सदू पुढे चालवितो. जीवनमूल्याचा चुराडा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७१५०९ वि: कादंबरी
क्रमांक १८१३ नों: दि: २८-१३-१७



करणारा भोगविलास सुलभेच्या मोहक रूपाने सदूसमोर येतो. पण नंदादीपावर काळे पटकूर पडण्याअगोदर सदू सावध होऊन मामाची धाकुली दीपकलिका तेवत ठेवतो. चिंध्या, जळमटे दूर होतात. दुकानात वापरले जाणारे साजुक तूप सदू त्या नंदादीपात टाकतो. व्यवहारवादी, भद्रकामना असलेला देशपांडे वकील देखील सदूला विचलित करू शकत नाही, त्याच्या मनात राग द्वेष चेतवू शकत नाही! असे नंदादीप सतत तेवत राहावे असे वाचक इच्छितो — डोळयांच्या कडांना सरसरून आलेले पाणी निपटीत, कुणाची दृष्ट लागू नये, इतक्या हळुवारपणे!

शुद्ध, निर्मळ, अकलंकित मायमऱ्हाटीचा विलास असे ग. दि. मां. च्या मराठी भाषेचे वर्णन करता येईल. ते कथा लिहोत, कविता लिहोत अगर कादंबरी लिहोत, त्यांच्या कलाकृतीवर कलाकाराच्या अनन्य संस्कृतिनिष्ठेचा, सोज्वळ आशामय जीवननिष्ठेचा झळाळ दिसतो. त्या झळाळीने यांचा शब्द शब्द जिवंत होतो. त्यांची जीवनचित्रे, स्मृतिचित्रे, त्यांतल्या व्यक्ती मन भारून टाकतात. ही संस्कृतिनिष्ठा संतपरंपरेची आहे. ग. दि. मां. कडे आलेली

ही देण साहित्याचा नंदादीप सतत तेवत ठेवील असाच विश्वास त्यांच्या साहित्याचा वाचक व त्यांचा स्नेही म्हणून मी ठेवणार !

— वामन कृष्ण चोरघडे

नागपूर
' राजीव ', धरमपेठ,
नवी वस्ती
दि. १४ जानेवारी १९६६.

तुपाचा नंदादीप

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 14924

१

# ऋणानुबंध

बरेच दिवस मनात घोळत असलेले ते सारे विचार आजच्या व्याख्यानात मी मोकळेपणाने बोलून टाकले.

श्रोत्यांचा समुदाय माझ्यासारखाच व्यथित झाला. त्यांनी टाळ्या पिटल्या नाहीत की आरोळ्या मारल्या नाहीत. माझा शब्दन् शब्द त्यांनी मनःपूर्वक ऐकून घेतला. माझे म्हणणे त्यांना संपूर्णपणे पटल्यासारखे दिसले. मी सांगितले होते, ते सत्यच होते, आपल्या समाजात सामाजिक नीतिमत्ता अशी उरलेलीच नाही. सर्वच नीतिमूल्ये नामोहरम झाली आहेत. नाती, ऋणानुबंध, परोपकार हे नुसते शब्दच उरले आहेत, त्यांचे अर्थ कधीच खुरटून गेले आहेत. सारा समाज अधोगतीला गेला आहे. प्रत्येक व्यक्ती स्वयंकेंद्रित झाली आहे. सुखाची कल्पना प्रत्येकाने स्वतःच्या अंगाभोवती लपेटून घेतली आहे. मने बधीरली आहेत. शरीरसुखाच्या पलीकडे त्यांच्या समाधानाचे लक्ष्य धावूच शकत नाही. ही माझी सारी विधाने श्रोत्यांनी मान्य केली होती. मी जितका दुःखी होतो तितकेच दुःख त्यांच्या सर्वांच्या मनात निर्माण झाले होते. व्याख्यान यशस्वी झाले होते, आणि माझ्याच व्याख्यानातल्या आशयाने, माझ्या मनातले दुःख अधिक वाढले होते.

सभेच्या चालकांचा निरोप घेताना मी उगीचच उदास होतो. " फार थोर विचार सांगितलेत आपण "...या त्यांच्या अभिनंदनानेही माझी चित्तवृत्ती सुखावली नव्हती. मांडलेल्या विचारांतील उदासीनता माझ्याही मनात भरून राहिली होती.

व्याख्यान आटोपल्याबरोबर लगेच परत जाण्याचा माझा इरादा होता, पण परत जावेसेही वाटेना. आजच्या दिवस मुंबईत थांबून सकाळच्या पहिल्या गाडीने पुण्यास जावे असे मी ठरविले.

‘ स्टेशनकडे घ्यायची का साहेब गाडी ? ’

‘ नाही, ’ मी म्हणालो, ‘ शिवाजीपार्ककडे घ्या. ’

शिवाजीपार्कला माझा एक मित्र राहत होता. त्याची आणि माझी मैत्री अगदी बालपणापासूनची होती. कसल्याही परिस्थितीत आमची मैत्री अभंग राहिली होती. नाना दामले हा माणूसच तसा होता. सख्ख्या भावाला वाटणार नाही इतका जिव्हाळा त्याला माझ्याबद्दल वाटत होता. तो माणूस अजून जुन्याच काळात वावरत होता. बदलत्या सामाजिक मूल्यांनी त्याची एकही निष्ठा खचली नव्हती. मित्रत्वाची कुठलीही कसोटी लावली तरी तिला तो उतरला असता. तसा तो मोठा श्रीमंत होता अशातली गोष्ट नाही. महिन्याकाठी पाचसहाशे रुपये तो कमवीत होता. मुंबईसारख्या शहरात ही मिळकत काही विशेष नव्हती. एवढ्या लहानशा उत्पन्नातही नाना सर्वांचे करीत होता. त्याच्या वृद्ध आईचे देवधर्म, भावंडांची शिक्षणे, आल्या-गेल्याचा सत्कार, इतके सर्व करूनही आपल्या स्वतःचा प्रपंच तो ठीकठाकपणे सांभाळीत होता. इष्टमित्रांच्या उपयोगी पडण्यासाठी तो सदैव सज्ज असे. मित्रांच्या पायात त्याने अनेकदा स्वतःची बेअब्रू करून घेतली होती, असंख्य वेळा प्रत्यक्ष मारामारीचे प्रसंगही स्वतःवर ओढवून घेतले होते. त्याच्या अन्य मित्रांचे त्याच्या बाबतीतले मत काय होते कोण जाणे, पण मला मात्र तो नेहमीच आदर्श मित्र वाटत आला होता. कंटाळल्यासारखे वाटले की त्याच्याकडे जाऊन, एकदोन दिवस राहण्याचा माझा परिपाठ होता. संसारतापाने पोळलेल्या माणसालाही त्याच्या घरात वावरल्याने विसावल्यासारखे वाटावे इतका त्याचा संसार सुखाचा होता. तो आणि त्याचे घर नेहमी आनंदात असे. स्वतः नाना सदा हसतमुख. त्याची हालचाल चपळ. बोलणे गोड. त्या गोडपणाला विनोदाची बारीक एकरेघी किनार. आत्मनिंदा हा त्याच्या विनोदाचा पाया. त्याला अडीअडचणी येत नसत असे मुळीच नाही. पण त्याच्या भाराखाली वाकणे तो कधी शिकलाच नव्हता. त्याचे वागणे प्रसन्न. बोलणे प्रसन्न. त्याच्या घरचे वातावरण प्रसन्न. घरातली सारी माणसेही तशीच दिलखुलास.

मोटारवाल्याला परत पाठवून देऊन मी नानाच्या बिऱ्हाडाच्या दरवाज्याशी पोहोचलो. दारावरची बेल दाबली. दार उघडायला नाना स्वतःच आला. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आपल्या पत्नीला उद्देशून तो ओरडायचा –‘ अग आनंदी, हा बघ कोण अखिल भारतीय कीर्तीचा पाहुणा आपल्या दारात आलाय्...’ पण आज तो तसे ओरडला नाही. त्याच्या चेहऱ्यावर ‹ ‹से हास्य उमटले. त्या हास्यात त्याचे नेहमीचे मोकळेपण नव्हते. माझ्या हातातली बॅग त्याने स्वतः घेतली. आत जाता जाता सैंपाकाच्या खोलीकडे पाहत तो म्हणाला, ‘ आनंदी, भाऊसाहेब आलेत्. ’

वास्तविक अशा वेळी वहिनी लगबगीने बाहेर यायच्या. माझ्या मुलांबाळां-पासून बागेतल्या झाडांपर्यंत सर्वांची चौकशी करायच्या. मग त्यांची त्यांनाच आठवण व्हायची आणि चहा करण्यासाठी म्हणून त्या सैंपाकघराकडे धावायच्या. आज तसेही झाले नाही. वहिनी दाराशी आल्या, थोडक्या हसल्या, पण त्यांच्या हसण्यातही नेहमीची प्रसन्नता नव्हती.

‘ बरी आहेत ना सगळी मुलं-माणसं ? ’ इतके त्यांनी विचारले. पण ते विचारणेही कणसूरच वाटले.

‘ आई कुठं आहेत ? ’ असे विचारून, नानाच्या म्हातारीला नमस्कार करण्या-करिता मी नेहमीसारखा आत जाणार तोच नाना म्हणाला,

‘ आई गोंदवल्याला गेलीय्. चार-सहा दिवसांनी परत येईल. ’ नानाची भावंडे आणि मुलेही कुठं आसपास दिसली नाहीत. कदाचित् मुले कुठे खेळायला बाहेर गेली असतील. भावंडेही कुठं कामाला गेली असतील पण मला वाटले, नानाच्या संसारात आज काहीतरी अडचण उत्पन्न झाली आहे. उभ्या उभ्याच नानाच्या खांद्यावर हात टाकीत मी त्याला विचारले,

‘ तब्येत बिब्येत बरी नाही का तुझी नाना ? ’

‘ तब्येतीला काय होतंय् ? लहानपणी प्यायलेलं धारोष्ण दूध अजून काम देतंय्. ’

धारोष्ण दुधाच्या त्या उल्लेखाने आम्हां दोघांचे बालपणातले सहजीवन क्षणार्धात् माझ्या डोळ्यांसमोरून तरळून गेले. नाना तेव्हा जितका धडधाकट होता तितकाच खरोखर आजही होता. बालपणच्या धारोष्ण दुधाची आठवण सांगताना त्याने हसण्याचा प्रयत्न केला; पण त्या हसण्यातली कृत्रिमता मला

जाणवल्यावाचून राहिली नाही. खांद्यावर टाकलेल्या हाताने त्याची भरदार पाठ हलकेच थोपटीत मी म्हणालो...

'काहीतरी बिघडलंय् तुझं आज. नेहमीसारखा नाहीस तू.'

नाना काहीच बोलला नाही. वहिनींना मात्र राहवले नाही. त्या पटकन् बोलून गेल्या,

'बिघडायचंय काय त्यात! यांचा स्वभाव नडतो झालं.' नानाच्या चांगुलपणाने त्याला काहीतरी अडचणीत आणले असावे हे मी ओळखले. आलेल्या अडचणीत काही साहाय्य करता आले तर करावे ह्या भावनेने मी वहिनींना विचारले, 'काय झालंय काय, ते तरी सांगा.'

पण मग वहिनीही काही बोलल्या नाहीत. एकाएकी त्यांच्या नाकपुड्या लाल झाल्या आणि डोळे पाण्याने भरून आले.

'अरे, कमाल करता तुम्ही. काय झालं ते सांगा तर.' मी थोडासा दटावणीसारख्या स्वरात बोललो.

'जाऊ दे रे,' माझ्या पाठीवर एक जोरदार थाप मारीत नाना म्हणाला, 'तुला माहीत आहे, तुझी वहिनी हळवी आहे. तुला अकादमीचं प्राईज मिळालं तेव्हा देखील ती रडली होती.' नाना विषय टाळू पाहत होता, पण मी ऐकायला तयार नव्हतो. अंगातला कोट देखील न काढता मी शेजारच्या खुर्चीवर बैठक मारली आणि निश्चयाने म्हणालो,

'तुमची अडचण काय आहे ती सांगा; नाहीतर मी पाणी पिणार नाही या घरात.'

'चहाला ठेवते...' एवढेच म्हणत पदराने डोळे पुशीत वहिनी आत गेल्या. नाना थोडा वेळ गप्प उभा राहिला. मग त्याने हलकेच खुर्ची ओढून माझ्यासमोर घेतली. तीवर बसत तो म्हणाला,

'खरं तर दोन-चार दिवसांपूर्वी तुलाच पत्र लिहायचा माझा विचार होता—'

'मग काय, पत्ता लक्षात नव्हता?'

'रागावू नकोस असा... म्हटलं, तुझ्याही मागं काही कमी व्याप नाही. तुला कशाला त्रास द्या.'

आणि एकाएकी नानाने विषय थांबविला. माझ्या मांडीवर थाप मारीत

तो म्हणाला, 'तुझं व्याख्यान कसं काय झालं आज ? आम्ही दोघंही येणार होतो...'

'व्याख्यानाचं मरू देत, तुझी अडचण काय आहे ती आधी सांग मला.'

नानाचा नाइलाज झाला. त्याला सांगणे भाग पडले.

'झालंय् काय, घरावर आलीय् टाच.'

खिडकीची काच फुटल्याची वार्ता सांगावी इतक्या सहजतेने नानाने सांगितले, पण माझ्या काळजाला हादरा बसला.

'टाच कशासाठी ?' मी ओरडलो.

'अरे तो दिगंबर नव्हता का... दिगंबर गोडबोले... आपल्याबरोबर शाळेत होता की सांगलीला...'

'तो ! वह्या-पेन्सिली विकायचा तो ! सैंपाकीणबाईंचा मुलगा ?"

'हां, तोच. कैक वर्षांनी इथं आला. म्हणाला, मला साबणाचा कारखाना काढायचाय्. एक को-ऑपरेटिव्ह बँक कर्ज देतेय्. फक्त तुझी सही पाहिजे. मी दिली सही. त्याच्या साबणाच्या कारखान्याचं पुढं काय झालं कुणास ठाऊक; पण माझ्या तोंडाला मात्र त्यानं आज फेस आणलाय्. ते पैसे उद्याच भरले पाहिजेत, नाहीतर... हा मालकीचा फ्लॅट् जाणार.'

'दिगंबर कुठाय् ?'

'तो भेटलाच नाही पुन्हा.'

'पण हो, टाच एकाएकी कशी आली ?'

'एकाएकी कुठली ?—' सैंपाकघरातून वहिनी म्हणाल्या, 'मधे अनेकदा नोटिसा आल्या होत्या. ह्यांनी सांगितलं कधी कुणाला-! हे सगळ्या जगाच्या उपयोगी पडताय्त. आता येणार आहे का कुणी यांना वाचवायला ! बरं, रक्कम तरी काय थोडी थोडकी आहे ? पाच साडेपाच हजार ! कुठून आणायचे आता ?'

मी पटकन् उठून उभा राहिलो. वहिनींना म्हणालो,

'रात्री जेवायला वाट बघू नका. कदाचित् उशीर होईल. काळजी करू नका. माझ्या पुष्कळ ओळखी आहेत इथं. होईल काहीतरी व्यवस्था.'

'अहो थांबा, चहा तरी घेऊन जा—'

वहिनींचे बोलणे माझ्या कानी आले. ते ऐकल्या न ऐकल्यासारखे करून

मी त्वरेने बाहेर पडलो. नानासारख्या सालस बालमित्राच्या संकटकाळी, त्याच्या उपयोगी पडण्याचे निश्चित ठरवून मी जिना उतरलो.

रात्रीचे अकरा वाजेतर्यंत मी अनेक ठिकाणी भटकलो; पण कुठेच काही काम झाले नाही. गवालिया टँकवर राहणाऱ्या एका व्यापारी मित्राकडून हुंडीवर पैसे मिळविण्याचा देखील मी प्रयत्न केला. पण यश आले नाही. रात्री अकराच्या सुमाराला मी शिवाजीपार्कला आलो, तो संपूर्ण निराशा पदरी घेऊन. मला स्वतःचा भयंकर संताप आला होता. वास्तविक हजारो रुपये मिळविणाऱ्या माझ्यासारख्या माणसाजवळ एवढी रक्कम शिल्लक असायला हवी होती. माझ्या खिशात पुण्याला जाता येईल इतकीच रक्कम होती. पुण्याच्या बँकेतील माझे खातेही नुसत्या हिशेबाने चिताडले होते. पत्नीचे दागिने विकल्यावाचून दुसरा काहीच उपाय मला सुचण्यासारखा नव्हता. रिकाम्या हाताने परत नानाच्या बिऱ्हाडी जाणे मला योग्य वाटेना. रात्रीच्या गाडीने परत जावे, पुण्यातच काही व्यवस्था करावी आणि सकाळी परत मुंबईस यावे असे मी ठरवले. घरच्या दागिन्यांची विल्हेवाट लावणे मला वाटते तितके सोपे नव्हते खचित; पण पत्नीचा राग पत्करूनही ते करण्याचे मी ठरवले. परस्पर निघून गेलो तर नाना आणि वहिनी बुचकळ्यात पडतील या जाणीवेने माझे पाय परत नानाच्या घराकडे वळले. जायला नको वाटत होते तरीहि वळले. नानाच्या घरात अजून दिवे दिसत होते. खिडक्या उघड्या होत्या. माझ्या घरातले दागिने नानाच्या गरजे-इतके भरले नाहीत तर नानाचा हा फ्लॅट जाणार होता. त्याचा सुखी संसार वनवासाच्या रस्त्याला लागणार होता. माझ्या स्वतःच्या खर्चिक वृत्तीचा विलक्षण संताप माझ्या डोक्यात दाटून राहिला. जिवाची अगदी तगमग झाली. काय वाटेल ते करून नानाची अडचण भागवायची. पुण्याला जाऊन पैसे घेऊनच परतायचं असा निश्चय करून मी पुनः नानाच्या इमारतीचे जिने चढलो.

दार उघडेच होते. माझी चाहूल लागताच नाना समोर आला आणि हातवारे करीत गाऊ लागला—

**‘ पाहू रे किती वाट जिवलगा पाहू रे किती वाट ’**

त्याच्या त्या बालिशपणाने माझ्या डोक्यातली स्वतःबद्दलची चीड अधिकच भडकली. निश्चयाने बाहेर पडलेला माझ्यासारखा माणूस काम करूनच परत येईल

अशी नानाची खात्री असली पाहिजे, म्हणूनच त्याची मनोवृत्ती निवळली होती. प्रसन्न झाली होती. नेहमीच्या प्रसन्नतेने तो गात होता. काम झाले नाही हे त्याला कसे सांगावे या विवंचनेत मी होतो. नानाने मला बोलूच दिले नाही. तो म्हणाला, " आणखी थोडा वेळ आला नसतास तर आमच्या पोटात कलकलणारे कावळे पोटातून उठून ताटावर बसले असते. आता लौकर आटप. पानं तयार आहेत. " बोलता बोलता त्यानेहूनच माझा कोट उतरविण्यास प्रारंभ केला. ' आलात का भावोजी, आज मुद्दाम तुमच्या आवडीच्या कोथिंबिरीच्या वड्या केल्यात्. आतून वहिनींचा आवाज आला. मला मेल्याहून मेल्यासारखे झाले. मला आवडणारी वस्तू वहिनींनी आजच केली होती असे नाही. त्या क्षणी मात्र मला वाटले की, अडचणीच्या वेळी मी त्यांच्या उपयोगी पडलो या जाणीवेनेच त्यांनी माझ्या आवडीची एवढी कदर केली असावी. मी " थांब रे, थांब रे " म्हणतो आहे याकडे बिलकुल लक्ष न देता नानाने माझा कोट उतरला. बाहेरच्या खुंटाळ्यावर न ठेवता त्याने तो समोरच्या अलमारीत ठेवला. अलमारी बंद केली आणि त्याने तिचे अंगचे कुलूप बसवून टाकले. माझ्या कोटाच्या खिशात पाच सहस्रांच्या नोटा असाव्यात अशी जणू त्याची खात्री होती. ओशाळल्या आवाजात मी विचारले, ' रात्रीची पॅसेंजर कितीला सुटते रे नाना ? '

' छे, छे, रात्री कोण जाऊ देतंय् तुला ! आज आता रात्र जागवायची. अनायासे दाजीसाहेबही आलेत. तूही आहेस. '

मला बोलण्यासाठी बिलकुल अवसर न देता गॅलरीच्या रोखाने पाहात तो ओरडला, ' दाजीसाहेब, चला जेवायला. '

गॅलरीच्या बाजूने एक ठेंगणा-बुटका गृहस्थ आत आला. त्याच्या अंगात कपडे नव्हते. बहुतेक नानाचेच धोतर तो नेसला होता. उघड्याबंब छातीवरचे जानवे दोन्ही हातांनी खाली-वर करीत तो आत आला. त्या माणसाला मी अनेकवार पाहिले होते. नानाच्याच बिऱ्हाडी पाहिले होते. त्य.चे माझे संभाषण मात्र कधी झाले नव्हते. नानाला अकारण बुडवणाऱ्या त्याच्या असंख्य मित्रांपैकी तो एक होता. नानाच्या घरी माझा मुक्काम असताना ह्यापूर्वी तो अनेकदा आला गेला होता. तो असाच न बोलता यायचा आणि न बोलता निघून जायचा. आता देखील त्याची तिथली उपस्थिती मला आवडली नाही. तो तिऱ्हाईत माणूस तिथे असल्यामुळे माझे

काम झाले नाही ते नानाला सांगणेही मला साधेना. मी काहीच बोललो नाही. मुकाटपणे हातपाय धुऊन पाटावर बसलो. तो गृहस्थ बसला. नानाही बसला. वहिनी वाढू लागल्या. माझ्या शेजारी बसलेल्या त्या माणसाचा मला उगीचच राग येत होता. बिचारा नाना आज केवढ्या संकटात होता. त्याच्या संकटाची ओझरती कल्पनाही त्या भोजनभाऊला नव्हती. तो आपला खाली पाहून जेवत होता. मोठ्या चवीने जेवत होता. मला वाटले, त्याच्या अंगावर एकदम ओरडावे, " लाज नाही वाटत असं फुकटचं गिळायला ? मित्र म्हणून हक्कानं येता आणि जेवता. मित्रावर आलेल्या संकटाची जाण तरी आहे का तुम्हांला ? " मी केले मात्र काहीच नाही. शांतपणे जेवणाऱ्या त्या गृहस्थाकडे नुसता तिरप्या नजरेने पाहात राहिलो. तो एकटाच अपराधी नव्हता. मी देखील त्याच्याच माळेतील मणी होतो. वहिनी आग्रह करकरून वाढत होत्या, पण आज माझ्या जिभेला त्या अन्नाची चव समजत नव्हती. माझ्या आवडीच्या कोथिंबिरीच्या वड्या देखील मला मातकट वाटत होत्या. पानावर बसलो होतो म्हणून मी जेवत होतो, बाकी त्या जेवणात माझे चित्त बिलकुल नव्हते. कुठल्याही परिस्थितीत पुण्याला गेले पाहिजे, पैसे आणले पाहिजेत, नानाला सोडविले पाहिजे ह्या एकाच विचाराचे चर्वितचर्वण माझा मेंदू अनेक मुखांनी करीत होता. शेजारी जेवणाऱ्या माणसाकडे पाहताना माझ्या डोळ्यांत तिरस्कार दिसत होता की काय न कळे. नाना एकदम म्हणाला,

'तुझी न् राजाची ओळख नाही का भाऊ ?'

'नाही.' मी तिरसटल्या स्वरात म्हटले. 'ओळख करून घेण्याची काही आवश्यकताही नाही' हे पुढचे वाक्य मी म्हणू शकलो नाही इतकेच.

'हा देखील तुझ्यासारखाच माझा बाळपणीचा मित्र. राजा ओगले.'

'असेल, असे शेकडो आहेत तुझे मित्र.' माझे मन मुक्यानेच उसळले. तोंडातून केवळ हुंकारच बाहेर पडला. हात जेवणात गुंतले असल्यामुळे त्या घृणास्पद माणसाला नमस्कार करणे मला भाग पडले नाही हे एकपरी बरेच झाले. तो माणूसही काही बोलला नाही. नाना मुक्याने जेवू लागला. वहिनी मुक्याने वाढू लागल्या. मुक्यानेच आमची जेवणे आटोपली. मी पानावरून उठताना मात्र वहिनी आवर्जून म्हणाल्या,

‘ नेहमीसारखे आज जेवला नाहीत तुम्ही भावोजी. ’

कसा जेवणार ? आजचा दिवस नेहमीसारखा होता थोडाच ? माझा प्रेमळ मित्र आज घोर संकटात होता. त्याचे घर उद्या त्याच्या ताब्यातून जाणार होते. त्याचा प्रपंच रस्त्यावर येणार होता. तो अनर्थ वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे माझे कर्तव्य होते. मी त्या प्रयत्नात होतो. पण यशाची कसलीच खात्री नव्हती. उद्या रस्त्यावर येऊ घातलेल्या संसारात आज रात्री पोटभर जेवणे कसे शक्य होते ?

आम्ही तिघेही बैठकीच्या खोलीत आलो. नानाने मसाल्याच्या सुपारीची डबी माझ्यापुढे धरली. मला त्याची विलक्षण कीव आली. स्वतःबद्दलचा संताप असह्य झाला. मानेनेच मी त्या सुपारीला नको म्हटले. नानाच्या त्या बाळमित्राने मात्र डबीतला चिमुकला चमचा न वापरता बुचकुलीने सुपारी घेतली. सुपारी चघळत चघळत, तृप्त पोटावर हात फिरवीत तो पुन्हा गॅलरीकडे गेला. मी घड्याळाकडे पाहिले. बारा वाजायला वीस मिनिटे बाकी होती. चटकन् निघालो तरच गाडी मिळण्याची शक्यता होती. लगबगीने अंगात सदरा चढवीत मी नानाला म्हणालो ......

‘ कोट दे लौकर माझा, मला गेलं पाहिजे. ’

‘ वेड की काय ? — आला नाही तोवर तुम्ही जातो म्हणता काय ? ’ गाफिलपणाने नाना पुन्हा जाऊ लागला. तो तिऱ्हाईत माणूस शेजारी असल्यामुळे माझी मनःस्थिती नानाच्या कानी ओरडून सांगणे मला साधले नाही. मी त्याचा हात पकडला आणि त्याला बाहेर काढले. बिऱ्हाडाचे दार ओढून घेतले. जिन्याजवळच्या जागेत आल्यावर मी नानाला म्हणालो,

‘ मला या गाडीनं गेलं पाहिजे नाना — ! ’

‘ का पण ? ’

माझ्या जाण्याचे कारण त्याला सांगणे माझ्या जिवावर आले, पण सांगण्या-वाचून गत्यंतर नव्हते. भरल्या गळ्याने, मोठ्या कष्टाने मी म्हणालो,

‘ अरे वेड्या, तुला वाटतं तसं नाही. माझा कोट तू मोठ्या बंदोबस्तानं कपाटात ठेवलास, पण त्याचे खिसे रिकामे आहेत. रातोरात मला पुण्याला गेले पाहिजे. काही तरी व्यवस्था केली पाहिजे. ’

माझी अपेक्षा होती माझ्या या खुलाशाने नानाचा चेहरा उतरेल, त्याचे पाय लटलटू लागतील, घसा कोरडा पडेल. म्हणून त्याच्याकडे बघण्याचे देखील मी टाळले. पण तसे काहीच घडले नाही. उलट माझ्या पाठीवर एक जोरदार थाप मारीत तो ओरडला,

'भलताच सेंटिमेंटल आहेस. मला वाटलं मीच भावनाप्रधान आहे. तूही माझ्यासारखाच आहेस. मी अडचणीत आहे ही गोष्ट मनातून काढून टाक ... माझी अडचण सुटली. उद्या भरण्याइतकी रक्कम माझ्याजवळ आहे. अगदी रोकड आहे. तुझ्या मित्राची अब्रू जात नाही. त्याचा फ्लॅट जात नाही.' मी ऐकतच राहिलो. क्षणभर वाटले, नाना हे सारे बनवूनच सांगतो आहे. प्रश्नार्थक अवस्थेतच मला स्थिर उभा राहिलेला पाहून नेहमीच्या मोकळ्या आवाजात नाना पुनः म्हणाला,

'By God I tell you. माझं काम झालंय्.'

'कुणी केलं?'

'राजानं ...'

'राजा?' माझ्या शेजारी बसलेला तो अबोल माणूस असे काही करण्याच्या योग्यतेचा असेल असे मला मुळीच वाटले नव्हते. मित्रत्वाची मूल्ये जाणणारा कुणा एकाचा मित्र या देशात जिवंत असेल याच गोष्टीवर माझा विश्वास नव्हता.

'तो तुमचा कुणी नातेवाईक आहे का?' मी विचारले.

नाना थोडा थांबला. गंभीर झाला. जिन्यातील दिव्याच्या क्षीण प्रकाशात त्याच्या डोळ्यांत पाणी चमकल्याचा मला भास झाला. माझे काळीज पुनः चरकले. कदाचित् मला बरे वाटावे म्हणून नानाने सर्वच गोष्ट बनवून सांगितली असावी असे भय माझ्या मनी उसळले. गहिवरल्या आवाजात नाना बोलला,

'राजा माझा नातेवाईक आहे... आणि नाही... दोन्हीही.'

'म्हणजे? –'

नानाने हलकेच माझ्या पाठीवर हात टाकला आणि कुणास ठाऊक कशासाठी, आम्ही दोघेही जिना उतरू लागलो.

शिवाजीपार्क मैदानावर आता कोणीही माणूस नव्हते. रात्र मध्याला आली होती. समुद्रावरचा गार वारा अंगाला गंभीर स्पर्श करून जात होता. समुद्राच्या

भरीव घोषावाचून कसलाही साद कानी येत नव्हता. पार्काच्या विस्तीर्ण गोलात कठड्याच्या आसऱ्याने काही बेवारशी जीव गाढ झोपी गेले होते. रात्रीच्या गाढ अंधारात विजेच्या दिव्याची माळ मात्र एकटक तेवत होती. मी आणि नाना पार्काच्या एका कठड्यावर जाऊन बसलो. बराच वेळ आम्ही दोघे एकमेकांशी काही बोललो नाही. आगगाडीची शीळ समोरून आल्यासारखी आली. मला वाटते, मी जिने जाणार होतो ती ' पूना पॅसेंजर ' निघून गेली. मला एकाएकी भास झाला, नाना रडतो आहे; त्याचे गाल भिजले होते. श्वास दाटला होता.

' नाना... ! '

माझ्या त्या हाक मारण्याने नानाचा गळा मोकळा झाला. माझ्या छातीत डोके खुपसून तो ओक्साबोक्शी रडू लागला. एखाद्या लहान मुलासारखा रडू लागला. नानाचे काम झाले नव्हते. खचित् झाले नव्हते. उद्या त्याची अब्रू जाणार होती. फ्लॅट जाणार होता. संसार रस्त्यावर येणार होता. त्याने खोटे सांगितले होते. खोटी शपथ घेतली होती. त्याच्या चांगुलपणाने त्याने माझे आणि त्याचे दोघांचे नुकसान केले होते. तो स्वतः पूर्ण धोक्यात आला होता. साहाय्यासाठी धडपडणारे माझे हात त्याने गच्च बांधून टाकले होते. वेळ अगदी थोडका होता. आता काहीही करता येण्यासारखे नव्हते. मी त्याला पोटभर रडू दिले. छाती मोकळी झाल्यावर तो आपणहून उठून सरळ बसला. तेव्हा मात्र कोरड्या ठणठणीत आवाजात मी त्याला विचारले,

' मला खोटं का सांगितलंस ? '

' खोटं नाही भाऊ, अगदी खरं आहे ते – '

' काय खरं आहे ? '

' राजा ओगल्याचं आणि माझं काही नातं नाही आणि तरीही तो माझा मेव्हणा आहे. त्यानं माझी अडचण काढली आणि ते नाते पुनः सिद्ध केले. त्याने पैसे तर दिलेच, पण उलट सांगितले, तुला जमेल तेव्हा परत कर. ती रक्कम माझ्या शिलकीतली आहे. '

नानाचे काम झाले होते याची खात्री पटल्यावर भारल्या गेलेल्या आवाजात मी विचारले,

' तुझा मेव्हणा आहे तो ? तुला एखादी बहीण आहे ? '

‘ होती — ’

‘ तीच ना ? तुझ्या बैठकीच्या खोलीत जिचा फोटो आहे ती ? ’

‘ हो. तीच. सुलभा तिचं नाव. ’

‘ पण ... तिचं लग्न तर झालं नव्हतं ... ’

‘ नव्हतं ... ’

‘ मग — ’

‘ तेच सांगण्यासाठी तुला इकडं आणलं मी. ’

‘ माझ्या औत्सुक्याला सीमा राहिली नाही. नाना सरळ बसला. माझ्याकडे न बघताच तो सांगू लागला —

सांगली सुटल्यावर आम्ही ठाण्याला आलो. तिथल्या शाळेत माझी आणि राजा ओगल्याची ओळख झाली. तो लहानपणापासून असाच अबोल, पोरका आणि दरिद्री असल्यामुळे त्याचा स्वभाव तसा झाला होता. त्याचा बाप ठाणे कोर्टात चहा विकीत असे. हा पोरगा हुशार. वर्गात त्याचा नंबर नेहमी पहिला असे. मी त्याच्याशी ओळख करून घेतली. मग तो आमच्या घरी येऊ लागला. माझ्या आईचा स्वभाव तुला माहीतच आहे. तिचे हात राजाच्या पोटात गेले. मॅट्रिकपर्यंत आम्ही दोघे एकत्र शिकलो. पुढे माझे वडील वारले. आमचं कुटुंबही निराधार झालं. मी मुंबईला आलो. रेल्वेत नोकरी धरली. राजा आपल्या हुशारीवर पुढं शिकला. इंजिनिअर झाला. परीक्षेचा रिझल्ट लागल्यावर तो महिनाभर माझ्याकडेच होता. आम्ही तेव्हा गिरगावातल्या एका चाळीत राहात होतो. पुढं त्याला पी. डब्ल्यू. डी. कडून बोलावणे आले. इंटरव्ह्यूला जाण्यासाठी त्याच्याजवळ चांगले कपडे नव्हते. माझ्याकडे एकच एक राखी रंगाचा लोकरी सूट होता. तो मी त्याला दिला. त्याची निवड झाली. पगार चांगला मिळू लागला. एवढी चांगली सरकारी नोकरी लागली तरी राजा मला आणि माझ्या कुटुंबाला विसरला नाही. पालघरला असताना तो दर रविवारी न चुकता आमच्या घरी यायचा. एक दिवस आनंदात काढायचा. सोमवारी परत आपल्या नोकरीवर जायचा. माझ्या लग्नात त्यानं पडेल ते काम केलं. आपण सरकारी नोकर आहोत, मुख्य इंजिनिअर झालो आहोत ह्याचा बडेजाव त्यानं कधीही सांगितला नाही.

त्याचं वागणं अचूक, बोलणं अगदी कमी. एके दिवशी त्याचा म्हातारा बाप माझ्याकडे आला आणि कळवळून म्हणाला,

‘ राजाला आता लग्न करायला सांगा. त्याचं वय झालंय. ’ राजाचा बाप मुलाला सांगू शकत नव्हता. त्याने येऊन मला सांगितले. त्या बापलेकात मुळीच संभाषण होत नव्हते. काही भांडण होते; मतभेद होते असे मुळीच नाही. मुलाच्या अनपेक्षित प्रगतीने त्याचा बाप उगीचच भांबावला होता. राजाच्या अबोलक्या स्वभावाने त्याचे ते भांबावणे वाढत गेले होते. बाप-लेकात अकारण एक अंतर निर्माण झाले होते. म्हाताऱ्याने एवढ्या अजीजीने मला सांगितल्यावर मी राजाच्या लग्नाची गोष्ट आपल्या घरातल्या माणसांजवळ काढली. माझी धाकटी बहीण सुलभा त्या वेळी सोळा-सतरा वर्षांची होती. गोरी, नीटस अंगी-पिंडी भरलेली, प्रसन्न, शांत मुद्रेची माझी ती एकुलती एक बहीण तुला देखील आठवत असेल. आमच्या घरात राजाच्या लग्नाच्या गोष्टी सुरू झाल्यावर सुलभा उगीचच बावरल्यासारखी झाली. तिचे ते बावरणे माझ्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही. एकटीच गाठून मी आईला विचारले,

‘ आई, आपली सुलभा राजा ओगल्याला दिली तर ? ’ आईने एकदम होकार दिला. मी राजाला पत्र लिहिले. त्याच्या पत्राचे उत्तर यायला तीन-चार दिवस लागले. तेवढ्या अवधीत माझ्या मनात असंख्य विचार येऊन गेले. राजा आणि मी बाळमित्र असलो तरी तेव्हा माझ्या-त्याच्या परिस्थितीत फार फरक पडला होता. कुठल्याही धनिकाने मोठ्या हौसेने त्याला आपला जावई करून घ्यावा इतके त्याचे आयुष्य तेव्हा फुलले होते. माझ्या बहिणीपेक्षा अधिक सुंदर आणि अधिक सुशिक्षित मुली त्याला सांगून येणे अपरिहार्य होते. फारसा विचार न करता माझ्यासारख्याचे त्याच्याशी नाते जुळवू पाहणे धाडसाचेच होते. राजाचे पत्र येईनासे झाले तेव्हा तर माझी चूक मला फारच मोठी दिसू लागली. नात्याची अपेक्षा केल्यामुळे त्याचे माझे मित्रत्वही धोक्यात येणार की काय अशी मला धास्ती वाटू लागली. पण तसे घडले नाही. चार दिवसांनी राजाचे पत्र आले. साऱ्या पत्रभर त्याने हवा-पाण्याच्याच ओळी लिहिल्या होत्या. नाही म्हणायला एकच ओळ आमच्या नव्या नात्याबद्दल लिहिली होती — ‘ नाना, माझं मन जितकं तुला कळेल तितकं परमेश्वरालाही कळणार नाही. ’ राजाचे पत्र

मी आईला वाचून दाखविले तेव्हा तिचे अनुभवी डोळे डबडबून आले. मग मी सुलभालाही विचारले. तीही तितक्याच भारदस्तपणे उत्तरली : ‘ नाना, तू माझे मन अचूक ओळखलेस. ’ राजा आणि सुलभा यांनी एकमेकांवर प्रेम केले. नुसत्या नजरांच्या धाग्यांनीच त्या दोन सालस जिवांनी आपल्या आयुष्याचा भविष्यपट विणला होता. त्या दोघांवाचून अन्य कुणालाही त्यांच्या प्रेमाचा सुगावा लागला नव्हता. त्या दोघांनी परस्परांत एकाही शब्दाची कधी देवाण-घेवाण केली नव्हती. जगातल्या कुठल्यासी प्रेमकथेपेक्षा ही प्रेमकथा वेगळी होती. पारिजातकाच्या फुलासारखी अत्यंत हळुवारपणाने ती प्रेमकथा फुलली होती आणि तितक्याच हळुवारपणाने तिची परिपूर्ती करण्याची संधी मला लाभली होती. साखरपुडयाचा साधा सोहळाही न होता राजा आणि सुलभा यांचे लग्न ठरले. मुहूर्त पक्का झाला. आमंत्रण-पत्रिका छापल्या गेल्या. राजाच्या घरात मायेचं माणूस कोणीच नव्हतं. दोन्ही घरची तयारी एका आमच्या घरीच सुरू झाली. सुलभेच्या आनंदाला तर पारावार नव्हता. प्रेमाच्या परिपूर्तीचे गीत ती अवघ्या अंगाने गात होती. एवढ्यात तिच्या कोवळ्या अंगात तो आनंद मावला नाही की काय कोण जाणे. तिला जरा कणकण भरल्यासारखे झाले. घरात तयार होत असलेल्या तेलकट तुपकटाचा आणि कार्याच्या धामधुमीचा त्रास तिला होऊ नये म्हणून चार दिवस तिला माझ्या मोठ्या भावाकडे नाशिकला पाठविली. मध्यंतरी राजा बिलकूल आला नाही. फक्त त्याची त्रोटक पत्रे येत राहिली. तोही सुलभाइतकाच प्रसन्न होता.

लग्नाला चार दिवस राहिले होते तेव्हा सुलभा परत आली. आली ती उंबऱ्यातच बसली. तिच्याने उभे राहावत नव्हते. साऱ्या लगीनघरात धावपळ सुरू झाली. डॉक्टर आले. सुलभाच्या कानाला खूप ठणका लागला होता. डॉक्टरांच्या मनी काय आले कुणास ठाऊक. ते म्हणाले, ‘ हिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये हालवा. ’

ज्या परमेश्वराने हा एवढा मंगल योग जमवून आणला तो परमेश्वर तिला चार दिवसांत पुन: पहिल्यासारखे सुदृढ करील असें सर्वांनाच वाटत होते. लग्नाची तयारी झालीच होती. मुहूर्ताच्या आदल्या दिवशी एकाएकी जे घडू नये ते घडलं. सुलभा गेली. नानाला पुन: हुंदका आला. माझ्या छातीवर डोके

घुसळून तो पुनः रडू लागला. एकुलत्या एक बहिणीच्या आठवणीने त्याला झालेले दुःख मी आडविले नाही. त्याला परत मोकळा होऊ दिला. गहिवरलेल्या आवाजात तो पुढे सांगू लागला —

'सुलभा गेली हे राजाला मुळीच कळवलं नव्हतं. आपल्या वडिलांना घेऊन तो माझ्या घराच्या दाराशी आला. तुझ्या वहिनीने, आनंदीनेच दार उघडले. राजाला समोर पाहताच आनंदीचा स्वतःवरचा ताबा सुटला. ती मोठ्याने ओरडली, 'भावोजी, वन्सं गेल्या !'

राजाचे काय झाले असेल ते मला सांगवत नाही. त्याने हातातली बॅग फेकून दिली. एखाद्या लहान मुलासारखा धावत तो माझ्या आईजवळ गेला आणि तिला मिठी मारून वेड्यासारखा रडू लागला. त्यापूर्वी तो माझ्या आईशी मोकळेपणाने कधी बोलला नव्हता. त्या दिवशी त्याने आपले सारे भाव तिच्याजवळ मोकळे केले. सुलभा जिवंत असताना तो तिच्याशी कधी बोलला नव्हता. ती गेल्यावर मात्र त्याने मोठमोठ्याने टाहो फोडला.

नंतर चार वर्षे त्याने लग्न केले नाही. मी अनेकदा त्याला लग्न करण्याबद्दल लिहिलं. त्यानं उत्तर धाडलं नाही. वर-वधूसाठी आणलेल्या मुंडावळ्या अजून आमच्या घरी आहेत.'

'अजून लग्न नाही केलं त्यांनी ?'

'केलंय् ..त्याला मुलंही आहेत. त्याचा संसार सुखाचा आहे. अजूनही तो नेहमीसारखा माझ्या बिऱ्हाडी येतो, माझ्या मुलाबाळांचं कौतुक करतो. स्वतःची पत्नी आणि आपली मुलं यांच्याबद्दल तो चुकूनही बोलत नाही. माझ्या बहिणीचं आणि त्याचं लग्न झालं नव्हतं पण तो माझा मेव्हणाच आहे... मेव्हणाच आहे...'

नानाच्या त्या गोष्टीने माझा मेंदू भारावल्यासारखा झाला. रात्र बरीच झाली होती. काळोख वाढला होता. शांतता वाढली होती. समुद्राचा गूढ घोष दुरून ऐकू येत होता. त्या अंधारात पार्काभवती पसरलेली विजेच्या दिव्यांची माळ एकटक तेवत होती. आम्ही दोघे हलकेच उठलो आणि घराच्या दिशेने चालू लागलो.

नानाच्या बिऱ्हाडात अजून दिवे तेवत होते. वरती जाऊन राजाभाऊ ओगल्यांना भेटावे, आजवर त्यांच्याबद्दल करून घेतलेल्या गैरसमजांची मनःपूर्वक माफी मागावी यासाठी मी अधीर झालो होतो. वर गेल्यावर वहिनींनी सांगितले,

'राजाभावोजी आत्ताच गेले. त्यांची जीप आली होती. महाडला काही महत्त्वाचं सरकारी काम निघालंय्.'

सकाळच्या गाडीने पुण्याला जाताना मी ताजी वर्तमानपत्रे चाळीत होतो. माझ्या व्याख्यानाची इतिवृत्ते सर्व वृत्तपत्रांनी ठळक अक्षरांत छापली होती. जे अनुभवले होते तेच मी बोललो होतो. पण आज त्या अनुभवांच्या सच्चेपणा-बद्दल माझी मलाच खात्री नव्हती. मी ती इतिवृत्ते पुनः वाचली नाहीत. नानाने सांगितलेली ती कथाच पुनः पुनः माझ्या डोळ्यांसमोर साकारत होती. आगगाडी आपला मार्ग आक्रमीत होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७१५०१ वि: कादंबरी
क्रमांक १८९३ नों: दि: २८।३।७०

२

# बोलका शंख

नव्या दिवसाची पहिली ट्राम ठाकुरद्वार नाक्यावरून खडखडत निघून गेली, आणि झावबाच्या वाडीत मनू कुलकर्णी झोपेतून जागा झाला. अंगाखाली चटई आणि उशाखाली तक्क्या, एवढेच त्याचे अंथरूण होते. ते त्याने गोळा करून ठेवले. व्हरांड्यातील किडक्या खांबाला चिकटून बसलेले विजेचे बटन त्याने खाली केले, तेव्हा दहा मेणबत्त्यांचा प्रकाश व्हरांडाभर विरळ होत गेला. पलीकडच्या खोलीसमोर तोंडावर वर्तमानपत्र घेऊन निजलेले अंतोबा बापट जागच्या जागी हालले. अगदी शेवटच्या खोलीच्या दाराशी वेटोळे घालून निजलेले बांडे कुत्रे उगीचच भुंकले; पुन्हा गप्प झाले. अंथरुणाच्या दोन्ही अंगांना पडलेले कागद मन्याने गोळा केले. नेहमीच्या संवयीने, तेवढ्या अंधुक प्रकाशातही त्याने ते जमवले. निर्मितीला विटलेल्या एखाद्या अष्टपुत्रेने नव्या अपत्याला मनोमन शिव्या घालाव्यात, तशा त्याने त्या नव्या हस्तलिखिताला घातल्या. सारे कागद हातात जुळवून एकवार उगाचच पालटले. मग तो खांबाला टेकून उकिडवा बसला. त्या हस्तलिखिताच्या सर्व पानांवर त्याने क्रमांक घातले. त्याची घडी घातली. एका रात्रीत आपण पस्तीस पानांची ‘ लघुकथा ’ लिहिली, याचे त्याचे त्यालाच नवल वाटले. आपल्याला वाटत असलेले हे नवल आणखी कुणालाही वाटणार नाही, याचे वैषम्यही त्याच वेळी त्याच्या मनात डोकावून गेले. चिडचिडल्यागतच तो जागचा उठला, आणि दरवाजा ठोठावू लागला. खोलीचे

दार आतून उघडले गेले. दिवा लागला. भल्या पहाटेची वेळ असून देखील, आपल्या पत्नीच्या चेहऱ्यावर त्याला कसलाच ताजेपणा दिसला नाही. मन्याची अपेक्षा होती की, 'रात्रीची गोष्ट पुरी लिहून झाली का ?' असे तरी तिने विचारावे. पण तिने विचारले ते भलतेच :

'आज दुपारी गोप्याला ऑफिसात पाठवू का ? वसईवाला आत्ता येईल आणि बिलासाठी धरणं धरून बसेल.'

मन्याने तिला काहीच उत्तर दिले नाही. खोलीभर झोपलेल्या संततीकडे त्याने एक नजर टाकली आणि भिंतीच्या कडेकडेने तो सैंपाकघरात गेला.

'स्टोव्ह बिघडला आहे.' पुढचा संघर्ष टाळण्यासाठी त्याच्या पत्नीने आधीच खुलासा केला. 'रात्रभर बसून इतकी उत्तम साहित्यनिर्मिती केली आणि वेळेवर चहा देखील नाही !' असे तो शब्दावाचून पुटपुटला. झपाट्याने सैंपाकघरातून बाहेर आला. मघा टळलेला अपघात आत्ता टळू शकला नाही. बेडकीसारखे हातपाय पोटाशी घेऊन झोपलेले एक पोर एकदम किंचाळत उठून बसले.

'पाय दिलात वाटतं त्याच्या अंगावर ?' गृहलक्ष्मी ओरडली. मन्याने काहीच उत्तर दिले नाही. काखेतले हस्तलिखित त्याने टेबलावर फेकून दिले आणि तो खोलीबाहेर पडला.

एका पोराच्या रडण्याने दुसरे जागे झाले. सामायिक स्नानगृहापाशी पोचेतोपर्यंत तीन अपत्यांच्या रडण्याचे आवाज त्याच्या कानांवर तसेच आदळत राहिले. ती रडारड बायकोने कशी काय थांबवली, वसईवाल्याचा आणि तिचा तह कुठल्या अटींवर झाला, हे समजून घेणे त्याने बुद्ध्याच टाळले. कोलाहलाने जागे झालेले आपले मन त्याने पुन्हा साहित्यनिर्मितीच्या उद्योगात नेऊन सोडून दिले. रात्री लिहून संपविलेल्या गोष्टीतील स्वभावचित्रांबरोबरच तो फिरत राहिला. नळाच्या शिळ्या पाण्याला त्याने आपल्या उत्साहाने ऊत आणला आणि सुस्नात अवस्थेत उजाडता उजाडता तो परत खोलीत आला. सामायिक स्नानगृहाच्या 'रांगांच्या राज्यात' मधला वेळ त्याने स्वतःशीच बोलत घालविला होता.

बैठकीच्या खोलीत अंथरुणे तशीच अस्ताव्यस्त पडली होती. रडणाऱ्या तिन्ही तोंडांनी सैंपाकघरात बसून चहा पिण्याला प्रारंभ केला होता. मन्या आत आल्याचे सरितेला कसे कळले कोण जाणे, वाफ निघत असलेला चहाचा कप घेऊनच ती

बाहेर आली. ' दुःस्थितीतही पतिसेवेत कसूर न करणाऱ्या त्या पतिव्रतेला आता एक नवीन पातळ घेतले पाहिजे ' असे मन्याला वाटले. तिच्याबद्दल इतका चांगला विचार त्याच्या मनात येऊनही त्या माउलीने मात्र टेबलावर कपबशी ठेवताना ती आपटण्याचाच आविर्भाव केला. काल रात्री लिहून झालेल्या कथेबद्दल तिने काहीही विचारपूस केली नाही. सैंपाकाच्या खोलीतून, बहुतेक मधल्याचाच कर्णा पुन्हा वाजू लागला आणि चडफडतच ती तिकडे धावली.

चहाचे गरम घोट घेता घेता मनोहर आपण लिहिलेली गोष्ट पुनः पुन्हा वाचू लागला. स्वतःच्या निर्मितीच्या कौतुकात त्याला आतील आरडाओरडा ऐकू येईनासा झाला. किती अप्रतिम लिहिले होते त्याने! जगाच्या वाङ्मयातील दहा उत्तम लघुकथांपैकी एक काल रात्री त्याने जन्माला घातली होती. पण तसे कोणी म्हणणार नव्हते, कोणी छापणार नव्हते, संपादक, टीकाकार, वाचक आणि प्रकाशक त्याच्या दृष्टीने सारे एकाच माळेचे मणी होते. घरची, दारची, बाहेरची, सारीच माणसे त्याच्यावर अन्याय करीत आली होती. त्याचे अभिजात वाङ्मय कधीच कोणी पारखले नव्हते. ते कधीच कोणाला कळले नव्हते. कळून घेण्याची कुवतच त्यांच्या बुद्धिमत्तेत नव्हती.

आपल्या घराण्यात एक युगप्रवर्तक साहित्यिक जन्माला आला आहे हे त्याच्या बापाला कळले नव्हते, आईला समजले नव्हते, की भावंडांना उमजले नव्हते. एका महान कथाकाराशी आपले जन्माचे नाते जडले आहे, हे सत्य दुर्दैवी सरितेच्याही ध्यानी आले नव्हते. एका श्रेष्ठ वाङ्मयकाराचे आपण भाग्यवान् वंशज आहोत, याचा पत्ता त्याच्या प्रजेला लागला नव्हता. कधी काळी त्यांना तसा पत्ता लागेल, अशीही आशा मन्याला वाटत नव्हती.

मन्याच्या मनाचे हे दुःख चिरंतन होते. त्याला कधीच शेवट नव्हता. त्याच्या प्रपंचाच्या पसाऱ्याची मोजदाद शिरगणतीच्या वेळी तरी झाली होती; पण त्याच्या वाङ्मयीन कार्याचा आढावा अद्यापी एकाही नियतकालिकाने घेतला नव्हता. त्याला कोणी ओळखलेच नव्हते.

कपातला चहा संपेतोपर्यंत, निर्मितीच्या आनंदातून त्याने ही अवहेलना उणी टाकली. शून्याएवढीच शिल्लक हाती लाभल्यावर त्याने टेबलाचा खण खस्सकन् उघडला, आणि ते हस्तलिखित त्यात कोंडून टाकले. कुणाशी काहीच न बोलता

आपले नाक चुरगाळीत तो बसल्या जागीच बसून राहिला. अखेर गोपू शाळेत जायला निघाला, तेव्हा त्याच्या थकलेल्या फीचा प्रश्न ‘ अत्यंत निकडीचा ’ म्हणून पत्नीने त्याच्यापुढे मांडला.

‘ शाळा बंद कर त्याची ! ’ एवढेच उत्तर मन्याने दिले. अंगात फाटके कपडे आणि गळ्यात विटकी पिशवी अडकवून ते बारा वर्षांचे पोर शाळेत निघून गेले. मग मात्र कामावर जायची वेळ होईपर्यंत कसलीच तक्रार मन्यापुढे आली नाही. बायकोचे तोंड उघडले नाही. बारक्या पोरांच्या बडबडीकडे त्याने लक्ष दिले नाही. वचावचा चार घास खाऊन त्याने चर्नीरोड स्टेशन गाठले आणि नेहमीची लोकल पकडली.

तिसऱ्या वर्गाच्या डब्यात भेटलेल्या एका चोखंदळ वाचकाने नकळत त्याच्या जखमेवरची खपली काढली. त्याचे तोंड सुटले : ‘ मराठी भाषेत लघुकथा-लेखनाचे तंत्र कोणालाच कळले नाही. हरिभाऊ आपट्यांपासून गंगाधर गाडगिळांपर्यंत साऱ्यांनी योजनापूर्वक आपली स्तुती करून घेतली. टीकाकार आणि लेखक एक-मेकांत मधून आपली नावे करून घेतात. मराठीत आजवर जन्माला आलेले कथावाङ्मय आपल्या दोन लघुकथांच्या वजनाएवढेही नाही...’ अशा अर्थाची अनेक बेजबाबदार विधाने मन्या त्वेषाने करीत राहिला. चर्चगेट स्टेशनपर्यंत तो एकटाच बोलत होता. त्याच्या वाणीचा बांध फोडणारा रसिक शेवटपर्यंत तो वाक्प्रवाह नुसता पाहात राहिला. सभा जिंकल्याच्या आविर्भावातच मन्या चर्चगेटवर उतरला. उतारूंच्या लोंढ्याबरोबर वाहत असताना, आपले व्यक्तिमत्त्व या सर्वांहून वेगळे आहे, असे तो स्वतःलाच गर्वाने बजावीत राहिला.

मधल्या वाटेने, फेरोजशहा मेथा रोडवरच्या आपल्या ऑफिसपर्यंत जाईतो तो दोन-तीनदा साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष झाला. आपले चार-दोन ग्रंथ त्याने इंग्रजी भाषेत लंडनमध्ये प्रकाशित करून टाकले ! रस्ता ओलांडताना, उगीच अडवणूक करणाऱ्या एका सुंदर मोटार-गाडीवर त्याने आपली भविष्यकालीन मालकी कायम करून टाकली. अडणीवरच्या शंखागत खाटेवरच बसून राहिलेल्या ऑफिसच्या पठाणाला त्याने आपली पोरे संभाळण्यासाठी नोकरीला ठेवले.

—आणि धाड्धाड् जिना चढत तो आपल्या चालू आयुष्यात येऊन पोचला.

त्याच्या शेजारीच ' टेबल ' असलेल्या तपकिरी जोश्याने तोंड उघडले नसते, तर आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या कैफातून बराच वेळ तो बाहेर आला नसता. जोश्याने त्याला भलतीच बातमी सांगितली. सर्वोत्तम लघुकथांच्या पुस्तकासाठी मुंबई सरकारने ठेवलेली बक्षिसे कुणाकुणाला मिळाली, त्यांची क्षुद्र नावे त्या कारकुंड्याने उच्चारली आणि मन्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. साहित्यिकां-इतकाच तो सरकारवरही चिडला. ' या देशातील प्रांत-सरकारांनासुद्धा आपल्या वाङ्मसेवेचे मूल्य कळू नये ' याचे त्याला असह्य दुःख झाले. गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेले आपले एकच एक पुस्तक, प्रकाशकाच्या बालिश हट्टासाठी त्याने सरकारी बक्षिस-समितीकडे पाठविले होते. ' परीक्षेला बसण्याइतका मी लहान नाही. ' असे तीनतीनदा त्या प्रकाशकाला बजावायलाही तो विसरला नव्हता. आपल्याला बक्षीस मिळणार नाही, हे त्याला माहीत होते. आणि तरीही जोश्याने दिलेल्या बातमीने त्याचे मस्तक भडकले होते.

महाराष्ट्रातले वाचक, टीकाकार आणि मुंबईचे प्रांतिक सरकार या सर्वांची निर्बुद्धता त्याला जोश्याच्या कळकट चेहऱ्यावर दिसू लागली. आपण ऑफिसात आहोत, याची त्याला शुद्ध राहिली नाही. त्या जोश्याला त्याने अगदी आडवा-उभा घेतला. एखाद्या व्याख्यात्याने पूर्वी पाठ केलेले भाषण अस्खलितपणे बोलत राहावे, तसा तो जोश्याच्या तोंडावर बोलत राहिला. आपल्या लिखाणाची अभिजात वैशिष्ट्ये, साहित्यनिर्मितीची मूल्ये, त्यांचे निकष इत्यादी अनेक विषयांवर त्याची वाणी अखंडपणे कडाडत राहिली. धावून दमलेले कुत्रे दमून एका जागी बसावे, तसा तो शेवटी आपल्या खुर्चीत बसला. कुत्र्याच्या जिभे-सारखा त्याचा संताप मात्र तोंडातल्या तोंडात लळलळतच राहिला.

चेहऱ्यावरच्या राखी रंगाला एकही सुरकुती न पाडता दात विचकीत तपकिरी जोशी म्हणाला, ' नुसता ' बोलका शंख ' आहेस झालं ! ' त्याच्या या शेऱ्यावर मन्या काही बोलला नाही; जागच्या जागी धुमसत राहिला, रागाने गुदमरत राहिला.

तशातच दुपारच्या डाकेने त्याच्या वडिलांचे एक पत्र आले. त्या पत्राने मन्याच्या डोक्यात जणू घासलेटचा डबा उपडा झाला. त्याच्या मस्तकाची आग आणखी भडकली. कोकणात म्हातारी आई आजारी होती. औषधपाण्यासाठी मन्याने तिला मुंबईला घेऊन जावे, अशी वडिलांची मागणी होती. मुंबईच्या

घरात अठरा विश्वे दारिद्य होते, अन् त्यात हे एकोणिसावे विश्व आगवी दाणादाण पेरणार होते !

आई, बाप, बायको, पोरे-कुणाकुणाचीच पत्रास मन्याला उरली नव्हती. त्याच्या घशातला शंख खोल पाण्यात गुदमरला होता. छाती फुटेतोपर्यंत तो त्याला फुंकत होता. त्यातून आवाज उमटत नव्हता; एखादा बुडबुडा देखील पाण्याच्या पातळीवर येत नव्हता !

ऑफिसची नित्याची वेळ संपेपर्यंत त्याने तसाच कढ काढला. नेहमीचे काम यांत्रिकपणाने करून टाकलें. साडेपाच वाजायच्या आधीच तो उठला, आणि जोश्याला देखील न विचारता बाहेर पडला.

'माझ्यावर भयंकर अन्याय झाला आहे !' असे रस्त्यारस्त्यातून ओरडत सुटावे, अन्यायाच्या चिडीसह एखाद्या वाहनाखाली चिरडून मरून जावे, असे त्याला वाटले. त्याचे शरीर सवयीने चालत राहिले. वाणीचा शंख काही केल्या वाजला नाही.

झावबावाडीतल्या राम-मंदिराजवळ आपण कशासाठी आलो, हे त्याला कळले नाही. आल्या पावली तो तिथून परत फिरला. उथळ जगाच्या सान्निध्यातही आपली अथांगताच गर्जून सांगत राहणाऱ्या समुद्राने त्याला आपल्याकडे बोलावले.

काळोख किट्ट पडेपर्यंत तो चौपाटीवर भटकत राहिला. चौपाटीवर हिंडणारी माणसे त्याला कळसूत्री बाहुल्यांसारखी थिटी वाटली. त्यांचा गजबजाट नव्या रुपयाच्या आवाजासारखा 'बद्द' वाटला. तो त्यांच्यात मिसळला नाही; वेगळे-पणाने भटकत राहिला.

समुद्रकाठची अथांग वाळू आपल्या पायांनी अकारण विस्कटून मानवाची पिल्ले आपापल्या खुराड्यात गेली. जळत राहिलेले दिवे, घोंघावणारा समुद्र आणि अथांग शांतता, एवढीच समुद्रकिनाऱ्यावर उरली. दोन्ही बाजूंना दिवे असलेल्या डांबरी सडकेवरून मन्याने शंभर फेऱ्या मारल्या. डोक्यात जाळ घेऊनच धूमकेतूसारखा तो फिरत राहिला. दिवस आणि रात्र यांची पारडी असलेला काळाचा तराजू जवळजवळ एका रेषेत आला. उजाडायला आले. मन्याने मनाचा पुरा निश्चय केला. अस्तित्व संपवून टाकण्याच्या निश्चयाने तो त्या घोंघावणाऱ्या अथांगतेकडे त्वरेने निघाला. एवढ्यात त्याच्या डोळयांना कुणीतरी

अडवले. बाजूच्या वाळवंटात एक पांढरी वस्तू उठून दिसली. त्या शेवटच्या क्षणीही मानवसुलभ औत्सुक्याने त्याचा गतिरोध केला. तो त्या वस्तूजवळ गेला. निरखून खाली पाहू लागला. त्याच्या औत्सुक्याने त्याच्या आधीच आत्महत्या केली. वाळूत उठून दिसणारी ती वस्तूही क्षुद्र होती, पोकळ होती.—तो एक भला मोठा शंख होता. मुक्तीचा मार्ग अडविणाऱ्या मोहविषयावर एखाद्या योग्याने लाथ मारावी, तशी मन्याने त्या शंखाला लाथ मारली !

'ए ऽ ऽ ! लाथ काय मारतोस ? मी काय तुझ्या वाटेवर पडलोय् ?' वाळूतून आल्यासारखा आवाज आला. मन्याने चमकून आजूबाजूला पाहिले. कुठे कुणीच नव्हते. त्याच्या पायाने दूर गेलेला शंख एवढ्यात गडबडत त्याच्या पायांजवळ आला. त्या गडगडण्याच्या लयीतच, फिदीफिदी हसणे देखील त्याच्या कानांवर आले.

'कोण हसतंयू ते ?' मन्या जोरात ओरडला.

'मी !' शंखातून आवाज आला.

'शंख !' मन्याने आश्चर्यातिरेकाने विचारले.

'हो, तुझ्यासारखाच मी देखील एक बोलका शंख आहे !'

—चेंडूसारख्या जागच्या जागी दोन-चार उड्या घेत तो शंख बोलला. मन्या मटकन् खाली बसला. नळराजाने राजहंस धरला असेल तितक्या अलगदपणे त्याने तो पांढरा शुभ्र शंख हातात धरला.

'खरंच, तू बोलतोस ?' मन्याने भांबावून विचारले.

'मग ?' शंखातून आवाज निघाला, 'तुझी काय कल्पना आहे ? तुला माहीत आहे तेवढंच जग आहे ? सर ऐझॅक न्यूटनचं ज्ञान देखील एका वाळूच्या कणाएवढं नव्हतं. मग तू कोण ?' मन्याच्या डोक्यातील आगीवर हस्तनक्षत्र कोसळले. तो एकदम थंडगार झाला. हातातल्या शंखाचे टणक पंख तो पुनः पुन्हा कुरवाळू लागला. त्याचे हात थंडगार पडले. शंखाच्या स्पर्शाने त्याला सजीवतेची उष्णता भासू लागली.

'तू इथं का पडला होतास ?' बोबडी अक्षरे मोठ्या कष्टाने सुस्पष्ट करीत मन्याने विचारले.

'तुझ्यासाठी !'

शंखाच्या त्या उत्तराने मन्याला सरितेच्या जुन्या सादाचे स्मरण झाले.

‘ माझ्यासाठी ? ’ त्याच्याही आवाजात मार्दव आले, प्रेमळपणा आला.

‘ हो. ’ चोचीकडील भाग मन्याच्या हनुवटीजवळ नेत शंख बोलू लागला, ‘ तू त्रासला आहेस, चिडला आहेस, हे सारं मला माहीत आहे. तुझा आत्महत्येचा विचार मूर्खपणाचा आहे. तुला कोणी ओळखलं नाही हीच तुझी तक्रार आहे ना ? अरे शतमूर्खा ! परमेश्वराला देखील अजून जगात कुणी ओळखलं नाही, म्हणून काय तो जगातून निघून गेलाय् ? ’

शंखाच्या या यक्षप्रश्नाला उत्तर देणे मन्याला साधले नाही. तो उकिडवा बसला होता, तो चांगला ऐसपैस मांडी घालून बसला. त्या बोलक्या शंखाला त्याने मांडीवर घेतले. मांडीवर घेतलेल्या बोबड्या पोराचे बोल आदिमाता जितक्या आनंदाने ऐकत राहील तितक्या आनंदाने तो त्याचे बोलणे ऐकू लागला. शंख म्हणाला, ‘ मन्या, मी नुसता बोलका शंख नव्हे. मला भूत-भविष्याचे ज्ञान आहे. जगात घडलेल्या यच्चयावत् गोष्टी माझ्या स्मरणात आहेत. पुढं, अनंत कालपर्यंत घडत राहणाऱ्या घडामोडींचं मला आगाऊ ज्ञान आहे. ’

कामधेनू, चिंतामणी, कल्पवृक्ष या साऱ्याच सांकेतिक कल्पना मन्याला माहीत होत्या. या शंखाच्या लाभाने जगातले सारेच ज्ञान त्याच्या हाती आले होते. आनंदाचा ठेवाच हाती सापडल्यामुळे दुःखाचा आठव करण्याचे काहीच प्रयोजन उरले नव्हते.

‘ तू माझ्या घरी येशील ? ’ शंखाच्या चोचीचे आत्यंतिक आत्मीयतेने एक चुंबन घेत मन्याने विचारले.

‘ अलबत् ! ’ शंख म्हणाला.

मन्याच्या आनंदाला पारावार राहिला नाही. शंखाला काखेत धरून तो उठून उभा राहिला. वाळूतून चालू लागला. नुसता साखऱ्याच चावून खाताना, आपल्याच दातांचा आवाज आपल्या कानांना ऐकू येतो, तसा स्वतःच्या पावलांचा आवाज त्याला ऐकू येऊ लागला. त्या गोड अनुभूतीने बोलक्या शंखाच्या आवाजाचा गोडवा सतालपणे मुखरित झाला :

‘ तुजसंगे मी गेही येईन
तुला मनातिल गूजे सांगिन

तुझ्याचपुरती माझी वाणी
अन्यांच्या ना पडेल कानी... '

' हो ! हो ! हो ! ' त्याच्या सताल करारावर मन्याने त्रिवार बोलांची स्वाक्षरी केली. तो अद्‌भुत बोलका शंख काखेत घेऊनच मन्या घराकडे निघाला. मग त्याच्या पावलांना अनिरुद्ध वेग आला. नव्या सूर्याच्या प्रकाशाबरोबर मन्या घरी आला, तेव्हा त्याला घरचे वातावरण एकदम प्रसन्न दिसले. त्याची तिन्ही पोरे एकमेकांपासून दूर बसली होती; आपापल्या जागी आनंदात होती. गोपू काही वाचीत होता. गोंद्या काही लिहीत होता. छोटा छब्या टेबलावर बसून कागदांची नाव करीत होता. मन्या दारातून आत येताच ती तिघेही एका जागी जमा झाली आणि टाळ्या पिटीत समाईक स्नानगृहाकडे पळाली.

' आई, आई ! अण्णा आले ! अण्णा आले ! ' असे त्यांचे धावते आनंद-गीत मन्याच्या कानांवर आले. शंखाला हातावर घेत तो सैंपाकघरात आला, तेव्हा सारे सैंपाकघर सुगंधित झाल्याचे त्याच्या लक्षात आले. कोपऱ्यातल्या देव्हाऱ्यासमोर एक उदबत्ती जळत होती. देव्हाऱ्यापुढच्या आरतीतली नीरांजने तेवत होती. देवमूर्तींच्या शरीरांवर प्राजक्ताच्या फुलांचा ढीग दरवळत होता. मन्या त्या देव्हाऱ्याजवळ गेला. त्याच्या हातातला शंख जणू आपण होऊन देव्हाऱ्यावर जाऊन बसला. मन्याला वाटले, प्राजक्ताची रास तिप्पट मोठी झाली. कधी नव्हे ते, हसत हसत सरिता दारातून आत आली. तिने झटपट स्टोव्ह पेटवला. चहाला आधण ठेवले. अत्यंत प्रेमळ आवाजात मन्याला ती म्हणाली, ' काल रात्रभर आम्हांला झोप आली नाही. इतकं काय रागवायचं माणसांनी ? '

बायकोचे ते शब्द ऐकून मन्याला नाचावेसे वाटले; पण तो नाचला मात्र नाही. दारिद्र्याच्या काचाने हळवी आणि भाविक झालेली आपली पत्नी कसलीही शंका घेणार नाही अशा आवाजात त्याने एक लघुतम कथा रचीत रचीतच तिला निवेदन केली :

' ऑफिसातला एक मित्र रात्री मला एका साधुमहाराजांकडे घेऊन गेला. ते महाराज गोरेगावला राहतात. त्यांचं वय एकशेअकरा वर्षांचं आहे. मला पाहताच त्यांनी माझ्या नावानं हाक मारली. तुझी आणि मुलांची चौकशी केली. आश्चर्यानं मी त्यांचे पाय धरले. प्रसाद म्हणून त्यांनी एक शंख हाती दिला. तो

पाहा, तो संताचा प्रसाद मी तुझ्या देव्हाऱ्यात ठेवला आहे. तुझ्यासारखीच मी सकाळ-संध्याकाळ त्याची पूजा करणार आहे. '

नवऱ्याच्या स्वभावात झालेल्या या आकस्मिक बदलाने सरिता भारावून गेली. मुले व्हायच्या आधी वागत होती तितक्या प्रेमाने ती त्याच्याशी वागू लागली. सकाळ-संध्याकाळ त्याच्यासाठी पूजेचे मांडू लागली. मनोहरही ओले नेसून तास तास त्या बोलक्या शंखापुढे बसू लागला. पूजेला बसताना सैंपाकघराचे दार आतून बंद करून घेण्याचा त्याने परिपाठ पाडला. पूजेच्या वेळी आतून ऐकू येत असलेला आपला आवाज ' आत्मनिवेदन ' नावाचा भक्तीचाच एक प्रकार आहे, असे त्याने बायकोच्या गळी उतरवले.

एके दिवशी सकाळी शंखाने मनोहरला सांगितले, ' तुला वीस रुपये पगार वाढणार आहे. ' दुपारी तसे घडले. मनोहरला शंखाच्या दैवज्ञ शक्तीची खात्री पटली. आईच्या आजाराबाबत त्याने शंखाला शंका विचारली. शंखाने दिलेले प्रत्युत्तर विश्वासपूर्वक त्याने आपल्या पत्नीला सांगितले : ' आई मुंबईला येणार नाही डॉक्टर असलेला मावसभाऊ तिला मिरजेला घेऊन जाईल आणि तिथं तिची तब्बेत खणखणीत बरी होईल. '

सासूबाईंच्या बाबतीत मनोहरने सांगितले अगदी तसेच घडले. तेव्हा आपल्या नवऱ्याला दैवी साक्षात्कार झाल्याची द्वाही सरितेने साऱ्या वाडीभर फिरवली. वाडीतल्या बायका रोजच्या रोज तिला नाना प्रश्न विचारू लागल्या. ती ते प्रश्न आठवणीने मनोहरला सांगू लागली. शंखाकडून मिळालेली उत्तरे तो तिच्या ओटीत टाकू लागला. हळूहळू या प्रश्नोत्तरांबद्दल सरिता थोडे शुल्क स्वीकारू लागली. कुलकर्णी कुटुंबात आर्थिक स्वास्थ्य नांदू लागले. गोप्याची फी अडेनाशी झाली. वसईवाल्याचे हल्ले कायमचे बंद झाले. बैठकीच्या खोलीत नवे कोच, खुर्च्या आल्या. मनोहरच्या लिहिण्याच्या टेबलावर पुष्पपात्रे सजू लागली. व्हरांड्यातील त्याची शय्या जमिनीपासून उंचावली गेली. दिवसभर एक लोखंडी कॉट अंग मुडपून भिंतीशी उभी राहू लागली; रात्री व्हरांड्यात विस्तारू लागली. थकलेल्या मनोहरला जाळीदार मच्छरदाणी पांघरूण घालून जोजवू लागली. पोरांच्या कपड्यांवरची ठिगळे लोप पावली. कपड्यांबरोबर पोरांचे चेहरेही नवे आणि टवटवीत दिसू लागले. सरितावहिनींनी सांगितल्याबरहुकूम बापट आणि

मंडळींनी प्रकाशित केलेली पुस्तके सरकारी बुक कमिटीने मंजूर केल्यापासून अंतोबा बापटही मनोहरशी अदबीने वागू लागला.

' तुम्ही घोरता फार ! ' हे त्याचे टुमणे आता नाहीसे झाले. त्या टुमण्याची जागा, ' तुम्ही खूप लिहिले पाहिजे, ' या नव्या टुमण्याने घेतली.

वाङ्मयीन आयुष्यातील मुस्कटदाबी आर्थिक सुस्थितीमुळे मनोहरला सुसह्य होऊ लागली. साहित्यिकांना शिव्या घालण्याचा त्याचा उद्योग मात्र सतत चालूच राहिला. सुस्थितीमुळे विद्यमान टीकाकारांच्या विरुद्ध सदैव चालू असलेली त्याची बडबड अधिक कडवी झाली. आपल्याला साहित्यात श्रेष्ठता केव्हा मिळेल, हा प्रश्न त्याने बोलक्या शंखाला हजार वेळा विचारला, पण प्रत्येक वेळी उत्तर आले, ' आस्ते कदम, आस्ते कदम ! '

त्या दिवशी सकाळी मनोहर असाच शंखापुढे बसला होता. मुलांच्या मास्तरीणबाई बाहेर त्यांची शिकवणी घेत होत्या. सकाळी सकाळीच दारावर आलेल्या चिनी फेरीवाल्याकडून सरिता काही रेशमी कापड खरेदी करीत होती तिने रात्री सांगून ठेवलेले प्रश्न शंखाला विचारण्यासाठी मनोहर ते मनातल्या मनात आठवीत होता.

देव्हाऱ्यातला शंख एकाएकी शहारला. नुकतीच वाहिलेली फुले देव्हाऱ्याबाहेर फेकली गेली. मनोहर आश्चर्याने पाहू लागला. शंखाच्या चोचीतून रक्त उमटले. घाबरलेल्या मनोहरने पुढे वाकून आपले दोन्ही हात त्याच्या पंखांवर ठेवले, आणि बावरा प्रश्न केला,—

' आज असं का ? '

' तुझ्या ऑफिसात गडबड होणार आहे. '

' कसली ? '

' मालक बदलणार आहे, नोकर तेच राहणार आहेत. '

' म्हणजे ? '

' कळेल लवकरच. तुला चिंता नाही. '

मनोहरने पुढे काही विचारले नाही. बावऱ्या औत्सुक्याने काय घडते त्याची तो वाट पाहात राहिला. पंधरा दिवसांच्या आत बोलक्या शंखाचे म्हणणे खरे झाले. सर्व विमा-व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झाले. जुनी मॅनेजिंग एजन्सी

कोपऱ्याला बसली. कंपनीची मालकी सरकारकडे गेली. मनोहरची नोकरी मात्र बचावली.

शुभ वार्ता आणि ज्ञान सांगणारा बोलका शंख हळूहळू अशुभ घटनाच आगाऊ सांगू लागला. धडधाकट तपकिरी जोश्याचे मरण शंखाने सांगितले. तेव्हा मात्र मनोहरचाही त्याच्यावर विश्वास बसला नाही. शंखाची शक्तीच कमी झाली असावी असा संशय मनात घेऊनच तो ऑफिसात गेला मधल्या वेळी ऑफिसशेजारच्या मद्रासी उपाहारगृहात जोडीने काळी कॉफी पीत असताना त्याने तपकिरी जोश्याचा चेहरा पुनः पुन्हा न्याहाळला. मरणाची पुसट छाया देखील त्याला त्याच्या चेहऱ्यावर आढळली नाही. शंखाने केलेले भविष्य त्याने घशातल्या घशात गिळून टाकले. जोश्याच्या डबीतील ‘ वर्तकी ’ आपल्या नाकपुडीत कोंबली. चारदोन जबरदस्त शिंका काढल्या. बोलत बोलतच ते दोघे कंपनीच्या इमारतीशी आले. वरून खाली उतरणाऱ्या पट्टेवाल्याने ‘ साहेब जोशीची आठवण करीत असल्याचा ’ निरोप सांगितला. अंगाचा बोजा आवरीत जोशी त्वरेने जिना चढू लागला. चढता चढता कुठेतरी त्याचा पाय घसरला आणि तो खाली आपटला. त्याच्या पाठोपाठ मन्याही धावला. त्याने त्याला उठवण्याचा प्रयत्न केला; पण तपकिरी जोशी उठला नाही, हालला नाही, बोलला नाही ! त्याचे अंग थंडगार झाले !

जोश्याच्या बाबतीतील भविष्य खरे झाल्यामुळे मन्याला बोलक्या शंखाची भीती वाटू लागली. तो त्याला प्रश्न विचारीनासा झाला. पूजेच्या वेळी तो हमखास मौन धरू लागला. त्याच्या मौनाने शंखाचा स्वभाव थोडा बदलला. एके दिवशी आपण होऊनच शंखाने ओरडून मन्याला सांगितले,—

‘ तुझी आई मेली ! ’ मन्या थक्क झाला; पडताळा पाहू लागला. दुपारच्या डाकेने वडिलांचे पत्र आले. मनोहरची आई खरोखरच मेली होती !

मनोहरला नको असलेल्या गोष्टी सांगत राहण्याचा शंखाने सपाटा चालविला आणि मनोहरला जगणे अशक्य झाले. तशात एकदा त्या शंखाने सांगितले, ‘ तुझा गोपू आज मरेल ! ’

त्या भीषण भविष्यज्ञानासरशी मनोहर देव्हाऱ्यापुढून उठला. सैंपाकघराचे दार त्याने खाडकन् उघडले. घाबरटपणाने घसा खरवडून त्याने ‘ गोपू, गोपू, गोपूऽ !— ’ अशा हाका मारल्या.

' गोपूला मी मार्केटात पाठवलं आहे. ' सरितेने सांगितले. अंगावरचे ओले वस्त्र न बदलताच मन्या सैंपाकघरातल्या सैंपाकघरात फेऱ्या मारीत राहिला. घडणार होते ते टळले नाही. तासाच्या आताच शेजारच्या बापटांच्या घरातली टेलिफोनची घंटा खणखणली. गोपूला अपघात झाल्यची वार्ता बापट-वहिनींनी घाबऱ्या घाबऱ्या सरितेला येऊन सांगितली. मनोहरने आपले कपाळ सुजेतोपर्यंत बडवून घेतले. सारे घर इस्पितळाकडे धावले. त्या कोवळ्या पोराचा छिन्नविच्छिन्न देह पाहताच सरितेची दातखिळी बसली.

पोरगा गेला तो गेलाच, बायकोने अंथरूण धरले. मन्याला वेड लागायची पाळी आली. असह्य त्वेषाने तो देव्हाऱ्यासमोर आला. डोळे विस्फारित करून त्या शंखावर वाकला. पुन्हा उठला. सैंपाकघराचे दार त्याने आतून दडपून घेतले. बाहेर बायको कण्हतच होती. तिचे मरण देखील हा नतद्रष्ट शंख एक दिवस सांगणार, असा विचार मन्याच्या मस्तकात गरगरला. त्याचा त्वेष शतपट वाढला. तो पुन्हा देव्हाऱ्याजवळ येतो न येतो, एवढ्यात तो शंख देव्हाऱ्यातून खाली उतरला. त्याच्याकडे संताप आणि तिरस्कारयुक्त लाल दृष्टीने पाहात मन्या ओरडला, ' निघालास ? जा ! टळ इथून ! '

देव्हाऱ्याखालून परत देव्हाऱ्यात उडी घेत तो शंख खदखदून हसला. त्याच्या हसण्याने मन्याचे डोळे भरून आले. गळा दाटला.

' हसतोस का ' ? मन्या ओरडला.

' मी असा जाणार नाही. ' शंख शांतपणे बोलला.

' निदान बोलू तरी नकोस ! ' असह्यपणे रडवेल्या स्वरात मन्या म्हणाला.

' मला कुणीतरी फोडल्याशिवाय माझी वाणी बंद होणार नाही ! ' शंखाने आपली ' गोम ' सांगितली.

' मी फोडून टाकतो तुला ! ' मन्या पुढे धावला. त्याने देव्हाऱ्यातल्या शंखाला हात घातला.

' सबूर ! ' शंखाचा तो शब्द जणू मन्याच्या हातांना पोळला. त्याने हात मागे घेतले. पाणावल्या डोळ्यांनी तो त्याच्याकडे बघत राहिला.

' माझी वाणी नाहीशी होईल; पण ती एकटी नाहीशी होणार नाही. बरोबर तुझीही वाणी घेऊन जाईल ! ' शंखाने शांतपणे सांगितले.

'म्हणजे ?' मन्या ओरडला. शंखाच्या वक्तव्याचा त्याला अर्थबोध झाला नाही.

'म्हणजे—' 'जे' चा उच्चार दुप्पट जोराने करून तो शंख तितक्याच शांतपणाने पुढे म्हणाला, 'मी फुटलो की तू मुका होशील.'

मन्याला चक्कर आली. तो मटकन् खाली बसला. सारे सैंपाकघर त्याच्या भोवती गरगर फिरू लागले. मुलांची किंचाळणी, पत्नीचे कण्हणे शतपट मोठे झाले. त्याच्या कानठळ्या बसल्या. मस्तकाचे लोखंड झाले.

पुढे चार दिवस मन्याने सैंपाकघरात जाण्याचे टाळले. सरितेच्या उशाशी तो अबोल बसून राहू लागला. तिचे औषधपाणी बघू लागला. शेजारच्या बापटवैनी धाकट्या दोन मुलांना जेवू-खाऊ घालू लागल्या. मुलाच्या आकस्मिक मृत्यूने बधिर झालेल्या शेजाऱ्याला सारेच वाडीकर मदत करू लागले. मन्याच्या सैंपाकघरातील शेगडी, स्टोव्ह बिलकुल पेटेनासा झाला.

सरितेचा ताप विलक्षण वाढला. अगदी मध्यान्हीच्या वेळी उशाशी पेंगणाऱ्या मनोहरला तिने आर्त हाक मारली. मन्या खडबडून जागा झाला.

'पाणी!—' सरिता म्हणाली.

अभावितपणाने मन्या जायला नको होते तिथे गेला! सरितेच्या उशागती असलेला तांब्या रिकामा होता, म्हणून त्याला सैंपाकघरात धावावे लागले. त्याने आत जाऊन विजेचा दिवा लावला. तो नळ सोडून तांब्या भरणार इतक्यात शंखाचा आवाज आला,— 'तुझी बायको –'

मन्याच्या हातून तांब्या मोरीत पडला. त्याचा कर्णकटू आवाज झाला. त्याने आपले दोन्ही कान दोन हातांनी करकचून झाकून घेतले. संतापानेच तो मागे वळला. कसलाही विचार न करता त्याने तो शंख पकडला. त्याच्या तोंडाकडील भागावर त्याने आपला हात रोवला. ओकारी आलेला माणूस तोंड दाबून मोरीकडे धावतो, तसा तो मोरीकडे धावला.

तो नतद्रष्ट शंख त्याने मोरीतल्या फरशीवर जोराने आपटला. शंखाने एक भयंकर किंकाळी मारली. त्याचे तुकडे तुकडे झाले.—मन्याच्या तणावलेल्या नाड्या किंचित् सैल झाल्या त्याला. सरितेची आठवण झाली. तांब्या भरून घेऊन तो बाहेरच्या खोलीत आला. सरिता धडपडत उठून बसली होती.

‘ काय झालं ? ’— तिने कण्हत कण्हत विचारले.

मन्याने तोंड उघडण्याचा प्रयत्न केला. त्याच्या तोंडातून शब्द फुटेना. तो हैराण झाला होता. त्याची वाचा गेली होती.

शेजारीपाजारी धावले. दुःखांनी गांजलेल्या कुलकर्णी कुटुंबासाठी साऱ्यांनीच खस्ता खाल्ल्या. सरिता वाचली. मनोहर मात्र जन्माचा मुका झाला ! त्याच्या त्या अवस्थेने विमा कंपनीतील अधिकारीही कळवळले. त्यांनी त्याची नोकरी चालू ठेवली.

वाचाच गेल्यामुळे मन्या कुणाविरुद्ध काहीच बोलेनासा झाला. नोकरीतून फावलेल्या वेळात तो आपले लेखन करू लागला. संपादक मंडळी सहानुभूतीच्या पोटी त्याचे लेखन प्रसिद्ध करू लागली. अंतोबा बापटांनी त्याचे संग्रह प्रकाशित केले.

त्याच्या बडबडीमुळे त्याला अनेक साहित्यिक शत्रू झाले होते, ते सारे आता त्याच्याकडे सहानुभूतीने पाहू लागले. त्याच्या लिखाणाची दखल घेऊ लागले. बघता बघता मनोहर कुलकर्णी प्रथितयश कथाकार झाला. बोलण्यात खर्च होणारी शक्ती लिहिण्यात लागू लागली, आणि मनोहरची ग्रंथ-निर्मितीही भराभर वाढू लागली. त्याच्या पुस्तकांची भाषांतरे परभाषांतून होऊ लागली. तो मुका झाल्यामुळे सारी रसिकता त्याच्याबद्दल आदराने बोलू लागली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

३

# निर्वाण

महाराष्ट्रीय खेड्यांतून पंचायती स्थापन झाल्या. कुलकर्ण्यांची दप्तरे उपरे तलाठी वागवू लागले. पाटीलक्या चोराहाती गेल्या. रामोशांची नायकीची वतनेही नष्ट झाली. महारांच्या महारक्या सरकारजमा झाल्या. कोट-पॅंट घातलेले एखादे पोर गावचावडीत बसून धनंतर शेतकऱ्यांना दाब देऊ लागले. गावातल्या माळवदी शाळेवर कौलारांची बंगलोरी टोपी बसली. गावठाणभर चौकोनी कंदिलांच्या काठ्या उभ्या राहिल्या. गावालगतच्या गावदरीत बिघ्याबिघ्यांना बांध पडले. कालव्याची बोलवा उठली आणि मावळतीकडच्या तांबड्या रानात पाचशे कुदळी कामाला लागल्या. पांढऱ्या टोप्या घातलेल्या पुढाऱ्यांची ये-जा सुरू झाली. इतके सगळे झाले, तरी आरणगावचा गावगाडा अजून पहिल्याच धोपटवाटेने चालला होता. बावऱ्या वेसकर घराघरातून हक्काची भाकरी मागत फिरत होता. बांधाबद्दलच्या भांडणाने कातावलेला कुळवाडी कायद्याची रेघ पुसण्यासाठी, आप्पाजीपंत कुलकर्ण्यांच्याच दारात बसत होता. गावकराच्या घरात होऊ घातलेल्या मंगल समारंभाचे आंवतण पहिल्यांदा जानू पाटलाच्या वाड्याकडेच जात होते. गावात पोलीस गेट आले तरी गावच्या नायकांनी आपली रखवालदारी सोडली नव्हती. महारवाड्यातील आठी- सोळा महार कुळवाड्याच्या मळ्यातील सऱ्यावाकोऱ्या पाडीत होते. सुतार औताची कुणी बसवून देत होता. लोहार लोखंडी मोटा दुरुस्त करीत होता. गुरव घरोघरी बेल-पत्रावळी वाटीत होता. कुंभाराचे चाक गावासाठी फिरत होते. तुटकी वहाण

सांधण्याचा मोबदला नव्या पैशात मागण्याची हिम्मत म्हाराला होत नव्हती. गावाच्या मध्यभागी बांधलेल्या कौलारू इमारतीवर 'समाज-मंदिर' अशी पाटी लटकली होती, पण गावकरी अजून तिला चावडीच म्हणत होते. विकास-योजनेचे अधिकारी आरणगावचा विकास पुरा झाल्याच्या समाधानात होते. आरणगाव मात्र होता तसाच होता.

एका संध्याकाळी पंढरपुराकडे जाणाऱ्या एस्. टी.तून पिवळे कपडे पांघरलेला एक उतारू आरणगावात उतरला. वाट विचारीत विचारीत गावाबाहेरच्या महार-वाड्याकडे गेला. त्याच्या येण्याने सारी महारवस्ती आनंदित झाली. दिवसभर घाम गाळून थकलेला महारवाडा नेहमीसारखा रात्री तक्क्यापुढे जमला. त्या पिवळ्या जवानाने महारांच्या कानी काही नवी औषधे ओतली. महारवाडा बिथरला. त्या दिवशी रात्रभर सारी महार जमात जागी राहिली. दहा-पाचदा 'भगवान् बुद्धकी जय!' अशा गर्जना निजल्या गावकऱ्यांच्या कानी आदळल्या.

सकाळी वार्ता पसरली की महारवाडा बाटला. बुद्ध झाला. म्हणजे काय झाले हे गावात कुणालाच काही कळले नाही. सकाळच्या कोवळ्या उन्हात गावा-मध्याच्या पारावर जेठा मारून बसलेल्या आप्पाजीपंत कुलकर्ण्यांनी भाकीत केले—

'आता महारवाडा गावापासून तुटणार.'

तसा तो आधीच तुटलेला होता. गावठाण वसल्या दिवसापासून महारांची वस्ती गावापासून वेगळीच होती. महारवाडा तुटणार तुटणार म्हणजे काय होणार, हे पारावरच्या कुणबी श्रोत्यांना उमगले नाही. उन्हे चांगली तापल्यावर म्हातारा बावऱ्या महार महारवाड्याकडून गावात आला. वयाने वाढ आणि कालमानाने निरुद्योगी अशी पाटील-कुलकर्ण्यांची जोडी अजून पारावरच होती. शेतकीच्या कामाला निघालेले चार दोन कुणबी त्यांच्या अवतीभवती बसलेले होते. म्हातारा बावऱ्या महार त्या जागी आला. हाताची चार बोटं कपाळाला लावीत तो खाली वाकला. जमलेल्या साऱ्याच गावकऱ्यांना उद्देशून मान खाली झुकवीत त्याने म्हटले,—

'जोहार मायबाप.'

'राम राम ...' बोतरा आप्पाजीपंत खलबत्त्यात पान कुटता कुटता बोलला. जानू पाटील आणि बाकीचे कुणबी त्या वाकलेल्या महाराकडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागले. बावऱ्या गांगरल्यागत झाला. रिवाज असा की, पारावर गावकऱ्यांच्या गप्पा सुरू असल्या म्हणजे महारही बेताने पाराखालच्या धुळीत बसायचा. गावकऱ्यांच्या बोलाचालीत भाग देखील घ्यायचा. आज बावऱ्याच्याने बसवले नाही. अवघडल्यासारखा तो तसाच उभा राहिला. हातातल्या काठीवर दोन्ही पंजे ठेवून त्याने आपली सुरकुतली लोंबती हनुवटी त्या हाताच्या पंज्यावर टेकली. भुवया आकसून, दात नसलेले आपले तोंड वासून तो पारावरच्या गावकऱ्याकडे पाहात उभा राहिला. त्याला काही बोलायचे होते. काही सांगायचे होते. आपले भारावलेले काळीज गावकऱ्यांच्या पायापाशी रिते करायचे होते. आपणहून बोलणे सुरू करण्याचा आगाऊपणा त्याच्या रक्तात नव्हता. कुणीतरी आपल्याला पुसावे, आणि मग आपण जबाब द्यावा अशा हिशेबाने तो उभा होता. बराच वेळ कुणी गावकरी त्याच्याशी काही बोलला नाही. त्यांच्या गप्पा आपसातच होत राहिल्या. शेवटी चाहूर रानातला उंचेला सीताराम, परवानगी घेऊन जायला निघाला तेव्हा आप्पाजीपंत कुलकर्ण्यांने त्याला थांबवले. कुलकर्णी म्हणाला,

'थांबा थोडे सीतारामबापू. रातसार महारवाड्यात काय चालल होतं ते विचारूया या बावऱ्याला.'

आप्पाजीपंताच्या या बोलण्याने बावऱ्याला हवी होती ती संधी मिळाली. दुखावलेल्या आवाजात तोहून बोलला,

'समदं कसनुकं झालं ...'

'काय, झालं काय?' घोगऱ्या आवाजाचा जानू पाटील म्हणाला. त्याने प्रश्न आधी विचारला आणि नंतर हनुवटी आणि भुवया वर उचलल्या. बावऱ्या आपल्या दमगीर आवाजात बोलू लागला —

'तालुक्याच्या गावासनं कुनी एक संन्यासी आला व्हता. त्यानं देवा धर्माचं काय सांगाटलं न्हाई. गावाकडनं महारावर किती जुल्म होतोय् ह्याचाच पाडा वाचला. त्यो सांगत व्हता त्यात लबाड काही नव्हतं. नव्या पोरास्नी ते एकदम पटलं. त्या समद्यांनी संन्याशीबुवाला त्यावर इलाज इचारला. बुवा म्हणाला

दा. 94924

‘ बुध व्हा. ’ महारांनी माना डोलावल्या. बुवानं सगळ्यास्नी उभं केलं आन् आपल्या रामू भटावानी त्येनं काहीतरी अवघड भाषान म्हनाय सांगटलं. समद्या महारांनी, ते चुकतमाकत म्हटलं. बुवा म्हनला, ‘ तुमी बुध झाला — ’

‘ बरं झालं, पीडा गेली. ब्राह्मणांचं ब्राह्मण्य गेलं. महारांचं महारपण तरी हव कशाला ? ’ आप्पाजीपंत म्हणाले.

‘ असं कसं म्हणतां पंत ? धरम सोडला महारांनी. ’ बावऱ्या काकळला होता.

‘ सोडतो म्हटल्यानं कुठं धरम सुटतो ! ’ हातवारे करीत घोगरा पाटील म्हणाला. बावऱ्याची जखम वाहू लागली. पाटील म्हणाला तेच त्याने अनेकदा आपल्या भाईबंदांना सांगितले होते.

‘ धरम सोडून करणार हाईत काय ? पोटाला तर पायजेच. त्यास्नी कामं, करत्यात तीच करावी लागनार. मग धरम बदलला म्हंजे काय ? गोम्याचं नाव सोम्या ठेवलं म्हणून का आभाळातनं तहानलाडू भूकलाडू पडणार हायत त्यांच्या पुढ्यात ? ’ जायला निघालेला सीताराम सहजावारी म्हणाला.

‘ तसं नाही ते — ’ तोंडातला पानाचा पिंक आवरीत आप्पाजीपंत बोलले.

‘ मग ? ’ जानू पाटलाला पडला होता तो प्रश्न साऱ्याच जमलेल्या गावकऱ्यांपुढे पडला. आप्पाजीपंत थोडे थांबले. बुडानेच पाराच्या कडेपर्यंत सरकून, हाताची दोन बोटे ओठांवर धरून, त्यांनी पानाचा पिंक पाराखाली फेकला. पाराशी उभा राहिलेल्या सीतारामाने आपला पाय वहाणेतून मोकळा केला. आप्पाजीपंताच्या पिंकावर त्या पायाने माती लोटली. पाय परत वहाणेत घालीत तो त्यांच्याकडे बघत राहिला. अघळपघळ बसलेल्या आप्पाजीपंताने आपले गुडघे आवळून उभे केले. अंगावरचे उपरणे कमरेमागून घेऊन गुडघ्यापाशी गुंडाळले. जेठा मारला. आपल्या दोन्ही हातांच्या बोटांनी दोन्ही गालांवरचे दाढीचे खुंट कुरवाळीत त्यांनी बावऱ्यालाच विचारले,

‘ तू रात्रभर त्यांच्यात होतास का बावऱ्या ? ’

‘ जी. ’

‘ बुद्ध झाल्यावर काही आणाशपथा झाल्या की नाही ? ’

‘ जी झाल्या. ’

'त्या काय झाल्या ते सांग.'

'तेच मोठं कसनुसं झालं. घरं चांगली चुंगली राखावी, समद्यांनी पोरंबाळं शिकवावी, कापडं खळनी घालावी...हे समदं ठीकच हाय...पर...' बावऱ्या अडखळला.

'बोल, पुढं बोल...'

'मेलेली ढ्वारं ओढू ने, अशी शपथ घेतली. मेलेल्या जनावरांचं मांस खाऊ ने हेबी आलं सरळ; पर मेलेलं ढ्वार म्हारांनी वडायचं न्हाई तर वडायचं कुनी?'

'ज्याचं त्यानं ओढावं.' आप्पाजीपंत बोलला. पिवळ्या कपड्यातला बुवाही नेमकं तेच बोलला होता.

'आणखी काय काय ठरवलंय् महारांनी?'

'का ऱ्या हाय ते समदं सांगन्यात? वाडवडलापासनं आमी करीत आलो ते कामच आता करायचं न्हाई असा हिशेब मनात धरलाय त्यांनी. मी मस्त आरडलू, पर मला कोन इचारतंय म्हाताऱ्याला? त्यो बुवा परगावचा. सांगून आन् शपथा घेऊन निघून गेला सकाळच्या मोटारीनं. पर आमाला गावातच ऱ्हायचं का न्हाई?'

'हं...' लांब सुस्कारा टाकीत आप्पाजीपंत म्हणाले, 'हे असंच व्हायचं आता बावऱ्या. घाटावर गावोगाव असं झालंय. आपल्याकडं नव्हतं. ते आता आलं...'

आप्पाजीपंत आणखी काही बरेच, या विषयावर बोलणार होते. पाराजवळच्या त्यांच्या वाड्याच्या दरवाज्यातून, त्यांच्या नातीने हरळी दिली--'आप्पा, पाणी तापलंय आंघोळीचं.' आप्पाजीपंतांनी जेठा मोडला. आपल्याच गुडघ्याचा आधार घेत ते उठून उभे राहिले. 'बराय' म्हणत पाराच्या पायऱ्यांकडे वळले. आप्पाजीपंत उठले तसा जानू पाटीलही उठला. बाकीचे कुणबीही हलले. गावाच्या मध्यभागी, तळपत्या सूर्याखाली, एकटा बावऱ्या महारच काय तो मागे उरला. रात्रभराच्या जाग्रणाने त्याचे अंग आंबले होते. महारवाड्याचा आडमुठेपणा आणि गावकऱ्यांची उदासीनता ह्या दोहोंच्या जाणीवेने तो कष्टी झाला होता. घडत होते ते घडायला नको होते असे त्या भाबड्या महाराला मनापासून वाटत

होते. गाव आणि महारवाडा ह्यांत यापूर्वी नुसतेच अंतर होते. आता ह्या दोन वस्त्यांच्या मधे एक जळती खाई पैदा होणार, अशी त्याची अटकळ होती. त्या खाईचे चटके त्याच्या मनाला जाणवत होते. काळजाला होरपळत होते. बराच वेळ बावन्या तसाच उभा राहिला. एखाद्या थकल्या गाढवासारखा, तसाच उभा राहिला. घडीभरानं एक लांब सुस्कारा टाकून, हातातली काठी आणि खांद्यावरची कांबळी सावरीत तो निघून गेला. कुणीकडे निघून गेला कुणास ठाऊक.

दुसऱ्या दिवशीपासून महारवाड्यातले महार गावात कामाला येईनासे झाले. गावकऱ्यांची हाक ते कानाआडवी टाकू लागले. गावकरी चडफडू लागले. महारड्यांना शिव्या घालीत आपली कामे आपण करू लागले. तशी, रानात अजून नांगरण – डोंगरणच चालली होती. बागाइतात कुठे कुठे व्हंडीची हिरवी थाटे उभी दिसत होती. कांद्या–लसणाच्या पाती उबदारीला आल्या होत्या. वांगी लेंबकळण्याइतकी अंगी भरली होती. रताळयाच्या वेलांनी रानचे ओले वाफे आपल्या हिरव्या – तांबड्या पानांनी गादलेले होते. जिराइतात तर अजून कसणीचाच अंमल होता. खताच्या गाड्या वाहण्याचेच काम महारांच्या वाटचे होते. ते गावकऱ्यांनी हाती धरले होते. बांध-बंधारीची तोडजोडही ज्यांची त्यांनीच आरंभली होती.

वैशाख महिना आकाराला आला तरी महारं गावात फिरकली नाहीत. रताळं मागण्याच्या निमित्तानं एखादा महार कुणा मळेकऱ्याच्या बांधावर उभा राहिला नाही की एखादी महारीण ‘ वैसं कोरड्याशाला ’ मागायला भाजीच्या वाफ्याशी आली नाही.

महारवाडा एका रात्रीत पालटला तो पालटलाच. महिना-पंधरा दिवसांत वाड्यातली पाचपंचवीस महारं अकलूजच्या साखरेच्या फॅक्टरीत कामाला गेली. काहींनी सरकारी कालव्याचे काम धरले. महारणी तर घोळाघोळाने कालव्याचे कामावर हजेरी लावू लागल्या. गावकऱ्यांच्या रागालोभाची त्यांना कुणाला पर्वाच उरली नाही. या सगळ्या घाटघोलाण्यात बावन्या मात्र गुदमरल्यासारखा झाला. तो जमातीबरोबर चालू शकेना. त्याला गावाबरोबर चालण्याची बहाई होती. तो एकटाच गावात यायचा. रानोमाळ भटकायचा. न सांगता, दिलेले काम होईल तसे करायचा. दिवेलागणी झाल्यावर गावातल्या मोठ्या मोठ्या वाड्यांच्या

अंगणात जाऊन काठी आपटायचा. त्याची मानाची भाकरी त्याला मिळायची. ती तो पाराच्या पायरीशी बसून खायचा. उरलेली उद्याच्या दिवसासाठी ठेवायचा. महारवाड्याने गावात येणे टाकले आणि बावऱ्याने महारवाड्यात जाणे वर्ज्य केले.

कुणी एखादा गावकरी कुत्सितपणे त्याला विचारी, 'का बावरा, घराकडं नाहीस का जात ?'

बावरा गप्प राही. दुसरा एखादा गावकरीच पहिल्याच्या सवालाला जबाब देई. 'त्यो कशाला जातोय म्हारवाड्यात ! लंकेत बिभीषेन !'

वैशाख वद्यातील एका अंधाऱ्या रात्री बावरा पारापाशीच पटकूर घालून पडला होता. घर असून त्याला घर नव्हते. जमातीच्या चुकीने गावाचे गावकरीही त्याला जुन्या मायेने वागवीत नव्हते. तसे खरेच होते की, ज्याला त्याला त्यांचे वागणे पहिल्यागत वाटत नव्हते, काय होते कोण जाणे ! बावरा उदास होता, कष्टी होता, इतके मात्र खरे ! अलीकडे अलीकडे त्याला झोपही नीट लागत नव्हती. राखणीच्या कुत्र्याच्या झोपेसारखी त्याची झोप उचलजागती झाली होती. त्या रात्री देखील तो निजला होता. पण काही केल्याने त्याचा डोळा लागत नव्हता. होते कसे आणि झाले कसे, या विचारातच तो तळमळत होता.

पाराजवळ असलेल्या आप्पाजीपंत कुलकर्ण्यांच्या वाड्यात गेले काही दिवस गडबड चालली होती. पाहुणे-रावळे येत होते. जेवणे-खावणे चालली होती. आज तर अंगणात मेढी रोवण्याचे काम चालू झाले होते. बावऱ्याला, त्यांच्या वाड्यातल्या कुणाही माणसाने हटकले नव्हते. लाकडे फोडण्याचे हमखास काम देखील त्याला सांगितले नव्हते. आप्पाजीपंतांच्या लेकीचे लगीन होणार होते, इतकी वार्ता त्याला मिळाली होती. गावातल्या गावकऱ्यांच्या कार्यांत महारांची सावली देखील नसावी याचे त्याला मनःपूर्वक वाईट वाटत होते. आपणहून आप्पाजीपंतांच्या अंगणात जाऊन उभे राहावे व आपले काम हक्काने मागून घ्यावे असा विचारही त्याच्या मनात येऊन गेला होता. हे काम एकट्याने करणे त्याला नामुष्कीचे होते. आटीसोळा महारांनी यावे आणि बामणाच्या कार्यातले अधिकाराने काम मागावे ही गोष्ट त्याला शानीची वाटत होती. ते घडणे आता शक्य नव्हते. एकटा बावरा कदाचित् धुडकावून लावला जाईल अशी भीती त्याची त्यालाच वाटत होती. तो दुःखी

होता. फार दुःखी होता. देवानेच आप्पाजीपंतांना बुद्धी द्यावी, आणि त्यांनी आपल्याला साद घालावी अशी त्याची ‘विच्छा’ होती. बोलाफुलाला गाठ पडली. खरोखरच कुलकर्ण्यांच्या वाड्यातून हरळी आली.

‘बावऱ्या बावऱ्या हे ऽ ऽ — ’

बावऱ्या आनंदातिशयाने उठला. अंथरलेले कांबळे खांद्यावर टाकीत तो ओरडला,

‘आलु आलु जी — ’

‘पंत बलवत्यात तुला!’ दरवाज्यातून हरळी भरणाऱ्या म्हमू चौगुल्याने सांगितले. बावरा वाड्याच्या चौकात आला. चौकात मंडप घालण्याचे काम चालले होते. चारी सोप्यांवर गॅसच्या बत्त्या तेवत होत्या. अंगणातच एका सतरंजीवर आप्पाजीपंत बसले होते. जानू पाटील, पवार, कृष्णा मास्तर इत्यादी गावातली ठळक मंडळी त्यांच्या सभोवती होती.

‘ज्वार’ बावरा ओरडला.

‘आलास का बावरा?’ आप्पाजीपंत त्याच्याकडे पाहू लागले, पण बत्तीच्या झगझगाटाने त्यांचे दोन्ही डोळे गच्च मिटले गेले.

‘जी, आलु जी.’

‘बस.’

‘हाय. की.’ बावरा बसला नाही.

‘तुला अशासाठी बोलावलं होतं...’

‘जी — ’

‘आपल्याकडे लगीन आहे.’

‘ठावं हाय, जी.’

‘म्हारं काही कुणी आली नाहीत.’

बावरा बोलला नाही.

‘महारांना आमंत्रण करण्याची काही प्रथा नाही आपल्या गावात!’

बावरा बोलला नाही.

‘तू वयानं वडील आहेस. तराळकी केलेली आहेस. बाकीची कामं कशीबशी केली, गावकऱ्यांनी. एक काम उरलं आहे. ते पिढीजाद तुम्हीच लोक करीत

आला आहात. परवा वरात निघेल मुलामुलीची. तेव्हा या गॅसच्या बत्त्या कोण धरणार ?'

'महारांनीच धरल्या पाहिजेत.' बावरा म्हणाला.

'पाहिजेत ना ? मग मागचं सारं आठवत असेलच. बत्त्या ह्या आत्ता निघाल्या, मागं हिलाल असत. दिवट्या असत. त्या महार मंडळीच वागवीत. काय ?'

'जी.'

सातआठ तरी गडी लागतील.'

'जी.'

'विचार जाऊन तुझ्या मंडळींना आणि सांग मला. नाहीतर मोलानं माणसं आणली पाहिजेत परगावाहून.'

'तसं कशापायी ? मी इचारतु की.'

'तुजं त्यांचं बोलणं हाय का न्हाई ?' जानु पाटलाने मध्येच विचारले.

'अशील नाही तर नशील. जाऊन इच्यारनं माज्याकडं लागलं.'

'बावरा —'

'जी —'

'हे एवढं नेमं घे अशीक' मेढी रोवण्याच्या कामी गुंतलेला एक गावकरी म्हणाला. बावऱ्याचा आनंद काळजातल्या काळजात नाचू लागला. त्याने मुंडासे-पैरण काढून ठेवली. पहार घेतली. अंगणात खड्डा पाडण्याचे काम तो नेटाने करू लागला. बाकीच्या म्हारवाड्यासारखे आपण अलग झालेलो नाही. सारे यात्रेकरू अर्ध्या वाटेतून उलटे वळले तरी आपण रस्ता सोडला नाही, या जाणीवेने त्याचे म्हातारे शरीर रसरसून आले. एखाद्या जवानाच्या गतीने तो पहार चालवू लागला. बघता बघता त्याने पाच-सहा वितीवितीची नेमे पाडून टाकली. मंडपाच्या त्या नेमांत मेढी उभ्या राहिल्या.

कितीतरी दिवसांनी बावऱ्या महारवाड्याच्या हद्दीत पाय घालीत होता. गाव आणि महारवाडा यांच्या मधोमध रिजगी दगडाचे एक पडके घरच काय ते उभे होते. महारवाडा 'बुद्ध' झाल्या दिवसापासून त्याने ते ओलांडले नव्हते. आज भल्या सकाळीच तो महारवाड्यात आला. महारवाडा होता तसाच होता. तशाच

केंबळी झोपड्या. तशीच माती उकरीत हिंडणारी कोंबडी. तशीच उघडी–नागडी पोरे. तशाच ओंगाळवाण्या बायका. तसाच धूर. तसाच गलबला. बावऱ्या तक्क्यासमोर आला. रात्री तक्क्यात झोपलेली महारमंडळी जागी झाली होती. त्यांच्या अंथरुणांच्या वळकट्या तक्क्याच्या पाठभिंतीस लगटल्या होत्या. कुणी दातांना तमाखूची मशिरी चोळीत होते. कोणी समोरच्या आडावर तोंड धूत होते. बावऱ्याच्या येण्याची दाद कुणीच घेतली नाही. त्याला मनस्वी वाईट वाटले. तेथूनच परत फिरावेसे वाटले. तो परतला नाही. कशीही असली, तरी महारवाड्याची ती वस्ती त्याची होती. मुस्काड फिरवून वागणारी ती सारी महार मंडळी त्याच्या रक्ताची होती. तो तक्क्याच्या जोत्यावर जाऊन बसला. भिंती न्याहाळू लागला. भिंतीवरचा बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो त्याच्या ओळखीचा होता. तांबड्या रंगाने रंगवलेली काही अक्षरे मात्र भिंतीवर नव्याने उमटली होती. त्यांच्याशी त्याचा परिचय नव्हता. कसल्याच अक्षराची आणि त्याची तोंडओळख उभ्या जन्मात झाली नव्हती. विहिरीवर तोंड धुऊन परत तक्क्याची पायरी चढणारा एक तरणा मुलगा थांबून बावऱ्याकडे बघत राहिला.

'का, वळख लागंना का फकिरा ?' बावऱ्या कडवटपणाने म्हणाला.

'फार दिवसांनी आलायस्. त्यानं तसं झालं !'

'हं, यावं असं ठेवलंय् कुठं तुमी ?'

'मग आज तरी कशाला आलायस् ?'

'आलोयू काय काम हाय.'

'आमच्यासंगं ?'

'व्हय.'

'कसलं ?'

'समद्यांस्नी इऊदे की.'

'सभा सांगणार हायीस का ?'

'मी बुध झाल्यालो न्हाई लेकरा. म्हारच हाय !'

'म्हारांचं काय काम हाय ह्या वस्तीत ?'

फकिराच्या त्या हुमदांडग्या जबाबाने बावऱ्याचे काळीज कातरले. उरातला डोंब उरात आवरीत तो म्हणाला, 'गावकऱ्यांचा सांगावा घिऊन आलोय.'

'कुठल्या गावकऱ्यांचा?' दुसरा एक महार जवळ आला. बघता बघता चार-आठजण फकिराच्या आसपास गोळा झाले. त्यांचा आविर्भाव ओळखुन बावऱ्या म्हणाला,

'ए, मला असं भ्या घालु नगा. आप्पाजीपंतांच्या घरी लगीन हाय. लगनाकार्यांत दिवट्या मशाली धरन्याचं काम डुयान् डुया म्हारं करीत आल्यात. ह्या लगनात तुमी येणार का न्हाई ते इचाराय आलोय.'

'कुरकळण्याला तोंड नाही इचारायला का पाय नाहीत इथवर यायला?' फकिरा उसळी घेत डाफरला.

'तू कशाला आलाईस सांगावा घिऊन?' दुसरा ओरडला.

'आयला, म्हातारं थकिला झालंय पर गावंदरी चरत न्हाई.' तिसऱ्याने नाक फुगवले.

बघता बघता बावऱ्याभोवती महार कालवा झाला. खोपटा-खोपटातली बायकापोरं तक्क्याभवती गोळा झाली. बावऱ्याला कुणी बोलू देईना. सारी जमात त्याच्यावर जणू तुटून पडली. प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. बावऱ्याच्यानं बोलणं सुधरंना. त्याच्या डोळयांच्या कडा ओलावल्या. नाक वाजू लागले, हातापायांत कापरे भरले. बातमी लागताच बावऱ्याचा लेक आपल्या खोपटातून धावत आला. माणसांची गर्दी हटवीत तो पुढे झाला. दोन्ही काखांत हात घालून त्याने बावऱ्याला उभे केले. तिरसट सहानुभूतीने त्याने बापालाच दटावले, 'चल, मरचील एकांदवख्ती. तुजं शानपण ठिव गुंडाळून भानुशीवर. उरल्यात तेवढं दीस गुन्यागोइंदानं काढ. उद्या मेलास तर काय गाव खांदा देणार न्हाई तुला. महारांच्याच बोकांडी बसचील —'

लेकराने बापाला चालवीत खोपटाकडे नेला.

बावऱ्या परत गावाकडे फिरकला नाही. आप्पाजीपंताच्या घरचे कार्य व्हायचे तितक्याच थाटाने साजरे झाले. महारांनी गावाशी वैर धरले आहे हे जाणून मांगवाडा गावच्या सेवेला धावला. व्हलारांनी वाजंत्री वाजवली. मांगांनी बत्त्या धरल्या. वरात मिरवली. गावजेवण झाले. गव्हाच्या खिरीच्या काहिलीच्या काहिली रिकाम्या झाल्या. महारवाड्यावाचून सारा गाव कुलकर्ण्यांने जेवू घातला.

आपल्या पिढीजात खोपटातील एका अंधेऱ्या खोलीत बावऱ्या तळमळत होता.

त्याचे अंग जळत होते. डोक्यातले रक्त उसळत होते. त्याला वारंवार वाताचे झटके येत होते. त्या झटक्यासरशी तो म्हातारा महार उसळून उठत होता. बंद कवाडावर लाथाबुक्क्या मारीत होता. तोंडाने एकसारखे बडबडत होता, ' अरं, मला सोडा ... मी गावचा तराळ हाय ... मला पाटलाच्या वाड्यातली बाभळीची गाठ फोडायची हाय. पवाराचा बैल मेलाय ... अरं, मला जाऊ द्या ... तालुक्याला वसूल पोचवायचा हाय ... आप्पाजी कुरकळण्याकडं लगीन हाय ... वरातीचा वखुत झाला ... तराळनी, मला तुझ्या चोळीची चुंबळ करून दे. '

त्याचे म्हणणे कुणी ऐकत नव्हते. तो बडबडतच होता. वातातच बोलत होता. बावऱ्याच्या खोलीचे दार वैशाख महिना सरेतो बंद राहिले. गावाला काही पत्ता लागला नाही. महारांच्या घरात जाण्याचे प्रयोजन कुणाही गावकऱ्याला कधीच भावले नाही. बावऱ्या मेला नाही म्हणून जगला. भुकेच्या वेळी त्याच्यापुढे अन्नाची थाळी ठेवण्याइतकी माणुसकी त्याच्या लेकाने दाखविली, पण त्याला सोडला मात्र नाही. ओरडून ओरडून बावऱ्याचा घसा बसला. घसा बसलेल्या अवस्थेतही तो ओरडत राहिला. आता त्याच्या ओरडण्याला रागाचा रंग राहिला नाही. त्याच्या अंगातला जाळ आणि डोक्यातली आग दोन्हीही थंडावली. त्याचा अवतार एखाद्या वेड्या गोसाव्यासारखा दिसू लागला. सारा महारवाडा जाणून चुकला की, बावऱ्याला वेड लागले. त्या वेडाच्या लहरीत तो बसल्या जागी बसू लागला. टाळ्या वाजवीत गाऊ लागला —

' देहाचे विराळ, मानिती सकळ
आत्मा त्यो निरमळ, सुद्ध बुद्ध ...'

' बुद्ध ! मी बुद्ध झालोय्‌ ! ' घसा खरवडून ओरडत तो खदखदून हसू लागला. बावऱ्याचे काय झाले त्याची वास्तपुस्त गावाने केली नाही महारवाड्याने त्याला मोजणे सोडून दिले. वैशाख सरला. ज्येष्ठ निघून गेला. आखाडाच्या आरंभाला पावसाने काळी रानवट हिरव्या पोपटी रंगानं रंगवून टाकली. महारांच्या मदतीवाचून गावगाडा पुढे जात राहिला. दरसालसारखीच पिके डुलू लागली. रानलक्ष्मी फुलू लागली. महारवाड्याने आपला सवता सुभा सजवीत आणला. फॅक्टरीत नोकरी लागलेली जवान पोरे एखाद्या दिवसाच्या सवडीने गावी परतू लागली. नव्या नोकरीतले सुख तक्क्यात बसून सांगू लागली. बावऱ्या

आता हिंडू-फिरू लागला होता. त्याचे डोके ताळ्यावर नसल्यामुळे त्याला कुणी हटकत नव्हते की त्याच्याशी कुणी बोलत नव्हते. त्याचे उघडे डोळे सारे काही पाहत होते. म्हातारे कान, कष्टाने का होईना, पण सारे काही लक्षपूर्वक टिपीत होते. महारवाडा 'बुद्ध' झाला म्हणजे काय झाले हे त्याला अजूनही कळले नव्हते. अजून तशीच केंबळी घरे होती. तशाच कोंबड्या माती विस्कटीत फिरत होत्या. ओंगाळवाण्या बायका तशाच पारोशाने भाकरी थापीत होत्या. नाही म्हणायला काही झोपड्यांतून रोकडीचा आवाज येत होता. ती देणगी अकलूजच्या कारखान्याची होती. महारांनी महार राहून कारखान्याची चाकरी केली असती तरीही तो पैका महारवाड्यात आला असता.

आखाडी पुनवे दिवशी तिन्ही सांजेला वेडा बावऱ्या तक्क्याच्या बाजूला नांद्रुकीच्या पारावर बसला होता. आभाळ तांबडेलाल झाले होते. वाऱ्याच्या भरारीला ओलसर वास येत होता. महारवाड्यातला कालवा कानांवर येत होता. बावऱ्याचे डोके थंड होते. हातपाय लुळ्यागत झाले होते. चांद उगवायच्या टिपणाला गावातून एकाएकी हलगीची घाई ऐकू आली. लेझमीच्या भिंगऱ्या बोलू लागल्या. बैलांच्या डरकाळ्या घुमल्या. माणसांचे साद उसळले. बावऱ्याला एकदम आठवले. न बघताच दिसल्यासारखे झाले. गावात बेंदराची मिरवणूक निघाली होती. शेलक्या शेलक्या बैलांचा जथा गाववेशीतल्या मारुतीच्या देवळा-कडे येत होता. त्या बैलांची शिंगे हिंगुळाने रंगलेली होती. त्यांवर झगागणारे बेगड गोंदाने डकवले होते. शिंगांच्या टोकांना पितळेच्या चकचकीत 'शेंब्या' बसविल्या होत्या. बैलांच्या कपाळांवर कावेचे गोल उठवले होते. अंगावर झुली घातल्या होत्या. त्या झुलींना भिंगे बसविली होती. बैलांच्या मेळाव्यापुढे हलग्या झडत होत्या. पिपाण्या बोलत होत्या. गावातली तरणी पोरे लेझिम खेळत होती. त्यांच्या पटक्यांचे शेव हवेत उडत होते. बैलांच्या बरोबर दमदार पावले टाकीत बैलांचे धनी चालत होते. बैलांच्या देखणेपणाचा गरूर मालकांच्या चालीत उमटत होता. एखादा अंडील खोंड डरकत होता. त्याच्या इसाळाने दुसरा फुसफुसत होता. गावाची दौलत गावातून मिरवीत होती. आखाडाचा महिना असल्याने ढग केव्हा गोळा होतील आणि चांद कधी लपेल याची खात्री नव्हती. मिरवणुकीच्या बरोबर गॅसच्या बत्त्या होत्या. त्या बत्त्या मांगांनी धरल्या होत्या. महारांनी त्या कामाला नकार दिला होता. आप्पाजीपंतांच्या घरच्या लग्नाच्या

वेळी एकही महार बत्त्या धरण्यासाठी गेला नव्हता. आपण सांगायला आलो तेव्हा साऱ्यांनी आपल्याला बुकलून कोंडून ठेवले होते. आज पुनः मोका आहे. गावाने महाराची दाद घेतली नाही. गाव आणि महारवाडा यांचे संबंध तुटले. गाव महारवाड्यात येत नाही, तर महाराने गावात जाण्याचे कारण काय ? आज मिरवणूक गावाची नाही. बैलांची आहे. बैलांशी कशासाठी महाराचं वैर ? बैलांनी पिढ्यान् पिढ्या कष्ट केले. शेती पिकली. शेतीवर गाव पोसला. महारवाडा पोसला. बैलाचं ऋण गावावर. बैलाचं ऋण महारवाड्यावर. त्यांच्या मिरवणुकीतील बत्ती महारानं धरलीच पाहिजे. बैल आपल्या पिढीजात कामात आजतागायत चुकले नाहीत. महारानं का चुकावं ?

विचाराच्या हिसक्यासरशी बावऱ्या उठला. त्याच्या अंगात कुठले बळ संचारले कोण जाणे; वाऱ्यासारखा धावत तो गावाच्या दिशेने निघाला. एका पोरगेल्या महाराने पळता पळता त्याचा बाहुटा पकडला.

‘ कुठं चाललास आज्या — ’

‘ बेंदराला जातो. बत्ती धरायला. सोड. ’ बावऱ्या त्या पोराला हिसडा मारून सुटला. कुडाच्या भिंतीवरून त्याने उडी घेतली. बघता बघता तो मिरवणुकीशी भिडला. एका मांगाच्या डोक्यावरची बत्ती त्याने पाठीमागून उचलली. आपल्या डोक्यावर घेतली. लेझमीच्या तालावर तो नाचू लागला. मांग बघतच राहिला. वेड्याच्या वेडचाळ्याविरुद्ध तक्रार ती काय करायची ? लेझिमवाले नाचत राहिले. वाद्ये वाजत राहिली. बावऱ्या नाचत राहिला. पाचशे बैलांच्या डौलदार मिरवणुकीत त्या वेड्या महाराकडे कुणाचे लक्ष गेले नाही. मिरवणूक शिवेजवळ आली, तेव्हा दगडी कुसाच्या आत सारा महारवाडा जमला होता. लाल डोळयांनी फक्त बावऱ्याकडे पाहात होता. मिरवणूक देवळापुढे आली. विसावली. धनगरांच्या मेंढरांनी पटक्यांवरून उड्या घेण्याची कमाल केली. गावकऱ्यांनी टाळया पिटल्या. दरसाल महाराचा तमाशा व्हायचा. आज झाला नाही. बैल परतले आणि गावकरी देवळापुढे बसले. दरवेशाच्या भेदिक गाण्यांनी पहाटेपर्यंत सूर धरला. घोंगड्यांच्या भाळी मारून ऐकत बसलेले गावकरी पेंगुळले. कुणी बसल्या जागीच आडवे झाले. बावऱ्या उभा होता. डोईवर बत्ती घेऊन पहाटेपर्यंत उभा होता. त्याचे पाय ताठरले नाहीत की हात अवघडले नाहीत.

तांबडे फुटले तशा सर्व बत्त्या पारावर बसल्या. बत्तीवाल्या मांगाने बावऱ्याच्या डोक्यावरचा उजेडही अलगत उचलून घेतला. बावऱ्या आज खूष होता. त्याने पिढीजात काम हट्टाने केले होते. डोक्यावरची बत्ती उतरल्यावर मात्र तो अधांतरी झाला. त्याला कुठे जावे ते समजेना. दीड पावणे दोन महिने तो बिनताप पडला होता; गावातल्या एकाही माणसाने त्याची चौकशी केली नव्हती. गावाला त्याची गरज नव्हती. त्याने आपले काम केले होते. आपल्या माणसांत परत जायला आता तो मोकळा होता. ती माणसे तरी त्याची होती का ? ती तर सारी 'बुद्ध' झाली होती. गावात त्याचे कोणी नव्हते महारवाड्यात त्याचे कुणी नव्हते. तरी तो निघाला. बधीर मनाने निघाला. जेथून आला होता त्या जागेकडे निघाला.

उजाडता उजाडता तो दगडी कुसाजवळ आला आणि त्याच्या भाईबंदांनी त्याला घेरला. त्याच्या डोक्यावर काठ्यांचे प्रहार बसले. जीव मुठीत धरून तो तिथून निसटला. रानोमाळ धावत जगू पाटलाच्या पडळीवर आला—त्याला आठवत होतं, पाटलाची म्हातारी वैद्यकी जाणते. पडळाच्या अंगणात येऊन त्याने जोराने हाक मारली, 'आई–'

'कोण हाय ?' म्हातारीचा आवाज आला.

'मी बावऱ्या तराळ. मार बसलाय् मला आई, दव्यासाठी आलोय्'

'वर ये बाबा, मला दिसत न्हाई.'

'मी वर कसा येऊ ? मी म्हार हाय्.'

'आजाऱ्याला जात नसती. ये, वर ये.' पाटलाची म्हातारी ओरडून म्हणाली. म्हातारीच्या त्या बोलण्याने बावऱ्याचा जीव थंडावला. जातीगोतीचे अंतर क्षणार्धात भरून आले. जन्मात पहिल्यांदा तो पाटलाची पडळ चढून वर जाणार, एवढ्यात त्याच्या काळजातून भयंकर कळ निघाली. पडळीच्या पायरीशीच तो मटकन् खाली बसला. बसतो न बसतो इतक्यात तो खाली कोसळला. त्या जखमी महाराची सारी हालचाल बंद पडली. तुटकी घोंगडी जिथल्या तिथे टाकून त्याचा निर्मळ आत्मा निघून गेला.

'आम्ही बावऱ्याच्या मुडद्याला शिवणार देखील नाही' या महारवाड्याच्या निरोपाने गावातली शेलकी मंडळी बिथरली. हट्टाला पेटली. त्या जुनाट महाराचा देह पाटलाच्या अंगणातच गरम पाण्याने माळ-बुक्का ल्याला. त्याच्या शेवटच्या

पालखीला आप्पाजीपंत कुलकर्णी, जानू पाटील, सीताराम पवार अशांनी खांदा दिला. आंधळी पाटलीण म्हणाली, ‘ पुण्याई हुती बिचाऱ्याची. ’ बावऱ्याच्या अंत्ययात्रेपुढे भजनी मंडळी गात होती, ‘ आम्ही जातो आमुच्या गावा । आमचा राम राम घ्यावा ॥ ’ गावी जाणाऱ्या त्या पाहुण्याला निरोप देण्यासाठी सारा गाव जमला होता. त्याच्या यात्रेमागोमाग सारे गाव चालत होते. बुक्का-गुलाल उधळीत होते.

दगडी कुसाच्या आत उभा राहून सारा महारवाडा तो सोहळा पाहत होता. त्या दृश्याने भारावून की काय न कळे, बावऱ्याचा लेक ओरडला, ‘ बघा लेको, तुम्हांला जगून मिळवता आलं न्हाई त्ये माज्या म्हाताऱ्यानं मरून मिळवलं ! ’ कुणीतरी त्याच्या तोंडावर हात ठेवला.

सारा महारवाडा मुक्याने बघत राहिला. बावऱ्याची अंत्ययात्रा पाहून त्यांचीही मने कळवळली होती.

४

# मोती

'घे, घे!'

चांद महात पुनःपुन्हा आग्रह करीत होता पण मोती त्या अन्नाकडे ढुंकूनही पाहत नव्हता. मूळचेच बारीक असलेले आपले डोळे अधिक आकुंचित करून तो कसला तरी खोल विचार करीत होता. एक तास झाला, चांद त्याच्या नाकदुऱ्या काढीत होता. मोतीचा अभिमानी स्वभाव त्याच्या चांगला ओळखीचा होता. मोतीच काय, पण त्याच्या गेल्या दोन पिढ्याही याच स्वभावाच्या होत्या हेही चांद जाणीत होता. म्हणूनच मोतीवर तो खेकसला नाही, की त्याने त्याला अंकुशाचे भय घातले नाही.

बऱ्याच प्रयत्नांनंतरही मोती रोटांना सोंड लावीत नाही हे ध्यानी आल्यावर तो स्तब्ध झाला. रोटांची चवड मोतीच्या समोर ठेवूनच तो तेथून उठला व हत्तीखान्याशेजारच्या खोलीत गेला. आता त्याची भाकरी खायची वेळ झाली होती. पण त्याने भाकरीचे गाठोडे सोडले नाही. मोती उपाशी आहे तर आपण कशाला खायचं? असा विचार करून तो खोलीतल्या मोतीच्या पाठीवर घालण्यासाठी केलेल्या काथ्याच्या गादीवर कलंडला. मोती का संतापला, यावाचून दुसरा कसलाही विचार डुलकी लागेतोपर्यंत चांदच्या मनात नव्हता.

चांद निघून गेल्यावर मोतीने आपली सोंड सैलपणाने कमानीच्या या कडेपासून त्या कडेपर्यंत झुकविली व डोळे साफ मिटून तो तसाच स्तब्ध उभा राहिला. आपल्यासाठी अजूनही चांद उपाशी राहिला असेल, हे त्याच्या लक्षात

आलेही एकदोनदा. पण त्या गोष्टीला महत्त्व देण्याइतकेही आज त्याचे मस्तक स्थिर नव्हते.

असे अपमानाचे जीवन किती दिवस कंठायचे, हाच विचार त्याच्या मनात सारखा घोळत होता. परवा तर त्याच्या अपमानाची परमावधी झाली. खरोखरच मोतीसारख्या अभिमानी जीवाचा मानबिंदू धुळीला मिळावा असाच तो प्रसंग नव्हता का ?

मोती अस्सल अवलादीचा हत्ती होता. त्याच्या घराण्याला अत्यंत उज्ज्वल असा इतिहास होता. आणि म्हणूनच बिनींच्या हत्तीचा मान आजच्या अमदानीतही त्याच्याकडे होता. संस्थानचा सरकारी लवाजमा जेव्हा जेव्हा निघे, तेव्हा चांदीचा हौदा आणि भगवी ध्वजा मोतीच्या पाठीवर असे. मानासाठी मान देणारी जी अवलाद आजही जुन्या क्षत्रिय घराण्यांत सापडते त्या जातीचा होता मोती.

मोतीची परंपराच तशी उज्ज्वल ! चांद महाताच्या तोंडून त्याने कैक वेळा ऐकले होते की, रायगडावर थोरल्या शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक झाला तेव्हा जी पहिली भाग्यशाली मिरवणूक निघाली तिच्या बिनीवर मोतीचा मूळ पूर्वज होता. हिंदुपदपातशाहीची अमर कीर्तिध्वजा रायगडाच्या राज्यभूमीवर मिरवण्याचा मान त्या महाभाग गजराजाला मिळाला होता.

स्वाभिभक्त आणि वंशाभिमान हे दोन गुण मोतीच्या रक्तात भिनलेले होते. मोतीचे आजचे धनीही शिवरायांच्या एका सरदाराच्या पावन वंशातलेच होते. पण पोशाखासुद्धा त्यांच्या विचारसरणीत आता फरक झाला होता. पण मोतीला मात्र आपली स्वामिनिष्ठा कधीही अनाठायी वाटत नसे. उलटपक्षी आपली पुढील पिढी रायगडावरच्या त्या राज्याभिषेकासारखा नवा राज्याभिषेक निश्चित पाहील अशी त्याला आशा वाटत असे.

गादीवरच्या राजपुरुषाला मुजरा करताना, मोतीला त्या ठिकाणी तो राजपुरुष न दिसता पहिल्या छत्रपतींची जिरेटोपातली वीरमूर्ती दिसत असे. पण परवाच्या गोष्टीपासून मात्र मोतीचे मन गादीवरच्या धन्याबद्दल विचलित झाले होते. त्याला वाटत होते, अजाणता का होईना, पण सरकारांनी आपल्या पिढीजात अभिमानाचा पाणउतारा केला !

त्याचे असे झाले : मुंबईकडची कोणी बोलपटसंस्था निसर्गचित्रांच्या चित्रणासाठी तिथे आली होती. संस्थेच्या दिग्दर्शकांनी महाराजांची भेट घेतली व एका दृश्यासाठी महाराजांचा हत्ती भाड्याने मागितला. बोलपटाच्या रुपेरी पडद्यावर महाराज देणार असणाऱ्या मदतीच्या गौरवार्थ त्यांची छबी, आभारप्रदर्शन, मुद्दाम दाखविण्यात येणार असल्याचे अभिवचनही दिग्दर्शकमहाशयांनी दिले होते. पण म्हणून काय झाले? मोतीसारखा इमानी हत्ती त्यांनी भाड्याने द्यावा? निदान मोतीच्या मनाला तरी ही गोष्ट आवडली नव्हती. मोतीच्या मनातले हेच विचार चांदच्याही मनात आले होते. चांदने ते खाजगी कारभाऱ्यांना बोलूनही दाखविले होते. पण खाजगी कारभाऱ्यांनी चांदच्या म्हणण्याकडे मुळीच लक्ष दिले नाही.

नेहमीप्रमाणे मोतीला सजविण्यात आले व चांद त्याला चित्रणाच्या जागेवर घेऊनही गेला. आतापर्यंत झालेल्या प्रकाराने मोतीचे डोके आधीच तापले होते, तशात आणखी एका कारणाची भर पडली. छत्रपती शिवरायाचा वेष केलेला नट उंच बुरुजावर उभा होता. मोतीने त्याला मुजरा करावा, असे दिग्दर्शकमहाशयांनी चांद महाताला दिग्दर्शन केले. मोतीच्या कानामागे पाय मारून चांदने नाखुषीनेच का होईना मोतीला तसा इषारा दिला. जन्मात पहिल्याने या वेळीच मोतीने चांदची अवज्ञा केली. छप्पनदा इशारा केला, तरी मोतीने आपली सोंड रतीभरही उचलली नाही!

'त्याला उन्हाचा त्रास झाला असेल, पाणी दाखवून बघा!' अशी दिग्दर्शकमहाशयांनी सूचना केली म्हणून चांदने मोतीला जवळच्या हौदाकडे वळविले. पण तरीही मोतीची सोंड स्तब्धच. हौदाकडून चांद मोतीला परत चित्रणाच्या जागी हाकू लागला. मोतीने चारदोनदा 'चीं चीं' असा आर्त आवाज केला आणि जी धूम ठोकली ती चांदच्या आरोळ्यांना, आज्ञांना व अंकुशालाही न जुमानता आपल्या तबेल्यापर्यंत. आपल्या नेहमीच्या तबेल्यात आल्यावर मात्र तो शांत उभा राहिला. हत्ती पळून गेल्यामुळे अर्थातच दुपारचे जेवण तेवढे नदीकाठी उरकून बोलपट कंपनीचे पथक परतले. बातमी महाराजांपर्यंत पोचली. महाराजांनी चांदला बोलावून घेतले व मोतीच्या या वागणुकीबद्दल खूप छेडले.

चांद परत आला तो मोतीवर संतापून नाही, तर महाराजांच्यावर कातावून!

त्याने महाराजांना सणसणीत जबाब दिला होता, " माझं जनावर अस्सल आहे. त्याच्याकडून असली कामे महाराजांनी करून घेऊ नयेत. आणि माझ्या पिढ्यान् पिढ्यांच्या सेवेचाही काही मुलाहिजा धरावा ! "

महाराजांच्या मातोश्रींनी चांदची कड घेतली व या वेळी तरी या महाताला क्षमा करावी असे महाराजांना सांगितले.

परत आल्यावर चांदने मोतीला खाऊ घालण्याचा प्रयत्न केला पण तोही वाया गेला. मोती व चांद दोघेही त्या दिवशी असेच उपाशी राहिले. चित्रपटसंस्था महाराजांचे औपचारिक आभार मानून दुसरे दिवशीच दुसऱ्या एका संस्थानात निघून गेली.

मात्र मोती व चांद दोघेही महाराजांच्या मनातून उतरले.

खाजगी कारभाऱ्यांनी महाराजांना सुचविले, 'मोतीला आता विकूनच टाकावा !'

एका सर्कस मालकात आणि संस्थानच्या खाजगी खात्यात पत्रव्यवहार सुरू झाला. पंधरा दिवसांनंतर चांदचा व त्याच्या मुलाचा खाजगी संवाद मोतीच्या कानांत धगधगत्या ज्वालांसारखा येऊन भिडला.

" आता आपली इनामंहि जप्त होतील उद्या ! "

" का ? "

" मोतीचा सौदा पाच हजारांवर कायम झाला ! "

" असं जनावर शोधून मिळणार नाही पुन्हा ! "

" सांगितलं खाजगी कारभाऱ्यांना ! "

" मग ? "

" त्यांना काय त्याचं ? त्यांना वाटलं, मी माझ्या इनामाच्या बचावासाठी सांगतोय् ! "

" काय म्हणाले ते ? "

" ते म्हणाले, तुमच्या नोकऱ्या रिसाल्याकडे बदलून घेऊ. नाहीपेक्षा तुम्हांला नवं जनावर आणून देऊ ! "

" आपलं नशीब ! "

" थोरले महाराज आज हयात असते तर असं झालं नसतं ! "

मोतीच्या मस्तकात जणू अग्निकुंड पेटले. चांद कमानीत आला. एक अक्षरही न बोलता मोतीपुढे रोटांची चवड ठेवून गेला मोतीला त्या रोटांच्या ठिकाणी नोटांची चवड दिसत होती. तो मनात म्हणत होता :

" ही किंमत केली महाराजांनी माझी ! मला वाचा असती तर मी ओरडून साऱ्या जगालां सांगितलं असतं की, या गादीला आता स्वामिनिष्ठेची किंमत उरली नाही ! '

' चांद निघून गेला. मोती गेले तीन दिवस अक्षरशः उपाशी होता तरीही त्याची अन्नावर वासना होईना. तो मटकन् खाली बसला. रवंथ करणाऱ्या बैला-सारखे त्याने डोळे मिटून घेतले. विचाराच्या अतिरेकाने त्याचे मस्तक उचलून, त्याचा मोठा स्फोट होईल की काय असे त्याला वाटत होते जवळ जवळ पंधरा मिनिटे याच अवस्थेत गेली. मोतीला कसली तरी गुंगी आली होती. वाड्यातले एक कुलुंगे कुत्रे मोतीपुढचे रोट बिचकत बिचकत कुरतडू लागले होते. मोतीने आपले डोळे किलकिले केले न केले तोच त्याच्या दृष्टीला ते क्षुद्र जनावर पडले. त्याचा संताप अनावर झाला. त्याने आपल्या सोंडेने त्याला खसकन् ओढून घेतले व रागाच्या भरात साखळदंडाच्या दगडावर त्याला असे सडकून आपटले की त्याच्या मस्तकाच्या चिंध्या चिंध्या झाल्या. रक्ताचे तुषार मोतीच्या सोंडेप्रमाणेच कमानीच्या भिंतीवरही उडाले. कुत्र्याने एक मर्मभेदक किंचाळी मारली. वाड्यातून शिपाई-प्यादे धावत आले. मोतीने संतापाच्या भरात साखळदंडाला हिसडा मारला. साखळदंड तुटला नाही, पण साखळदंडाचा दगड मात्र मुळासकट उपटून आला. मोती पटांगणात धावत सुटला !

" मोती पिसाळला ! मोती पिसाळला ! त्याने राणीसाहेबांचा कुत्रा ठार केला ! " जिकडे तिकडे भयंकर हलकल्लोळ उठला. धोतर सावरीत सावरीत खाजगी कारभारी खाली आले व दबल्या आवाजानेच त्यांनी फर्माविले, ' त्याऽला गोऽळी घालाऽऽ ! ' मोती सैराट धावत सुटला. चांद व त्याचा मुलगा त्याच्या पाठोपाठ धावत सुटले. मोतीने वाटेत मात्र कुणाला कसलीही इजा केली नाही. गावाच्या बाहेर आल्यावर चांद त्या पळत्या हत्तीच्या समोर येऊन थांबला व ओरडला, ' मला आधी तुडव आणि मग असा धिंगाणा घाल. साऱ्यांनी नीती सोडली. तू तर जनावर, तू तरी कशाला किंमत धरतोस तुझ्या महाताची ! '

आणि खरोखरच चांद त्याच्या वाटेवर आडवा पडला. मोतीचे डोळे जणू काही वितळत होते. तो स्तब्ध झाला. चांद उठला. एखाद्या अवखळ व हट्टी मुलाला आईने कुरवाळावे तसे त्याने मोतीच्या सोंडेला निर्भयपणाने कुरवाळले. त्याच्याही डोळ्यांतून पाझर सुरू झाला होता.

" असं करू नये बाबा. थोरांनी चुका केल्या, ते थोर आहेत. आपण आपलं कर्तव्य करावं ! "

चांदने त्याच्या साखळदंडाचा लांबुडका दगड सोडून टाकला व ' चल ' म्हणत तो साखळदंड धरून चालू लागला. दोघांच्याही डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या होत्या.

गावाबाहेर म्यूझियमपाशी साठमारीचे मैदान होते. ते लोखंडी गजांनी भरभक्कमपणे बंद करता येत असे. चांद त्याला घेऊन आत गेला. चांद आणि मोती साठमारी मैदानात पोचल्याची वार्ता हां हां म्हणता नगरात पसरली आणि सारा गाव पिसाळलेल्या हत्तीला पाहण्यासाठी मैदानाकडे लोटला. खाजगी कारभारी बगीतून आले होते. तेथूनच ते ओरडले," चांद, त्याला चाप लाव ! तो पिसाळला आहे ! "

" प्राण गेला तरी मी माझ्या जनावराला चाप लावणार नाही ! " सर्व शक्ती एकवटून चांद ओरडला.

" तू बाहेर हो म्हणजे आम्ही व्यवस्था करू ! "

काहीही न बोलता चांद बाहेर आला. मोती स्तब्धच उभा होता. चांद बाहेर आल्यावर चारदोन सशस्त्र शिपाई आत उतरले व त्यांनी भीत भीत मोतीला चाप लावले. मोती जागचा हाललाही नाही. त्याचे अंग बधिर झाले होते. काय चालले आहे हेही त्याला कळत नव्हते. ब्राँझच्या पुतळ्यासारखा तो निश्चेष्ट होता. सशस्त्र सैनिक चाप लावून बाहेर आले. जागच्या जागी त्यांना हवालदाऱ्या देण्याचे खाजगी कारभाऱ्यांनी वचन दिले. चांदची मात्र त्यांनी वास्तपुस्तही केली नाही. हळूहळू गर्दी ओसरू लागली. साठमारी मैदानाचे लोखंडी दार बंद करण्यात आले.

आपल्या पायांना चाप लावले आहेत हे आता कुठे अस्पष्टसे का होईना, पण मोतीच्या लक्षात आले. क्रूसावरच्या ख्रिस्तासारखा तरीही तो धीरगंभीरच होता. पायाला लागलेल्या भयंकर कळा सोसूनही तो समोरच कुठे तरी पाहात होता.

आणि अगदी समोरच म्यूझियमची इमारत होती. इमारतीची जी खिडकी उघडी होती त्या खिडकीतून समोरच्या स्टँडवर ठेवलेला हस्तिदंती ताजमहाल दिसत होता. मोती एकदम भानावर आला. पायाला खूप कळा लागल्या आहेत, पोटात अन्न नाही, आपणाला हालता सवरताही येत नाही, वगैरे सर्व गोष्टी त्याच्या एकाएकी ध्यानात आल्या. ऊन रखरखत होतं. एकही बघ्या आता मैदानाच्या अवती भवती दिसत नव्हता. मोतीचे डोळे त्या ताजमहालाच्या चिमुकल्या आकृतीवर खिळले होते. मोतीला माहीत होते की, तो ताजमहाल त्याच्या बापाच्या दातांचा होता. तशा जखडलेल्या अवस्थेतही त्याच्या सुबुद्ध मेंदूत विचार सुरू झाले. 'माझ्या वडिलांनी आयुष्यभर सेवा केली आणि मेल्यावरही आपली स्वामिभक्ती अशा सुंदर स्वरूपात चिरंजीव ठेवली. आणि मी ? – मानवांच्या आहारी जाऊन हे काय केले ? '

मोतीच्या मनात हे पश्चात्तापाचे वारे वाहत आहेत तोच चांद आला. मोतीच्या त्या दुर्दशेने त्याला गेल्या चारपाच रात्री झोप नव्हती. चांदला पाहताच मोतीने आपली सोंड वर केली व आनंदप्रदर्शनासाठी एक विशिष्ट आवाज केला. चांदने ओळखले, मोती शुद्धीवर आला. त्याला आता मुक्त करावा ! पण साठमारीच्या फाटकाच्या किल्ल्या आता त्याच्या ताब्यात कुठे होत्या ? किल्ल्या आणण्यासाठी म्हणून तो वळला. चांद परतता आहे हे पाहून मोतीने जास्त ओरडा सुरू केला. चांद ओरडून म्हणाला, ' थांब राजा, किल्ल्या आणतो ! ' मोती स्तब्ध झाला. मोठ्या प्रयासाने त्याने किल्ल्या मिळविल्या आणि परत येऊन मोतीला मुक्त केले. हा वेळपावेतो सर्कसवाल्यांचा सौदा बारगळलाच होता. वेड्या हत्तीला घेऊन काय करणार तो बिचारा ! चांदने मोतीला पुन्हा तबेल्यात नेले.

हल्ली मोतीला कसलेच काम सांगण्यात येत नव्हते. म्हणून चांद त्याला रोज साठमारीत नेऊन खेळवीत असे. त्याच्याशी लटकीच लढाई करीत असे. तिकडे जाता येता रोज मोती म्यूझियमच्या खिडकीशी थांबे, व आपल्या स्वामिभक्त बापाच्या स्मारकाचे दर्शन घेई. चांदही त्याला सांगत असे, हा ताजमहाल तुझ्या बापाच्या दातांचा आहे. तू दिसण्यात सहीनसही त्याच्यासारखा आहेस. पण वागण्यात मात्र थोडा तरण्या जनावरासारखा करतोस ! एवढे म्हणून तो स्वतःशीच हसे व मोतीच्या कानामागे पाय मारी. मोतीही गंमतीदार चालीने चालू लागे.

चांदची नोकरी आणि मोतीची चाकरी आता पूर्ववत चालू झाली होती. एका पौर्णिमेच्या रात्री चांद व त्याचा मुलगा मोतीला धुण्यासाठी तलावावर घेऊन आले. मुलगा पाणी शिंपडीत होता. चंद्राचे किरण मोतीच्या शुभ्र दातांवर पडल्यामुळे ते चांदीच्या शिंगासारखे तळपत होते. मोतीला ते दिसत होते, व का कुणास ठाऊक, त्याच्या मनात आपल्या मरणाचे विचार येत होते.

हत्तीच्या दातांवरून चांदला ही आठवण झाली.

" उद्या मोठा समारंभ आहे. मोतीला फिरवायचंय् त्यातून ! "

" कसला समारंभ ? "

" साम्राज्य सरकारला जय मिळाला ना ? "

" बरं मग ? "

" त्याच्या आनंदासाठी आपले महाराज रेसिडेंटसाहेबांचा सन्मान करणार आहेत आणि त्यांना भेट म्हणून शिल्या हत्तीच्या— "

शिल्या हत्तीचे – आपल्या बापाचे – नाव निघताच मोतीही लक्षपूर्वक ऐकू लागला.

" शिल्या हत्तीच्या दातांचा तो ताजमहाल साहेबाला बक्षीस देणार आहेत ! '

" साहेबाला काय म्हणून ? " चांदच्या मुलाने विचारलेलाच प्रश्न मोतीच्याही मनात आला आणि तलावात उभा असताही त्याच्या अंगाची लाही झाली !

" साहेब सरकारचा प्रतिनिधी म्हणून ! आणि तो ताजमहाल गावातून मिरवीत मिरवीत रेसिडेंटच्या बंगल्यावर न्यायचा आहे. आणि ते काम आमच्या मोतीकडे आहे ! "

" हिरे लावले आहेत नाही त्या ताजमहालाला ? "

" लाख दीड लाखाचा जिन्नस आहे ! " चांद म्हणाला. बोलत बोलत दोघेही मोतीला धूत होते. धुणे संपल्यावर हत्तीला चालवीत बापलेक बोलत निघाले. पण मोतीच्या मनात मात्र ' माझ्या बापाची ही तेजस्वी आठवणही हे महाराज लोकांच्या स्वाधीन करणार ? यांना स्वतःच्या संपत्तीबद्दल आस्था नाही. इमानी हत्तीचे दात यांना पृथ्वीमोलाचा ऐवज वाटला पाहिजे. ते कुणाला तरी तो स्वतःच्या लहरीसाठी अर्पण करणार ! आणि तोही कुणाला ? ज्याचा आमच्याशी काही संबंध नाही अशा एका गोऱ्या माणसाला ! माझ्या बापाच्या दातांची ती

वस्तू तो उद्या आपल्या देशाला घेऊन जाईल. मग इथे त्याच्या सेवेचं स्मारक काय राहणार ? याच्याजवळ काय दुसऱ्या वस्तू नव्हत्या त्याला द्यायला ? मोती झपाझप चालत होता. महाताची बोलणीही चालू होती. मोती तबेल्यात आला. झोपायला जाताना चांदने मोतीला बजावले, ' अंगावर गदळ घेऊ नकोस हं आता ! आता कसा छान रंग झालाय् तुझा पावसाळ्यातल्या ढगासारखा ! '

चांद निघून गेला. मोतीला झोप आली नाही. त्याने चारा खाल्ला नाही. गवत अंगावर घेण्याचा नेहमीचा लाडका चाळाही केला नाही. त्याने आपल्या मनाशीच काही तरी निश्चय केला. त्याचे चुटुकले डोळे केवढेतरी विस्फारित झाले होते त्या वेळी. पहाटेच्या वेळेला मात्र चांदला काही संशय येऊ नये म्हणून त्याने सारे गवत खाऊन टाकले व झोपल्याचे सोंग केले. नेहमीप्रमाणे चांद आला. त्याने पाहिले, मोती झोपला आहे. चारा उरलेला नाही. त्याने त्याला उठविले नाही. तो तसाच गुपचुप परत गेला. न्हाऊन झोपी गेलेल्या बाळाची झोप त्याच्या आईला मोडवत नाही. तशीच काहीशी अवस्था झाली चांदची !

मोतीच्या सोंडेवर रंगीत खडूने इंग्रजी ' V ' ची आकृती काढण्यात आली. जरी किनखापाची झूल आणि चांदीच्या घुंगुरमाळांनी त्याला सजविण्यात आले. हौद्यात उंच गिरद्या रचून त्यावर शिल्या हत्तीच्या दातांचा तो ताजमहाल ठेवण्यात आला. सारा रिसाला जमला. महाराज आले. राणीसाहेब आल्या. बँड वाजू लागला. सशस्त्र सैन्याने दोन रांगा केल्या. महाराजांची मोटारही रस्त्यावर आली. शिंग झाले व वाड्याच्या महादरवाज्यातून मिरवणूक चालू झाली. नागरिकांचा प्रचंड मेळा जमला होता. सरदार दरकदार रांगेने चालत होते. गच्ची-सज्जांवरून नारीजन सोहळा पाहत होता.

रेसिडेंटचा बंगला नदीकाठी होता. मिरवणूक त्या रोखाने चालत होती. नागरिकांच्या दृष्टीला ती एका वस्तूची मिरवणूक होती, पण मोतीच्या मनाला मात्र ती आपल्या बापाच्या स्वामिभक्तीची निर्दय प्रेतयात्रा वाटत होती ! तो धिमेपणाने पावले टाकीत होता. अशीच मिरवणूक नदीच्या तीरापर्यंत आली. आता बंगला दिसू लागला होता. बंगला दृष्टीस पडताच धाडधाड असे दहावीस बार काढण्यात आले. मोती तिथेच थबकला ! काही केल्या हलेना. मागच्या मोटारी मागेच थांबल्या व पुढच्या रांगा मागे तोंड वळवून पाहू लागल्या. चांदला काय करावे

ते समजेना. मोतीला समजूत घालावी म्हणून तो खाली उतरला. त्याबरोबर मोती स्वैर धावत सुटला. गर्दीची पांगापांग झाली.

"मोती पुन्हा पिसाळला!" ओरडा झाला. कल्लोळ उठला. शिस्तीचे सैनिक वाट फुटेल तिकडे धावू लागले. सरदारांनी उलटी तोंडे वळवून धावण्यास प्रारंभ केला. मोटारी दूर अंतरावर गेल्या. हत्तीच्या पायांखाली एकदोन माणसे चेंगरली गेली. आरडाओरडा आणि धुमाकूळ माजला.

"त्याला गोळी घाला!" महाराज स्वतः ओरडले.

शेपन्नास बंदुकवाले मोतीमागे धावले. धाड् धाड् धाड् धाड्! बारापाठीमागे बार झाले. मोतीचा विस्तीर्ण देह एखाद्या बुरुजासारखा कोसळला.

तो मेला याची खात्री झाल्यावर बघ्यांची गर्दी झाली. मोती मेला! त्याच्या देहाची चाळण झाली होती.

वेडा मोती मेला!

पण आश्चर्याची गोष्ट ही की, मरता मरता त्याने तो ताजमहाल मात्र नदीत फेकला होता!

वेडा मोती मेला!

त्याच्या बापाच्या दातांचा ताजमहाल मात्र त्याने आपल्या मरणापूर्वी अथांग जलदेवीच्या हवाली केला!

दुसरे दिवशी खाजगी कारभाऱ्यांनी चांदची चौकशी केली.

त्याचा कुठेच पत्ता लागला नाही!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

८

# नेम्या

माणूस एकटा येतो आणि एकटाच माघारा जातो. एकट्याने जीवन जगणे मात्र त्याला साधत नाही. तो आपल्या भोवती आपली माणसे जमवितो. काही माणसेच त्याच्या भोवती जमतात. त्यांतली सारीच शेवटपर्यंत टिकतात असे नाही. बाळपणी जोडलेला एखादा मित्र प्रौढपणी शत्रू होतो. प्रौढपणीचा एखादा स्नेही बरोबर चालता चालताच मित्रघाताची संधी साधतो.

पाठीला पाठ लावून आलेले सख्खे भाऊ एकमेकांचे हाडवैरी होतात. बापाविरुद्ध मुलगा न्यायालयात उभा राहतो. प्रियकर प्रेयसीचा वध करतो. आश्रित आधारावर कुऱ्हाड उगारतो. शिष्य गुरूचा सर्वनाश करू धजतो.

माणसांच्या या जगात अशा अमानुष गोष्टी रोज घडतात. माणूस अगदी माणसासारखा वागल्याची उदाहरणेच कमी आहेत.

अशी उदाहरणे दृष्टी पडायला देखील भाग्य असावे लागते. मला ते लाभले आहे. अव्याहत तीस वर्षे माझ्या बरोबर चालत असलेला माझा एक मित्र आहे. आजतागायत, विनोदाने देखील असत्य बोलला नाही. त्याने कोणाचा द्वेष केलेला नाही, कुणाचा पै-पैसा त्याने लुबाडलेला नाही. साधा माणूस आहे. माणसाच्या विकृतीने त्यालाही सोडलेले नाही, आणि तरीही तो माणूस राहिला आहे.

त्याचे वय आता छत्तीस वर्षांचे आहे. सडपातळ अंगकाठीचा, काळगेल्या वर्णाचा, आणि पांढऱ्या शुभ्र वेषाचा हा माणूस समोर दिसला की मला एक

निर्लेप आनंद होतो. कसल्याही विचारात असलो, कसल्याही मनःस्थितीत असलो तरी मी त्याला उबदारपणे विचारतो, "येनरी नेमिनाथ ?"

"छल्लू येत्ती री."

त्याची-माझी ही प्रश्नोत्तरी वर्षानुवर्षे चालत आलेली आहे. तिला काही अर्थ नाही, आणि तरीही ती अर्थवत्तेने थबथबलेली आहे. त्याचे नाव नेमिनाथ बलवंत उपाध्ये. माझ्या घरातील मुले त्याला 'नेमा' म्हणतात. कधी 'नेमा' ही नामाक्षरे उलट करून 'माने' असेही ती पुकारतात. मी त्याला अनेक नावांनी बोलवितो. कधी नेमिशा, कधी नेमिनाथ तर कधी सरसाहेब. सर गुरुनाथांच्या नावाशी मिळता असा त्याच्या नावाचा ध्वनी, इतकेच या पदवी-दानामागचे कारण. कधी कधी तर मी त्याला 'सर नेमन डिक्सन' या नावानेही बोलावतो.

'आप किसीभी नामसे पुकारिए, हम जवाब दे देंगे!' अशी त्याची वृत्ती असल्याने, त्याला आतापर्यंत ही अनेक नामाभिधाने माझ्यापासून प्राप्त झाली आहेत, पण त्याचे माझ्या जिव्हाळ्याचे नाव 'नेम्या—'.

नेम्या माझ्या नात्यातला नाही. गावातला नाही. तो जातीने चतुर्थ जैन. माझ्या बाळपणी आमचे खेडे सोडून, पोटाच्या पाठीमागे आम्ही कुंडल गावी आलो, त्याच्या दुसऱ्या दिवशीच त्याची आई वारली. आम्हांला मिळालेली जागा त्याच्या घराच्या आसपासच होती. एकाएकी मध्यरात्री लहान मुलांचा ओरडा ऐकू आला, 'माझी चंपा, माझी चंपा!' त्या रात्री, रात्रभर नेम्याच्या घरातील आक्रोशाने आमचे घर जागे राहिले.

दुसरे दिवशी आम्हांला कळले की जवळच्या घरातली जैनाची बाई गेली. तिची बिचारीची लहान धाकटी मुले आहेत. ती रात्रभर ओरडत होती. आई मेलेला मुलगा म्हणून मी नेम्याला प्रथम पाहिला. मला त्याची कणव आली. एखाद्याची आई मरणे ही गोष्टच भयंकर होती. नेम्या तर बिचारा पाचसहा वर्षांचा होता. मी त्याच्या मानाने मोठा होतो. मराठी चौथी इयत्ता शिकत होतो. रोज शाळेला येता जाता मी नेम्याच्या घराकडे पाहत होतो. आई मेलेल्या मुलांचे ते घर माझ्या काळजात कालवाकालव करीत होते.

एके दिवशी रात्री झोपताना माझे वडील माझ्या आईला म्हणाले, "शेजारच्या

जैनाच्या घरात गाय आहे, त्यांच्याकडे सांगून ठेवलंय मी. उद्यापासून रतीब सुरू होईल दुधाचा. ”

दूध घालायला आला तो नेम्याच. मला वाटले, आई मेली असल्यामुळे त्याचे कपडे फाटलेले असतील, पण तसे काहीच नव्हते. उलट थंडी लागू नये म्हणून त्याने लोकरीचे हातमोजे घातले होते, पायमोजे पण घातले होते, कानटोपी पण ल्यायला होता.

त्यांच्याकडचा दुधाचा रतीब सुरू झाल्यामुळे, त्याची माझी रोज गाठ पडू लागली. गाठ पडता पडता गट्टी जमली. एकदा तो मला आपल्या घरी घेऊन गेला. त्याचं घर फार छान होतं. माणदेशी माळवदांपलीकडे वेगळ्या वस्तू मी पाहिल्याच नव्हत्या तोवर. नेम्याच्या घरची माडी, माडीकडे जाणारा लाकडी जिना, रंगविलेल्या तुळया हे सारे मला आठवले. नेम्याच्या घरात एक म्हातारी होती. ती त्याच्या आईची आई. नेम्या तिला ‘ पै ’ म्हणून हाक मारीत होता. ती म्हातारी फार प्रेमळ होती. नेम्याबरोबर आलेला त्याचा दोस्त, म्हणून तिने मलाही खाऊ दिला. खारका, खोबरे, बदाम असल्या वस्तू, तसराळे भरून पुढ्यात ठेवल्या. मग नेम्याकडे माझे जाणे-येणे रोजचे झाले.

त्याच्या बापाची मला मात्र भीती वाटायची. तसा नेम्याचा बाप मोठा गमत्या माणूस होता. तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टीबिष्टी सांगायचा; पण त्याची एक खोड होती. चमत्कारिक हिशोब घालायचा. ते काही सुटायचे नाहीत. बराच वेळ गेला म्हणजे तो तिरसटून म्हणायचा, “ कशाला लेको शाळा शिकता ? गुरं राखायला जा त्यापेक्षा ! ”

बत्तीस सालच्या प्लेगच्या साथीने नेम्याचा तो बापही वारला. मी सातवीची परीक्षा देऊन आलो. इंग्रजी शाळेत गेलो. नेम्या मागे प्राथमिक शाळेत होता. त्याचा मोठा भाऊ बंडू माझ्या वर्गात होता. पण त्याची माझी दोस्ती जमली नाही. बाप मेल्यामुळे बंडूने शाळा सोडली. तो वडिलांचे उपाध्येपण करू लागला. नेम्याच्या हातीही झोळी आली.

सकाळी उठून तो गावातल्या साऱ्या जैनांच्या दारी जायचा. घरोघर त्याला भाकरीचे पीठ मिळायचे. त्या प्रभातफेरीत कधी कधी त्याची माझी गाठ पडली तर तो हसून म्हणायचा, “ भिक्षा पात्र अवलंबिणे, किती जिणे गोजिरवाणे ! ”

मला वाटते, ही उक्ती त्याने त्याच्या बापाकडून उचलली होती. ते ‘ भिक्षां देही ’-चे काम तो मोठ्या खुषीने करी. देवपूजेचा मात्र त्याला कंटाळा होता. त्याचे देवस्थान गावापासून दूर डोंगरावर होते. तिथल्या पार्श्वनाथाला पाणी घालण्यासाठी त्याला खूप तंगडतोड करावी लागायची. गावातल्या त्याच्या ‘ बस्ती ’तही एक भली मोठी दिगंबर मूर्ती होती. ती सारीच्या सारी धुऊन काढणे त्याच्या जिवावर यायचे. त्याच्या ह्या कामात साह्य करणे मला कधीच जमले नाही. बस्तीतल्या देवापुढे येणाऱ्या बदामांचा फडशा पाडण्यात मी हौसेने त्याचा मदतनीस होत असे. त्याचे माझे वय सारखे नसून देखील त्याची माझी मैत्री जमली. भिक्षांदेही, पूजा आणि शाळेची वेळ सोडली तर तो माझ्याबरोबर असायचा. पुढे पुढे तर त्याच्या माडीवर आम्ही आमचे कार्यालयच थाटले. देशभक्ती, प्रभातफेऱ्या, कथावाचन, नाटक मंडळ्या — वाढत्या बाळपणी मला अनेक छंद जडले होते. नेम्या त्या प्रत्येकात माझ्याबरोबर असे. त्याची स्मरणशक्ती जबर. एकदा ऐकले की त्याला तोंडपाठ व्हायचे. त्या पाठांतराला शेंडा, बुडखा काहीच नसायचा. कधी तो किर्लोस्करवाडी ते पुणे रेल्वे रस्त्यावरील स्टेशनांची नामावळीच पाठ म्हणायचा, तर कधी ‘ दादा, देना मला अलविंदाशव ’ असली एखादी जाहिरातही म्हणून दाखवायचा. वर्तमानपत्रातले उताऱ्याच्या उतारे तोंडपाठ म्हणायचा.

स्वभावाने तो अत्यंत मऊ, कनवाळू. एका रात्री त्याच्या माडीवर मी एक शोकपर्यवसायी गोष्ट वाचून दाखविली. नेम्या अक्षरशः रात्रभर रडत होता. बाळपणातील सात-आठ वर्षे नेम्याने माझ्या संगतीत काढली. मी वयाने मोठा म्हणून की काय न जाणो, तो माझ्याशी नेहमी स्नेहभावाने वागत आला.

१९३४ साली मी शिकायला म्हणून औंधाला गेलो आणि नेम्याची व माझी ताटातूट झाली, ती मी फैजपूर काँग्रेसला जाऊन, आश्रमवासाचा अनुभव घेऊन, परत कुंडलला येईपर्यंत. पुढची दोन वर्षे मी कुंडलला अत्यंत वाईट स्थितीत काढली. त्या वेळी नेम्या सदैव माझ्याबरोबर राहिला. त्याच्या माडीवरच माझा अड्डा होता. घरच्या दारिद्र्याला कंटाळून, मी नशीब काढण्यासाठी कोणालाही न सांगता पळून आलो तो नेम्याच्या घरूनच. नेम्या मला स्टेशनपर्यंत पोचवायला आला. निरोप देताना खळखळून रडला.

मी कोल्हापूरला आलो. चित्रपटधंद्यात काही रुटुखुटू करू लागलो. नेम्याचा माझा संबंध तुटला. दरम्यानच्या काळात तोही माझ्यासारखाच कुठे तरी पळून गेला. कोकणातल्या कुठल्याशा 'पाळशी' नावाच्या गावापाशी त्याने शाळा काढली. काही काही केले.

एकूणचाळीस साली मी यशवंत संगीत मेळ्याबरोबर गणेशोत्सवाच्या कार्यक्रमासाठी सांगलीला गेलो होतो. वखार भागात आमच्या मेळ्याचे कार्यक्रम झाले. माझ्या नकला झाल्या. रंगमंचकावरून खाली उतरलो, तो नेम्या हजर. अवतीभोवती कुणी पाहाते आहे, याचा विचार न करता भर रस्त्यावर त्याने पायांनां हात लावून मला नमस्कार केला.

" तू रे कुठे ? " मी विचारले.

" तुम्हांला भेटायला. "

" करतोस काय ? "

" काही नाही. "

" चल कोल्हापुराला. "

नेम्या निघाला. नेसूचे धोतर, अंगातला कुडता आणि माथ्यावरची टोपी, एवढ्याच सामानानिशी तो माझ्याबरोबर कोल्हापुरी आला. मी एका अडत दुकानात राहत होतो. तोही माझ्याबरोबर राहिला. मी तिथल्या दुकानदाराचा आश्रित. तो माझा आश्रित. तिथल्या मुक्कामात त्याने माझ्याबरोबर उपास काढले. मिळेल तेव्हा, मिळेल ते अन्न आम्ही दोघांनी खाल्ले. माझे कपडे असे फार नव्हतेच, पण नेम्या ते धुऊन ठेवी. माझे उष्टे घासून लख्ख करी. माझी सेवा हा त्याचा धर्म बनला. त्याचे कारण मला तेव्हा कळत नव्हते. आजही समजलेले नाही. ऋणानुबंधाचे लागेबांधे म्हणतात ते हेच !

त्याचे हस्ताक्षर सुंदर. अगदी मोत्याच्या दाण्यांसारखे. त्या अक्षरांनी तो माझ्या कच्च्या कविता फेअर करून ठेवी. मी खांडेकरांचा लेखनिक म्हणून काम करू लागल्यावर, त्यांचे काही लिखाण घरी घेऊन येई. त्याची प्रत करण्याचे काम तो मनःपूर्वक करी. त्याच्या सेवेने गहिवरून जाऊन कधी कधी मी विचारी, " नेम्या, तू हे का करतोस ? "

" करावे वाटते म्हणून. " एवढेच उत्तर तो देई.

तो आपले घर विसरला. गाव विसरला. भाऊ विसरला. बहीण विसरला. लग्न होऊन सासरी आलेल्या मुलीने माहेरचे पाश कटाक्षाने तोडून टाकावेत, तसे त्याने साऱ्या आप्तस्वकीयांचे पाश तोडून टाकले. जे माझे आहे, त्याला तो आपले म्हणू लागला. माझ्या आई-वडिलांची चिंता करायला शिकला. माझ्या भावंडांची काळजी वाहू लागला. माझ्याशी पूर्णपणे समरस झाला.

ग्रामोफोन कंपनीची कामे मिळाल्यावर मला थोडे नाव मिळाले. थोडा पैकाही सापडला. नेम्याला वाटले, आपले अण्णा मोठे झाले. मोठ्या माणसांची बडदास्त त्याने कुठे पाहिली होती कोण जाणे. तो माझ्या आंघोळीचे पाणी उपसून ठेवू लागला. एवढेच नव्हे, तर शौचाला जायचे पाण्याचे भांडे देखील शौचकूपात भरून ठेवू लागला. त्याच्या सेवेची सीमा झाली. कुणी कुणाची केली नसेल, असली सेवा त्याने माझी केली. निर्हेतुकपणे, अगदी आपसुख केली. स्वतःच्या-विषयीचा विचार सोडून देऊन केली.

बेचाळीसमध्ये माझे लग्न झाले. नेम्याच्या सेवेचे क्षेत्र आणखी विस्तार पावले. तो माझ्याबरोबर माझ्या पत्नीचीही सेवा करू लागला. घरगडी ज्या कामांना नाके मुरडीत, ती कामे तो बिनबोभाट करीत राहिला. बेचाळीसच्या क्रांति-कारकांशी माझे संबंध होते. ते माझ्याकडे येऊन छपून राहत असत. एकदा एकाने एक काम सांगितले.

" नेमिनाथ, ही बॅग कुंडलला त्या अमक्याकडे पोचवशील ? "

' हो ! ' नेम्याने होकार दिला. काम सांगणारा मित्र होता ना माझा. तोही नेम्याला आदरणीय. शिगोशिग शस्त्रांनी भरलेली ती बॅग त्याने न भिता, न डगमगता सांगितल्या स्थळी नेऊन पोचविली. काहीच न केल्यासारखा कोरडा ठणठणीत माघारा आला. नुसत्या आभाराचीही अपेक्षा त्याने केली नाही.

पुढे काळ मोठा कठीण आला. मला दोन मुले झाली; आणि उत्पन्न पार थंडावले. नेम्या त्या वेळी घरी जेवायला येईनासा झाला. तो प्रफुल्ल स्टुडिओत स्टोअर-असिस्टंट म्हणून नोकरी करीत होता. शक्यतो तिकडेच कुठेतरी जेवायचा. झोपायला फक्त घरी यायचा साखर, तांदूळ असल्या वस्तू न जाणे, कुठून मिळवायचा आणि त्या गुपचूप सैंपाकाच्या खोलीत आणून ठेवायचा.

दसऱ्याचा सण होता म्हणून मी त्याला सांगितले, ' नेम्या, जेवायला घरी

ये.' तो 'हो' म्हणाला. सकाळचाच उठून कुठे पसार झाला त्याचा पत्ता नाही. दुपारचे दोन वाजले तरी आला नाही. त्याला घेतल्यावाचून जेवणे मलाही प्रशस्त वाटेना. मुलाबाळांनी जेवून घेतले. मी आणि पत्नी त्याची वाट बघत थांबलो. दुपार सरली, उन्हे कलली, दिवस बुडाला तरी त्याचा पत्ता नाही. शोधायचा तरी कुठे? स्टुडिओला सुट्टी होती, तरी तिकडे चौकशी केली फोनवरून. तिथे तो नव्हता. ओळखीच्या ठिकाणी स्वतः पाहून आलो. तिथेही नव्हता. रात्र झाली, तरी तो आला नाही. शेवटी पोलिसात वर्दी द्यावी की काय असा विचार करीत आम्ही बसलो. रात्री बारा वाजता तो आला. आला तो मोठ्या चमत्कारिक अवस्थेत. डोळे शून्य झालेले. शरीराचे भान नाही. हातात आपट्याच्या पानांच्या चार फांद्या घेतलेल्या—

"नेम्या, गेला होतास कुठे?" मी विचारले.

"सोनं लुटायला. घ्या सोनं!" म्हणत त्या फांद्यांची चार पानं कुरतडून त्याने माझ्या हाती ठेवली. खाली वाकून पायांवर डोके ठेवले. त्याची ती वृत्ती आणि मुद्रा पाहून मी हादरलो. मनोमन खात्री पटली, 'याचे डोके फिरले!' मी आणखी कुणाला काही बोललो नाही. पत्नीला त्याचे ताट करायला सांगितले. आम्ही दोघेही त्याच्यासाठी उपाशी राहिलो होतो. जेवताना तो वाटीत भात आणि भातात पाणी असे करू लागला. त्याची ती दशा पाहून मला भडभडून आले. गावचा एक विद्यार्थी कोल्हापुरातच शिकायला होता, त्याला बोलावून घेतला आणि त्याला सांगितले, याला असाच गावाकडे घेऊन जा. तो त्याला माझ्या खेड्यात घेऊन गेला. तिथे गेल्यावर तो पूर्वीसारखा वागू लागला. शेतावर राहिला. तिथल्या वातावरणाशी एकरूप झाला. वर्षाभरात त्याने माझ्या खेड्यातल्या घरात आणि खेड्यातही एवढे प्रेम संपादन केले की, घरातले पान नेम्यावाचून हलेना. गावातल्या समारंभाचा आरंभ नेम्या आल्यावाचून होईना.

"काय झालं होतं नेम्याला?" पत्नीने विचारले.

"मस्तकावर परिणाम झाला होता." नंतर मी तिला सांगितले.

"मला देखील वाटत होते तसेच. दुसऱ्या दिवशी दिसले, अलीकडे त्याच्या वागण्यात फरक पडला होता. तो पहिला राहिलेला नाही."

"असेल काही मानसिक कारण!"

" काय असावं पण ? "

" आता कशाला त्याचा शोध ? बरा झाला ना, ठीक झालं ! "

नेम्या परत आमच्याकडे आला, तो मी पुण्यास बिऱ्हाड केल्यावर. माझ्या धाकट्या बहिणीला पोचविण्यासाठी तो आला. आला तो पुन्हा परत गेला नाही. पुण्यातच राहिला. परत त्याचे सेवाकार्य सुरू झाले. मुलांना शाळेत पोचविणे, त्यांच्या फीज जाऊन भरणे. बाजारहाट करणे. सारे चक्र सुरू झाले. तो घरात असला म्हणजे मला कुठल्याच गोष्टीत पाहावे लागत नसे. आल्यागेल्याचे स्वागत, पत्रव्यवहार तो सांभाळी. वर्ष सहा महिने ठीक गेले. एके दिवशी माझी पत्नी कुरकुरली, " नेम्याचं काही तरी बिघडलंय्. "

" कशावरून ? "

" उलटे बोलतो. "

" तुला ? "

" हो. "

" शक्य नाही. "

" खरं हो, एक सांगितलं तर भलतंच करतो. आपली अक्कल मलाच सांगत बसतो. "

" ठीक आहे. त्याला अक्कल आहेच थोडी जास्त. तुझ्यापेक्षा. "

पत्नीच्या आधी नेम्या माझ्याबरोबर नांदत होता. त्याच्या स्वभावाची जाण मला पूर्णपणे होती. या वेळी माझे गणित चुकले.

त्या दिवशी घरात कुणीतरी पाहुणा होता, त्याची झोपायची व्यवस्था नेम्याच्या खोलीत केली होती. रात्रीचे आठ नऊ वाजले होते. नेम्या अवेळीच जाऊन आपल्या अंथरुणावर झोपला होता. न जेवताच झोपला होता. मी चौकशी केली, तेव्हा पत्नीने सांगितले, " त्याला जेवायचं नाही. डोकं दुखतंय् ! " आम्ही जेवणे उरकली. पाहुणा नेम्याच्या खोलीत गेला. तिथल्या पलंगावर लवंडला.

" अहो दिवा नका ठेवू. मला उजेडात झोप येत नाही. " नेम्याने त्याला तराटणी दिली.

पाहुण्याने लक्ष दिले नाही. थोड्या वेळाने दिवा बंद करू, अशा विचाराने

झोप घेण्यापूर्वीचे वाचन म्हणून तो एक पुस्तक चाळू लागला. पाच मिनिटे झाली नाहीत, तो नेम्या अंगात आल्यासारखा ताडकन् उठला आणि त्याने विजेचा बल्बच खसकन् काढून घेतला. पाहुणा घाबरला आणि माझ्याकडे आला. नेम्याची कर्तुक त्याने मला सांगताक्षणीच माझे डोके एकदम भडकले. मी तरातरा त्याच्या खोलीत गेलो. अंधारातच त्याला पकडून बाहेर खेचला, ओरडून विचारले, " काय रे, बल्ब तोडलास का ? "

" हो, हो, खोली काय त्यांच्या बापाची आहे ? "

माझा संताप अनावर झाला. मी त्याच्या फाडकन् एक कानशिलात भडकावली. त्याला पुढे ढकलीत ओरडलो, " असं वागणार असलास तर नको राहू इथं. चल नीघ ! " तो दाराबाहेर जाऊन धडपडला. परत उठला आणि मागे न बघता अंधारातील जिना उतरला.

" जाऊ दे ! मरू दे ! " मी वैतागून म्हणालो.

जाऊन जाऊन जाईल कुठे ? अन्नाची आठवण झाली म्हणजे पाळलेले जनावर देखील परत फिरते, या कल्पनेने मी तसे म्हणालो असेन, पण नेम्या त्या रात्री परत आला नाही. दुसऱ्या दिवशी आला नाही. तिसऱ्या दिवशी आला नाही. तो गेला तो गेलाच — कुठे गेला कुणास ठाऊक ?

त्यानंतर त्याचे पत्र नाही. चिठ्ठी नाही. काही नाही. कोल्हापुरात त्या दसऱ्याच्या दिवशी, त्याला तसे झाल्यापासून त्याचा स्वभाव बदलला होता, असे पत्नीने मला वारंवार सांगितले. माझा त्यावर विश्वास बसेना. तिची खात्री झाली होती, की तो आता परत येणार नाही. पण मला सारखे वाटत होते, तो येणार. त्याला माझ्यावाचून गमणार नाही. माझ्याइतके जवळचे त्याला दुसरे कोणीच नाही.

माझा अंदाज खरा ठरला. सहा-आठ महिन्यांनी तो परत आला, पण आला तो पूर्ण बदलून. शरीर अशक्त, कळाहीन झालेले. डोळे खोल गेलेले. हातापायांची बोटे वेडीवाकडी झालेली. पाठीला पोक आलेले. गालफडे बसलेली — त्याला चालवत देखील नव्हते.

" नेम्या, काय रे झालं तुला ? " मी कळवळून विचारले.

तोल जाऊन पडल्यासारखा तो समोरच्या खुर्चीत पडला आणि एखाद्या लहान मुलासारखा रडू लागला. त्याला मोकळेपणाने रडताही येत नव्हते. मलाही

गहिवरून आले. माझ्या आसऱ्याने वाढलेला हा अनाथ जीव उभ्या आयुष्यात काही न घडता मरणार की काय, या कल्पनेने माझे अंतःकरण पिळवटून निघाले. मी त्याच्याजवळ गेलो. त्याला कुरवाळले. धीर दिला. डॉक्टरना बोलावणे धाडले. डॉक्टरनी त्याला तपासला आणि औषध पाठवितो असे आश्वासन देऊन ते निघून गेले. थोड्या वेळाने त्यांची चिठ्ठी आली, "रोग्याला एखाद्या इस्पितळात पोचविलेले बरे!" त्याला कसला रोग झाला होता कोण जाणे? डॉक्टरांचा सल्ला डावलणे धारिष्ट्याचे ठरले असते. एका ओळखीच्या विश्वासू मित्राबरोबर मी त्याला मिरजेला रवाना केले. तिथे मिशन हॉस्पिटलमध्ये माझा एक मावसभाऊ डॉक्टर होता. त्याला पत्र दिले. नेम्याने माझा निरोप घेतला, तेव्हा माझा हुंदका गळयात थांबू शकला नाही. त्याच्या डोळ्यांना तर खळच नव्हती. त्याला पुष्कळ काही बोलायचे होते. पण बोलायचे देखील त्याला कष्ट होत होते. त्याला पाठविणे भाग होते, म्हणून पाठविला. एका तिरीमिरीत अंगावरच्या कपड्यनिशी गेलेला नेम्या, अशा हलाखीत का होईना, परत आला होता. आता तो पुन्हा परत येईल की नाही याची शाश्वती नव्हती!

दगडाला देव समजून केलेली सेवा फुकट जात नाही. नेम्याने एका सजीव माणसाची सेवा केली होती. तो वाचावा, परत यावा असे माझे मन कळवळून अपेक्षीत होते. माझ्यासाठी तो स्वतःला विसरला होता. त्याच्यासाठी आटोकाट करता येईल ते करणे माझे कर्तव्य होते

मिरजेच्या इस्पितळात राहिलेला नेम्या खडखडीत बरा झाला. माझ्या मावस-भावाचे तसे पत्र आले. त्याने लिहिले होते, 'त्याची प्रकृती आता उत्तम आहे. इस्पितळातून त्याला आता घरी आणले आहे. तो घरात इतका मिसळून गेला आहे की, त्याला इथून सोडणे अवघड झाले आहे. मी घरीही एक छोटासा दवाखाना चालवतो. तो माझ्या हाताखाली कंपौंडर म्हणून काम करतो. तो सुखात आहे. तुमच्याकडे काय नि माझ्याकडे काय सारखेच आहे.' डॉक्टरने लिहिले, पण नेम्याने मला काहीच लिहिले नाही. लिहो वा न लिहो, तो बरा झाला यात सारे आले, असा विचार करून मी निःश्वास सोडला.

दिवाळीच्या सणानिमित्त नेहमीप्रमाणे आम्ही सारी मंडळी खेड्यावर गेलो होतो. अभ्यंगस्नाने उरकून देवदर्शनासाठी बाहेर पडतो तो दरवाज्यात नेम्या

हजर! आता तो चांगला गुटगुटीत दिसला. परत त्याने पायाला हात लावून नमस्कार केला.

"एकाएकी कसा रे आलास?"

"दिवाळी अंक दृष्टीला पडले मिरजेत. तुमचे लेख आलेले पाहिले. फार आठवण होऊ लागली. राहवेना. आलो."

"ठीक आहे. आलास तसा दिवाळी करून जा." मी सांगितले. त्याने मान डोलावली. तो राहिला. परत पुन्हा मिरजेला गेला नाही. आमच्याबरोबर तो पुण्याला आला. 'कशाला येतोस?' असे त्याला विचारण्याचा धीर मला झाला नाही. लहानपणापासून तो माझ्याबरोबर राहिला होता. आताच त्याला दूर हो म्हणणे मला क्रूरपणाचे वाटले.

पुण्यात आम्ही आमच्या स्वतःच्या बंगल्यात राहायला आलो. माझ्या पत्नीच्या बरोबरीने नेमिनाथाने बंगल्याची साफसफाई केली. सामान लावले. त्याची सेवा परत पूर्ववत् सुरू झाली. दसऱ्याच्या दिवशीचा तो प्रकार, तो बल्ब तोडण्याचा पराक्रम आणि ते प्रेतवत् होऊन दारात येणे, यातील काहीच आता पुन्हा संभवणार नाही याची खात्री पटल्यावर मी नेमिनाथाला विचारले,

"तू असा किती दिवस राहणार?"

"जन्मभर." त्याने उत्तर दिले.

"तिशी आली तुझी."

"मग?"

त्याने पूर्वी कधी भविष्याचा विचार केला नव्हता. आजही तो करण्याची त्याची सिद्धता नव्हती. त्याच्यासाठी विचार करणे हे जणू माझेच काम होते. चारी अंगांनी फुलून आलेल्या माझ्या संसारात तो जड मुळीच नव्हता, पण त्याच्या स्वतःच्या आयुष्याचे काय?

तो प्रश्न अचानकपणे सुटला. पुण्यात नभोवाणी केंद्र निघाले आणि नेम्याला एक लहानशी नोकरी मिळाली. तिथले काम त्याने इतक्या मनःपूर्वक केले की, वर्षभरात तो सर्वांचा प्रिय झाला. सेवेच्या बळावर त्याने अनेकांची मने जिंकली. त्याला पगारही बरा मिळू लागला.

तो पगार तो महिन्याच्या पहिल्या तारखेला आणून माझ्या पत्नीच्या स्वाधीन

करू लागला. नोकरी लागली तरी त्याने घरकाम मुळीच सोडले नाही. बाजारहाट, हिशेब-ठिशेब हा त्याचा नित्यक्रम चालूच राहिला. स्वतः मिळवू लागल्याची जाग आल्याने, त्याला जेवण अधिक गोड लागू लागले. रेडिओ केंद्रावरून त्याचा लौकिक वाढू लागला. त्याने केलेल्या भूमिका लोकप्रिय झाल्या. आणि पुन्हा अचानकपणे त्याचे मस्तक बिथरू लागले.

एके दिवशी संध्याकाळी त्याने चक्क माझ्यासमोरच्या कोचात बैठक मारली आणि म्हणाला, " मी आता लग्न करणार आहे ! "

मी ऐकतच राहिलो !

" निपाणीचा एक श्रीमंत गृहस्थ मला मुलगी देणार आहे. त्याच्या मोटरी आहेत. त्याला मुलगा नाही. "

त्याच्या त्या स्वप्नरंजनाने मी पुन्हा घाबरलो. तो दसरा, तो विजेचा बल्ब आणि ते प्रेतवत् अवस्थेत परतणे, सारे झराझर माझ्या डोळ्यांसमोरून चमकून गेले. त्याच्या बिथरण्याचा धागा माझ्या हाती लागला. तो कमी बोलणारा, प्रामाणिक आणि सरळ माणूस. हवे ते मिळविण्यासाठी वाकड्या मार्गाने जाण्याचा त्याचा स्वभावच नव्हे. सेवेत सर्वस्व मानण्याची त्याची वृत्ती असली तरी माणसाची मूळ प्रवृत्ती काही त्याच्या ठिकाणी नाही, असे नाही. माझे विवाहित आयुष्य दोन वर्षे जवळून पाहिल्यावर तो बिथरला असेल. ती ऊर्मी आवरण्याचा त्याने प्रयत्न केला असेल. स्वतःला विसरण्यासाठी तो खेड्याशी समरस झाला. भरलेल्या कुटुंबात आल्यावर त्याची ऊर्मी पुन्हा उसळली असेल. मध्यंतरी परागंदा झाला. तेव्हा कदाचित्......काही आजार त्याने ओढवून घेतला असेल. वैद्यकीय इलाजांनी त्याला सावरला होता. रेडिओ केंद्रासारख्या रंगीन वातावरणात त्याच्या सुप्त प्रवृत्तींनी उचल खाल्ली. तो फुटू देत नव्हता ते त्याला जोराने मागे सारून उसळू पाहात आहे. त्याचे लग्न केले पाहिजे.

नेमिनाथाचे लग्न झाले. त्याला पत्नी अतिशय चांगली मिळाली. सत्त्वशील शेतकरी जैन घराण्यातली. चार इंग्रजी बुके शिकलेली. ती वर्षभर आमच्याच घरी होती. धाकट्या जावेने वागावे तशीच ती माझ्या पत्नीशी वागली. आता त्याने बिऱ्हाड केले आहे. माझ्याच बंगल्याच्या आउट हौसमध्ये तो राहतो.

स्वतःचा मुळीच विचार न करणारा, वेताळासारखा आज इथे आणि उद्या

तिथे भटकणारा नेमिनाथ आता स्थिरावला आहे. त्याला अपत्य झाले आहे. माझ्याच मुलांतून ते खेळत असते. बागडत असते. वयाची उणीपुरी तीस वर्षे माझ्या सावलीत वाढलेला नेम्या आता स्वतः सांसारिक झाला आहे. अजूनही त्याची सेवावृत्ती कायम आहे. माझे काही दुखले खुपले की त्याला काम सुचत नाही. त्याची चूल वेगळी आहे, घर वेगळे नाही. रोज सकाळी तो आपल्या बिऱ्हाडात जागा होतो. प्रथम माझ्या बंगल्यात येतो. व्हरांड्यात दोन पायांवर उकिडवा बसून सकाळची वर्तमानपत्रे चाळतो. स्नान उरकले की आमच्या स्वयंपाकघरात येतो. बाजारातून काय आणायचे, काय नाही ते माझ्या पत्नीला विचारतो. सायकलीवर टांग टाकून मंडईत जातो. मंडई करून आला की त्याच सायकलीवरून माझ्या, मॉंटेसरीत शिकणाऱ्या छोट्या मुलीला शाळेत पोचवतो. माझी कामे विचारून घेतो आणि मग आपल्या संसाराच्या सेवेला लागतो.

मी वा आमच्याकडे आलेला कुणीही पाहुणा गावाला जाणार असेल, तर नेमिनाथाला फक्त वर्दी द्यावी लागते. तो रिझर्व्हेशन करून तिकिटे स्वतःजवळ ठेवतो. गाडीची वेळ पाहून टॅक्सी बोलावून घेतो. सामान डब्यात ठेवून, जाणारा ठीक बसला आहे याची खात्री करून मग निरोप घेतो.

नेमिनाथ पूर्वी होता तसाच आहे; मध्ये बदलला होता. त्या बदलाला कारण होते. लोक म्हणतात, नेम्या लग्नानंतर पूर्वीसारखा झाला आहे!

गेल्या वर्षी मी त्याला म्हणालो, " नेम्या, मला शंभर रुपये दे रे, " त्याने मान डोलावली. अर्ध्या तासानें दहादहाच्या दहा नोटा त्याने माझ्या हाती दिल्या. मी ती गोष्ट साफ विसरलो. लक्षात ठेवण्याचे कारणही नव्हते. नेम्या परका आहे असे मला कधी वाटलेच नाही.

परवा तो माझ्याकडे आला आणि चाचरत म्हणाला, ' ... तेवढे ते पैसे ? '

' कसले ? ' मला वाटले, नेहमीच्या वीज-पाण्याच्या बिलातली काही बाकी त्याला भरायची असेल.

" ते मी तुम्हांला दिलेले ! "

नेम्याच्या तोंडून हे उद्गार ऐकताच माझा पारा एकदम चढला.

" मला दिलेले पैसे परत मागतोस ? पैसेवाला झालास लेका – आभाळाला हात लागले तुझे ? इतकी वर्षे खाल्लंस ते ? तुझ्या लग्नाला खर्च आला तो ? तुझ्या आजारीपणात खर्चावे लागले ते ? "

नेम्याला उत्तर सुचले नाही. तो निमूटपणे निघून गेला. मला वाटले नेम्या बदलला. त्याला आपले-तुपले कळू लागले. माणसे घेतलेले उपकार विसरतात. केलेल्याची परतफेड व्हावी म्हणतात. नेम्या अपवाद असेल असे वाटत होते. तोही बदलला. तो लौकर गेला म्हणून बरे, नाहींतर बल्ब तोडल्यासारखी मीं आताही त्याच्या मुस्कटात दिली असती !

समोरच्या मारवाड्याकडून नेम्याने शंभर रुपये कर्जाऊ घेतले होते. त्या रकमेला जबर व्याज होते. त्याच्या मिळकतीइतकाच त्याचा खर्च होता. या रकमेला हातच लागत नव्हता. त्या कर्जातून सुटण्यासाठीं त्याला मीच मदत करायला हवी होती. माझ्याशिवाय त्याला कुणीच जवळचे नव्हते. आणि ते पैसे त्याने माझ्यासाठी आणले होते. मी पैसे मागितले होते. ते त्याच्याजवळ नव्हते. मला नाही म्हणणे त्याला जमले नव्हते. किंबहुना माझा शब्द झेलणे हा त्याच्या स्वभावाचाच एक भाग होता.

हे सारे मला कळले, तेव्हा मला भडभडून आले. नेम्या बदलला नव्हता. माझी दृष्टी बदलली होती !

नेम्या माझ्याबरोबरच चालतो आहे. मी राजासारखा सुखानेच चालत राहिलो तर माझ्या अंगावरील भरजरी आनंदवस्त्राचा घोळ जमिनीवर लोळू नये म्हणून तो आपल्या हाती अदबीने उचलून धरून तो माझ्या पाठोपाठ चालत राहील, दुःखाच्या भाराने वाकून मी रस्त्याच्या मध्येच बसलो, तर तो मला धीर देईल. जुन्या निष्ठेने माझे पाय चेपील, माझे ओझे स्वतः उचलण्याचा प्रयत्न करील. मी उठेतो माझ्या शेजारी बसून राहील.

प्रापंचिक माणसाला असावीत ती सारी नाती मला आहेत. वरद विठाबाई-सारखी कासवीच्या डोळ्यांची आई आहे. भावाच्या करंगळीच्या जखमेसाठी अंगावरच्या महावस्त्रांचा पदर अधीरपणे टरकावील अशी बहीण आहे. मोठ्या भावाला ‘ वडिलां ’च्या ठायी मानणारे निष्ठावंत भाऊ आहेत. पातिव्रत्य आणि संसारदक्षता या बाबतीतल्या भारतीयांच्या आदर्शांशी तंतोतंत जुळणारी सुहासिनी पत्नी आहे. प्रकृतीने सुदृढ, रूपाने गोड आणि बुद्धीने तल्लख असलेली अपत्ये आहेत. पण नेम्याचे माझे नाते वेगळे आहे.

त्या नात्याला नाव नाही. दगडाला देवत्व देणारे संत आणि माणसासारखाच मातीच्या पोटी जन्मलेला दगड, यांच्यातील नात्याला नाव काय ?

नेम्याचे आणि माझे तसलेच काही निनावी नाते आहे.

तसा तो माझ्या नात्याचा नाही. गोत्यातला नाही-काहीच नाही—

६

# औंधाचा राजा

मी राजा पाहिला होता. पदरी राजकवी ठेवण्याइतका बडेजाव त्या राजाने कधी केला नाही. पण यदाकदाचित् जर मी त्याचा राजकवी झालो असतो तर ' साक्षात् मनुरिव स्वयम् ' असे त्याचे वर्णन करताना मी थबकलो नसतो. त्या राजाला मी प्रथम पाहिले, तेव्हा माझे वय दहा-अकरा वर्षांचे होते. राजा म्हातारपणाच्या पायऱ्या चढू लागला होता.

' राजा येणार, राजा येणार — ' म्हणून सारा गाव आनंदात होता. गाव राजाच्या संस्थानापैकी होता. संस्थानच्या चार-पाच तालुक्यांपैकी तो एका तालुक्याचा गाव होता. त्या दिवशी त्या गांवढळ गावातील साऱ्या धूळभरल्या रस्त्यांना तुषार-स्नान घडले होते. भिजल्या मातीचा वास सर्वत्र दरवळत होता. पेठकऱ्यांची तेलकट दुकाने आज नीटनेटकी झाली होती. बाजारपेठेच्या बोळकंडीत एकदोन ठिकाणी तांबडी आलवाणे फडकत होती. त्यावर बेगडी अक्षरे चमकत होती : ' श्रीमंत भवानराव पंडित प्रतिनिधी चिरायू होवोत ! '

रस्त्यांशी हातमिळवणी करणारी गृहस्थांची अंगणे रांगोळ्यांनी सुशोभित केलेली होती. सरकारवाड्यासमोरच्या पटांगणात प्रजाजनांनी गर्दी केली होती. अधिकारी वर्ग माथ्यावरचे रुमाल चाचपीत व छातीवरची उपरणी सावरीत येरझाऱ्या करीत होता. न्हाऊन धुऊन कपाळभर कुंकू ल्यायलेल्या पूर्वास्पृश्य सुवासिनी राजाची वाट पाहात दुतर्फा उभ्या होत्या. त्यांच्या हाती पितळी थाळ्या होत्या. त्या थाळ्यांतून नीरांजने पेटली होती. वाड्यासमोर येऊन मिळणाऱ्या प्रत्येक गल्लीच्या

तोंडाशी दर्शनोत्सुकांची गर्दी तुंबली होती. सर्वांच्याच डोळ्यांत औत्सुक्य वा आदर यावाचून दुसरा भाव नव्हता.

'त त त त्त त त त्त थ्यु थुई थुई ऽऽऽ'

कारंजे चढत जावे तसे गुरवाच्या शिंगाचे स्वर चढत गेले आणि जो तो पुढे सरसावला. सरकारी अधिकाऱ्यांनी भुईपर्यंत वाकून मुजरे केले. राजाची मोटार आली. अस्पृश्य सुवासिनींनी डोईवरचे पदर आणखी पुढे ओढले. दुरूनच राजाला आरत्या ओवाळल्या.

वाड्याजवळच्या एका घराच्या बोडक्या माळवदावर मी उभा होतो. कुंबीवर छाती रुतवीत खाली वाकून पाहत होतो. औंधाचा राजा खाली उतरला. वाड्याकडे जायचा तो परत फिरला. त्या अस्पृश्य भगिनींच्या रांगेजवळ तो आला. त्यांपैकी प्रत्येकीच्या थाळीत, त्याने रुपया-आठ आणे टाकले. गरीब संस्थानचा राजा, पण त्याची चालचलणूक एखाद्या हिंदू सम्राटासारखी. अस्पृश्य बायकांपैकी प्रत्येकजण चटाचट लवू लागली. राजाला नमस्कार करू लागली. राजाच्या तोंडातून उद्‌गार निघत राहिले. 'जय देव!' आपल्याला केलीली वंदना देखील राजा स्वतःकडे घेत नव्हता. ती देवाच्या नावे तशीच वाहून टाकीत होता.

प्रजाजनातील पददलितांचा सत्कार प्रथम स्वीकारून मग राजा वाड्याकडे निघाला. राजा होता म्हाताराच, पण त्याची चाल ध्वजाच्या काठीसारखी ताठ. चालताना त्याची छाती तेवढी प्रथम पुढे सरकते आहे असे वाटत होते. त्याचा वेष साधाच होता पण त्या साधेपणातही राजैश्वर्याची ऐट होती. डोक्याला लाल भडक ब्राह्मणी पगडी, तिच्यावर डौलदार तुरा. अंगात बाराबंदीचा पायघोळ रेशमी अंगरखा, पायात चुणीदार तुमान. बुटापुरताच त्याच्या वेषावर इंग्रजी पोषाखाचा संस्कार होता. एरव्ही सारा थाट अस्सल मऱ्हाटी. बघणाऱ्याला वाटावे की, राजपुरुष नुकताच पालखीतून उतरला असावा. माळवदावर जमलेल्या प्रजाजनांनी एकदम राजाच्या नावाचा जयजयकार केला. त्याने वर पाहिले. मलाही दर्शन घडले. रुंद कपाळ, भले मोठमोठे डोळे, प्रसन्न हसणे. मी मनातल्या मनात खूष झालो. मी राजा पाहिला. त्याच्या कपाळावरचे तिरेघी गंध आणि त्या पांढुरक्या भरदार मिशा, माझ्या मनी अगदी ठसून गेल्या. जयजयकार ऐकत

आणि मुजरे स्वीकारीत राजा सरकारवाड्याकडे जाऊ लागला. संस्थानच्या बँडवर मान-गीत वाजू लागले.

**' जय अंबे, हो प्रतिनिधिस सुचिर सुखदा**
**सतत असो विजय,**
**जय अंबे, हो प्रतिनिधिस सुचिर सुखदा '**

ते गीत ऐकत असतानाच मला शाळेत वाचलेला प्रतिनिधी घराण्याचा इतिहास आठवू लागला. किन्हईचे त्र्यंबकपंत कुळकर्णी ... त्यांची औंधच्या यमाई देवीवरची निष्ठा ... त्र्यंबकपंतांच्या पत्नीचे बाळंतपण प्रत्यक्ष जगन्मातेने केले ... त्यांना पुत्र झाला ... परशुराम त्र्यंबक पंतप्रतिनिधी ... ब्राह्मण घराण्यात जन्मलेला महावीर क्षत्रिय ... त्याचे शूरत्व ... त्याचे कवित्व ...

**' श्री अंबिकेने अभयंकराला**
**दिले, भितो कोण भयंकराला ? '**

... सातारच्या छत्रपतींचे ते प्रतिनिधी कसल्याही भयंकर संकटाला भ्याले नाहीत ... महाराष्ट्रात आणि प्रतिनिधींच्या घराण्यात असंख्य उलथापालथी झाल्या ... एकदा तर खुद्द छत्रपतींनीच प्रतिनिधींच्या माथ्यावर दगड ठेवविला... खंडो बल्लाळांनी त्यांना वाचविले ... प्रतिनिधींनी चिटणिसांना वडिलांच्या ठायी मानले ... श्राद्धाला ब्राह्मणाऐवजी कायस्थ पंगतीला येऊ लागला ... ती परंपरा दुसऱ्या परशुरामपंतांनीही चालवली ... दुसरा परशुरामपंत तर अवलिया ... त्याचा उजवा हात युद्धात तुटला ... इतिहासाने त्याला संबोधले ' थोटा पंत. ' त्या थोट्या पंताची जन्मदात्री आईच त्याच्या विरुद्ध उठली ... पेशव्यांनी त्याचा मुलूख जप्त केला .. एक राख मात्र थोट्या पंताशी एकनिष्ठ राहिली ... थोट्या पंताच्या प्रेमासाठी तिने एक डोंगरी किल्ला लढविला ... पेशव्यांच्या पंगतीत एक खारट आर्या खाकरत राहिली ...

**' तेलिण मारिल सोटा**
**बापु गोखल्या सांभाळ कासोटा '**

थोटा पंत निपुत्रिकच राहिला ... त्याला दत्तक घेण्याची मुळीच इच्छा नव्हती ... साहेबांनी आणि संबंधितांनी एक दत्तक मारून मुटकून त्याच्या मांडीवर बसविला ... तो दत्तक राजपुत्र आपल्या वर्तणुकीने राजर्षिपदाला

पोचला ... औंध संस्थानचे विद्यार्थी देवाची करावी तशी आजतागायत त्याची प्रार्थना करीत होते ...

**'श्रीनिवास, धीविकास, चिद्विलास देई**
**उपकृत मी सर्वपरी शरण तुझ्या पायी'**

त्या श्रीनिवासरावांचा औरसपुत्र म्हणजेच हा औंधचा राजा.

त्या दिवशी राजाला मी दुरून पाहिले. जवळून पाहण्याची इच्छा होती ती काही लौकर पुरी होईना. राजाच्या मुक्कामात, गावात शिक्षकांचा मेळावा भरला. त्या मेळाव्याच्या अध्यक्षपदावरून राजाने साऱ्या शिक्षकांना सांगितले, 'विद्या-दानासारखे दान नाही. मास्तरकी ही चाकरी नाही. ते एक थोर समाजकार्य आहे.' राजाच्या ह्या बोलण्याने संस्थानच्या अर्धपोटी शिक्षकांच्या मुखावरही आनंद झळकला. शिक्षकांच्या मेळाव्यापाठोपाठ राजाने विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रदर्शनाला भेट दिली. त्या प्रदर्शनातील वस्तू खरोखरच प्रदर्शनीय होत्या! शाडूच्या गोळ्याला पिवळी फासून एखाद्याने तो गोळा पेरू म्हणून प्रदर्शनात मांडला होता. देवाची मूर्ती चिखलात रुतवून त्या छापातून ओतून काढलेले मेण, अनेकांनी मूर्ती म्हणून मांडले होते. कोष्ट्यांच्या पोरांनी रंगीबेरंगी नाडया विणून ठेवल्या होत्या. सुताराच्या लेकरांनी सामता-पटाशीचे संस्कार करून सांदीतले लाकूड उजेडात ठेवले होते. कुणी कलमदाने बनविली होती. कुणी खुर्चा-टेबल घडविण्याची खटपट केली होती. जिनगराच्या मुलांनी कातरकाम आणि कागदी कुट्टयाची चित्रे केली होती. ज्यांना काहीच करता आले नव्हते त्यांनी चित्रे काढली होती. त्या चित्रकलेतला शिवाजी जिरेटोप घातलेल्या पोपटासारखा दिसत होता. दाढीच्या सादृश्यामुळे शिवाजी आणि अफझुलखान यातला फरक ओळखणे कठीण झाले होते. या बालचित्रकलेतील कुत्री आणि मांजरे सारखीच होती. ससा, कुत्रे आणि माणूस या तिघांची उंची सारखीच होती. ब्राह्मण विद्यार्थ्यांनी आपली हस्ताक्षरेच प्रदर्शनात ठेवली होती.

राजाने ते सारे प्रदर्शन पाहिले. मनःपूर्वक पाहिले. कुशल विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली. खुर्ची करणाऱ्या मुलाला त्याने कारखानदार होशील असा आशीर्वाद दिला, तर मोडी अक्षर काढणाऱ्या मुलाचे, उद्याचा इतिहाससंशोधक म्हणून कौतुक केले. बक्षिस-समारंभाच्या समारोपात त्यांनी आपला आशावाद ओरडून सांगितला,

'आज ओबडधोबड वस्तू करून, प्रदर्शनात मांडणाऱ्या ह्या विद्यार्थ्यांतूनच उद्या ओगले, किर्लोस्करांसारखे कारखानदार निर्माण होतील.'

मुलांच्या प्रदर्शनाइतकीच आपुलकी राजाने व्यापारी मंडळींच्या पानसुपारीच्या प्रसंगी दाखवली. व्यापाऱ्यांनी आणलेले फुलांचे हार त्याने नम्रपणे नाकारले. सुताचा हार समोर येताच त्याची मुद्रा प्रसन्न झाली. व्यापाऱ्यांना उपदेश करताना त्याने एक सूत्र सांगितले – 'कच्चा माल विकू नका. पक्का माल घेऊ नका.' व्यापाऱ्यांना काय कळले कुणास ठाऊक, पण राजाने सांगायचे होते ते घसा खरवडून सांगितले. राजाचा आवाज मोठा होता. त्याचे शब्द पोटात उसळत आणि मग ओठांतून बाहेर पडत. त्यामुळे त्याचे बोलणे नेहमीच घसा खरवडून बोलल्यासारखे वाटे. त्याच्या भाषणात हुकमत असे आणि आर्जवही असे. वाणीसारखीच त्याची नजरही दबदबा उत्पन्न करी आणि स्नेहाचाही वर्षाव करी. सरकारी अधिकारी त्याचा उल्लेख 'पंतसाहेब' म्हणून करीत. त्याचे अडाणी प्रजाजन त्याला म्हणत-- 'पंत बाबा'.

पंत बाबाचा मुक्काम तालुक्यात आला की खेड्यापाड्यांच्या उत्साहालाही उधाण येई. राजाही कुणाचा उत्साहभंग करीत नसे. तो माळ्यांच्या मळ्यात डाळिंबे खाण्यासाठी सहकुटुंब जाई व एखाद्या नगरशेठ्याच्या हवेलीत मेजवानीही घेई. मात्र श्रीखंड चाखता चाखता जरब भरल्या आवाजात त्या शेठ्याला सांगे – 'रुपयावर दोन आणे मिळवणे हा व्यापार, पण रुपयाचे दोन रुपये करणे हा अनाचार.'

प्रजाजनातील ब्रह्मवृंदांनी एखादा धार्मिक समारंभ केला तर राजा मोठ्या आस्थेने तिथे उपस्थित होई. ईदच्या सणादिवशी आपल्या मुसलमान प्रजाजनांना पानसुपारी करण्यासही तो विसरत नसे. महारवाडा ही तर त्याची आकस्मित भेट देण्याची निश्चित जागा. त्याच्या तोंडातून अस्पृश्य हा शब्द कधी निघत नसे. अस्पृश्यांचा उल्लेख तो पूर्वास्पृश्य म्हणून करी किंवा त्यांना अस्पृष्ट संबोधी. त्याच्या राज्यातील कुठल्याही मंदिरात अस्पृश्यांना मज्जाव नसे.

राजाचा तालुक्यातील मुक्काम संपत आला आणि आम्हां विद्यार्थ्यांना सरकारी निमंत्रण आले. शाळेतील विद्यार्थी हे त्या राजाच्या सर्वांत जवळचे आप्त. रांगारांगांनी आम्ही सरकारी वाड्यात पोचलो. त्या दिवशी तर राजा राजा-

सारखा मुळींच वाटला नाही. त्याचे वागणे, अगदी जवळच्या नात्यातल्या एखाद्या वडील माणसासारखे होते. आम्हां सर्व विद्यार्थ्यांना त्याने पोटभर गाईचे दूध प्यायला दिले; सर्वांची प्रेमळपणाने चौकशी केली. कुणाच्या पाठीवर त्याने हलकीशी थाप दिली तर कुणाची हनुवटी कुरवाळली. एकाचे पोट थोडे थुलथुलीत होते. राजाने ते चिमकोट्यात धरले आणि त्या पोराला दरडावून विचारले, ' नमस्कार किती घालतोस ? ' पोराने नकारार्थी मान डोलावली आणि राजाला आवडीचा विषय सापडला... ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ' अशा अवघड देववाणीत सुरू करून, त्याने आम्हांला नमस्काराच्या व्यायामाचे महत्त्व पटवले. आमच्या मास्तरांना ताकीद दिली, ' मुलांच्या बुद्धीपेक्षा त्यांच्या शरीरसंपत्तीकडे अधिक लक्ष द्या. '

त्या भेटीत माझे राजाशी बोलणे झाले नाही, पण त्याचे बोलणे पुष्कळ वेळ ऐकत बसावे अशी सुप्त इच्छा माझ्या मनात तीव्रतेने उद्‌भवली. मी ती कुणाला सांगितली नाही, मनोमन वागवीत राहिलो. राजाचा मुक्काम संपला. तो निघून गेला.

त्याच्या थोरवीच्या गोष्टी मात्र पुढे महिना पंधरा दिवस दरवळत राहिल्या. उण्यापुऱ्या बहात्तर खेड्यांचे संस्थान. वार्षिक वसूल चार साडेचार लाख. पण राजाला आपल्या भूमीचा आगळा अभिमान. आपल्या अडाणी प्रजेबद्दल त्याच्या मनी अमाप प्रेम. राजाच्या प्रथम दर्शनानंतर तीनचार वर्षांनीच संस्थानच्या दुसऱ्या एका तालुक्यात एक कथा घडली. मी त्या वेळी त्या तालुक्याच्या गावी होतो. त्याही गावात राजाचा मुक्काम आला. ते गावही लहानसेच होते. गावाबाहेर एक छोटेखानी आंबराई होती. त्या आंबराईत एक लहानसा बंगला होता. राजाचा मुक्काम त्या बंगल्यात होता.

एका सकाळी एक मराठमोळी म्हातारी बंगल्याच्या फाटकाशी आली. राजा आपल्या नित्यकर्मात मग्न होता. त्याचे सूर्यनमस्कार आटोपले होते, सर्वांगस्नान उरकले होते, पूजापाठ उरकला होता. बंगल्याच्या अंगणात एका पाटावर तो राजपुरुष एखाद्या पुतळ्यासारखा उभा होता. ताठ उभा होता. त्याचे हात जोडलेले होते. हनुवटी उचलली गेली होती. डोळे अगदी स्थिर होते. त्याच्या पापण्या पूर्ण उघडलेल्या होत्या. दृष्टी एकाग्र होती. समोर उंच आकाशात कोवळे

सूर्यबिंब तळपत होते. आंब्याच्या मोहराचा वास दरवळत होता आणि राजा सूर्यदर्शनाचा व्यायाम घेत होता. एकाएकी राजाची समाधी भंग झाली. फाटकावरचे पहारेकरी त्या म्हातारीला अडवीत होते. दरबारी रीतरिवाज माहीत नसलेली म्हातारी पुन:पुन्हा कळवळून सांगत होती, 'मला राजाला भेटायचंय्,' 'मला राजाला भेटायचंय्.' राजाच्या कानांना तिची आर्तता समजली. उभा होता त्या जागेवरूनच त्याने दरडावून विचारले, "कोण आहे ?"

एक पहारेकरी धावत आला. राजापुढे आला. त्याने चाचरत सांगितले, "एक बाई दर्शनासाठी आलीय्."

"येऊ द्या तिला आत," राजा बोलला आणि दळ हलले. ती वेडीविद्री खेडूत बाई राजासमोर आली. एकदम त्याच्या पायांवर पडली. राजा सोवळ्यात होता. त्याला तिच्या स्पर्शाचा विटाळ झाला नाही. बापाने लेकीला विचारावे तसे त्याने तिला विचारले,

"काय झालं बाई ? काय पाहिजे तुला ?"

बाईने रडत रडत सांगितले, "सरकार, तुमच्या एका अधिकाऱ्यानं लाच खाल्ली. तो आणखी मागतोय्. माझ्यागाठी दिडकी नाही. कुठून देऊ त्याला पैसा ? पैसे दिल्याशिवाय तो माझे काम करीत नाही."

"नाव सांग त्याचे." राजा गरजला.

बाईला कापरे भरले. तिला बोलणे सुधारेना. मोठ्या मिनतवारीने चाचरत चाचरतच तिने त्या अधिकाऱ्याचे नाव सांगितले. राजाने तिचे सांत्वन केले व जातीने तिच्या कामात लक्ष घालण्यास आपल्या खाजगी चिटणिसाला फर्माविले.

दुपारी तो लाचखाऊ अधिकारी राजदर्शनाला आला. तो नमस्कारासाठी राजाच्या पायांशी वाकला. आशीर्वादाऐवजी राजाचा दंडा त्या अधिकाऱ्याच्या डोक्यावर बसला. अधिकाऱ्याच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले. "मूर्खा," राजा ओरडला, "माझ्या लेकरांकडून लाच खातोस ? या घडीला माझे राज्य सोडून चालता हो."

तो अधिकारी गेला. त्याला जाणे भाग पडले. पुढे महिनोगणती तो अधिकारी औंधाच्या राजाबद्दल पुण्याच्या वर्तमानपत्रात काही वाईट-साईट लिहीत राहिला. त्याच्याएकी राजाने कान घट्ट झाकून घेतले. कुणाचे काहीच ऐकून घेतले नाही.

‘ राजा प्रकृति रंजनात् ’ या सिद्धान्तावर त्याचा विश्वास होता. राजाच्या मोठेपणाची ही गोष्ट ऐकल्यापासून तर माझ्या मनी त्याच्याबद्दल भक्ती उत्पन्न झाली. त्याच्या प्रत्यक्ष सहवासाचा लाभ मिळावा अशी तहान मला लागून राहिली. राजापर्यंत पोचणे प्रजाजनाला अशक्य नव्हते. पण त्याच्या प्रेमाला पात्र होणे सोपे नव्हते. राजा दयाळू होता पण भोळा नव्हता. खोट्याची त्याला मनस्वी चीड होती. लाचारीचे बोलणे त्याला ऐकवत नसे. सोन्यातले हीण अचूक ओळखण्याइतका तो चाणाक्ष होता. राजाने जवळ करावे इतका कोणताच प्रभावी गुण माझ्या अंगी नव्हता आणि तरीही त्याच्या कृपेची इच्छा माझ्या मनी वाढीला पडली होती. राजापर्यंत पोचण्याचे एकच अस्त्र माझ्याजवळ होते, ते म्हणजे माझे पिढीजात दारिद्र्य. ते अस्त्र मी चालवलं आणि राजाच्या आसपास पोचलो.

माध्यमिक शिक्षणासाठी मी औंधास, प्रत्यक्ष राजाच्या राजधानीत आलो. राजधानीचा गावही राजाला शोभेसाच होता. ल्हानसा पण टुमदार. त्या एवढ्याशा गावात हायस्कूल होते. ‘ त्र्यंबक कलाभुवन ’ नावाची एक औद्योगिक शिक्षण-संस्था होती. अनंत मनोहर जोशी यांच्यासारखे तपस्वी गायक राजाने जवळ केले होते. त्यांच्याकरवी तो गायनकलेचे विद्यादान करीत होता. राजा स्वतः तर, चित्रकलेचा छांदिष्ट म्हणविण्याइतका प्रेमी होता. औंध संस्थानातील शाळांतून चित्रकलेचे शिक्षण सक्तीचे होते. राजा कलाप्रेमी होता तसाच धर्मनिष्ठही होता. कीर्तन या उपदेशकांच्या परंपरागत संस्थेवर त्याची प्रगाढ श्रद्धा होती. कीर्तनकाराच्या शिक्षणाची सोयही राजधानीच्या गावी होती. महाराष्ट्रीय थोर थोर कीर्तनकार राजाने पदरी बाळगले होते. त्याचा राजवाडा साधाच होता. लक्ष्मीपेक्षा सरस्वतीचाच संचार त्या प्रासादात आधिक्याने होत होता. राजवाड्याच्या दर्शनी अंगणात सहा ऋतूंचे प्रतीकात्मक पुतळे उभे होते. तर पिछाडीच्या बाजूला मूर्तिकारांनी आपला कारखाना ठेवला होता. माडीवरील एका दालनात अजंठ्यातील चित्रकृतींच्या प्रतिकृती जशाच्या तशा चितारल्या होत्या; त्या दालनाचे नावच होते अजंठा हॉल. राजवाड्यातला चित्रसंग्रह खरोखरच अवर्णनीय होता. राजाच्या निद्रागारात पूर्ण नलोपाख्यान तसबिरींच्या रूपाने लटकत होते; तर एखादे दालन गजगौरीच्या चित्रकथेने सुशोभित झाले होते.

अनुक्रम ........................ दि. ........
क्रमांक ........................ बो. दि. ..........



भारतातील सर्व नामांकित चित्रकारांच्या कलाकृती त्या राजवाड्यात होत्या. भिवा सुताराच्या रामपंचायतनापासून कोल्ह्याळकरांच्या तांडवनृत्यापर्यंत वेगवेगळ्या कलाकृती दालनादालनातून लटकविलेल्या होत्या. राजा तसा विद्याविभूषित होता. डेक्कन कॉलेजात त्याचे शिक्षण झाले होते. बी. ए. ची उपाधी त्याने मिळवली होती. पुस्तकसंग्रहाइतकाच त्याचा वाद्यसंग्रहही त्याच्या चोखंदळपणाची साक्ष देत होता. साऱ्याच कलांना त्याच्या लेखी आदराचे स्थान होते. राजाचे कलाप्रेम हे त्याच्या ऐषआरामाचे द्योतक नव्हते. कलावंताच्या जबाबदारीची त्याला जाण होती. मोठमोठे शास्त्रीय गायक कऱ्हाड देवीपुढे कीर्तनाला उभे राहात होते. कलेचे हात संस्कृतिवर्धनासाठी राबत होते. राजाची देवावर निष्ठा होती. धर्मावर श्रद्धा होती. गीर्वाण भाषेतील साहित्यावर तो जणू लुब्ध होता. त्याच्या ह्या सर्व आवडी-निवडी त्याच्या निवासस्थानात साकारलेल्या दिसत होत्या.

मी औंध हायस्कुलात दाखल झालो. मला विद्या मोफत मिळत होती, रोजचे अन्नही विनामूल्य मिळत होते. मला राजाश्रय मिळाला होता, पण राजकृपा मात्र माझ्या वाट्याला आली नव्हती. औंध हायस्कुलात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना राजाच्या डोळ्यात भरणे फारसे अवघड नव्हते. कारण राजाची दृष्टी सर्वांत अधिक शिक्षणसंस्थांवर होती. शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांविषयी त्याच्या मनी उपजत माया होती. भूत आणि वर्तमानापेक्षा भविष्याबद्दल तो अधिक जागरूक होता. विद्यार्थ्यांसाठी त्याने अनेक सोयी केल्या होत्या. प्राथमिक शिक्षणाला कुठेच शुल्क नव्हते. माध्यमिक शिक्षणाची फी होती केवळ दोन आणे. औंधला तर विद्यार्थ्यांसाठी फ्री बोर्डिंग होते. अत्यंत अल्प भाड्याची वसतिगृहे होती. त्या वसतिगृहातील खोलीचे भाडे देखील केवळ सहा आणे मासिक. मी पंचवटी नावाच्या वसतिगृहात राहात होतो. फ्री बोर्डिंगातील अन्नावर निर्वाह चालला होता. जगदंबेच्या नैवेद्याइतकेच राजाचे लक्ष विद्यार्थ्यांसाठी शिजवल्या गेलेल्या अन्नाकडे असे. विद्यार्थ्यांसाठी त्याने सर्व सुखसोई तर केल्या होत्याच, पण त्यांच्यावर कसलाही कुसंस्कार घडू नये याचीही काळजी त्याने कटाक्षाने घेतली होती. औंध गावात कुठेही एक कपभर चहा विकत मिळत नव्हता. एकही सिनेमागृह नव्हते. कधीमधी राजाच एखादा सिनेमा विद्यार्थ्यांना दाखवी. तो कार्यक्रम जगदंबेच्या देवळात व्हायचा. परदेशांत छोटे छोटे शास्त्रविषयक बोलपट

निर्माण होत असत. राजा ते मागवून घेई आणि राजकुटुंबीय मुलांबरोबर सर्व शाळकरी मुलांना दाखवी. कधी कधी राजा दूरच्या प्रवासाला जाई. त्या प्रवासाचे चलच्चित्रपट तयार करवी आणि तेही जगदंबेच्या मंदिरात आम्हांला दाखवी; चलच्चित्रपटाची सर्व साधनसामग्री तेवढ्यासाठी त्याने खरेदी केली होती. चित्रपट घेणारे कारागीर पदरी बाळगले होते.

एकदा राजा आमच्या शाळेत आला. अगदी अचानकपणे आला. शाळेच्या मुख्याध्यापकांना वाटले, शाळेत चालू असलेल्या धंदेशिक्षणाची, धार्मिक शिक्षणाची प्रगती अजमावण्यासाठी राजा आकस्मिक आला असेल. आमच्या शाळेत त्या काळातही सूतकताई, मातकाम, शेतकी, विणकाम हे विषय शिकवले जात होते. शिक्षकमंडळींना ते सारे फॅड वाटे, पण राजहट्टापुढे त्यांचे काही चालत नसे. राजा आला तो नेमका आमच्या वर्गात आला. मी त्या वेळी इंग्रजी सहाव्या इयत्तेत होतो. राजा येताच आम्ही सर्व खडबडून उठून उभे राहिलो. राजा एका विद्यार्थ्यापुढे आला. अगदी प्रेमळ आवाजात त्याने त्या बावरलेल्या विद्यार्थ्याला विचारले,

" तुमच्या वर्गात पहिला तास कसला असतो ? "

" नमस्काराचा. " विद्यार्थी उत्तरला.

" छान. दुसरा ? " राजाने विचारले.

" गीतापठनाचा. "

" गीतेतले कुठले वचन तुला सर्वांत अधिक आवडते ? "

" कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । "

ही सर्व उत्तरे ठरलेली होती. ते प्रश्न विद्यार्थ्यांना माहीत होते. त्यांची काय उत्तरे दिलेली राजाला आवडतात हेही त्यांना पाठ होते. आणि हे सर्व स्वतः राजाही जाणत होता. त्या दिवशी त्याने एक वेगळाच प्रश्न एका विद्यार्थ्याला विचारला.

" तू पुढे कोण होशील ? "

या प्रश्नाने मात्र तो विद्यार्थी चपापला. त्या विद्यार्थ्याला उत्तर देणे जमले नाही. मग तो प्रत्येक विद्यार्थ्याला हाच प्रश्न विचारू लागला. वर्गशिक्षकांच्या माथ्यावर घाम जमा झाला. एक विद्यार्थी धीर करून म्हणाला,

" मी कलेक्टर होणार. " राजाने नाक मुरडले.

एकजण बोलला, " मी मुन्सफ होईन. "

राजाच्या रुंद कपाळावर आठ्यांचे जाळे जमले. कुणाच विद्यार्थ्याला कळेना की, राजाला काय उत्तर द्यावे म्हणजे त्याला बरे वाटेल.

" तू रे ? " आणखी एका मुलास राजाने विचारले.

" मी बांगड्यांचा कारखाना काढणार. "

मग कुठे राजाच्या चेहऱ्यावर समाधान झळकले.

" तुझे नाव ? "

" ज्ञानू विठू कासार. "

" शाब्बास ! " राजाने त्याची पाठ थोपटली, " तू मॅट्रिक पास झालास म्हणजे माझ्याकडे ये. मी तुला भांडवल देईन कारखाना काढायला. "

त्या कासाराच्या मुलास आश्वासन देऊन राजा आला तसाच निघून गेला. माझ्यावर प्रश्नाची पाळीच आली नाही. मीही असेच काही तरी उत्तर दिले असते आणि भांडवल मिळविले असते. त्याने तसे भांडवल कैकांना दिले होते. म्हणूनच त्या छोट्याशा संस्थानात किर्लोस्करांचा लोखंडाचा कारखाना होता, ओगले ग्लास वर्क्स भरभराटीत होती. ' वॉशेक्स ' आणि ' ग्लिसरीन ' या साबणांनी बाजारपेठेत नावे कमविली होती. सुगंध शाळेचे धूप महशूर होते. श्रीनिवास मेटल वर्क्सच्या वस्तू बाजारात दिसत होत्या. आपले छोटेसे संस्थान एक औद्योगिक वसाहतच होऊन जावे अशी राजाची मनीषा होती, आणि त्यासाठी इष्ट ते सर्व करण्याची त्याची तयारी होती.

या अनाहूत प्रसंगीही राजाशी जवळीक करणे मला जमले नाही. मी राजाला अनेकदा पाहिले; जवळून पाहिले. त्याची भाषणे ऐकली. त्याचा वाडा पाहिला. वाड्यातील राजकुमारांशीही माझे परिचय झाले. पण राजाच्या कृपेस पात्र होण्याची संधी मला लाभता लाभेना.

फ्री बोर्डिंगवाल्या मुलांना सगासुदीचे जेवण राजवाड्यात मिळत असे. एकदा अशीच पंगत बसली होती. वाढपी वाढत होते. थोराघरी आल्यामुळे आम्ही सर्वजण संकोचून बसलो होतो. संकल्प सोडण्यासाठी म्हणून राजा पंगतीत आला. मोठमोठ्या डोळ्यांनी त्यांनी आमच्याकडे पाहिले आणि खाजगी कारभाऱ्यांना

उद्देशून तो एकदम ओरडला, " या मुलांच्या पंगती आत आमच्यासमोर घ्या. "

खाजगीकडचे सारे नोकर घाबरले. आम्ही पटापट आमच्या जागांवर उठून उभे राहिलो. आमची पंगत आत गेली आणि आतली पंगत बाहेर आली. राजाच्या पंगतीला जेवायला बसल्यावर आमच्या लक्षात आले की, राजाने ही अदलाबदल का केली. आमच्या पंगतीत पक्वान्ने वाढली होती, तर बाहेरच्या पात्रांवर साध्या पांढऱ्या पोळयाच होत्या. ती विषमता राजाच्या स्वभावाला मानवली नव्हती. तो बोलला काहीच नाही, फक्त गुरकावल्यासारख्या आवाजात तो म्हणाला, ' इथून पुढं आमची बाळं आमच्याच पंगतीला जेवली पाहिजेत. ' खाजगीकडल्या नोकरांनी नंदीबैलासारख्या मुंड्या हालवल्या. विद्यार्थ्यांना राजाच्या पंगतीचा लाभ मिळाला आणि राजाचे नित्याचे पंगतीपठाण मात्र हिरमुसले झाले.

राजाच्या पंगतीला, आमच्या पुढ्यात गोडधोड जेवण येऊ लागले, पण ते अन्न आम्हांला मानवेनासे झाले. कारण जेवताना राजा आमच्याशी बोलू लागला, पण त्याच्याशी बोलणे आम्हांला जड होऊ लागले. राजा एखादा संस्कृत श्लोक म्हणे व त्याचा अर्थ एखाद्या मुलाला विचारी. ज्याला अर्थ विचारला असेल त्याला हपका बसे आणि तो आपला हात उगीचच आखडता घेई. पुढे पुढे भोजनगृहात एक फळा ठेवला जाऊ लागला. त्यावर रोज एक नवा श्लोक लिहिला जाई व स्वतः राजाच त्या श्लोकाचा अर्थ विषद करून सांगे. राजाच्या भोजनगृहाला आम्ही विद्यार्थी आपसांत भोजनशाळा म्हणू लागलो. इतके झाले तरी राजाची दृष्टी आपल्यावर वर्षवून माझे ईप्सित काही साधले नाही. ती संधी गणेशोत्सवाचे वेळी आली. गणेशोत्सव हा राष्ट्रीय उत्सव जगदंबेच्या नवरात्र मंडपात मोठ्या धडाक्याने साजरा केला जाई. नाटके, नृत्ये, करमणुकीचे कार्यक्रम चार चार दिवस चालत. त्या उत्सवात आम्ही सहावीच्या विद्यार्थ्यांनी अत्र्यांचे ' गुरुदक्षिणा ' नाटक बसविले. मी त्यात वक्रदंताची विनोदी भूमिका करीत होतो. नाटकाचा प्रयोग बघायला राजा आला. वक्रदंताच्या व ऋषि-कुमारांच्या प्रवेशात तो एखाद्या लहान मुलासारखा खदखदून हसला. दोन-चारदा ' वाहवा वाहवा ' असे ओरडून त्याने टाळ्या पिटल्या. माझे कैक वर्षांचे ईप्सित सिद्ध झाले.

उत्सव संपला. राजाच्याच अध्यक्षतेखाली बक्षिस-समारंभ सुरू झाला.

दा. क्र. १४७२५



आम्हांला आधीच बातमी लागली होती की, शाळेच्या बक्षिसाव्यतिरिक्त काही विशेष बक्षिसे स्वतः राजाने देऊ केली आहेत. त्यात माझे नाव असणारच याबद्दल मला खात्री होती. विशेष बक्षीस जिंकलेल्या विद्यार्थ्यांची नावे जाहीर करण्याची वेळ आली तेव्हा माझे पंचप्राण कानांच्या पडद्याआड येऊन थांबले. पहिले नाव वाचले गेले ते गोखले नावाच्या एका विद्यार्थ्याचे. त्याने सुदाम्याची भूमिका केली होती. तो पोरगा अगदी पाप्याचे पितर होता. राजा आपल्या मोठमोठ्या डोळ्यांनी त्याच्याकडे रोखून पाहात राहिला. गोखल्याने बक्षीस स्वीकारले. राजा त्याला गंभीरपणे म्हणाला, "बाळ, हे बक्षीस अभिनयाचे. अभिनय चांगला केलास, पण ..." राजाच्या तोंडच्या पणामुळे गोखल्याच्या तोंडचे पाणी पळाले. आम्हीही ऐकू लागलों. राजा त्या सुदाम्याला उद्देशून म्हणाला, "औंध संस्थानात सुदाम्याचे काम करण्यासाठी एखादा विद्यार्थी सापडावा याचे आम्हांला फार वाईट वाटते. पुढच्या वर्षी याच नाटकात तुम्ही बलरामाची भूमिका केली पाहिजे." कुणीही टाळ्या दिल्या नाहीत. सुदामा घामाघूम होऊन आपल्या जागेवर येऊन बसला. राजाला शरीरसौष्ठवाबद्दल अत्यंत प्रेम होते. आता दुसरे बक्षीस बलरामाचे काम केलेल्या विद्यार्थ्याला मिळणार याबद्दल खात्री होती, पण तसे घडले नाही. यादी वाचणाऱ्या शिक्षकाने माझे नाव पुकारले आणि माझ्या मनोरथाचे घोडे गंगेत न्हाले. मी दोन्ही पायांवर उठून उभा राहिलो आणि राजा खो खो हसू लागला. त्याला सारे माझे नाटकातील काम आठवत होते. मी जवळ जाताच त्याने माझ्या हातावर बक्षीस ठेवले आणि जोराने माझी पाठ थोपटली. जिंकलेल्या पैलवानाचा दंड धरून त्याला फडात फिरवतात तसा राजाने माझा दंड धरला आणि लोकांना उद्देशून तो म्हणाला, 'हा मुलगा हास्याचे डोंगर उत्पन्न करील. बाळ, तू टाकीत जा. शिकला नाहीस तरी चालेल." त्याने मला सांगितले. टाकीत म्हणजे बोलक्या सिनेमात. इंग्रजी शब्द जाणून बुजून अशुद्ध उच्चारण्याची त्याची लकब होती.

राजाज्ञेप्रमाणे मी शिकलो नाहीच, टाकीत गेलो. मधल्या काळात राजाने आपल्या राज्यात असंख्य सुधारणा केल्या. भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या आधीच आठ वर्षे त्याने आपल्या प्रजाजनांना स्वातंत्र्य बहाल करून टाकले. औंध संस्थानात निवडणुकीची धमाल उडाली. राजाचा एक मुलगा परदेशातून

बॅलिस्टर होऊन आला होता. त्याने अगदी राजाच्या हातावर हात मारला. त्यालाच जनतेने संस्थानी राज्याचा मुख्य प्रधान केला. राज्यकारभाराची घटना राजाने खुद्द महात्मा गांधींच्या सल्ल्याने तयार करून आणली होती. मधल्या चारपाच वर्षांत मला राजदर्शन घडले नाही. मी कोल्हापूर संस्थानात होतो. संस्थाना-संस्थानातला फरक पाहात होतो.

एकदा असाच महाद्वार रस्त्याने जगदंबेच्या दर्शनाला मी चालले होतो. एक मोटर माझ्या बाजूला अचानक थांबली. मी वळून पाहिले तो ‘ औंधाचा राजा. ’ राजाचे शब्द माझ्या लक्षात होते. त्याचे उपकार मी विसरलो नव्हतो. राजाच्या पायाला हात लावण्याची इच्छा माझ्या मनी उफाळून आली, त्यापूर्वीच राजाने मोटरचे दार उघडले आणि माझ्या पाठीवर थाप मारली. तो मला विसरला नव्हता. म्हणाला, “ बाळ, तुमची प्रगती आम्ही ऐकतो आहोत. आनंद वाटतो. आपल्या संस्थानचे नाव असेच उज्ज्वल करा. जगदंबा तुम्हांला उदंड आयुष्य देईल. ”

राजा निघून गेला. त्याने सांगितलेल्या मार्गाने मी चालत राहिलो. भलीबुरी प्रगती करीत राहिलो.

बेचाळीसच्या लढ्यात साताराच्या क्रांतिकारकांना आसरा मिळाला तो औंध संस्थानातच. त्याला इंग्रजांचे राज्य कधीच आवडत नव्हते. त्याची निष्ठा होती छत्रपति शिवाजीमहाराजांवर. तो स्वतः कीर्तन करी, त्या कीर्तनाची सर्व कथानके त्याने शिवचरित्रावरून गुंफली होती. स्वावलंबनाचा उपदेश तर तो आपल्या प्रजाजनांना सदैवच करीत असे. बलोपासना हा तर त्याच्या प्रगाढ निष्ठेचा विषय होता. त्याने आयुष्यभर कधीही परदेशी कपडा वापरला नाही. परदेशी वस्तू वापरली नाही. परदेशी वस्तूविरुद्ध तो एका सभेत बोलत असताना त्याच्याच — शिक्षणाने सुजाण झालेल्या — एका नागरिकाने त्याला खडसावून विचारले होते, “ मग महाराज, मोटर कशी वापरता ? ” अमोघ वक्तृत्वाबद्दल प्रसिद्ध असलेल्या राजाची जीभ त्या प्रसंगी चाचरली होती. त्याचे डोळे गहिवरले होते. साद गहिवरला होता. त्या प्रजाजनाला त्याने उत्तर दिले होते... “ माझ्या संस्थानचा मुलूख इतस्ततः पसरलेला आहे. एक तालुका सोलापुराजवळ तर दुसरा विजापूर हद्दीत. वेगवान वाहन नसेल तर माझ्या संस्थानच्या प्रत्येक खेड्यात जाणे मला

अशक्य होईल. पुन्हा पुन्हा माझ्या प्रजाजनांची गाठ पडणार नाही. नाइलाजाने मी हे परदेशी वाहन वापरत आहे. यंत्रे आणि औषधे या बाबतीत आपण दुबळे आहोत. त्या बाबतीतही हा देश स्वावलंबी झाल्याचे पाहण्यास परमेश्वराने आम्हांला आयुष्य द्यावे. ”

१९४७ साली देश स्वतंत्र झाला. राजाचे डोळे कृतार्थ झाले. साऱ्या संस्थानभर महोत्सव साजरे केले गेले. पुढे दोन वर्षांतच राजाला आपले राज्यही भारतीय प्रजेच्या स्वाधीन करावे लागले. कृतार्थ राजयोग्यासारख्या त्याने त्या घटना आनंदाने पाहिल्या. हे आनंदवनभुवन त्याच्या समर्थ डोळ्यांनी फार पूर्वी पाहिले होते. त्याच्या निर्मितीसाठी करता येतील तितके प्रयत्न विधायकपणे केले होते.

त्या वेळी मी पुण्याला होतो. नुसता नाममात्र राजा राहिलेला औंधाचा राजा पुण्याला आला होता. पंताच्या गोटातील आपल्या जुनाट बंगलीत त्याचे वास्तव्य होते. मी दर्शनाला गेलो. राजदर्शन होताच चरकलो. राजा आता खरंच म्हातारा दिसू लागला होता.

“ या — ” राजाने माझे स्वागत केले. अनंत विषयांवर तो माझ्याशी बोलला. अगदी मनमोकळे बोलला. जणू मी त्याच्या कुटुंबापैकीच एक होतो. संस्थानातून बाहेर पडलेल्या प्रत्येक माणसाबद्दल त्याला पुरेपूर माहिती होती. मी काय करतो आहे, कसा नांदतो आहे, हेही त्याला माहीत होते.

“ शिवाजीमहाराजांच्या आयुष्यावर चांगले चित्रपट का काढले जात नाहीत ? ” राजाने विचारले.

“ त्याला स्वतःची चित्रसंस्था पाहिजे. ” मी म्हणालो.

“ त्याला किती खर्च येईल ? ”

त्यावर मी एक आकडा सांगितला. तो ऐकून राजा गंभीर झाला. बोलला काहीच नाही. थोडा वेळ गप्प राहिला. त्याच्या मनातील विचार मी ओळखू शकलो. त्याला वाटत होते, ‘ संस्थानात उदयाला आलेल्या अनेक उद्योगांना माझा हातभार लागला, ह्याच्या उद्योगात मात्र मी साहायभूत होऊ शकत नाही. कारण मी आता राजा राहिलो नाही. ’ तो त्या विषयावर पुनः बोलला नाही. माझ्याबद्दलच बोलत राहिला. माझा ‘ रामजोशी ’ हा बोलपट त्याला फार

आवडला होता. कीर्तन, लावण्या, नाटक, तमाशा या साऱ्याच कलाप्रकारांबद्दल राजाला मनापासून आस्था होती. रामजोशीच्या कथानकातील एक चूक मात्र त्याने मला सांगितली. तो म्हणाला, "उत्तर पेशवाईतील तमाशात बायका नाचत नसत. नाच्ये पोरे असत. आणि खरंच बोलायचं तर तमाशात नाच्येच चांगले दिसतात."

मग मी राजाला माझ्या एका चित्रपटासाठी आमंत्रण दिले. तो आनंदाने आला. चित्रपट पौराणिक होता. राजाला पुराणांचे प्रेम. संस्कृत साहित्याचे प्रेम. रामायण, महाभारत हे तर त्याचे अत्यंत आवडते ग्रंथ. त्या चित्रपटाची कथाही रामायणावरच आधारलेली होती. चित्रपटातील वातावरण, कथेची घडण, त्यातले काव्य, सारेच राजाला आवडले. ते चांगले होते म्हणून त्याला आवडले की ते मी लिहिले होते – त्याच्या एका प्रजाजनाने लिहिले होते – म्हणून त्याला पसंत पडले कोण जाणे; चित्रपट संपल्यावर त्याने मला छातीशी धरले. गहिवरून बोलला, "बाळ, तुम्ही आपल्या संस्थानचे नाव उजळलेत!"

राजाने राज्य सोडले होते, पण औंधच्या भूमीचे प्रेम आणि तिथल्या प्रजाजनांचे कौतुक त्याच्या विशाल छातीत पूर्वीसारखेच हेलावत होते.

अगदी शेवटी मी राजदर्शनाला गेलो. तो दिवस संक्रांतीचा होता. मी गेलों. पंताच्या गोटातीलच कथा. राजाला आनंद झाला. तो आता खूप थकला होता. सचिंत वाटत होता.

मी पायांना स्पर्श करून नमस्कार केला.

"जय देव!" राजा बोलला. एवढ्यात कुणी तरी आत आले. ते राजाचे व्याही होते. त्यांना 'बसा' म्हणायच्या आधीच राजाने त्यांची माझी ओळख करून दिली.

राजा बोलला, "हा आमचा मुलगा. औंधच्या शाळेत एवढासा होता. आता मोठा झाला आहे. नाव कमावलं आहे. आमच्या बोर्डिंगात होता. जगदंबेच्या परडीतलं अन्न खाल्लं आहे. त्याचं त्यानं स्मरण ठेवलं आहे."

राजाला मान देण्यासाठी पाहुण्यांनी मान डोलावली. राजा गप्प झाला. बऱ्याच वेळाने बोलला, "सर्वच गणितं बरोबर येत नाहीत. काही चुकतात." व्याह्यांना त्यांचे म्हणणे समजले नाही. राजघराण्यातील मुलांमुलींबद्दलच्या अपेक्षा राजाला वाटत होते तशा फलद्रूप झाल्या नाहीत. त्याला काही तरी अबोध दुःख होते.

मी निरोप घेऊन निघालो तेव्हा राजा स्वगत बोलावे तसा बोलला,

" बरं वाटतं अशी मुलं भेटली म्हणजे. आता काही मी राजा राहिलो नाही पण बाप आहे. मुलांनीं भेटावं असं वाटतं. "

मला अश्रू आवरणे कठीण झाले. मान खाली घालूनच मी गोटातून बाहेर पडलो.

बस्स. त्यानंतर पुन्हा मी राजाला पाहिले नाही. औंधाचा राजा गेला. मनूच्या परंपरेतील शेवटचा पुरुष गेला !

परवा, ' दो आँखे बारह हाथ ' या मी लिहिलेल्या चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. त्या चित्रपटाची कथा मला औंध संस्थानच्या परिसरात सुचली होती. औंधच्या राजानेच तो अद्‌भुत प्रयोग करून पाहिला होता. ' मॉरिस फ्रीडमन ' नावाच्या एका पोलिश तरुणाच्या सूचनेवरून गुन्हेगारांना उघड्या वस्तीत ठेवण्याचा प्रयोग औंधकरांनी केला होता. ती संस्था अल्पशेष अवस्थेत अजून आहे. माझ्या गावाजवळच आहे. तिथल्या खुनी कैद्यांनी मला सांगितले होते, ' बेड्या काढताना राजाने आम्हांला जगदंबेसमोर नेऊन शपथा घेववल्या होत्या ! माझ्या या चित्रपटात, या देवाच्याच धाकाचा उपयोग केला होता. माझ्या उद्योगाला राजाचे साहाय्य अशा तऱ्हेने झाले. राजाच्या हयातीनंतर झाले.

' दो आँखे बारह हाथ 'च्या यशाचे अभिनंदन करणारे एक पत्र मला आले. ते औंधाच्या राजाचे थोरले चिरंजीव बॅ. अप्पासाहेब पंत यांनी सिक्कीमहून लिहिले होते. त्यांनी लिहिले होते :

' — तुझे अभिनंदन करू की कौतुक ! गुन्हेगारांना माणुसकीने वागविण्याचा हा प्रयोग माझ्याच एका मित्राच्या सांगण्यावरून बाबांनी केला होता. आज बाबा असते तर... '

पुढची अक्षरे मला वाचवेनात. किती तरी वेळ डोळे नुसते गळतच राहिले.

ॐ

७

# गावरान शेंग

ते भलेमोठे गुलमोहराचे झाड लालभडक फुलांनी लहडलेले असो, नुसत्या हिरव्याचार पानांनी डंवरलेले असो वा निष्पर्ण अवस्थेत वाळकुंजे झालेले असो, भीमा माळीण त्याच झाडाखाली बसलेली असते.

तिची अंगलट आता वार्धक्याने ओघळली असली तरी मूळची इमारत बुलंद. पुढचे दात पडल्यामुळे तिच्या तोंडाचे आता खिंडार झाले आहे, पण सदैव हसण्याच्या तिच्या लकबीने, बाईने चांगला काळ भोगला असला पाहिजे हे निश्चित ध्यानात येते. तिचा आवाज थोडा घोगरा आहे. ती बोलते हळू, पण वाटते मोठ्याने बोलल्यासारखी. तिच्या तोंडात पुरुषी शिव्या फार आहेत. दिवसभर ती बसलेलीच असते, पण कधी उठते तेव्हा ध्यानात येते की, ती कमरेपासून वर, पुढे झुकलेली आहे. आणि तिचा कमरेपासून मागचा भाग जरा जास्त थुलथुलीत झाला आहे. तिचा मांसल आणि गोरा चेहरा आता सुरकुत्यांनी बाद केला आहे, पण डोळ्यांतली मजेदार चमक अजून कायम आहे.

भीमाचा धंदा आहे शेंगा विकण्याचा. बारमहा तिच्याकडे ओल्या भाजलेल्या भुईमुगाच्या शेंगा असतात. मोसमांच्या दिवसात मक्याची कणसे, ओला हरभरा, असा वाणही ती ठेवते.

एक पोत्याचे बस्कर. समोर एक डालगा. त्यात शेंगा. एक पेटलेली शेगडी आणि तिच्यात वाळू असलेली एक लोखंडी पाटी. इतकाच तिच्या दुकानाचा व्याप

आहे. आल्यागेल्या कुणाही मुंडासेवाल्याला ती हटकते आणि हसत हसतच सांगते, " ए भडव्या, परवाची पावली टाक की ! "

भीमाच्या गिऱ्हाइकाला जणू तिच्या शिव्या लागतच नाहीत. ते तिच्याजवळ येते. पाटीतल्या चार शेंगा आपल्या हातांनीच वाकून उचलते. त्या सोलून, गरम गरम दाणे तोंडात टाकताच बोलते, " पगारावर देतो की भीमा ! "

" आठवणीनं दे आणि तुझ्या त्या काळ्या गडग्यालाही द्यायला सांग – "

काळा गडगा म्हणजे कोण हे त्या गिऱ्हाइकाला कळते आणि ते मान हलविते. परत उधारच पावशेर शेंगा खरेदी करते. अंगरख्याच्या लोंबत्या खिशात त्या भरून खात खात शीळ घालीत तिघून जाते. तिच्या बैठकीवरून जाणारा रस्ता एका मोठ्या फॅक्टरीकडे जातो, त्यामुळे तिथल्या मजुरांची गिऱ्हाइकी तिला दोन वख्ती हमखास मिळते. सकाळी सहा-साडेसहाला आणि संध्याकाळी साडेचार पाचला.

मधल्या वेळी तिला जाणाऱ्या-येणाऱ्यांकडून तुरळक विक्री मिळते, नाही असे नाही; पण समोरच्या कन्याशाळेतल्या पोरी हे तिचे दुसरे मोठे गिऱ्हाईक. रोजच्या मधल्या सुट्टीत पोरींचा घोळका बाहेर पडतो; भीमाची शेंगांची पाटी रिकामी होते आणि तिच्या बटव्यात चार-पाच रुपयांचा खुर्दा सहज जमतो. भीमाची गावरान शेंग त्या मुलींच्या शाळेत इतकी प्रसिद्ध आहे की, मुलीमुलींत पैजा लागतात. त्यांच्या जितीची भरपाई, आणि हार खाल्ल्याचा दंड भीमा माळणीच्या शेंगेत दिला-घेतला जातो.

कन्याशाळेतल्या सगळ्या मुली आणि सगळ्या शिक्षिका भीमाला ओळखतात. सर्वच कपाळाला आठ्या घालून खाली बघत चालणाऱ्या मोठ्या बाई देखील भीमाला पाहून हसल्यागत करतात.

" राम राम बाईसाहेब ! " थेट पुरुषी पद्धतीने भीमा नमस्कार करते.

" नमस्कार ... " बाई हसून उत्तर देतात.

खालच्या वर्गातल्या मुली तर भीमाच्या फार लाडक्या. ती कुणाला ' चिमणी ' म्हणते तर कोणाला ' चिचुंद्री ' म्हणते. कुणी नवा कोरा झगा घालून आली तर भीमा कौतुकाने तिच्या झग्याचा झोळ हाताने चाचपून कपड्याचे पोत पाहाते. कापड भारीच भारी वाटले तर झगेवाल्या पोरीच्या पाठीत मऊ रपाटा घालीत म्हणते, " बुडवा बापाला ! "

तिच्या असल्या शेऱ्यांची चिमुरड्या मुलींना मौज वाटते आणि त्या खदखदा हसतात. एक विनोदाची कांडी झगमगली की साऱ्या घोळक्यात चंद्रज्योती पेटतात आणि निष्पाप हसण्याचे भुईनळे सर्वत्र उडू लागतात. आठवी ते अकरावीतील मुलींना मात्र भीमा " अहो अहो " बोलविते. सर्वांचीच आडनावे माहीत नसतात; पण उच्चवर्णीयातील चार-सहा नावे तिला पाठ आहेत. त्यांतले कुठले तरी एक घेऊन कुठल्याही मुलीला हाक मारते. गिऱ्हाईक तर मिळवतेच मिळवते; पण त्या त्या मुलीशी चांगली दोस्तीही जोडून टाकते. कधी कुठून तरी दाढे दाढे पेरू आणते आणि मुलींना दाम न घेता वाटून टाकते.

रोजच्या मधल्या सुट्टीत मुलींचा घोळका नेहमीच भीमाच्या दुकानाभोवती जमतो, तसाच आजही जमला होता. सान्यांची कमळी मात्र त्यातून दूर उभी होती. काही मुली भीमाकडून शेंगा खरेदी करीत होत्या. काही खरेदिलेल्या फोडून खात होत्या. एखादीच्या लाल चुटुक ओठावर जळक्या फोलांचे काळे चिकटून बसले होते. एखादीच्या गालावरच तसले काजळ लागले होते. गलबलाट, हसणी, " इश्य, अय्या " चे चीत्कार. काकणांचे आवाज, वेण्यांच्या गिरक्या आणि साड्यांची सळसळ. या सादांचे एक इंद्रजाल निर्माण झाले होते. भीमा त्यात गुरफटली होती, पण तिचे लक्ष मात्र बाजूला उभ्या राहिलेल्या कमळीकडे होते.

शेंगांचा हारा रिकामा झाला. भीमाच्या बटव्याचे पोट भरले. तिच्या पुढ्यात कुरतडलेल्या फोलांचा सडा झाला; तोच घंटा झाली आणि साऱ्या मुली शाळेच्या इमारतीकडे धावल्या. एका मिनिटात त्या जागेचे वातावरण निःशब्द झाले.

कमळी मात्र एक एक पाऊल उचलत शाळेच्या इमारतीकडे निघाली होती. तिला जणू धावत जाण्याची मुळीच गरज नव्हती. संध्याकाळ होताच चिमण्या झाडावर बसाव्या तशा साऱ्या मुली आपापल्या वर्गात जाऊन बसल्या. वर्ग सुरू झाले. कमळी बाहेरच घुटमळत होती.

एक एक पाऊल हळूहळू टाकीत कमळी शाळेच्या दिशेने चालली होती. भीमा तिची पाठमोरी हालचाल मोठ्या तन्मयतेने न्याहाळीत होती. कमळीच्या वेणीची रेशमी लड तिच्या पाठीवर हलके हलके रुळत होती. साडीचा पदर

उजव्या खांद्यावर गोळवटला होता. चोळीच्या पट्टीखालची तिची उघडी गोरी पाठ डोळ्यांत भरत होती. कमरेखालच्या भागावर तरुणपणाची झाक रुंदावली होती. मंद चालण्याबरोबर त्या भागाची होणारी आवळी जावळी हालचाल मोठी मनोहर वाटत होती. भीमाच्या आवाजाला पुरुष जागा झाला की काय कोण जाणे, तिने वसल्या जागेवरूनच मोठ्याने हाक मारली —

" अहो प्रभाताई ! "

विमनस्कपणे नखं कुरतडत कमळी पुढे पुढेच चालली होती.

" अहो लीलाताई ! " भीमाने पुन्हा आणखी मोठ्याने हाक मारली, तशी कमळीने मान वळवली. तिचे डोळे भ्यायलेल्या सशासारखे होते. जमिनीला हाताचा रेटा देऊन भीमा जागची उठली आणि लगालगा थोडी पुढे आली.

" तुम्हांला – तुम्हांलाच हाक मारली — "

" मला ? " कमळीने आश्चर्याने विचारले आणि भीमाच्या दिशेने ती चार पावले पुढे आली.

" ऑफ असलं तर थोडं इकडं या ! "

भीमा माळणीने आपल्याला का बोलवावे हे कमळीला कळले नाही, पण ती पुढे आली. – आणखी पुढे आली. शाळेच्या फाटकाजवळ त्या दोघींची गाठ पडली. भीमा मायेने तिच्या जवळ आली, पाठीवरून हात फिरवावा म्हणून उचललेला हात मात्र तिने एकदम मागे घेतला.

" शिवू ? " भीमाने उगीच थोडं हळू विचारले.

" का ? " काहीच बोध न झाल्याने कमळी म्हणाली.

" तुम्हां लोकांत आजकाल काही पाळत नाहीत म्हणा — "

कमळीला अजूनही कसलाच बोध झाला नाही.

" तसं काही नाही ना ? मलूल दिसता म्हणून म्हटलं ! " आता मात्र भीमाने तिच्या पाठीवरून हलकेच हात फिरविला. त्या अनोळखी प्रेमाने कमळी एकाएकी गहिवरली आणि तिला रडू दाटले.

" का हो ? "

कमळीला काही बोलवेना. भीमाने तिचा हात धरला आणि तिला गुल-मोहराच्या सावलीत नेली. आपल्या बस्कटावर तिला बसवून भीमा स्वतः तशीच धुळीत बसली आणि मग अतिशय प्रेमळ आवाजात विचारू लागली—

" काय झालं लीलाताई ? "

" माझं नाव लीला नव्हे, कमळ ! ! " नाक वर ओढीत कमळी म्हणाली. तिच्या गोऱ्या नाकपुड्या तांबड्या लाल झाल्या.

" पाणी देऊ का आणून ? " भीमाने विचारले.

" नको ! " कमळीला पुन्हा हुंदका आला. ती उठू लागली. भीमाने तिला परत हात धरून बसती केली आणि एखाद्या घरातल्या वडील माणसाने समजूत घालावी, तशी ती रस्त्यावरची माळीण तिची समजूत घालू लागली.

" अशी रडू नको बाई. काय झालं ते मला सांग. मी तुझ्या आजीसारखी ! " कमळीचे ओठ थरथरू लागले, पण तिला काही बोलता येईना. तिला परत हुंदका आला. दोन्ही हातांचे पंजे तोंडावर ठेवून ती ओक्साबोक्शी रडू लागली. भीमाला काय करावे ते सुचेना.

" कमळ, कमळ " करीत तिच्या पाठीवरून हात फिरवू लागली, पण कमळला ती उबळ आवरेना. ती उठली.

" मी जाते, घरी जाते. " एवढेच म्हणून ती तोंड फिरवून चालू लागली. बघता बघता ती पंचवीस पावले दूर गेली. तिला थांबविणे भीमाला शक्य झाले नाही. शाळेपलीकडच्या चार इमारती टाकून एका बोळात शिरली. पार दिसेनाशी झाली.

कमळी घराशी आली तेव्हा ताराबाई दरवाज्याला कुलूप लावून कुठंतरी जायच्या बेतात होत्या. त्या ठेवणीतले हिरवे जरीकाठी पातळ नेसल्या होत्या.

घरात असलेल्या एकच एक खोट्या मोत्यांचा कंठा त्यांच्या गळयात होता. एका काखेत रडते पोर घेऊन त्या कुलुपात किल्ली फिरवीत होत्या. कुलूप बसत नव्हते आणि काखेवरचे पोर केकटत होते...

" मी घेते बाबूला— " म्हणत कमळी पुढे झाली.

" काही नको. मधल्या सुट्टीला आला असाल तुम्ही. चहाफराळाचं करून ठेवलंय् तुमच्या काकोबांनी. ते खा आणि उलथा शाळेत. कहार मेला ! "

मातृदेवता बोलती झाली आणि कमळीचे पाय गारठल्यासारखे झाले. एक अक्षरही न बोलता ती पुढे झाली आणि रडत्या बाबूला तिने ताराबाईच्या खाकेतून काढून घेतला. ते पोर जळवेसारखे आईला चिकटले होते. तुटता तुटेना. त्याने भयंकर भोकाड पसरले, तरी कमळीने त्याला घेतलेच.

" पाच मिनिटं घेशील व पळशील शाळेत. मला बाहेर जायचं आहे ! "

" मी थांबते आहे घरात ! "

" नको. तुमची शाळा नको चुकायला ! "

" शाळेत नाही जायचं मला ! "

" का ? "

" दुपारी सुटी आहे ! "

" कोण मेलं ? "

" कुणी नाही ! "

" मग सुटी कसली ? शाळेपेक्षा सुट्ट्याच फार झाल्या आहेत मेल्या ! " बोलता बोलता ताराबाईंनी दार उघडले आणि मुलीला उद्देशून त्या म्हणाल्या, " सांभाळ जरा बाबूला. मी गायनशाळेत जाऊन येते ! " बाबूची तुतारी मायलेकींच्या संवादावर वाजतच होती. आई जिना उतरली तशी बाबूने तिच्या दिशेला झेपा टाकीत जोराने बाजा करायला प्रारंभ केला. त्याला आवरता आवरता कमळी बेजार झाली. तिने त्याला पाळण्यात घालून पाहिले, मांडीवर जोजवून बघितले, बाबूचा कर्णा मुळीच बंद होईना. कमळीला वाटले, त्या पोराच्या तोंडात शाळेतले फळा पुसायचे फडके बोळा करून भरावे. मुळातच तिचे डोके ठणकत होते, त्यात बाबूचे रडू. खेड्यात बायका मुलांना अफू घालून झोपविताना तिने पाहिले होते. तशी अफू घालून बाबूला झोपवावे असाही विचार तिच्या मनात आला. तिने केले काहीच नाही. आपले पाय लांब पसरले. न्हाऊ घालताना तान्हे मूल ठेवतात, तसा बाबूला आपल्या पिंढऱ्यावर पालथा ठेवला आणि पाय वर खाली करीत ती त्याला जोजवू लागली. दोन्ही हातांनी थोपटू लागली.

बाबूच्या रड्याबरोबरच तिचे मन आपले रडगाणे गाऊ लागले. बरं होतं खेड्यात. दादा उगीच शहरात आले. लहानपणी ते माझे किती लाड करीत. तेव्हा आई होती. तिच्याबरोबर माझे सगळेच सुख हरपले. घरच्या गव्हाचा सांजा आता कुठला मिळायला ! दादा तरी काय करणार बिचारा. त्यांना मिळतात ऐंशी रुपये. त्यात कसं भागणार ? ही माझी आई त्यांच्याजवळ गाणं शिकायला आली अन् हिने त्यांच्याशी लग्न कशाला केलं कुणास ठाऊक ! हा भाऊ एक

झालाय् आणखी दळभद्रा...खर्च वाढलाय्. आईलाच पातळं घेणं दादांना कठीण जातं, मग मला कुठून घेणार ते...मी परकर नेसत होते, तीच बरी होते. पातळं फार महाग पडतात. वर्गातल्या मुली किती छान छान पातळं नेसून येतात. कुसूम अरकेरीनं परवा नेसलेली ती म्हैसुरी साडी किती तलम होती...आपल्याला कुठली तसली...! मधल्या सुट्टीत चहा देखील मिळायची मारामार – तिथं कुठली पातळं न् कुठलं काय ?...पण फी तरी दिली पाहिजे. बाई किती कठोर बोलल्या. आज वर्गात बसू देणार नाही म्हणाल्या...नाही तर नाही...

कमळीचे डोळे पुन्हा पाण्याने काठोकाठ भरले. पायावर पालथा पडून बाबू कण्हल्यासारखा रडत होता. तिने पदराने डोळे कोरडे केले आणि मान वाकवून पाहिले, बाबूचे डोळे मिटत चालले होते पण झोपेतसुद्धा तो रडायचे विसरला नव्हता.

तिचे कोवळे पाय थोडेसे अवघडल्यासारखे झाले, पण हलायची सोय नव्हती. बाबूने पुन्हा भोकाड पसरले असते. पाय हालवत ठेवून उगीचच ती खोलीभर पाहू लागली. ताराबाईंनी सोडून ठेवलेले जुनेरे तसेच पडले होते. चुलीवर जळकटलेले चहाचे भांडे तसेच होते. खरकट्या तोंडाने कपाने बशीवर बैठक मारली होती. पायाडयावरचे डबे उगीचच हालचाल करून जागच्याजागी थांबल्यासारखे तिला दिसत होते. मोरीत भाताची शिते असून घाण पाण्यावर तरंगत होती. डालडाच्या जुन्या डब्यावर केरसुणी पालथी पडली होती. गणपती बसविला होता, त्या कोनाड्याचे रंगासह पोपडे निघाले होते. त्या पोपड्यांत ढेकणांनी घरे केली होती. एक ढेकूण जमिनीवरून भिंतीवर जाण्यासाठी धडपडत होता. आत बाहेर निःशब्द दुपार होती.

कमळीचे डोके रिकामे झाले होते. थोडी तलखली होऊ लागल्यासारखं मात्र तिला वाटत होते. तिला भूक लागली होती. भुकेची आठवण झाल्यावर तिला एकदम हळवेसे वाटले. दुपारी सैंपाकाला उशीर होता म्हणून न जेवताच ती शाळेत गेली होती. जाताना फीची शेवटची तारीख होती हे तिच्या लक्षात आले होते. वडील घरातच होते. एक मोडकी बाजाची पेटी दुरुस्त करीत ते कॉटवर बसले होते. त्यांच्याकडे फीचे पैसे मागण्याचा धीर तिला झाला नव्हता. घरचे दारिद्य तिला कळत होते. बाबूच्या डांग्या खोकल्याने डॉक्टरची फी शाळेच्य

फीच्या तिप्पट झाली होती. ती आगाऊ भरावी लागली होती हे तिला माहीत होते. ती तशीच शाळेत गेलेली होती.

काहीतरी खावे असे तिला वाटू लागले. तिच्या जिभेखालचा भाग उगीचच ओला झाला. डोळ्यांचे कोपरे पुन्हा पाझरू लागले. बाबूला झोप लागली होती. तिने त्याला हलकेच उचलला, कॉटवरच्या गादीवर चादर म्हणून घातलेले जुने धोतर इतके फाटले होते की, त्याची चौपदरी घडी केली तरी सारे भोकसे लपत नव्हते. तिने ते धोतर त्रासिकपणाने दूर फेकले. ते फेकल्यावर तिच्या लक्षात आले की, धोतराच्या चौपदरीखाली गादीलाच भला मोठा भोकसा आहे आणि त्यातून विटकरी रंगाचा कापूस वर आला आहे. एका हाताने बाबूला खांद्यावर सावरीत ती धोतराजवळ गेली. कष्टाने वाकून तिने ते धोतर उचलले. एका हाताने तिला त्याची घडी मुळीच साधेना. चिडून तिने ते तसेच अंथरले. बाबूला अलगद त्यावर ठेवले. त्याच्या अंगावर माशी बसून परत त्याने भोकाड पसरू नये म्हणून तेच धोतर भेळेची पुडी करताना कागद मुडपतात तसे तिने बाबूच्या अंगावर मुडपले.

सावत्र आईच्या पातळाची घडी करून ठेवणे, चहाची भांडी घासून पालथी घालणे, मोरीतून खराटा फिरवून घेणे ही कामे तिला प्रथम करायला हवी होती हे तिला कळत होते, पण तिला आता भूक लागली होती.

पायाडयांवरच्या डब्यातून ती हुडक्या घेऊ लागली. बाजरीचे पीठ, तुरीची डाळ, मीठ याच वस्तू तिच्या हाताशी लागल्या. उचलून तोंडात टाकावे असे काही काहीसुद्धा त्या खोलीत तिला सापडले नाही. चहाच करून घ्यावा असे तिने ठरविले. डब्यात साखर तर होती. टोपात दूध होते. पण चहाच्या डब्यात, फक्त यात चहा होता एवढं सांगण्यापुरती काळी धूळ होती. कमळी अगदी निराश झाली. मोरीजवळच्या शिंक्यावरचा भोपळा फोडून खावा असे तिला वाटू लागले. पण तो विचार तिचा तिलाच मूर्खपणाचा वाटला. ती हताश झाली खूप मोठ्याने रडावेसे तिला वाटू लागले. भिंतीला टेकून ठेवलेली एक चटईची सुरळी तिने पायाने खाली पाडली. आईचे जुनेरे उशाला घेतले आणि ती आडवी झाली. त्या भुकेल्या अवस्थेत तिला आपल्या सख्ख्या आईची आठवण झाली.

खेड्यात असतानाही काही दादा साने मोठा श्रीमंत नव्हता. पण शेतीचे थोडे-बहुत उत्पन्न येत होते. देवळातल्या रोजच्या हजेरीबद्दल त्याला देवस्थानकडून पंचवीस रुपये मिळत होते. कमळीची आई तेवढ्यात टुकीनं संसार करीत होती. कमळी एकुलती एक असल्यामुळे तिचे खूप लाड होत असत. तिच्या भातुकलीतल्या लग्नासाठी देखील तिची आई खरा पुरणावरणाचा सैंपाक करीत होती. कमळीसाठी खणाचे परकर ती आपल्या हाताने शिवीत होती. ती मागेल ते रांधून वाढीत होती. तीन वर्षांपूर्वीचे ते सारे सुख कमळी विसरली नव्हती. आईच्या हातच्या आमसुलाच्या साराची चव तिला अजून आठवत होती.

झोप आणि जागृती यांच्या मधल्या पोकळीत कमळी आपल्या खेड्यातल्या घरात वावरत होती. तिची आई पोवळी गाईच्या कासेखाली बसली होती. कासंडीवर पांढरे शुभ्र फडके अंथरून त्यावर तिने कुटलेली खडीसाखर पेरली. त्यावर ती धार पिळीत होती. वासराशी बागडणारी कमळी त्याच्या शिंगाचे झाड किती उंच झाले आहे ते चाचपून पाहात होती. आईने तिला हाक मारली. धारोष्ण दुधाची फुलपात्री तिने तिच्यापुढे केली – ती घटाघट ते दूध प्याली.

छप्पापाणी खेळण्यासाठी जमलेल्या शेजारच्या साऱ्या मुली कमळीच्या सैंपाकघरात आल्या. आईने फोडणीच्या लाह्यांची भली मोठी परात त्यांच्यापुढे ठेवली. उखाणे घालीत घालीत त्या चटकदार खाद्याचे बोकणे त्या भरू लागल्या.

गरम गरम पुरणपोळीवर आईने तुपाची धार धरली – कमळीने तुकडा मोडला. तिच्या जिभेला गोड चटका बसला. एक वेलदोड्याचा कण तिच्या दातात अडकला. ते दुःख देखील सुवासिक होते.

गूळखोबऱ्याचे मोदक, शेवयांची खीर, कोहाळ्याचे सांडगे, खजुराचं लोणचं – आईच्या हातचा एक एक पदार्थ जेवता जेवता कमळीचे इवले पोट अगदी जड झाले. कोठीच्या खोलीतल्या कापसाच्या भोतावर जाऊन ती उताणी झोपली – तिच्या पोटाला तडस लागली – भिंतीवर नखाने आपले नाव लिहिता लिहिता तिला गडीगुप्प झोप लागली.

ती सुखद स्वप्ने पाहता पाहताच आज कमळीला गाढ झोप लागली. सूर्य मावळतीला गेला. त्या अंधाऱ्या खोलीतला अंधार अधिक दाट झाला. रात्रीत एक चक्कर टाकून जाणाऱ्या गुरख्यासारखा वारा येऊन त्या उघड्या दाराची कडी

वाजवून गेला. बाबू कॉटवर झोपला होता. कमळी चटईवर पडली होती. तिच्या डोळ्यांच्या कोपऱ्यांतून गळालेले पाणी गालांवर सुकून गेले होते. त्या पाण्याचा वण तिच्या गोऱ्या गालांवर उजेडावाचून चमकत होता.

" कमलताई, कमलताई – " एकदम भरडा पण प्रेमळ पुरुषी आवाज आला आणि कमळी खडबडून जागी झाली.

" कोण आहे ? " तिने उठून बसत विचारले.

दरवाज्यातून भीमा आत आली.

कमळीचा पदर पार ढळला होता. कमळीच्या छातीवरचा यौवनाचा कोवळ विस्तार भीमाच्या नजरेतून सुटला नाही.

" झोपला होता काय ? "

" नाही. सहज लवंडले होते ! "

" मधल्या सुटीनंतर परत शाळेत गेलाच नाही वाटतं ! "

" नाही गेले – डोकं फार दुखत होतं ! " कमळीने तीच चटई जरा पुढे ओढली आणि भीमाला ' बसा ' म्हटले. भीमा चटईवर बसली नाही. जमिनीवर बसली. तिने आपला ओटा जमिनीवर पालथा केला. चारपाच हिरवेगार पेरू जमिनीवर घरंगळले. कमळी प्रश्नार्थक चेहऱ्याने बघतच राहिली, तेव्हा मायाळू आवाजात भीमा म्हणाली —

" घे बाळा, तुझ्यासाठीच आणलेत ! ! "

कमळीला नाही म्हणवले नाही. तिच्या तोंडाला पाणी सुटले. तिने पेरू उचलला आणि तो दातलीतच ती भीमाशी बोलू लागली.

" घर कसं सापडलं तुम्हांला ? "

" काढला पत्ता-- "

" कसा ? "

" सांगितला तुमच्या वर्गातल्या मुलींनी ! बुकांची पिशवी वर्गातच राहिली ! "

" खरंच की ! "

" ठेवलीय् मी "

" कुठाय् ? "

" माझ्याजवळ. उद्या याल तेव्हा देईन ! "

" मी शाळेत नाही येणार उद्या. "

" का ? "

कमळी थोडीशी थबकली, पण परत सावरून म्हणाली, " तब्येत बरी नाही ! "

" खोटं ! "

" अं ! "

" फीसाठी बाईंनी वर्गाबाहेर काढलं होतं. होय ना ? "

कमळीच्या हातातला पेरू तसाच राहिला. तिचे डोळे पुन्हा भरले. ती प्रेमळ माळीण पुढे झाली. आपल्या पदराने तिचे डोळे टिपले. हलक्या हातांनी पाठ थोपटली आणि मऊ लुसलुशीत स्वरात ती म्हणाली, " चालायचंच बाळा, गायनमास्तरला पगार किती मिळायचा ? त्यात संसार कसा करायचा ? आणि पोराबाळांच्या शाळेचा खर्च कसा भागवयाचा ? पुन्हा घरात सावत्रपण. तू काही काळजी करीत जाऊ नकोस. अडलं नडलं मला सांगत जा ! अं ? "

कमळीला काय बोलावे ते सुचेना. भीमाने एक पाचाची नोट काढून तिच्या हाती दिली आणि उठून उभी राहतच ती बोलली, " ही दे फी उद्या. बुकं घेऊन जा तुझी. दोन वर्सानं एसस्सी झालीस म्हणजे पडेल डोला पाण्यात ! मी जाते आता – फॅक्टरीचं गिऱ्हाईक येईल —"

कमळी काही बोलायच्या आतच भीमा निघून गेली. हातातला अर्धा पेरू – जमिनीवर पडलेली ताजी फळे आणि हातातली कोरी नोट यांकडे कमळी पाहातच राहिली. हे काय घडले हेच तिला कळेना. पण तिला उगीचच हुशारी मात्र वाटली. ती चटकन् दोन पायांवर उभी राहिली – जमिनीवरचे पेरू उचलून दोन्ही हातांवर ती चेंडूसारखे झेल घेऊ लागली —

दुसरे दिवशी साडेदहालाच ती शाळेकडे गेली. भीमाने तिची पुस्तकांची पिशवी जपून ठेवली होती.

तिने ती घेतली आणि वेणीचा शेपटा उडवीत वळताना ती लाडिकपणे म्हणाली —

" आजी, दादांचा पगार झाल्यावर परत देईन पैसे ! "

" लगीन झाल्यावर दे ! " म्हातारी खदखदा हसली आणि गरम गरम शेंगांची एक मूठ तिनं तिच्यापुढे केली —

" आता कशाला शेंगा ! मी जेवून आलेय् ! "

" खा ग, तुला काय लेकराच्या जातीला -- "

तिचे म्हणणे कमळीला मोडवेना. या शाळेत आल्यापासून कैकदा तिला या शेंगा खरेदी कराव्याशा वाटत होत्या. पण तिच्या हाती एक आणा तरी कुठून असणार ! खरपूस भाजलेल्या त्या देशी शेंगेची सुरकुतलेली बी तिने तोंडात टाकली – तिला आईच्या हातचे पुरण आठवले !

" गोड आहे ! " ती खुषीने म्हणाली.

" गावरान आहे माझ्या लेकी — "

त्या दिवसापासून भीमाची आणि कमळीची चांगली मैत्री जमली. दादा, सावत्र आई, बाबू यांपेक्षा या भोळ्या माळणीविषयी तिला अधिक माया वाटू लागली. भीमा तिला कधी सोनेरी रंगाची रिबीन आणून देई, कधी मधल्या सुट्टीत चॉकलेटच्या दोन वड्याच तिच्या हातावर ठेवी ...

शेंगांचा तर तिला रतीबच लागला होता. एका मधल्या सुट्टीत अशीच घंटा झाली. साऱ्या मुली पळाल्या. भीमाने कमळीला तेवढे थांबविले. ती आज कासोट्याचे नेसली होती. तिच्या गोऱ्या गरगरीत पोटऱ्या मोठ्या लोभस दिसत होत्या. भीमाने त्या नीट न्याहाळल्या, मांडीचा गोलवाही तिच्या दृष्टीने टिपला. तिच्या नजरेचा तो अनपेक्षित रोख न कळल्याने भोळेपणाने कमळीने विचारले —

" काय बघता ? "

" शाळा सुटल्यावर सांगेन. आता जा, घंटा होऊन दोन मिनटं झाली — "

कमळी त्या वेळी शाळेत गेली, पण तिचे पुढच्या दोन तासांत लक्ष लागलं नाही. शेवटची घंटा झाली आणि ती भीमाबाईकडे धावली. भीमाबाईने तिला डोळ्यांनीच थांब अशी खूण केली. साऱ्या मुली गेल्या. मास्तरणी गेल्या. शुक-शुकाट झाला तेव्हा भीमाने गार्टर्सची एक जोडी कमळीपुढे केली --

" काय हे ? " खेड्यात वाढलेल्या त्या मुलीच्या ध्यानातच आले नाही —

" हे लावत जा पातळाला. बामणी नेसणं तुमचं. सोळा हात साडी न् अर्धी मांडी उघडी — "

तिच्या या फटकळ म्हणीमुळे मात्र कमळीला लाजल्यासारखे झाले. तिने पोटरी मांडीवरचे पातळ पायांची चाळवाचाळव करून सारखे केले.

" म्हणून म्हणते, हे लावत जा ! " भीमा त्यातल्या त्यात हळू आवाजात बोलली.

" कसे लावायचे पण ! "

" माझ्या बापानं लावले होते कधी ! " भीमा खो खो हसली.

घरी कमळीने ताराबाईंना सांगितले, " या वस्तू एका श्रीमंत मैत्रिणीने दिल्या ! " ताराबाईंना वाटलं बरं झालं. त्यांनाही या वस्तूंची गरज होती, पण कर्मदरिद्री प्रपंचात गार्टर्स खरेदी करणेही त्यांना साधत नव्हतं. ते गार्टर्स त्या दोघी मायलेकी वापरू लागल्या. मग भीमाने तिला कधी स्नोची बाटली दिली. कधी टोमकोचे हेअर ऑइल दिले. कधी हस्तिदंती कंगवा दिला तर कधी लाल खड्याच्या इअररिंग्ज दिल्या. मुलीने थोरामोठ्यांच्या मुलींशी मैत्री केली याचे तिच्या दादांनाही बरे वाटले. ताराबाईंना तिच्या वस्तूंचा दुर्मिळ उपभोग घेता येऊ लागला. पाचसहा महिने हे असेच चालले. कमळीची फी दर महिन्याला भीमाच भरीत होती. घरात तिने सांगून टाकले होते, " मला नादारी मिळाली आहे ! "

बाबूच्या दुखण्याने सान्यांच्या घरात डॉक्टर शिरला आणि सहा महिन्यांचे घरभाडे थकले. जुन्या भाडेकरूंना काढून टाकण्याच्या इराद्याने सदाच तक्रारी करीत असलेला घरमालक कमळीच्या दारात उभा राहून अद्वातद्वा बोलला. कमळीचे वडील आणि ताराबाई अगदी अचारी का बिचारी झाली.

" या महिन्याला सारंच्या सारं भाडं मिळालं तर ठीक, नाही तर जागा खाली करा. चौपन रुपये एकदम फेडण्याचा तुमचा दम आहे का ? खोलीची धर्मशाळा करून टाकलीयू. सरकार एक भोसडीचं भाडेकरूंचाच पक्ष घेतंय्; पण आता सहा महिने होऊन गेलेत. मी दयामाया करणार नाही ! सांगून ठेवतो-- "

उग्र चेहऱ्याच्या घरमालकाच्या या उद्‌गारांनी दादा सान्याचा गळा अगदी भरून आला. त्याला काय करावे ते सुचेना. त्यांनी, जागा होऊन रडायला लागलेल्या बाबूच्याच पाठीत उगीच धपाटे घातले. ते पोर प्राणान्त जवळ आल्यासारखे ओरडले. ताराबाईंनी त्याला त्यांच्या हातून हिसकला म्हणून बरे, नाहीतर त्यांनी त्या पोरट्याला त्या वेळी बेशुद्ध केले असते. दादा टोपी घालून बाहेर गेले आणि पोराला पोटाशी धरून ताराबाई मुळूमुळू रडू लागल्या. त्यांनी

चुलीला पेटत घातले नाही, की कमळीलाही शेगडी फुलवायला सांगितलं नाही.

साडेदहा वाजेपर्यंत दबकत दबकत कमळीने आपले सारे काम आटोपले आणि आईला न सांगताच ती शाळेकडे निघून गेली.

गुलमोहराच्या झाडाखाली कमळीची म्हातारी मैत्रीण आपले दुकान मांडून बसलीच होती. ती तिच्या जवळ गेली.

"भीमा!"

"काय?"

"तुझ्या मायेचा फायदा फार घेते मी!"

"मला कुठं लेकरंबाळं आहेत!"

"आज एक काम करशील?"

"सांग!"

"कठीण आहे!"

"होण्याजोगं असेल तर अलबत करीन!"

"चौपन रुपये पाहिजेत!"

"चौपन?"

"फार आहेत?"

भीमाचा सुरकुतलेला चेहरा थोडा गंभीर झाला. डोळयांत मात्र कसलेसे समाधान तरळले. डालग्यातल्या मूठभर शेंगा तिने शेगडीवरच्या पाटीत टाकल्या. तापलेल्या वाळूवर त्या इकडे तिकडे परतत ती निश्चयाने सांगू लागली—

"शाळा सुटल्यावर तुला जरा माझ्याबरोबर यायला पाहिजे!"

"येईन की. कुठं?"

"माझ्या घरी—"

"माझा एक लांबचा भाचा आहे. श्रीमंत आहे तो. त्याला बोलावून घेते, तो देईल."

"मला लवकर परत करणे जमणार नाही." कमळी घोटाळली.

"माझ्या घरी यायचं जमेल ना? बस्स!"

कमळीला अत्यानंद झाला. पाठीमागे रुळणारी वेणी या खांद्यावरून त्या खांद्यावर टाकीत ती जाण्यासाठी निघाली—

" साडेपाचच्या सुमाराला निघू ! " भीमा म्हणाली.

" बरं ! " कमळीनं पाठ फिरविली न फिरविली तोच भीमाने पुन्हा हाक मारून तिला थांबविले...

" कमळ ! "

" काय ? "

" कपडे जरा ठाकठीक असू देत. थोरामोठ्यांकडं जायचं आहे ! "

" होय. " कमळीला तिचे म्हणणे लगोलग पटले.

शाळेत मास्तरणी वेगवेगळे विषय शिकवीत होत्या. पण कमळीचे त्यांच्याकडे मुळीच लक्ष लागले नाही. सर्व वेळ ती चौपन रुपयांचा – आणि भीमा माळिणीच्या त्या भाच्याचाच विचार करीत होती. पाच वाजले आणि शाळा सुटली. घरी जाताना तिने शेंगा विकत बसलेल्या भीमाला दुरूनच सांगितले, " आल्ये हं ! ! "

घरात येऊन तिने तोंड स्वच्छ धुतले. स्नो-पावडर लावली. आईचे ते एकुलते एक पातळ ती सकच्छ नेसली. भीमाने दिलेलेच गार्टर्स तिने लावले. आरशात पाहताच तिला वाटलं, आपण आता छान दिसत आहोत.

" आई, जाऊन येते ग— " तिने ताराबाईंना म्हटले.

" मरा ! " ताराबाईंची मनःस्थिती अद्याप निवळली नव्हती. मुलीवर संतापण्याचेही त्राण त्यांच्यात उरले नव्हते. कमळीने पायांत चपला सरकावल्या आणि ती बाहेर पडली. वडिलांना मोठ्या संकटातून सोडविण्यासाठी ती आता बाहेर पडत होती. तो आनंद तिच्या सर्व शरीरात उसळत होता. मनात हेलकावत होता. डोळ्यांत खेळत होता.

गुल्मोहराच्या झाडाखाली एक टांगा उभा होता. भीमाचे मोकळे दुकान टांगेवाल्याच्या पायाशी कोंबले गेले होते आणि भीमा कमळीचीच वाट पाहत उभी होती.

" आली ! " ती टांगेवाल्याकडे बघून म्हणाली. कमळी झपाझप चालत होती. सूर्याच्या सरत्या प्रकाशात तुरुतुरू चालणारी ती नवयौवना खरोखरीच उचलून घ्यावी इतकी सुंदर दिसत होती. ती जवळ आली तेव्हा तिच्या तोंडावरच्या स्नोचा वास एकदम जवळ आला. भीमाचे सुरकुतलेले डोळे थोडे

आनंदल्यासारखे झाले. उगीचच प्रेमाने " अहो जाहो " म्हणतात, तसे म्हणत ती कमळीला म्हणाली—

" बसा- "

कमळी टांग्यात बसली. भीमा माळणीच्या मनाचा थोरपणा तिला आगळा वाटला. तो बोलून कसा दाखवावा हे तिला कळले नाही. ती नुसती म्हणाली – " भीमा ! "

भीमाने तिच्या शेजारी बसत तिच्या पाठीवरून हात फिरवला. टांगेवाला थोडा खाकरला. भीमाने त्याला एक दणगट शिवी हासडली. टांगेवाल्याची व तिची दृष्टादृष्ट झाली. टांगेवाल्याने आपला डावा अर्धा डोळा मिटला आणि भीमानेही मानेला लहानसा हिसडा देत आपल्या डाव्या डोळयाखालच्या सुरकुत्या अधिक स्पष्ट केल्या. कमळीला ते काहीच दिसले नाही. ती आनंदात होती. तिला खात्री होती, भीमा आपले काम करणार आणि आपण वडिलांना संकटमुक्त करणार आहोत.

त्या बकाल वस्तीत भीमाचेच तेवढे घर टुमदार होते. मंगलोरी कौलांचा लाल पदर डोक्यावर घेऊन उभी राहिलेली ती झोपडी अगदी तरुण दिसत होती. समोरच्या भिंतीला दोनच लहान खिडक्या होत्या. त्यांतली डाव्या बाजूची खिडकी अर्धी मिटलेली होती. कमळी भीमाच्या मागोमाग चालत आली. भीमाने दार लोटले. दारातच बसून राहिलेली एक गुबगुबीत मांजरी " म्यॉव " करून ओरडली. भीमाने तिला उचलून घेतले.

" ही माझी लेक ! " भीमा कमळीला म्हणाली. मुक्या जनावरावर देखील पोटच्या पोराप्रमाणे माया करणाऱ्या त्या माळणीबद्दल कमळीला आणखी आदर वाटला.

आतल्या खोलीत जाताच भीमाने दिवा लावला आणि ती मोठ्याने म्हणाली, " बन्सेराव ! "

" मी आलोय् भीमा- " माडीवरून एक तरणाताठा आवाज आला. शेजारच्या खोलीतून कुणातरी तरुण मुलीचा चेहरा बाहेर डोकावला आणि कमळीच्या पाठीवर अलगद हात मारीत भीमा म्हणाली—

" जा, वर जा, मी सांगितलंय् त्याला – "

निःशंक मनाने त्या छोट्याशा जिन्यावरून हळूहळू चढत कमळी वर निघाली. वास्तविक तिची इच्छा होती भीमानेही आपल्या बरोबर यावे, पण ती तसे म्हणाली नाही. तिच्या चांगुलपणाचा फायदा घ्यायचा तरी किती ?

कमळी माडीवरच्या खोलीत आली. खोलीत छानदार बैठक होती. विजेच्या दिव्याला हिरवी काच होती. तिच्या पावलांची चाहूल लागताच बन्सेराव पलंगावर बसला होता तो उठून उभा राहिला. कमळी जिन्यावरून वर आली तेव्हा त्याच्या डोळ्यांतही दिवे पेटले.

नीटस बांध्याची चापूनचोपून हिरवे नेसलेली ती पोरगी खरंच फार मोहक दिसत होती. तिच्या अंगलटीचे प्रत्येक वळण इतके नमुनेदार होते, की कवळ-णाराच्या मिठीत स्वर्गसुखच सापडावे. कमळी मुळीच बावरलेली नव्हती. तिच्या ओठांवर हसू नव्हते. पण ओठांच्या हालचालींतला अल्लडपणा हसण्यापेक्षा गोड होता. तिच्या कानांतले तांबडे लोलक त्या हिरव्या प्रकाशात मोठे मजेदार दिसत होते. एका कटाक्षाने तिचे रूप पिऊन घेता घेता, तिच्या नजरेशी मात्र बन्सीला जरा ठसका लागला. तिचे डोळे अगदी निष्पाप होते. त्यात फक्त अजीजी होती. अन्य कसलीही भावना नव्हती. तिचा मागमूस देखील नव्हता. बन्सीचे धाडस अडखळले – " बसा ना ! " पलंगाऐवजी एका लाकडी खुर्चीकडे बोट दाखवीत तो म्हणाला.

कमळी त्या खुर्चीवर बसली. भीमाकडे जशी ती पाहात असे तशीच ती बन्सीकडे पाहू लागली. बन्सी चांगला तरणाबांड पोरगा होता. त्याचे डोळे टपोरे होते. दोन्ही भुंवया जोडणाऱ्या एका काळ्या राठ केशरेषेने त्याच्या नाकाच्या मुळाशी कपाळावर एक कमान केली होती ! त्याचे ओठ हसरे होते व त्यावर कोरलेली मजेदार मिशी छान होती ! कमळीला वाटले, हा भीमाचा भाचा आपले काम खचित करील !

कमळी काही बोलली नाही. खोलीच्या हिरव्या प्रकाशात ती आजूबाजूच्या तसबिरी न्याहाळू लागली. श्रीकृष्ण मागे उभा होता आणि नुसती फुगीर चोळी घातलेली राधा आळस दिल्यासारखे हात करून त्याच्या अंगावर रेलली होती – सरोवराकाठी एक उमदा पुरुष अजीजीने उभा होता आणि चोळी नसलेल्या उरावरचा पदर लपवीत एक स्त्री आभाळातून अंतराळी वर चालली होती —

श्रीकृष्ण कदंबाच्या झाडावर बसला होता आणि खाली कितीतरी तरुण गोपी अगदी उघड्या - पाण्याने लाज झाकीत काकुळतीने उभ्या होत्या —

कमळीला कसेसेच झाले. तिच्या कोवळया छातीत कुठेतरी एक बारीक चमक आली आणि डोळयाखालचा स्नायू थोडासा स्फुरण पावला. तिने आपली दृष्टी त्या तसबिरीवरून काढली आणि ती सरळ बन्सीकडे पाहू लागली. तो नोटा मोजीत होता. कमळीला अत्यानंद झाला —

" हे चौपन रुपये मावशीने सांगितले होते. "

कमळीने झटकन् उठून ते पैसे घेतले. काय बोलावे ते न कळल्यामुळे ती घुटमळली. उपकृताचे ओशाळे हसू तिच्या ओठांच्या कोपऱ्यांवर उमटले. तिने हात जोडले व दाराकडे निघाली. दार बंद होते.

दार बंद आहे हे लक्षात येताच बन्सी पुढे झाला. त्या दारावर आतून हलके धक्के मारीत तो म्हणाला, " मावशी, दार उघड - "

" जिन्यावर पावले वाजली. दार उघडले गेले. म्हाताऱ्या भीमाचा चेहरा हास्याने डवरून आला होता ...

" - निघाली ? " - भीमाने बन्सीलाच विचारले.

" हं ! " बन्सी अवघडल्यासारखं बोलला.

" मिळाले पैसे ? " भीमाने कमळीला विचारले.

" हो ! "

भीमाने त्या दोघांकडे आळीपाळीने पाहिले आणि आपले स्थूल अंग जरा बाजूला घेतले. कमळी जिना उतरली.

भीमाही तिच्या पाठोपाठ खाली आली.

" येत्ये हं ! ! " कमळी म्हणाली.

" पैसे जपून ठेव ! "

" हो ... "

" त ... त्यांना सांगा गेले म्हणून ... " कमळी म्हणाली. भीमा मनमोकळे हसली. " सांगते, सांगते ... पुन्हा भेट होईलच की ! "

" हो, येईन मी पुन्हा ... " कमळी म्हणाली आणि चौपन रुपयांच्या नोटा मुठीत दाबून ती वेगाने घराकडे निघाली ...

कमळीला पैसे मिळाले होते. तिला आनंद झाला होता, पण त्या आनंदाला कसली तरी कळ दुखवीत होती. ती कसली कळ होती ते कमळीला कळत नव्हते. मुळीच कळत नव्हते. आपण कितीही धावलो तरी पडणार नाही असे मात्र तिला वाटत होते. तिला कसला तरी आधार मिळाला होता. नोटा मुठीत दाबून ती घराच्या दिशेने धावल्यासारखी चालत होती. शहरातल्या अंधारावर दिवे डोळे मिचकावीत होते.

## ८

# वसुली

एक माणूस अगदी जीव जाऊन मेला होता आणि घोळामेळानं गणपती पोचवायला निघावं तशी गावकरी मंडळी त्याच्या प्रेतयात्रेबरोबर निघाली होती. कुणाच्या डोळ्यांत पाणी नव्हतं. कुणाच्याही चेहऱ्यावर ती कळा नव्हती. शिंकाळी धरून पुढे चाललेला तरणा पोरगा मागे वळून वळून खांदेकऱ्यांशी बोलत होता. खांदेकरीही आपापसात मोठ्याने गप्पा हाणीत होते. मनमोकळे हसत होते.

त्या प्रेतयात्रेला माणूस काही कमी नव्हतं. बायापोरं वजा केली तर धनगर मंडळीची सारी जमात त्या घोळक्यात चालत होती. चार दोन शेलके मराठे गडीही होते. टापशा बांधलेले ब्राह्मणही काही अगदीच नव्हते, असं नाही.

गाव तसा धनगरांचाच. पाटलांची चार टाळकी गावकीपुरतं एखाद्‌दुसरं ब्राह्मण कुटुंब. वाण्या-उदम्यांना कसलं आलंय कुणाचं सोयर न् सुतक !

महादू बकूला तसं जिव्हाळ्याचं कुणी नव्हतं ही गोष्ट तर खरीच ! तो अगदी अलीकडंच पिंपळगावला आला होता. सगळी हयात त्याने तिकडं धुळं, मूर्तिजापुराकडं काढली होती. तिथं काय करीत होता कोण जाणे ! पण आता चाळिशी उलटल्यावर तो गावात आला होता. धंदा असा काही करीत नव्हता. पण कुठं 'बराशी'ला जा, शीजन आहे तंवर अकलूजच्या फ्याक्टरीतच चार सहा महिने काढून ये, असं चालायचं त्याचं !

गाव सगळं होतं त्याच्याच गोताचं, पण ह्याची काही खंडीभर मेंढरं नव्हती, का गावदरीला बोटभर जमिनीचा तुकडा नव्हता.

ग्यानू धुळा त्याचा लांबचा पुतण्या लागत होता आणि त्याच्याजवळ तो भाकर-तुकडा खात होता. रात्री पडायला तर महादू बक्रू हमेशा मारुतीच्या देवळात असायचा. ग्यानूची आई होती रंडमोंड आणि ग्यानू नुकताच विशीत आलेला. मुलूख हिंडून आलेला जाणता दीर म्हणून अवशीही त्याला करून घालायची. गावातले लोक वेडंविद्रं बोलायचे पण ते देवाला माहीत !

धनगराची जात मुलखाची अडाणी. आता या सुधारणांच्या वाऱ्यानं गावात पांढऱ्या टोप्या फार यायच्या. ब्राह्मण कुणी त्यांना हिंग लावून विचारायचे नाहीत; तेव्हा धनगरांच्या वतीनं महादू बक्रूच पुढं व्हायचा. देश मोप फिरल्या-मुळं त्याला बोलणं चांगलं सुधरायचं ! रीतभातही त्याला चांगली ठाऊक होती. वर आणखी त्याला थोडकं हिंदी बोलायला यायचं. गावापासून खंडोबापर्यंतच्या गाडीवाटेची शाप सडक करण्याच्या कामात महादू बक्रूच म्होरक्या होता. बंगलुरी कौलाची शाळा उघडायला बांधकाम मंत्री पाच मिनिटांसाठी आले होते, तेव्हा त्यांना अग्रेवानं शेरडाचं महादूनंच दूध पाजलं होतं.

गावातल्या धनगरांची आणि ब्राह्मणांची ही बेकी काही कडेपासून नव्हती. महादू बक्रू आल्यापासूनच जरा रेंदा वर येत होता. म्हसकोबाच्या देवळात एकदा महादूनंच सगळ्या धनगरांकडनं "बेलभंडार" शिववला होता– "गावात ब्राह्मण ठेवायचा नाही" म्हणून.

तसं झालेलं मात्र नव्हतं. गावातली ब्राह्मणं अजून पहिल्यागत धनगरांना शेणावरनंच ओढीत होती अन् धनगरंही अडल्या भिडल्या वेळेला बामनाचेच पाय धरीत होती. विशेष म्हणजे दादा गोडबोल्याची अन् महादूची जोरदार गट्टी जमली होती. ब्राह्मणांना मुळातनं उपसून काढण्याच्या बाता हाणणारा महादू बक्रू दादाच्या सोप्यावरचं जाजम का झाडत होता, याचं कोडं एकाही धनगराला उलगडलेलं नव्हतं !

महादू बक्रू चार दोन वर्षांत कारभारी बनला होता आणि धनगर जमात त्याला ओलांडून जात नव्हती एवढं बरीक खरं.

तो महादू बक्रू आज मेला होता. एकाएकी त्यानं आपला कारभार आटपला

होता. चौघांच्या खांद्यांवरून निवान्त निघाला होता. द्यानूनं शिंकाळी धरली होती. पिकलेल्या धनगरांनी ताटीला खांदे दिले होते. यात्रा चालली होती. तंबाकूची देवाण-घेवाण चालली होती. मागच्या बाजूला एखाद् दुसरा बिडीचा धूरही निघत होता. गटागटांनी धनगर मंडळी गप्पा हाणीत चालली होती.

महादू बक्रू चारचौघा धनगरांसारखा नव्हता, हे तर खरंच; पण त्याला मरण आलं होतं तेही चारचौघांसारखं आलं नव्हतं. काल रात्री एक वाजेस्तोवर तो रामोशांच्या पोरांबरोबर गस्त घालीत गावातनं हिंडला होता. मध्यान्ह रात्रीला बाप्या गुरवाच्या घरी चहा प्याला होता. सकाळी दादा गडबोल्याच्या वाड्यात जाताना तर खुद्द द्यानूनं पाहिला होता. दुपारी तो मारुतीच्या देवळात धोतर खालवर घालून झोपल्याचं बापू गुरवानं पाहिलं होतं. आणि आता चार साडे-चारच्या टिपणाला त्याची पालखी स्मशानाकडे निघाली होती. ही घटना तशी पुष्कळ अचंब्याची होती. महादू बक्रूला पोचवायला निघालेल्या घोळक्यात मात्र बोलाचालीचा " पॉइंट " काही वेगळाच होता.

" दादा गडबोल्याला गुरू भेटला नव्हता गावात; पर आमच्या चुलत्यानं त्याला शिरीगणेशा शिकवला. " द्यानू म्हणत होता.

" लई चरफडत असल बामन – मेला तर गेला. पर बामनाला माती चारली गड्यानं ! " एक खांदेकरी बोलत होता. दादा गडबोल्याची खोडकी मोडली याचा आनंद महादूच्या मरणाच्या दुःखापेक्षा फारच अधिक होता. कुणी दादाच्या जुल्माच्या कहाण्या सांगत होते. महादूच्या दादाच्या घरी किती कप " च्या " प्यायचा, त्याचा हिशेब सांगत होते. बस्स, हीच चर्चा चालली होती. गोष्ट अशी होती : दादा गडबोल्याकडनं महादू बक्रूनं साडे तीनशे रुपये व्याजी काढले होते आणि त्यातली एक कवडी देखील दादाला न देता तो पुटकन् गेला होता. दादासारख्या नतद्रष्ट सावकाराला साडेतीनशेचा ऐनजिनसी टोला बसला होता. गावातल्या एकाही जित्या धनगराला साधलं नव्हतं, ते या तऱ्हेनं महादूला मरून साधलं होतं. ' पांडुरंगाचं शिखर चंद्रभागेत बुडेल, पण दादा गडबोल्याचा एक पैसा या पांढरीत बुडणार नाही. ' उठल्या सुटल्या अशी बडबड करणाऱ्या दादा गडबोल्याची चांगलीच दातखीळ बसली होती. एक भला मोठा उंदीर मांजराच्या घशात अडकून मेला होता, आणि आता मांजराची प्राणांतिक तडफड होणार या कल्पनेनंच बाकीची उंदरं शेपट्या उचलून नाचत होती.

दादा गडबोले बोक्यासारखाच दिसायचा. घारे डोळे, बसकं नाक आणि त्या पिंजारलेल्या मिशा. हा गलेलठ्ठ चित्पावन अडाणी धनगरांच्या माना मुरगाळूनच गबर झाला होता. त्याचं गाव कुठं होतं कुणास ठाऊक; पण म्हणतात की, पिंपळगावला येण्यापूर्वी तो कुठंतरी अव्वल कारकून होता. तिकडं 'पेणसल' घेऊन मग इकडे आला होता. तो आला, तो शांतिनाथ जैनाच्या दुकानी दिवाण म्हणून. शांतिनाथ जैनाचं आणि त्याच्या घरजावयाचं चालायचं भांडण! पण दादाचा पायगुण असा...दादा आल्यावर त्यांचं भांडण मिटलं कायमचं. सालसालाच्या अंतरानं ते दोघेही सासरे-जावई मेले! अन् दादा बसला त्याच्या धनावर फडा काढून. चांगला साठी उलटलेला माणूस, पण त्याची कांती गाजरासारखी लाल होती. शांतिनाथ जैनाची बायको आणि लेक दोघींनाही त्यानं काखेत मारलं. अन् तो राजागत राहायला लागला. मायलेकीत भांडणं होत होती; पण गावच्या कानांवर काही येत नव्हतं. दोघीही दादा गडबोल्याला मात्र फुलासारख्या झेलीत होत्या. दादाच त्यांचा जमीनजुमला आणि कापड-दुकानही बघत होता.

दुकान हाती आल्यापासनं दादानं गावावर जाम दाब बसवला होता. तरी शांतिनाथाची सावकारी त्याच्या पणज्यापासून चालत आली होती. पण सावकारी हिसका मात्र गावाला दाखवला तो दादा गडबोल्यानं. सगळी धनगरं दादापुढं मेंढरासारख्या लेंड्या टाकीत होती. सरकार दरबारातही दादाचं वजन ऐट हातं. मामलेदार, फौजदार सारे जैनाच्या वाड्यावर उतरत होते. आणि ते निघून गेल्यावर दादाच पाटील-कुलकर्ण्यांना हुकूम सोडीत होता. रत्ना जैनिणीच्या आजेसासऱ्यापासूनची देणी दादानं वसूल केली होती. गावाबाहेर चिरेबंदी वाडा बांधला होता. पोरंबाळं मुंबई-पुण्याला बड्या बड्या चाकऱ्यांवर ठेवली होती, आणि आपण इकडं गुलाल्या हाणीत होता!

आतलं कुणी छातीवर हात ठेवून सांगावं! पण त्या जैनाच्या मायलेकींना दादानं दावणीच्या गायी करून टाकलं होतं, आणि आता त्यानं स्वतःची सावकारी सुरू केली होती. सावकारीचं 'लायसेन,' कर्ज मिटवणारं 'बोर्ड' सगळं काही दादा कोळून प्याला होता.

"आज देतो, उद्या देतो –" करून एखादं धनगर हुलकावण्या द्यायला

लागलं की दादा मिशा पिंजारून म्हणायचा, " मला हुलकावण्या दाखवू नकोस. कांग्रेसचं राज्य असू दे, नाहीतर पुन्हा साहेब येऊ दे. तुझ्या पोराबाळांना तीन बोटं लंगोटी मिळू द्यायचा नाही, माझी दिडकी बुडवशील तर!"

अशा त्या दादा गडबोल्याचे साडेतीनशे रुपये महादू बकूनं ऐनजिनसी बुडवले होते! महादू जिवानिशी मेला होता. त्याच्यामागं सारं वाळवणंच होतं. ना पोर ना बाळ! ध्यानू नुसता शिंकाळीचा धनी! महादू खानदेशात गेला, तेव्हाच भावा-भावांच्या वाटण्या झाल्या होत्या व नावाचं नातं होतं. सरकारदरबारी पार फारकती होऊन गेल्या होत्या. आपल्या नावाचं तुकडं शांतिनाथाच्या बापाला विकूनच महादू बकू परागंदा झाला होता. एक मुंडासं, दोन पंजी, दोन कुडती, एक दंडकं, एक चांदीचा गरगोटा आणि एक चंची एवढीच त्याची 'इष्टण' मागं होती. ते इनाम दिलं तरी भिकारी देखील हात पुढे करणार नव्हता.

जिवानिशी मरून का होईना महादू बकूनं दादाला डुबवला होता! त्याला साडेतीनशाला टोपी घातली होती! साऱ्या धनगरांना तोच आनंद झाला होता. महादूला ओढ्याकाठी घेऊन जाताना धनगरं याच विजयाच्या आनंदात होती.

त्याच आनंदानं त्यांनी महादू बकूला जाळाच्या ओंजळीत टाकला आणि झांजड पडताना सारी धनगरं ओल्या कपड्यांनिशी गावाकडं परतली.

आपल्या दरवाज्याच्या चिरेबंदी पायऱ्यांवर बसून दादा कानकोरणं चालवीत होता, एवढ्यात ओली धनगरं त्याच्यासमोर चालत गेली. कानकोरण्यातला मजा न सोडता दादानं ओरडून विचारलं —

" कोण गेलं रे?"

" महादू बकू!" कुणीतरी दबकत बोलला. बोलणाराला आणखीन् पुढंही काही बोलायचं होतं पण त्याची बोल्ती धजावली नाही.

" महादू बकू मेला?" दादाच्या या शब्दातला तोठरा सगळ्याच धनगरांना जाणवला आणि त्यांना बरं वाटलं!

" दोन वाजता मळ्याकडं जाताना बघितला की मी!" दादा म्हणाला.

" व्हय, पर चारीच्या टिपणालाच गेला —"

धनगरं आणखी थांबली नाहीत. दादाला बोलायला पाहिजे होतं ते आपसात

बोलत ती पुढं गेली आणि दादाच्या डोक्यात रहाट फिरायला लागला. तो तरातरा उठून आत गेला. जोत्याच्या पायऱ्या चढला न चढला एवढ्यात त्याच्या कानांवर हाक आली -- " दा अ दा ऽ "

ती शांतिनाथ जैनाची लेक कली होती.

" का ग ? "

" फराळ झाला का ? "

" नाही अजून – का ? "

" आईनं दुकानातलं कापड इकलं तुम्हांला न सांगता. "

" कुणाला ? "

" द्यानू धनगराला – "

" कसलं कापड ? "

" पांढरं मांजरपाट ! त्याचा चुलता मेला म्हणं ! "

" ठीक झालं ! " आपल्याच टाळूवर बोटं वाजवीत दादा आत निघून गेला आणि कली दोन दातावळीत जीभ घालून उभ्या ठिकाणीच कचकन् वाकली. थोडा वेळ उभी राहिली, पाठीमागच्या कासोट्यावर हात फिरवीत आली तशी निघून गेली.

दादाच्या डोक्याचं एक चाक आऊट झालं होतं. काही केल्यानं त्याचा विचार पुढं जाईना. महादू बकूकडचे पैसे बुडाले ही कल्पना त्याला सहन होत नव्हती. महादू मेलाच होता. त्यामुळे दादाचा नाइलाज झाला होता. नाही तर त्यानं त्याला दरवेषाच्या अस्वलासारखा नाकात दोरी घालून तालुक्याला नेला असता.

" पाय धुवायचं पाणी ठेवलंय ! " दादा माजघराच्या तोंडाशी आला तेव्हा आतून त्याच्या कुटुंबाचा आवाज आला. दादानं तिकडं लक्ष दिलं नाही. खुंटीवरचा सदरा काखेला मारून तो उघडा बोडखाच बाहेर पडला.

अंधार चांगलाच झाला होता; पण दादाच्या डोक्यात मशाली पेटल्या होत्या. डोळयांच्या उजेडानंच तो मारुतीच्या देवळासमोर आला. देवळापुढच्या अंगणात आडव्या पडलेल्या लिंबाच्या खोडावर चार पाच सडे गडी घोंगडी लपेटून बसले होते. त्यांच्यात गप्पा चालल्या होत्या. महादू बकूच्या मरणाच्याच. दादाची उभी सावली थोडी जवळ जाताच त्यांतल्या एकानं विचारलं, कोण ते ? — "

" मी दादा गडबोले."

दादा गडबोल्याचं नाव ऐकताच मंडळीत पांगापांग झाली. दोघं-चौघं उठून उभे राहिले.

" देवाला आला हुता ?" एकानं विचारलं.

" हो ना. देवळात दिवाच दिसत नाही!" काही तरी बोलायचं म्हणून दादा बोलला.

" गुरव मर्तिकाला गेला असल !"

" धनगराच्या ! त्याला काय पडलंय !"

" त्या गुरवानंच पैला बघितला महादू बकूला !"

" म्हंजे ?"

" नव्हं, करंजाडात तळमळत हुता महादू, तवा बापूनंच पहिल्यांदा बघितला त्याला."

करंजाडात कशाला गेला होता महादू ?" लिंबाच्या खोडावर बूट टेकीत दादानं सांगणाऱ्या कुणब्याकडं आवाज टाकला —

" तिथंच निजला हुता न्हवं का र्यो मुळया पिऊन !"

" मुळया पिऊन ?" दादाच्या डोक्याचं चाक दुरुस्त होऊ लागलं.

" माहीत नाही तुम्हांला ?"

" नाही —"

दादासारख्यापेक्षा आपल्याला या गावातल्या प्रकरणाची अधिक माहिती आहे, याबद्दलचा अभिमान आवाजात आणीत तो कुणबी खाकरून सांगू लागला —

" अहो, दोन-अडचाच्या सुमाराला ते धनगर देवळातनं उठलं ते आलं मावली आईच्या डोहाजवळ. तिथं काठाला तांबड्या कण्हेरीचं गचपण आहे. त्या कण्हेरीची झुडपं त्यानं उखडली. चांगल्या मूठभर मुळया काढल्या. धारंला धुतल्या. खडकावर दगडानं वाटल्या, अन् बेलस्यानं त्याचा रस प्याले. अर्ध्या घंट्यानं भेलकांडत भेलकांडत गुरवजीच्या बांधावर आलं. अन् देवळात निजतं तसं निजला धोतर खालवर घेऊन. जराशानं शेरडीला पाला पाडाया म्हणून बापू गुरव गुरवकीत आला."

" बरं पुढं ?" दादाच्या डोसक्यातील पायशिकल आता चांगली दुरुस्त झाली होती आणि तो चाकं फिरवून पाहात होता—

" पुढं काय– ? बाप्याची नजर गेली या झोपलेल्या गड्यावर. हाका मारल्या तर एक नाही न् दोन नाही. बापूनं जवळ जाऊन तोंडावरचं धोतर बाजूला केलं तर महादू. तोंडाला फेस आला होता, आणि पराण केव्हाच निघून गेला होता. मग गुरव गावात आलं ते भलतंच... "

" अरेरे– " महादू बकूच्या मरणाचं पुरं आख्यान दादाला कळलं आणि त्याचं डोकं जोरात चालू लागलं, " मला कुणीसुद्धा गाढवानं सांगितलं नाही !" असा पावशेर गावकऱ्यावरच ठेवून दादा गडबोले तिथनं उठला. नीट वाड्याच्या वाटेला लागला. बोलणं ऐकू येणार नाही एवढ्या अंतरावर दादा गेल्याची खात्री होताच आडाच्या बुंध्यावरचे सारे गडी एकदम हसले. आणि म्हाताऱ्याला साडेतीनशेची कानटोपी बसल्याचा आनंद – दहा कुत्र्यांनी एक हाडूक आलटून पालटून चघळावं तसा घेऊ लागले.

" मला फराळ करायचा नाही, हो. " इतकंच माजघराच्या तोंडाशी ओरडून दादानं पायशिकल उचलली व बाहेर काढली. दिवा पेटवला, टांग टाकली आणि तालुक्याचा रस्ता सुधारला !

जाताना दादाला दिसलं – गोंदिरवाड्यावर महादू बकू अंगच्या तेलानं जळत होता.

तडातापडीनं तालुक्याला गेलेला दादा गोडबोले दुसऱ्या दिवशी परत आला नव्हता. लेकीनं केलेली चहाडी कळल्यामुळं रत्ना जैनीण हैराण झाली होती. कली तर दिवसातनं दहादा गाववेशीपर्यंत जाऊन आली होती. संध्याकाळी माळवदावरून तिनं चांगली दोन मैलांपर्यंत तालुक्याची वाट न्याहाळली, पण दादा काही आला नाही.

झांजड पडल्यावर त्या दोघीही मायलेकी वेगवेगळ्या कारणांनी गडबोल्याच्या वाड्यात आल्या होत्या. पण गडबोलीणबाईनं नेहमीच्या कोरड्या ठणठणीत आवाजात सांगितलं होतं, " का गेलेत, कुठं गेलेत आणि कधी येणार आहेत मला काही म्हटलं तर काऽही माहीत नाही. "

रात्री गावाच्या सगळ्या मेंढवाड्यांत मेंढरांच्या शेंबड्या शिंकांबरोबर याच

गप्पा रंगल्या होत्या :—" दादाला महादूनं हात दाखवला. व्याजासकट चार साडेचारशाला डुबवला ! "

दुसऱ्या दिवशी दिवस उजाडायला एका खांडातली मेंढरं जमावी तशी सगळी काळी धनगरं जमली होती. दही घेऊन महादू बक्कूची माती सावडायला निघाली होती.

" दादा काय तालुक्याला गेला म्हनं ! " ग्यानू बोलला.

" का करतोय् जाऊन ? महादूच्या मागं हाय काय ? "

" तेच म्हनलं "– नाही म्हटलं तरी महादूचा जवळचा नातेवाईक असल्या-मुळं ग्यानूच्या पोटात थोडी धाकधूक होती.

" दादानं पैसं दिलं त्याला हेच मोठं अक्रुत झालं ! "

" महादूच्या तोंडात साकार होतो गा ! " कुणी मेलेल्या महादूच्या गुणांच्या पवाड्याला आरंभ केला–

" दादा उष्ट्या हातानं कावळं हणायचा नाही. तेला महादूनं पाणी लावलं तरी कसं असंल बा ! "

" मोठा हिकमत्या होता तो ! " पवाड्याचे चौक सुरू झाले. आणि पहिला चौक मिळवणीला यायच्या आधीच सगळ्या धनगरांच्या नजरा हबकल्या. तालुक्याहून येणाऱ्या पोलिसाची आणि माती सावडायला आलेल्या धनगरांची नेमकी गोंदिरवाड्यावर गाठ झाली.

पोलिसांनी माती सावडायला हरकत घेतली. विषानं मेलेल्या माणसाला वर्दी-वाचून दहन केल्याच्या आरोपावरून पोलिसांनी सगळ्या धनगरांना जाबजबाबा-साठी तालुक्याला धरून नेलं आणि लांडग्यानं दहा पाच पाटरं नेल्यावर मेंढवाड्यात माजावा तसा हलकल्लोळ सगळ्या गावात माजला.

अदल्या पहाटेच दादा गुपचूप माघारी आला होता. त्याचं आयुष्य नेहमी-सारखं सुरू झालं होतं. शांतिनाथाच्या गादीवर बसून तो कापड विकू लागला. रत्ना आणि कली चढाओढीनं त्याला खाऊ घालू लागल्या. त्याची मर्जी संभाळू लागल्या.

चार-सहा दिवस गावात अगदी सामसूम झाली होती. आणि मग एकमेकींच्या

डोक्यातील उवा मारीत उन्हाला पाठी देऊन बसणाऱ्या धनगरणी आपआपसात कुलकुलू लागल्या--

" आता ग दोडा काय करायचं ? "

" का झालं ? "

" मेंढरं काय पोरांच्यानं आवरत्यात व्हय ? बापई सगळं तालुक्यात अडकलं– "

" आमच्याबी रानातलं जित्राब वाळून चाललंयं. पाच-सहा दिस मोट नाही. " मेंढवाड्याची झापं उघडत नव्हती. रानात मोटेचं चाक वाजत नव्हतं. दहा दिवस जणू सारा गाव महादू बकूच्या सुतकात राहिला. धनगरणी हवालदिल झाल्या. कुणब्याचे उंबरे झिजवू लागल्या. धनगरापेक्षा थोडी बरी कापडं वापरणारे कुणबी कायद्या एकी कानांवर हात ठेवू लागले आणि शेवटी एक म्हातारी धनगरीण रत्ना जैनिणीच्या येऊन पाया पडली. अंगात " माउली " आलेल्या झाडाचे पाय धरावेत तसे तिने रत्नाचे पाय धरले आणि गहिवर घातला—

" जिमिनी वाळून चालल्यात – गुरंढोरं चाऱ्यावाचून मराया लागल्यात. आता तूच गावाला वाचीव ! "

" माझ्या हातात काय ? वेव्हार सगळा दादा बघत्यात ! "

" तू दादाला सांग. तालुक्यातनं तेवढी माणसे सोडवून आण ! "

" ते माझं ऐकणार नाहीत. ते कुनाचं ऐकत न्हाईत ! "

कुणी रत्नामार्फत, कुणी कलीमार्फत दादा गडबोल्यांच्या कानांपर्यंत आपली हलाखी पोचवू लागले होते. दादा वरून नाक वाकडं करीत होता तरी आतून त्याला गुदगुल्या होऊ लागल्या होत्या.

तालुक्याच्या बाजाराला गेलेली धनगराची पोरं नाही नाही त्या बातम्या घेऊन येऊ लागली होती. कुणी म्हणे, " धनगरास्नी फौजदारानं बुटाच्या लाथा घातल्या. " कुणी म्हणे, " मुसलमान हवालदार त्यांच्या उरावर नाचला. " धनगरणी कासावीस झाल्या. दादा गडबोल्याशिवाय या अरिष्टातनं कुणी सोडवू शकणार नाही, अशी त्या सर्वजणींची खात्री पटली आणि एक दिवशी नागरपंचीम नाचायला जावं तशा घोळमेळ्यानं त्या दादाच्या वाड्यावर आल्या. दरवाज्यातच साऱ्याजणींनी नाकापर्यंत पदर ओढले आणि माना फिरवल्या.

वाड्याच्या सोप्यातच दादा हिशेबाच्या वह्या उलट्या पालट्या करीत बसला होता.

" काय ग ? " दादानं भुवया ताणून विचारलं. बायका आणखी मागं सरल्या.

" अरेच्या, लाजता काय ? पुढं या-- "

शेवटी रत्नाला कौल लावलेली म्हातारी धनगरीण पुढं आली आणि पदर अंथरून त्यावर आपलं डोकं टेकीत ती अत्यंत काकुळतीनं बोलली--

" दादा, शंभरजणींचं कुंकू वाचवा--"

" मी ? मी कोण तुमचं कुंकू वाचवणारा ? मी जैनाच्या पैशावर पोसलेला साप ! "

म्हाताऱ्या धनगरणींनं फडाफडा आपल्या कानसुलात मारून घेतल्या. रडून रडून गाल भिजवले. बाकीच्यांनीही पदरातल्या पदरात टिपं गाळायला सुरुवात केली, तेव्हा दादा जरा जागचा हलला आणि म्हणाला--

" नानी, हा कायद्याचा फासा आहे. तालुक्याला जा आणि एखाद्या वकिलाला सांग-- "

" वकिलाचं शानपन तुमच्या पक्षी अगाव हाय का दादा --" म्हातारी हुंदका आवरीत म्हणाली आणि तिनं पुन्हा हात जोडले. दादानं वेळ ओळखली आणि आवाज शक्य तितका अनासक्त ठेवीत तो मंदपणे म्हणाला, " मी करीन तालुक्याला जाऊन खटपट. "

" तेवढं करा. देव उदंड औक्ष देईल ! " म्हातारी म्हणाली आणि दुरूनच दादाचा अलाबला घेऊन तिनं आपल्या कानशिलावर बोटं मोडली.

दादा विचार केल्यासारखा आविर्भाव करून म्हणाला, " पण एका घावात डाव संपवायचा असेल, तर फौजदाराचा हात ओला केला पाहिजे ! "

" ते सरळच आहे की, " आपल्या अनुयायांकडे वळून नजर टाकीत म्हातारी म्हणाली. अनुयायी धनगरणींची अनुमती गृहीत धरून म्हातारीनं विचारलं--

" किती लागतील दादा ? "

दादा जरा गप्प बसला आणि मग डोळे मोठे करीत ओठ आवळीत आणि डोलवीत त्यानं उजव्या हाताचं बोट उंच केलं.

" शंभर ? " म्हातारी म्हणाली.

दादा भकास हसला. धनगरी अज्ञानाची कीव करीत तो म्हणाला, " शंभरानं

काय कात होणार ? सारा गाव गुंतलाय्. हजारभर तरी मोजले पाहिजेत. कुठं बभ्रा करता उपयोगी नाही. सुटून आल्यावर बापयांनासुद्धा सांगता उपयोगी नाही. ह्या बोलून चालून चोरीचा मामला आहे ! ”

म्हाताऱ्या धनगरणीनं मान डोलावली आणि दरवाज्याच्या भिंतीशी थांबलेल्या गोषातील घोळक्यात जाऊन तिनं काही कुजबूज केली. मग ती पुढं आली आणि म्हणाली —

“ घटकाभरानं हजार रुपये आणून देते ! ”

“ बरं ” म्हणत दादा आंघोळीला उठला. धनगरणीही परतल्या.

सुरती हजार रुपये मोजून घेऊन दादानं कसा कमरेला लावला. कुणालाही न सांगण्याबद्दल धनगरणीकडनं “ माउली ” आईची शपथ त्यानं तीनतीनदा घेववली व दिवेलागणीच्या सुमाराला सायकलीवर बसून तो तालुक्याला गेला.

पोलिसांनी बसवून ठेवलेली धनगरं मेंढरासारखी भुई हुंगत होती. कुणालाही काय करावं ते सुचत नव्हतं. प्रत्येकजण भ्याला होता आणि आपण मरून गावाला “ काळ ” झालेल्या महादू बकूला आईबहिणीवरून शिव्या घालीत होता. खटला अजून सुरू झाला नव्हता. आणि सुरू झाल्यावर काय होणार याचं एकाही धनगराला ज्ञान नव्हतं.

दादा गडबोले नऊ वाजायच्या टिपणाला तालुक्याच्या फौजदाराकडे पोचला. गावच्या भल्यासाठी त्या महाकाय ब्राह्मणानं यवन फौजदाराचे पाय धरले आणि पाचशेची चांदी त्याच्या तळहाताला मळली.

“ पण तुम्ही का सोसता हे ? ” फौजदार म्हणाला.

“ गावासाठी ! मी या गावचा न शिवचा, पण या गावच्या जिवावर मी हे दिवस पाहिले. ”

“ पण धनगरांना याची जाण राहणार नाही ! ”

“ राहायला पण नको. आपणही ओळख देऊ नका. मी तरी पैसा त्यांच्याकडूनच मिळवला ना ! ”

“ नाही म्हटलं तरी स्वराज्यातले श्रीमंत सुधारत चालले आहेत, असा एक विचार फौजदारांच्या डोळ्यांपुढे येऊन गेला. त्यांनी दादाची देणगी लाचारपणे स्वीकारली. त्याला आग्रहानं पंक्तीला बसविलं आणि “ रौंड ”च्या निमित्तानं त्याच्या गाववेशीपर्यंत पोचवूनही दिलं.

फौजदारानं काय काय आणि कसं कसं जमविलं कोण जाणे! — दुसरे दिवशी सर्व धनगरं सुटली. गावाकडे आली. धनगरणींनी मनोमन दादाला दुवा दिला. प्रत्येकीनं आपल्या माणसाला "दादानं तुम्हांला सोडवलं" असं सांगितलं. आणि दुसरे दिवसापासून शांतिनाथाच्या दुकानासमोर जोडा काढून प्रत्येक धनगर दादाला रामराम घालू लागला. कलीचा ऊर दादाच्या मोठेपणानं भरून येऊ लागला आणि रत्नाचा तिच्या एकीचा "इसाळ" आतल्या आत धुमसू लागला.

महादू बकू मेला तरी दादाचा पैसा बुडला नाही. त्यानं पाचशे रुपये जमा करून घेतले. आता ग्यानू धनगराला पुढं करून महादूनं बुडवलेली रक्कम वर्गणी करून दादाला परत करण्याचा विचार एक म्हातारा धनगर पुनः पुनः उकरून काढतो आहे. कोणीही धनगर अजून त्याला स्पष्ट नकार देत नाही. दादा त्या विषयात मुळीच लक्ष घालीत नाही. ग्रामविकास योजनेत "पिंपळगावला" एक वाचनालय मिळावं, असा दादाचा प्रयत्न चालू आहे; तो स्वतः या योजनेला आपले १०१ रुपये देणार आहे. आणि वाचनालयाला "महादू बकू"चं नाव द्यावं, अशी त्याची गंभीर सूचना आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७१५०१ वि: कोरंबरी
क्रमांक १८१३ नोंद दि. २६।३।

१

# वेडा पारिजात

तात्यांचे वय आता साठी ओलांडून पुढे गेले आहे. ‘ साठी बुद्धी नाठी ’ ही म्हण त्यांच्या बाबतीत निरुपयोगी आहे. लहानपणापासूनच ते एककल्ली आणि भोळसर आहेत. सारे आयुष्य त्यांनी एकाकी अवस्थेत काढले. माझ्या वडिलांचा संसार एवढा विस्ताराला आला, पण तात्या कधी त्यात येऊन स्थिरावले नाहीत. चार-दोन वर्षांनी ते कधीतरी गावी येत, नाही असे नाही. घरातल्या अगदी लहान मुलांशी तेवढे ते मनमोकळेपणाने बोलत. गावातल्या वडीलधाऱ्या मंडळींच्या गाठीभेटी घेऊन एके दिवशी मुक्यानेच निघून जात असत. माझे वडील तात्यांचे थोरले बंधू. त्यांच्याशीही कधी तात्या मनमोकळेपणाने बोललेले मी पाहिले नाहीत.

बारा-तेरा वर्षांपूर्वी माझ्या वडिलांच्या शेवटच्या दुखण्यात तात्या सांगून धाडल्यासारखे आले. महाप्रयाणाच्या सिद्धतेत असलेल्या वडील भावाच्या पायगती मुक्यासारखे बसून राहिले. शेवटचा श्वास सोडण्यापूर्वी वडिलांनी त्यांना आवर्जून सांगितले,

“ कोंडिबा, आता गाव सोडून जाऊ नकोस. माझी मुलं कर्ती झालीत. शेतजमिनीचा एवढा खटाटोप त्यांनी केलाय. तुला कुणी अंतर देणार नाही. ”

वि- तात्यांनी मान डोलवली.

स्वीका झे वडील इहलोक सोडून गेले. वडील बंधूंच्या मरत्या शब्दाला तात्यांनी त्याच्या गाव आणि ते गावात राहिले. गावात म्हणजे गावातल्या आमच्या वाड्यात

नव्हे. त्यांनी आपली वस्ती गावदरीच्या रानात टाकली. रानातल्या झोपडीत तीन दगड मांडले. पुन्हा एकाकी संसार सजवला. तेव्हापासून आज दिवसापर्यंत ते तिथेच राहात आहेत. गावातला वाडा आणि रानातली झोपडी यांतील अंतर दोन फर्लांगांचे देखील नाही. तात्या ते अंतर तोडून सहसा गावाकडे येत नाहीत. खेड्यात राहणारी माझी भावंडे त्यांच्या या चमत्कारिक वागण्याला कधीही, कसलीही हरकत घेत नाहीत. नाही म्हणायला माझी आई तेवढी तात्यांच्यावर कातावते. संतापल्या स्वरात ती त्यांना म्हणते,

"मुले वागणार नाहीत असं पुतणे वागवतात. पोरांनी कर्तुकीनं कमावलं आहे. म्हातारपणी उपभोग घ्यायचा सोडून असं का राहता वनवाशासारखं ?"

आईला उलट उत्तर मिळत नाही. तात्यांचे वनवासाचे व्रतही कधी सुटत नाही. त्यांचे जगच वेगळे आहे.

माणूस हा प्राणी सामान्यतः घरवेडा आहे. तात्यांना 'घर' या संस्थेची मातब्बरीच कधी कळली नाही. आदिवासी माणसासारख्या त्यांच्या गरजा अगदी प्राथमिक आहेत. एवढ्या म्हातारपणीही भल्या सकाळी उठून ते रानातल्या विहिरीत आंघोळ करतात. दिवसभर उन्हातान्हातून रानभर भटकतात. मनाला येईल ते काम करतात. त्या कामामागे कसले गणित असत नाही. कधी उन्हाला पाठ देऊन ढेकळे फोडीत बसतील, तर कधी उन्हात तळत वावरातले सडच वेचून काढतील. कधी झोपडीपुढचा दगडी खळगा उगाचच मोडतील आणि नव्याने रचतील. झोपडीची तळ-जमीन, गाईच्या शेणाने स्वच्छ सारवून घेण्याचा उद्योग ते आठवड्यातून दोनदा करतात. स्वतःचा तुकडा स्वतः भाजून खाण्यात त्यांना कष्ट असे कधी वाटतच नाहीत. रानातल्या जनावरांशी मात्र ते मायेने वागतात. एखादी शेळी गाभण असली तर पहिलटकरीण लेकीचे आई कौतुक करणार नाही, इतके कौतुक तात्या त्या शेळीचे करतात. गुरांचा गोठा रानातच असतो. बैलजोड्या, गाई, त्यांची पारडे-वासरे रानातच असतात. चाकरीचे गडी जनावरांची उस्तवारी नेमाने करीत असतातच. पण त्यांच्या कामावरही तात्यांचा पावशेर ठेवलेला असतो. एखाद्या बैलाच्या खांद्याला नखभर रक्ताळलेली सूज आली तर सदैव मुके दिसणारे तात्या एकदम बोलभांड होतात. चाकरीच्या गड्याच्या तीन पिढ्यांचा उद्धार करतात. कुणा गाईच्या चौकावरचे हाड

उंचावल्यासारखे दिसू लागले की त्यांच्या संतापाला सुमार राहात नाही. जनावरांच्या प्रकृतीची खराबी त्यांना विलक्षण अस्वस्थ करते. गड्यामाणसांची रळी उडवून ते थांबत नाहीत. कळेल त्या उपायांनी त्या जनावरांना धडधाकट करण्याच्या मार्गाला ते स्वतः होऊन लागतात. कानांच्या आतल्या भागात लाल कातड्यांचे मखमली अस्तर असलेले एखादे हुंदडते वासरू त्यांना इतका जीव लावते की, त्याच्याशी लोंपाट खेळत राहणे हा त्यांचा दिवसभराचा उद्योग होऊन बसतो. त्याच्यामागे ते साऱ्या गावदरीभर पळत राहतात. कोवळे जनावर आणि निबर माणूस यांची जगाआगळी शर्यत कामकरी, कुळंबिणी आणि उंडगे गुराखी यांच्या करमणुकीचा विषय होऊन बसतो. अशा एखाद्या पाड्याचे लाड मग इतके वाढतात की पुसणे नको. वाढत्या खोंडाने नंदीपणाची तयारी धरावी म्हणून तात्या त्याला कणकीचा रतीब सुरू करतात. त्याच्या शिंगांतली रग वाढीला पडावी म्हणून त्याचे मस्तक मांडीत धरून त्याच्या शिंगाचे अंकुर ते खाजवून खिजवत बसतात. झोपडीपुढच्या झाडाला डोईच्या रुमालाचे एक टोक बांधून दुसरे टोक ते आपल्या हातात धरतात. आणि ते धावत्या पाड्याच्या आड धरून त्याला उड्या मारण्याचे शिक्षण देतात. जनावरासारखाच त्यांचा जीव पाखरांतही रमतो. कोवळ्या उन्हात अंगणात जमणाऱ्या चिमण्या, साळुंक्यांना ते आपण होऊन मूठभर दाणा घालतात. विहिरीच्या खबदाड्यातील पारव्यांची कोटी आतल्या अंड्यांसह जलार्पण होऊ नयेत म्हणून, धोतराची कास घालून ते विहिरीच्या भिंतीवर लटपटत चढतात; आणि कोब्यांची लोंबती लक्तरे हलक्या हाताने आत सारून देतात. रानात पिके उभी असली म्हणजे याच पारवे-चिमण्यांना हुसकावून लावायला ते कमी करीत नाहीत. गोफण या आयुधावर तात्यांचा विश्वास नाही. नुसता आरडा केला तरी पाखरे उडून जातात. त्या कोवळ्या जिवांना दगडाने मारणे निर्दयपणाचे आहे असे त्यांना प्रामाणिकपणाने वाटते. पाखरां-जनावरांप्रमाणे झाडाझुडपांना देखील त्यांच्या मनी माया आहे. आमच्या शेतीवाडीत आजन्म कष्ट करून लाळेने मेलेल्या धुमाळ्या बैलाची शिंगे जशी त्यांनी तालीवरच्या बांधात अर्धी पुरून ठेवली आहेत, तशीच हरबऱ्याच्या खुटनातील शमी-आपट्याची खोडेही सांभाळून ठेवली आहेत. कुणी विचारलेच तर ते सांगतात,

अनुक्रम ७१५०१ ... दि: ...
क्रमांक १८९२ ... नों. दि: २५/३/४०



" कुणाला ठाऊक ! वाल्मीकीच्या दांडयासारखी ही खोडे पुन्हा पालवतील. "

फुलांच्या झाडांचा मात्र तात्यांना फारसा षोक नाही. बारा एकर रानात एकच पांढऱ्या कण्हेरीचे झाड आहे. त्याला सांभाळावे लागत नाही. नाठाळातले नाठाळ जनावरही त्याला तोंड लावू धजत नाही. ते झाड कधीतरी माझ्या वडलांनी लावले होते म्हणूनच की काय कोण जाणे, तात्या त्याच्याकडे थोडे लक्ष देतात. रानात मोट चालू नसली तर एखादी घागर आवर्जून त्याच्या बुडी ओततात. रान, जनावरे, पाखरे, झाडेझुडपे यांतच तात्या रमलेले असतात. देवाधर्माचाही त्यांना फारसा आठव नाही. सुगी मनासारखी साधत राहिली तर वरवंड्याच्या कोनाडयात बसविलेल्या शेंदऱ्या म्हसोबाला, आपल्या आंघोळीनंतर एक तांब्याभर पाणी न चुकता ते घालतात. जोंधळयाच्या पानावर साखर पडली किंवा गव्हावर तांबेरा आला की पहिला राग ते त्या शेंदऱ्या धोंडयावर काढतात. पारोशा अंगानेच तो धोंडा ते उचलतात आणि विहिरीत फेकून देतात. खळयाच्या वेळी ते त्या पाषाणाला पुन्हा वर काढतात. वरवंड्याच्या कोनाडयात आस्थेने ठेवून देतात. विहिरीतून आंघोळ करून ओलेत्याने वर येताना, पाण्याने भरून आणलेला चकचकीत तांब्या त्याच्या डोक्यावर उलटा करतात. त्याला चंदनचोथा आणि कण्हेरीचे फूल वाहतात.

तात्यांच्या झोपडीत एक दत्ताची तसबीर आहे. सुगीच्या दिवसांत त्या तसबिरीलाही ते कण्हेरीच्या फुलांची माळ चढवितात. एरवी त्या तसबिरीवर कोळयाने विणकाम केले तरी त्यांचे ध्यान तिकडे जात नाही. वाचनाचा आणि त्यांचा काही संबंध नाही. तशी पंढरपुराहून आणलेली तीन-चार पुस्तके त्यांच्या दुभत्याच्या कपाटात आहेत. एक गुरुचरित्र, एक व्यंकटेशस्तोत्र आणि एक सहदेव भाडळीचे पुस्तक. ती पुस्तके आहेत मात्र. तात्या ती उघडून बसलेले कधी कुणाला दिसत नाहीत.

" कोंडिबा सावकार पिसारी माणूस आहे, " असा गावभर त्यांचा लौकिक असल्यामुळे त्यांना भेटायला कुणी जात येत नाही. नाही म्हणायला, माझ्या भावंडांची धाकटी मुले आपल्या चिमुकल्या पायांतून काटे मोडून घेत घेत, वेळी-अवेळी तात्यांच्या भेटीला जातात. त्यांना बघून तात्यांचे काळीज फुलून येते. वासरा-कोकराइतक्याच मायेने ते त्या मुलांशी खेळतात. त्यांना हरबऱ्याचे घाटे

सोलून देतात, उसाचे करवे कापून देतात, राताळ्याची हंडी उकडून देतात. हुरडा-निंबूर भाजून देतात. निजेला आली तर झोपवतात, झोपलेल्या मुलाला पोचवायला वाड्यापर्यंत देखील येतात. मुलाला त्याच्या आईच्या स्वाधीन करून आपल्या वनवासी वस्तीकडे परत निघून जातात.

रानातली झोपडी आणि तिच्याभोवतीचे अर्ध्या एकराचे आवार हे जणू तात्यांचे साम्राज्य. थिबा राजासारखे त्या चतुःसीमेत ते सर्वाधिकारी. तिथे कोणी गेलेले त्यांना खपत नाही. वर्षांतून एक वेळ मी गावाकडे जातो, तेवढ्या वेळेपुरते तात्या आपले ते साम्राज्य माझ्या हाती देतात. माझा मुक्काम तिथे आहे तोपर्यंत ते स्वतः पाहुण्यासारखे वागतात. धनीपणा माझ्याकडे येतो. मी तिथून हाललो की त्यांचे साम्राज्य पुन्हा त्यांच्या स्वाधीन होते. वापरासाठी काढलेल्या खुर्च्यांचे सेट, तात्या त्याच्या घड्या करून ठेवतात. त्या घड्या एका पोत्यात भरतात, पोत्याचे तोंड दाभणसुतळीने शिवून टाकतात. क्रोकरी सारी कड्या-कुलुपात ठेवतात. गाद्यांच्या गुंडाळ्या करून दडवून ठेवतात. शाईच्या दौती, पेन्सिली, पुस्तके, कागद, सारेच्या सारे तात्या आपल्या ताब्यात ठेवून देतात. त्या सामानाला दुसऱ्या कुणी हात लावलेला त्यांना मुळीच चालत नाही.

गेल्या वर्षी मी भावाला लिहिले, "तात्यांच्या झोपडीला फरशी करून घे. दगडी भिंतींना आतून सिमेंट प्लॅस्टरिंग करून घे." भावाने ते काम कुणातरी ठेकेदाराला दिले. त्यांची माणसे तात्यांच्या साम्राज्यात घुसली. झोपडीत जाऊन पाहणी करू लागली.

"काय बघता रे?" तात्यांनी त्यांना दरडावले.

"भिंतीला गिलावा करायचा आहे. जमिनीला फरशी बसवावयाची आहे." पाहणी करीत असलेल्या एकाने सांगितले, "सामान हलवायला पाहिजे इथलं."

"नाही हलवणार."

"मास्तरांनी सांगितलंय." मास्तरांनी म्हणजे माझ्या धाकट्या भावाने.

"फार शहाणा आहे तो!"

"सामान हलविल्याशिवाय आम्ही काम करणार कसे?"

"करू नका. व्हा चालते."

तात्यांच्या पिसारीपणापुढे त्या कामकऱ्यांचा दमा चालला नाही. आगळीक

घेऊन माझ्या भावाकडे गेले ते. खांद्यावर धोतराचा सोगा टाकून तो तरातरा रानात आला. थोड्या रागीट आवाजातच तात्यांना म्हणाला, " तात्या, काम करू द्या की यांना ! "

" नाही देणार. "

" का ? "

" यांची खटपट इथं सुरू झाली म्हणजे मी कुठं राहू ? "

" गावात राहा. "

" मी नाही राहणार. "

" असं कसं ? "

" असंच ! "

" तुम्हांला जागा मोकळी करावी लागेल. "

" मी करणार नाही. "

" का पण ? "

" इच्छा माझी. "

" ठीक आहे ! " भाऊ देखील चिडीला पेटला आणि गडी बोलावून त्याने झोपडीतले सामान हुसकण्यास आरंभ केला. तात्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. डोळे लालबुंद झाले. त्यांनी ट्रंक भरली. वळकटी बांधली. डोक्यावर ट्रंक आणि काखेत वळकटी घेऊन ते मोटार नाक्यावर आले. बोलले नाहीत, चालले नाहीत. पंढरपुराकडे जाणाऱ्या मोटारीत चढले. त्यांनी गाव सोडला, पण सोडला तो माझ्याकडेच येण्यासाठी. "

फाल्गुन महिन्यातील एका गदगदत्या रात्री तात्या माझ्या घरी पोचले. रात्री दीड वाजला होता. उकाड्याने झोपेशी उभा दावा मांडला होता. मी जागाच होतो. कुत्र्यांनी कालवा केला आणि दारावरची बेल खुळ्यासारखी खणखणली, तेव्हा मी उठून व्हरांड्यात आलो. विजेचे दिवे पेटते केले. तात्यांना पाहिले आणि थक्क झालो. मी दार उघडले. त्यांच्या माथ्यावरची ट्रंक मीच उतरून घेतली. वळकटी त्यांनी उभ्या उभ्याच खाली टाकली. त्यांचे काहीतरी बिनसले आहे, हे मी ओळखले. पद्धतीप्रमाणे पायाला हात लावून नमस्कार केला.

" आयुष्मान् हो... " म्हणता म्हणताच त्यांचा गळा दाटला.

"का हो तात्या ?" मी चमकून विचारले.

त्यांनी हुंदका आवरला. नेसूच्या सोग्याने डोळे पुसले. निश्चयी स्वरात ते म्हणाले, "जाणार होतो गोसावी होऊन, पण तुझ्या बापाचं बोलणं मनात आलं. आता इथंच राहीन शेवटपर्यंत. गावाचं तोंड पाहणार नाही. धाकट्यांनी माझी शोभा केली!"

मी फार विचारपूस केली नाही. पत्नीला जागी केली. तात्यांना काही हवं-नको ते बघण्याविषयी सांगितले. अपरात्र असल्यामुळे ते जेवले खाल्ले नाहीत. बंगल्याबाहेरच्या अंगणात त्यांनी आपली पथारी अंथरली आणि ते आडवे झाले.

दुसऱ्या दिवसापासून त्यांचे जीवन सुरू झाले. दोन वेळचा चहा आणि दोन वेळचे जेवण घेण्यासाठी तेवढे ते आत येत असत. बाकी सारा कारभार बाहेर बागेत. गावाकडच्या रानासारखेच तें इथल्या बागेत राबू लागले. मनाला वाटेल ते करू लागले. असे का ? तसे का ? असे त्यांना कुणीच विचारले नाही.

बागेतल्या साऱ्या फळझाडांच्या बुडी त्यांनी आळी बांधली. मोसमी फुलांची झाडे उपटून टाकली. अंगणभर माजलेले तण खुरप्याने खुरपून, अंगण कसे लख्ख केले. पाठीमागच्या दारी एक जांभळ आहे, तिला त्यांनी छोटासा पार बांधला.

दिवसभर काही ना काही करण्याचे त्यांचे व्रत सुरू राहिले. .बोलणे, भाषण अगदी कामापुरते. पाळीव कुत्री आणि घरातली लहान मुले यांच्याशी मात्र ते बोलत. मनमुराद बोलत. जिम्या कुत्र्याच्या गळयात त्यांनी एक पट्टा बांधला. त्याला फेकलेला चेंडू तोंडी धरून, फेकणाराच्या हाती आणून देण्याचा एक खेळही त्यांनी शिकवून टाकला.

फाल्गुन, चैत्र, वैशाख या तीन महिन्यांत त्यांनी गावाकडचा आठव काढला नाही. वैशाखाच्या उन्हात माळ्याच्या जोडीने त्यांनी साऱ्या बागेची खांदणी केली. झाडाझुडपांसाठी खत आंथरून ठेवले. कुंडयाकुंडयांतील माती बदलून टाकली.

मृगाचा पहिला पाऊस पडला. तापलेली जमीन शांत झाली. वाऱ्याला नवनिर्माणाचा वास येऊ लागला. बियाण्यांना अंकुर फुटले; आणि तात्यांचा मुकेपणाही पालवू लागला. एक दिवशी ते सुनेला म्हणाले, "अग, आवळी आणि डाळिंबी यांच्यामध्ये ते कसलं रोप आहे?"

" पारिजाताचे. " माझी पत्नी म्हणाली.

" कशासाठी लावलंय् ते ? "

" फुलांसाठी. "

" फुलं काय खाता येतात ? आवळी, डाळिंबीला अडचण करील ते रोप. "

" मग ? "

" तिथून काढावं ते. दुसरीकडे लावावं लागेल. "

" का ? "

" मोठं झालंय्. कळ्यासुद्धा आल्या होत्या त्याला. "

" लागलं तर बघू. नाही तर मरू दे मेलं तर. फळझाडांना नको त्याची अडचण. "

तात्यांच्या करण्याला हरकत घेतली तर अकारण अनर्थ माजेल या विचाराने माझी पत्नी गप्प बसली. तात्यांनी ते नेटके पारिजाताचे रोप मुळासकट अलगद काढले आणि परसदारी लावून टाकले. पाऊस चांगलाच लागला. तात्यांना अंगणात झोपणे अशक्यच झाले. चार भिंतींच्या आत त्यांना झोप येईनाशी झाली.

माझ्या बंगलीपाठीमागच्या कृषि-विद्यालयाच्या जमिनीत पिके वर येऊ लागली. पावसाच्या धारांच्या सळयांआडून तात्या ते दृश्य पाहू लागले. त्यांना गावाकडची सय येऊ लागली. तिकडची दृश्यं आठवू लागली. मागेपुढं संदर्भ नसताना ते उगीचच बोलू लागले —

" गावदरीची विहीर भरेल औंदा. "

आखाडाच्या पावसाने आषाढी आबाद केली आणि तात्यांची अस्वस्थता वाढली. त्यांना करमेनासे झाले. त्यांची प्रकृती बिघडली. गावाकडच्या जनावरांची नावे त्यांच्या तोंडी येऊ लागली. तशात एके दिवशी भावाचे पत्र आले की, बुधिहाळ धरणाच्या कालव्याचा एक फाटा आमच्या गावदरीच्या रानात येतो आहे. ते वृत्त तात्यांच्या कानी गेले. त्यांची अस्वस्थता आणखी वाढली. त्यांना कणकणल्यासारखे होऊ लागले. जेवण नीट जाईना. रात्रीचे जेवण तर त्यांनी जवळ जवळ सोडूनच दिले. त्यांनी अंथरूण धरले. चार भिंतींच्या आत बसण्याची त्यांना आता संवय नव्हती. अंगात ताप घेऊन ते बाहेर उघड्यावर बसत.

पाऊस मुसळधार पडत होता. दिवस असून रात्रीसारखे अंधारले होते. तात्या मागच्या व्हरांड्यातील चौपायीवर बसले होते. एकटक कुठेतरी पाहात होते. कशालासा मी मागीलदारी गेलो. त्यांची दृष्टी स्थिरावल्याचे पाहून मी विचारले,

" काय बघता हो तात्या ? "

" वेडंच आहे बेटं ! " तात्या हसल्यागत करून म्हणाले.

" कोण ? "

" ते पारिजातकाचं रोपटं. "

" पारिजातकाचं रोप वेडं आहे ? "

" तर काय ? आपल्याला एका जागेवरून दुसऱ्या जागी हलवलं आहे हे त्याला कळलंच नाही. तिथंही वाढीला लागलंय् ! बघ कसं फुललंय् ! जाणतं झाड असं वाढत नाही. हे वेडंच आहे वेडं ! "

ते वेडे झाड बदललेल्या जागेवर फुलत राहिले. पण तात्यांना मात्र ही बदललेली जागा मानवेना. पावसापाण्याने माणदेशाच्या वाटा रोखल्या असतील. नदीनाले वाहत असतील. ठायी ठायी अडवणूक होईल. प्रकृती आणखी बिघडेल. अनेक गोष्टी आम्ही सांगून पाहिल्या. तात्या थांबले नाहीत. उन्हाळ्यात केलेली त्यांची प्रतिज्ञा पावसाळ्यात वाहून गेली. नागपंचमीच्या सणासाठी देखील ते शहरात थांबले नाहीत. अंगात ताप, घशात सूज, ट्रंक डोक्यावर, वळकटी काखेत अशा अवस्थेत ते परत गावाकडे जायला निघाले. त्यांना अडविणे निष्फळच. मी त्यांना फाटकापर्यंत पोचवून आलो. जाता जाता, तात्यांनी थांबून आवळी-डाळिंबीच्या मधल्या जागेकडे पाहिले आणि मला उद्देशून म्हणाले, " इथेच होता नाही तो वेडा पारिजात ? "

" हं ! " मी हसून म्हणालो.

" त्याला दुसरी जागा मानवली, मला नाही मानवत, पोरं चुकली. पोरंच ती. त्यांचं काय मनावर घ्यायचं. जातो मी. पौषांत ये तू. खुर्च्यांना पॉलिश लावून घेईन. झोपडीचा गिलावा झाला असेल. फरशी पुरी झाली असेल ! "

तात्या परत गावाकडे गेले आहेत. त्यांची प्रकृती उत्तम झाली आहे. रानातल्या झोपडीतले त्यांचे साम्राज्य पुन्हा सुरू झाले आहे. एखादे लग्नकार्य निघाले तर ते पुन्हा शहरात येतीलही. ते इथे राहणार मात्र नाहीत. जाणते झाड

दुसऱ्या जागी वाढत नाही. त्याची मुळे हलतात. तात्यांची मुळे त्या वनवासी जीवनातच रुजलेली आहेत. त्यांना सुखाची हवा मानवणार नाही. तात्या खेड्यात आहेत. पण माझ्या इथल्या प्रपंचात त्यांची रोज आठवण निघते.

परसातला तो पारिजात पांढरी चांदणी रात्र फुलावी, तसा फुलत असतो. घरातली मुलेबाळेसुद्धा आपसांत बोलताना बोलतात —

" दिवाळीचा किल्ला कुठे करायचा ? "

" वेड्या पारिजातकाखाली ! "

तात्यांनी दिलेले विशेषण त्या झाडाच्या जन्माला चिकटले आहे.

" वेडा पारिजात ! "

## १०

# पंतांची किन्हई

काही नावे, काही गावे, काही वास, काही सहवास, काही साद आणि काही नाद माणसाच्या मनात जन्मभर घरे करून राहतात. विसरू म्हटले तरी त्यांची स्मरणे मनुष्य विसरू शकत नाही. किन्हई या गावच्या बाबतीत माझी अवस्था हीच आहे. तसा त्या गावात मी फार थोडा काळ नांदलो आहे, पण त्या गावाची आठवण काही केल्या माझ्या मनातून पुसली जात नाही.

हा गाव सातारा रोड स्टेशनपासून अडीच-तीन मैलांवर आहे. १९३५ साली माझ्या वडिलांची बदली या गावी झाली. मी औंधाला शिकायला होतो. आमच्या घरची बाकीची सारी माणसे खेड्यावर होती. वडील एकटेच किन्हईला गेले होते. तेथून त्यांचे मला पत्र आले. औंधाहून किन्हई जवळ आहे. सुट्टी पडली तर इकडे ये.

मी सुट्टी पडण्याची वाट बघितली नाही. सुट्टी काढली आणि किन्हईला निघालो. रहिमतपूर, कोरेगाव आणि सातारा रोड, फक्त तीन स्टेशनांचा प्रवास; पण मी रात्रीच्या गाडीनं निघालो. त्यामुळे पोचलो अवेळी. बव्हंशी अगदी मध्यान्हरात्रच होती त्या वेळी. बरोबर चिरगुटे फारशी नव्हती. एक घोंगडी होती. ती घेतली आणि स्टेशनच्या आवारात बाहेर उघड्या वाऱ्यावर पडलो.

चांदण्या मोजीत अंगणात झोपण्याचा परिपाठ मला लहानपणापासून पडला होता. घोंगडीला पाठ लागल्याबरोबर मला गाढ झोप लागली.

जागा झालो तो कुणी तरी हलवून जागे केले म्हणून. मला हलवून जागे

करणारा तो माझ्या अर्थातच ओळखीचा नव्हता. त्याच्या हलविण्याने आणि हाका मारण्याने मी जागा झालो.

" कुठं जाणार ? " मला जागविणाऱ्याने, मी जागा झाल्यावर मला विचारले.

" किन्हई. " मी म्हणालो.

" मग चला तर, मी निघालोय. " तो म्हणाला.

" मी चालत जाणार आहे ... ! " मी खरे ते सांगितले.

" अन् मला कुठं पायशिक्कल दिलंय् सरकारनं. चला. जाऊ बोलत. तांबडं मावळलंय् ! ! "

मी धडपडून उठलो. अवतीभवती पाहू लागलो. पाण्याचा नळ कुठंच दृष्टी पडेना.

" चला राव ! कसलं त्वांड धुता न् काय ? तोंडावर घोंगडं घेऊन तर झोपला होता रातभर. काही केरकचरा पडलेला नाही तोंडावर ! " त्या माणसाचा तो लंगडा विनोद मला मोठा मौजेचा वाटला. मी घोंगडीची घडी करून पिशवीत टाकली. पिशवी खांद्यावर घेतली आणि चालायच्या तयारीने सज्ज झालो.

तोही तयार होता. त्याच्या उजव्या हातात घुंगुर लावलेला भाला होता. डाव्या खांद्यावर थैली होती. सरकारने पायशिक्कल न दिल्याची तक्रार त्याने नुकतीच केली होती. त्याचा जामानिमा आणि सरकारविरुद्धची कुरकूर यावरून मी त्याचा पेशा ओळखला. " तुम्ही पोस्टमन आहात वाटतं ? " मी त्याला विचारलं.

" नाही, रनर ! " तो म्हणाला. रनर असला तरी त्याची चाल काही फारशी जलद नव्हती. त्याच्या बरोबरीने चालणे मला सहज जमत होते.

स्टेशनसमोर दिसणारे एक टेक आम्ही ओलांडले न ओलांडले तोच सूर्योदय झाला. त्या रनरची आकृती आता कुठे मला स्पष्ट दिसली. बोलण्यावरून तो म्हातारा वाटत होता, पण त्याच्या ओठावर वा हनुवटीवर एक देखील केस नव्हता. त्याचे मुंडासे, डगला यावरून तो फॅशन करीत असावा असेही मला वाटेना. चालताना त्याच्या हाताची हालचालही मोठ्या विचित्र पद्धतीने होत होती. बायका बाजाराला जाताना हाताला झटके देत चालतात, तसा तो चालत

होता. माझ्या मनात काही तरी विचित्र शंका आली. थोडके हसू देखील आले, ते मी ओठातल्या ओठात आवरले आणि त्या रनरला विचारले,

" तुमचे नाव काय हो ? "

" आबा. " तो म्हणाला. मी खो खो हसू लागलो. तो काही चिडला नाही. माझ्या हसण्याबरोबर तोही निष्कारणच हसू लागला; तसे माझे हसू आणखी वाढू लागले. मग मात्र तो गंभीर झाला आणि म्हणाला, " तुला काय सटवाई हसवती का काय लेकरा ? "

" सटवाई तान्ह्या लेकराला हसविते आबा ? " मी म्हणालो.

" मग तू काय बाप्या आहेस ? शाळेत तर शिकतोस न्हवं ? "

" तुम्हांला कसं माहीत ? "

" आमच्या किन्हईला आलेल्या नव्या देवस्थान कारकुनाचा लेक न्हवं तू ? "

" हो, तुम्हांला कुणी सांगितलं ? "

दाढीमिशा मुळीच नसलेल्या या माणसाजवळ कर्णपिशाच्च वगैरे काही विद्या आहे की काय, अशी रास्त शंका मनात डोकावली. आता आबा जोराजोरानें हसू लागला.

" का हो, हसता का ? "

" अरे तुझ्या बानंच सांगून ठेवलं होतं मला तू येणार आहेस म्हणून. "

" तुम्हांला ? "

" मलाच काय, सान्या गावाला ठाऊक आहे तू येणार म्हणून ! "

आबाने सांगितलेल्या या वार्तेने मी गप्प झालो. माझ्या वडिलांना माझे केवढे कौतुक वाटत असले पाहिजे. मी येणार होतो म्हणजे काही राजाचा लेक येणार नव्हता; पण माझ्या वडिलांना माझे येणे अत्यानंदाचे होते. तो आनंद त्यांच्या पोटात राहिला नव्हता. त्यांनी तो सान्या गावाला वाटून टाकला होता.

बोलता बोलता मी आणि आबा नांदगिरी गावात आलो. इकडची गावे आमच्या माणदेशातील गावासारखी उघडी बोडकी नव्हती. गोंडेदार हिरव्या कुंच्या घालून बसलेल्या गौरीपुढच्या बाळांसारखी ती लोभस होती.

डाव्या बाजूला असलेल्या एका डेरेदार डोंगराकडे हात करीत आबा म्हणाला, " ह्यो बघ नांदगिरीचा किल्ला; तुझ्या बुकात आला असंल ! ! " बुकातला

नांदगिरी किल्ला माझ्या मुळींच ध्यानात राहिला नव्हता. आबानं अनाहूतपणे माहिती सांगितली ती मात्र मी लक्षात ठेवली.

" वर एक मोठं टाकं आहे, त्यात विंचवागत गार पाणी बारमहा भरलेलं असतं. टाक्याच्या आत अंधार असतो. त्या अंधारातनं पाणी कापीत आत गेल्यावर एक दत्ताची मूर्त लागते. मोठं जागृत स्थान आहे ! ! "

कधी मधी ते स्थान पाह्यचं ठरवून मी आबाबरोबर पुढे चालू लागलो. कोवळ्या उन्हाचा शेक अंगाला बरा लागत होता. पायांना थकण्याची कल्पना देखील नव्हती. चालता चालता आम्ही टेकाडावर चढलो तेव्हा दूरवर एका हिरव्या वनराईकडे बोट दाखवीत आबा म्हणाला, " ती बघ किन्हई. " मला नुसती झाडी दिसली. गावाचा मागमूस देखील लागला नाही.

किन्हई गावाच्या आसपास हिरवी रुखावळ इतकी दाटली होती की, गावात आले तरी गाव आला आहे असे वाटले नाही. एक सुंदर बगीचा आणि तिच्या मध्यभागी टुमदार कौलारू बंगली लागली तेव्हा मी आबाला विचारले,

" आबा, हे काय ? "

" लायब्री बंगला ! " आबा म्हणाला.

" एवढे मोठे आहे गाव – लायब्ररी असण्याएवढे ? "

" पूर्वी पंत सरकार गावात ऱ्हात होतं तवाच्या बागा, इमारती ह्या. आता काय नाही. " आबाने उत्तर दिले.

लायब्ररी हा शब्द बहुतेक आबाला कळला नव्हता. औंधकर संस्थानिक त्या गावात पूर्वी वस्ती करीत होते. आता ते येथे नाहीत. गाव आणि नाव तेवढे राहिले, " पंतांची किन्हई " इतके मी जाणले.

त्या गावात आल्यावर तर मला कुठल्या तरी बागेत आल्यासारखे वाटले. गावच्या गल्ल्या अन्य खेड्यांतील गल्ल्यांसारख्या निरुंदच होत्या; पण त्या प्रत्येक गल्लीतून पवित्र असा सुगंध येत होता. ते गौडबंगाल मला काही केल्या कळेना. त्या सुगंधाने मी अगदी भारावून गेलो. पोलीसठाण्याजवळ आल्यावर आबा थांबला आणि मला उद्देशून म्हणाला, " हे पोलीसठाणं, हवालदार असतील त्यांना इचार. ते नेतील तुला बापाकडे ! "

आबाने दाखविलेल्या पोलीसठाण्याकडे मी पाहात राहिलो. ती इमारत मोठी अजबच होती. आबा निघून गेला. एका गल्लीच्या कोपऱ्यावर आलेल्या त्या षट्कोणी इमारतीकडे जाताना माझ्या पायांचा वेग मंदावला. गावातली प्रत्येक गल्ली सुगंधाने भरलेली आणि पोलीसठाण्याची इमारत षट्कोणी, मंगळुरी कौलांची. मला माहीत नव्हते की, या रांगड्या महाराष्ट्रात कुठे असली अद्‌भुत खेडी आहेत.

पोलीसठाण्याची पायरी चढून मी वर गेलो. दुटांगी धोतर नेसलेला, भरघोस मिशांचा एक माणूस अंगात डगला चढविण्यात गुंगला होता.

" हवालदार—" मी म्हणालो. तो वळला.

" या, दादा आताच गेले वाडयाकडे ! " त्या माणसाने माझे स्वागत केले व न विचारताच मला हवी होती ती माहितीही देऊन टाकली. मी देवस्थान कारकुनाचा मुलगा आज येणार होतो, हे आबाप्रमाणे त्या पोलीस कॉनिस्टेबललाही माहीत होते. तो माणूसही पोलिसासारखा दिसत नव्हता. पोलिसाचे सोंग घेतलेल्या एखाद्या गोसाव्यासारखा वाटला मला तो.

" चला, जाऊ दादांच्याकडेच. " तो पोलीस म्हणाला. पोलीस चौकी उघडीच ठेवून तो माझ्याबरोबर निघाला.

वाडयाकडे जायला म्हणून वळलो. पुन्हा सुगंधाचा एवढा जोरदार झोत आला की मी त्या सुगंधाने गुदमरलो. आता मात्र माझ्याने राहवेना. मी त्या पोलीस हवालदारालाच विचारले, " एवढा सुगंध कसला येतो आहे हो या गावात ? "

" या गावात उदबत्त्यांचे वीस-पंचवीस कारखाने आहेत. " पोलीस हवालदार म्हणाले.

केवढा भाग्यवान गाव. गावात उद्योग आहे तो देखील सुगंध निर्माण करण्याचा. कातडी कमावण्याचा धंदा एखाद्या गावच्या नशिबी आला तर गाव दुर्गंधीने कोंदून जायचा. किन्हईचें तसे नव्हते. तिथे अष्टौप्रहर सुगंध दरवळला होता.

पोलीस हवालदार 'दादा वाडयाकडे गेले आहेत' म्हणून म्हणाले, तो वाडा पंत प्रतिनिधींचा. शे-पाऊणशे खणांचा, ऐसपैस, दुमजली. आम्ही

वाड्यात गेलो. समोरच्या कचेरीत एका शुभ्र गादीतक्यावर माझे वडील बसले होते. मला पाहून ते उठले. त्यांचा आनंद मला त्यांच्या डोळ्यांत वाचता आला. वाड्यात आणखी कुणी नव्हते. वडिलांनी मला सारी इमारत फिरून दाखविली. मागचा पुढचा चौक, माडीवरची दालने, त्या दालनांतील नामांकित चित्रकारांच्या हातच्या तसबिरी, भिंतीतील चोरखोल्या. राजवाडाच होता तो. त्याच्या नुसत्या दर्शनाने माझा जीव सुखावला. वाड्याच्या समोरच्या प्रांगणातील निशिगंधाची बाग पाहून तर मी वेडाच झालो. निशिगंधाचे एक फूल मिळाले तरी मी उल्हसित होत असे. मग इथे तर पुरा बगीचाच निशिगंधाच्या फुलांनी लहडलेला होता!

असल्या वाड्यात न राहता औंधचे राजे त्या औंधाला का राहतात तेच मला कळेना.

वाड्याच्या मागच्या दरवाज्यात आल्यावर तर मला आणखी सुंदर दृश्य दिसले. तो वाडा नदीकाठावर वसलेला होता. वाड्याच्या पिछाडीला लागून नदीचा घाट होता. घाटावर मोठेमोठे वटवृक्ष होते. त्या वडाच्या गाढ सावलीत एक टुमदार मंदिर होते. त्या मंदिराच्या कोरीव दगडाच्या पायऱ्या नदीच्या निवळशंख धारेपर्यंत पोचलेल्या होत्या.

"दादा, हे मंदिर कशाचे?" मी वडिलांना विचारले.

"एकवीरेश्वर!" ते म्हणाले.

त्या देवाचे नाव देखील मला आवडले. एकवीरेश्वराचे मंदिर, पलीकडे नदी आणि नदीच्या पलीकडे गाव. नदीची धार गावाच्या मधून गेलेली. पैलतीरावर आणखी संपन्न बाग डवरलेली. त्याच्या पलीकडे गावची प्रमुख बाजारपेठ आणि त्याच्या पलीकडे औंधकर संस्थानिकांची कुलस्वामिनी – तिचे मंदिर, तेही एका छोटेखानी टेकडीवर. दगडी बांधणीचे, त्याला तळापासून वरपर्यंत पायऱ्या.

वडिलांनी गावची रचना सांगितली आणि मी अगदी त्या गावाच्या प्रेमात पडलो. त्या गावातून नुसते भटकत राहावे असे मला वाटू लागले.

वडील म्हणाले, "चला आता जेवा. मग संध्याकाळी जा देवीला!"
मी विचारलं, "सैंपाक कोण करतं दादा?"

वडील बोलले, "मीच. आज मित्रानं केला असेल!"

मी विचारले, "कोण?"

ते म्हणाले, "दामोदर मनोहर हेड कॉनिस्टेबल!"

मला पोलीस ठाण्यावर भेटलेले ते गृहस्थ कागदपत्री सही देखील अशीच करीत असत! दामोदर मनोहर हेड कॉनिस्टेबल. तो माणूस इतका प्रेमळ होता की, पोलीस खात्यात त्याला नोकरी कशी काय लागली होती कोण जाणे! त्याच्या आयुष्यात लग्न हा प्रकारच संभवला नव्हता. तूर्त वडील आणि ते एकत्रच सैंपाक करीत होते, जेवत होते. त्या दिवशी मी पोलिसाने केलेला सैंपाक जेवलो. पोलिसाचे हात पाठीची चामडी लोळवायचे, ते माझ्या पोटात गेले. किन्हईतली संध्याकाळ तर मी जन्मात विसरणार नाही. थंडगार वाऱ्याच्या झुळका, निवळ निळ्या आकाशात परतणाऱ्या पाखरांची भिरी, वडाच्या मायेवरील चिमण्यांचा गोड गोंधळ, चहू दिशांनी येणारा आल्हाददायक सुगंध, गायीगुरांच्या हंबरण्याचे आवाज, एकवीरेश्वराच्या देवळातील घंटांचे मंजुळ नाद आणि कुठून तरी ऐकू येत असलेली एका विलक्षण पद्धतीने, गद्यप्राय शैलीने गायली जाणारी मोरोपंत कवीची केकावली--

सदाश्रितपदा सदाशिवमनोविनोदास्पदा
स्वदासवशमानसा कलिमलांतका कामदा
वदान्य जन सद्गुरो प्रशमितामिता सन्मदा
गदारिदरनंदकांबुजधरा, नमस्ते सदा

ती केकावली गाणारी व्यक्ती कवी मोरोपंतांच्या रक्ताची होती. ते त्या महाकवीचेच वंशज होते. रामकृष्ण दत्तात्रय पंत पराडकर. पंतांनी या टुमदार खेड्यातच कायम वास्तव्य केले होते. गावातील एकवीरेश्वराचे देऊळ, औंधकर संस्थानिकांनी त्यांना दिले होते. त्या देवळात त्यांनी आपला 'सुगंधशाळा' नावाचा उदबत्त्यांचा कारखाना चालविला होता.

त्या सुगंधित गावात मी आठ-दहा दिवस राहिलो. ते गाव सोडणे मला कठीण झाले. तेवढ्या आठ-दहा दिवसांत मला अनेक तोंडवळ्यांच्या ओळखी झाल्या. त्या तोंडवळ्यांबद्दलचे असीम औत्सुक्य माझ्या मनी निर्माण झाले. व्यक्तीसारख्याच वस्तूही परिचयाच्या झाल्या. वैशिष्ट्ये उमगली. मनातले

कुतूहल वाढतच गेले. मला समजले की, मंदिरात आणि धर्मकार्यात वापरल्या जाणाऱ्या उदबत्त्यांची निर्मिती करणारा पंत पराडकरांचा कारखाना, केवळ अस्पृश्य लोकांकडून चालविला जात होता. उदबत्त्यांची कृती पंत पराडकरांना कुणा सिद्धपुरुषाकडून मिळाली होती. पंतांचा एक तरुण भाचा, कुरळ्या दाढी-मिशांचे जंगल घेऊन त्या कारखान्यात काम करीत होता, पण त्याचे वेड होते योगसाधना. पंतांनी आपल्या अपत्यांची नावे मोठी काव्यात्म ठेविली होती. त्यांच्या मुलींची नावे होती : आर्या आणि केकावली. पंतांनी सारे पंतवाङ्मय प्रकाशित केले होते. 'लोकसंग्रह' नावाचा कारखानाही पूर्वी चालविला होता. टिळककालीन राजकारणाशी त्यांचा संबंध होता. त्यांच्याजवळ वीर सावरकरांच्या प्रक्षिप्त ग्रंथांच्या प्रती जपून ठेवलेल्या होत्या.

पट्टाभिषिक्त श्रीरामाच्या देवळासमोर एक बाबूराव राहत होते. लोक त्यांना भंपक बाबूराव म्हणत असत, पण तो माणूस दिलाचा राजा होता. त्याची शेकडो एकर जमीन होती. घरच्या श्रीमंतीपेक्षा मनाच्या श्रीमंतीला तो माणूस अधिक मान देत होता.

भंपक बाबूरावांच्या वाडयात एक लिमये मास्तर राहत होते. त्यांचा मुलगा गोरेगावाला गवळ्याचा धंदा करीत होता. जातीने कोकणस्थ ब्राह्मण असून त्या मुलाने असा स्वतंत्र व्यवसाय आरंभला होता. तो दर महिन्याला बापाकडे पैसे पाठवीत होता आणि लिमये मास्तर जुन्या राजवाडयातील जागा खरेदी करून त्यावर दुमजली घर बांधणार होते.

जुन्या राजवाडयात कुणी डॉक्टर पाटणकर राहत होते. त्यांनाही औंधकर पंतांनी आश्रय दिला होता. आयुर्वेदाविषयीचा त्या माणसाचा गाढा व्यासंग होता. 'सुवर्णराजवंगेश्वर' ही त्यांची औषधी देशभर प्रसिद्ध होती.

नदीकाठावरच्या एका वाडयात एक कुटुंब राहत होते. त्यांची मुले अत्यंत हुशार होती. थोरला मुलगा अण्णा, पराडकरांच्या सुगंधशाळेत व्यवस्थापक म्हणून काम करीत होता. तो म्हणे उत्तम नट होता. गावात नाटके बसविण्याची त्याला फार हौस होती.

भंपक बाबूरावांप्रमाणे एक बाबूराव चष्मेवाला या गावात होता. तो गावचा कुलकर्णी होता. त्याचे नाव कुणीतरी 'लाखपाचोत्री' ठेविले होते.

ही असली नावे ठेवण्याचे काम मांडवगणे भटजी करीत होते. ते सरकारवाड्याच्या माडीवर राहात होते. त्यांचे पोट खूप मोठे होते. त्यांची बायको पण त्यांच्यासारखी जाडी होती. ती मंडळी औंधकर सरकारांच्या आश्रयाने तिथे आली होती. औंधकर औंधाला निघून गेले होते आणि आश्रितांनी वाड्यात कायमचा तळ ठोकला होता. या पठ्याने या गावात नवीन आलेल्या माझ्या वडिलांना देखील नवे नाव ठेवले होते : खुडखुडदास !

राजवाड्याशेजारी एक पडका वाडा होता. तो म्हणे विमाप्रसिद्ध चिरमुल्यांचा होता. मोटारवाले गरवारे या किन्हईचेच होते. औंधकर संस्थानिकांचा मूळ पूर्वज या किन्हई गावचाच कुलकर्णी होता.

किन्हईपासून दोन मैलांवर एक बलभीमवाडी होती. ते स्थळ अत्यंत रम्य होते. तिथे पूर्वी एक साधू राहत होता. त्या साधूच्या प्रसादाने औंधकरांच्या घराण्यातील कोणा पुरुषाला औंधाधिपती होता आले होते. तो पुरुष राजघराण्यात दत्तक गेला होता.

किन्हई सोडून मी औंधला गेलो खरा, पण किन्हई गावात माझे मन फार गुंतून राहिले. ते वर्ष निघून गेले. छत्तीस साली मी पुन्हा किन्हईला गेलो. त्या वेळी आमचे सारे बिऱ्हाडच किन्हईला आले होते. वडिलांची बढती झाली होती. ते देवस्थान कारकुनाचे देवस्थान वहिवाटदार झाले होते. मी किन्हईला आलो तो आजारी पडून. आजारीपण योग्य वेळी आल्याने माझा मुक्काम दीर्घकाल होऊ शकला. किन्हईत राहायला सापडले.

ज्या राजवाड्याच्या प्रथमदर्शनाने मी निहायत खूष होऊन गेलो होतो, त्या राजवाड्यात आता आमची सर्व मंडळी राह्यलाच आली होती. वडिलांच्या पगाराचा आकडा पन्नासाच्या आतबाहेरच होता, पण राजवाड्यात राहिल्यामुळे साऱ्या कुटुंबावरच श्रीमंतीची कळा आली होती. वाड्याच्या निगराणीसाठी औंधकर सरकारनी नेमून ठेवलेले नोकर आमच्या कुटुंबाच्या सेवेत रुजू झाले होते. आता धाकट्या भांवडांना संभाळण्यासाठी लखोबा गडी अहोरात्र सिद्ध होता. केरवारा, सडासारवणासाठी सखू मोलकरीण बांधलेली होती. वडिलांना लोक 'रावसाहेब' म्हणू लागले होते आणि आई 'काकीसाहेब' पदवी पावली होती. आमच्या घरातल्या कुणाही माणसांनी श्रीमंती कधी स्वप्नात

पाहिली नव्हती. अनाठायी चालून आलेला राजप्रासादनिवास अंगवळणी पडण्याचा हव्यास प्रत्येकाला लागला होता. आई देवाला जात होती, ती मागेपुढे पट्टेवाला घेऊन. पोरे शाळेला जात होती, ती दप्तराचे ओझे गड्याच्या हाती सोपवून. माझे वडील मात्र या बेगडी श्रीमंतीत मुळीच गुरफटलेले नव्हते. उलट ते आईलाच म्हणत,

"नोकर सरकारचे आहेत, त्यांना उगीच राबवू नकोस."

"दो दिवसाची जाइल सत्ता अपेश माथा घेउ नको." हा फंदी अनंताचा फटका ते पुनः पुन्हा आईच्या माथ्यावर फटकारीत होते. पण आई त्यांचे ऐकायला तयार नव्हती. समोर आलेल्या राजलक्ष्मीचा ती पुरेपूर उपभोग घेत होती.

माझी प्रकृती बरी झाल्यावर आईने मला वरचा दिवाणखाना उघडून दिला. त्या दिवाणखान्यात हंड्या, झुंबरे, गाद्या-गिरद्या, सारा राजेशाही थाट होता. मोठमोठ्या आरामखुर्च्या होत्या. कसरीने रसास्वाद घेतलेली असंख्य पुस्तके होती. दिवाणखाना भला मोठा ऐसपैस होता. त्याच्या खिडक्यांना रंगी-बेरंगी तावदाने होती. त्या तावदानांतून आत येणारा चक्क सूर्यप्रकाश त्या दिवाणखान्याचे वातावरण अधिकच स्वप्नमय करून टाकीत होता. औंधच्या कुठल्याही राजकुमाराने घेतला नसेल इतका उपभोग मी त्या ऐश्वर्याचा घेतला. पाठीशी लोड, पायाखाली तक्क्या अशा लक्ष्मीघरी थाटात मी तेथे भरमसाठ वाचन केले. हरिभाऊ आपट्यांच्या साऱ्या कादंबऱ्या, 'महाराष्ट्र कुटुंब माले' चे कैक ग्रंथ, 'मासिक मनोरंजन' आणि 'केरळकोकिळ' यांचे अनेक अंक वाचून मी फस्त केले. आजारीपणाच्या कारणाने माझी मॅट्रिकची परीक्षा हुकली होती. किन्हईच्या मुक्कामात मी अभ्यासाच्या पुस्तकांना हातही लावला नाही. सकाळी लवकर उठावे, राजवाड्याच्या स्नानगृहातील दगडी चौरंगावर बसून राजा गोपीचंदासारखे मनमुराद सुखस्नान करावे, नदीचा प्रवाह ओलांडून पैलाड जावे, एखाद्या कोकरागत उड्या मारीत साखरगडनिवासिनीची टेकडी चढावी. त्या टेकडीवरील डोंगरी फुले कविता गात गात गोळा करावी. ती देवीच्या मूर्तीवर वाहावी. वहिवाटदाराचा मुलगा आल्याचे पाहून तिथल्या पुजाऱ्याने आगतस्वागत करावे, चांदीच्या वाटीतून बेसनाचा रसरशीत लाडू

प्रसाद म्हणून पुढे करावा. मग रमत गमत टेकडीच्या खाली उतरावे. उतरताना राम गणेशांच्या, बालकवींच्या कविता तोंडपाठ म्हणाव्यात. घरी आल्यावर मनसोक्त न्याहारी करावी आणि दिवाणखान्यात जाऊन त्या राजेशाही बैठकीवर लोळत पुन: वाचनास प्रारंभ करावा—असा माझा क्रम चालला होता.

एके दिवशी काही कामानिमित्त पंत पराडकर वडिलांच्याकडे आले. अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचनाला सोकावलेल्या माझ्या मनाने ही संधी दवडली नाही. ' केसरी 'तून प्रसिद्ध झालेले सावरकरांचे लेख आणि पंतांचे वाङ्मय यांचा वास मला आगाऊ लागलेला होताच. पंतांची परवानगी विचारून मी त्यांच्या कारखान्यात वळण पाडले. सुगंधशाळेच्या सुगंधी वातावरणात हाती आले ते वाङ्मय मी अधाशीपणाने वाचू लागलो. त्या कारखान्यात काम करणाऱ्या साऱ्या स्त्रिया महारणी होत्या. त्यांची राहणी स्वच्छ होती. भाषा शुद्ध झाली होती. वाचलेल्या वाङ्मयातील उतारे मी त्यांना सांगू लागलो. कथनाची कला मला उपजतच साध्य होती. हातांनी उदबत्त्या वळता वळता त्या चांडालस्त्रिया माझ्या पुराणात रंगू लागल्या. पंतांचा ब्रह्मचारी भाचा गोपाळ आणि नाट्यवेडा व्यवस्थापक अण्णा खेर यांच्याशी त्या काळात माझा चांगला दोस्ताना झाला. गोपाळबरोबर मी गावाबाहेरच्या शिवमंदिरातही संध्याकाळच्या वेळीं जाऊ लागलो. हे शिवमंदिर तर योग्यांना समाधिस्थान आणि कवींना प्रतिभास्थान वाटावे इतके शांत आणि रम्य होते. त्याची बांधणी हेमाडपंती पद्धतीची, काळ्या दगडांची होती. हे मंदिरही नदीकाठीच होते. पंत पराडकरांना ' वनस्पतिजन्य शुद्ध धूपाची ' विद्या देणारे त्यांचे सिद्ध गुरू हयात असताना याच मंदिरात नांदत होते. या मंदिरात गेल्यावर गोपाळ तासच्या तास शीर्षासन करून उलटा उभा राही. आणि मी मंदिराच्या कठड्यावर बसून नव्यानेच पाठ झालेल्या आर्या केकावलीतील चरण गुणगुणत राही—

" श्रीरामा तू स्वामी जगाचा असशी माझ्या शिरावरी जागा ।
आम्हांस तुझ्या पायावाचुन निर्भय नसे दुजी जागा ॥ "

सूर्यास्ताच्या समयी त्या निवान्त जागी त्या ओळींना काही वेगळा अर्थ यायचा. आकाशाच्या लाल कडा धीरे धीरे अंधारून जात. पूर्ण झांजड पडे. ब्रह्मचारी गोपाळ त्या शिवमंदिराच्या गाभाऱ्यातील नंदादीप प्रज्वलित करी.

नंदादीपाच्या प्रकाशात उजळलेल्या चंदनचर्चित शिवपिंडीला प्रणाम करून आम्ही दोघे परतत असू. कोरडी वाळू, ओली वाळू, खडबडीत खडक, निसरडे खडक, गुडघाभर पाणी, घोटाभर पाणी यांतून प्रवास करीत नदीच्या पात्रा-पात्रानेच आम्ही घरी येत असू.

रात्रीचे जेवण आम्ही कुटुंबीय मंडळी वाड्याच्या मागील अंगणात करीत असू. त्यामुळे रोजच्या भोजनाला वनभोजनाची चव येई. प्रत्येक घास अमृताचा लागे. झोपण्यासाठी मात्र मी देवडीवरची जागा निवडली होती. वाड्यावरचे राखणे रामोशी देवड्यांवरच घोंगडी मुस्कटून झोपत. त्यांच्यापासून थोडी अलग, मी माझी गादी घालून घेई. बाकीचे लोक घोंगड्यांवर झोपले असताना आपणच तेवढे मऊ मऊ गादीवर झोपण्यात मला एक अनोखा आनंद मिळे. दामोदर मनोहर हेड कॉनिस्टेबलही आमच्याच ओळीत येऊन झोपत असे. ते आणि राखणी रामोशी रात्री बारा बारा वाजेपर्यंत वेगवेगळ्या विषयांवर बोलत त्या कथा मोठ्या सुरस आणि चमत्कारिक असत. दरवडेखोरांच्या, खुनांच्या, चोरांच्या त्या गोष्टी मला मनापासून आवडत. त्या ऐकता ऐकताच माझा डोळा धुरमळे.

आनंदाचे दिवस आणि समाधानाच्या रात्री, अशा सुखात किन्हईतले माझे काही दिवस गेले. मग एके दिवशी पंतांचा व्यवस्थापक अण्णा खेर माझ्याकडे आला आणि गावात नाटक बसवायचे ठरले. पट्टाभिषिक्त रामाच्या देवळात नाटकाच्या तालमी सुरू झाल्या. त्या गांवढ्या गावात माझ्यासारख्या अर्ध-शिक्षिताला सर्वज्ञतेचा मान अकारण मिळू लागला. माझ्या म्हणण्याप्रमाणेच नाटक बसले.

कार्तिकाची जत्रा आली. किन्हईची बाजारपेठ लोकांनी गजबजून गेली. काही दिवसांसाठी आम्ही वाडा मोकळा केला. शेजारच्या एका लहानसर जागेत राहिलो. औंधाहून श्रीमंत राजेसाहेब आले. देवीची पालखी निघाली. विसाव्याच्या मंडपात साताऱ्याच्या ‘पिलूजान’ नायकिणीचे गाणे झाले. दोन दिवस सारा किन्हई गाव उत्साहात बुडून गेला. तिसऱ्या दिवशी रात्री आमचे नाटक होणार होते. श्रीमंतांच्या समोर होणार होते. ऐन वेळी एक गोंधळ झाला. नायिकेचे काम करणारा राम कुलकर्णी एकाएकी आजारी पडला.

मंडळी घाबरली आणि माझ्याकडे आली. मी ते काम स्वत: करायचे ठरवले. नायिकेच्या स्वभाव-चित्रासाठी माझे तोंड रंगवून झाल्यावर गावच्या ' मेकप ' मास्तराने मला सांगितले, ' तुम्ही बालगंधर्वासारखे दिसता. '

पट्टाभिषिक्त रामाचे मंदिर माणसांनी फुलून गेले. ' व्याही विहीण ' नाटकाचा प्रयोग उत्तम वठला. माझे नायिकेचे काम तर उत्तम वठले. श्रीमंत औंधकर पंतांसारख्या चोखंदळ रसिकाने माझे काम बघून मान डोलावली आणि ' शाबास ', असे उद्‌गार काढले,

कार्तिक यात्रा संपून गेली. श्रीमंत निघून गेले. आम्ही पुनः वाड्यात आलो. मी भूमिका केली नायिकेची, पण मला महत्त्व प्राप्त झाले नायकाचे ! दुसऱ्या दिवसापासून गावातल्या तरण्याताठ्या मुली माझ्याकडे बोटे दाखवू लागल्या. मला येत असलेला पाहून उगीचच लाजल्यागत करू लागल्या. नाना वेळावीत लाडके लाडके हसू लागल्या. माझ्या मनात एक निराळीच अस्वस्थता उत्पन्न झाली. त्या अस्वस्थतेची माझी मलाच भीती वाटू लागली. गावातूनच हिंडायचे मी सोडून दिले. वाड्याच्या तिसऱ्या मजल्याच्या खिडकीत बसून दिवसभर आपला वाचत राहू लागलो. कोवळ्या ग्रामगौरी समोरच्या राममंदिरात जमू लागल्या. दिवसभर तिथे झिम्मा-फुगड्या घालू लागल्या. माझ्याकडे तिरपे तिरपे कटाक्ष टाकू लागल्या. कैकदा मी खिडकीचे दार लावून घेतले. मग पाणी पिण्याचे वा कसले तरी निमित्त काढून त्या वाड्यात येऊ लागल्या. कुणी साखरगडनिवासिनीच्या पायरीवरच मला भेटू लागल्या, तर कुणी संध्याकाळी माझ्या आधीच लायब्ररी बंगल्याच्या आवारातील आवळीच्या झाडाखाली जाऊन बसू लागल्या. त्यांचा हा स्वयंस्फूर्त लपंडाव गावकऱ्यांच्याही डोळ्यांवर येऊ लागला. मांडवगणे भटजींनी मला नवीन पदवी दिली—' बालकुंजविहारी. '

कुणीतरी उपद्व्यापी माणसाने एकवीरेश्वराच्या घाटावरच माझे आणि एका मुलीचे नाव खडूने मोठ्या अक्षरांत लिहून ठेवले. त्या मुलींचा तो पोरखेळ मला आवडत होता. पण तो खेळ तसाच सुरू राहिला तर परवडणार नाही, याची मात्र मला जाण होती. महामूर दारिद्र्य भोगल्यामुळे प्रीती आणि प्रणयाचे खेळ आपले नव्हेत याचे ज्ञान मला वयाच्या सतराव्या वर्षीच झाले होते. दुपारच्या वेळी मी दिवाणखान्यात वाचत बसेनासा झालो. अंगाची

उगाचच लाही होत असल्याचा भास होऊ लागला आणि दुपारचा सारा वेळ शिवमंदिराच्या वरच्या बाजूस एक डोह होता, त्या डोहात डुंबण्यात मी काढू लागलो.

असाच एके दिवशी संध्याकाळी डोळे लाल होईस्तवर पोहून मी वाड्यात परत आलो. आमच्या मोलकरणीची मुलगी माझ्या एका धाकट्या भावंडाला खेळवत होती. मला पाहताच ती उगीचच लाजली आणि डोळ्यांची चमत्कारिक उघडझाप करून हसली.

" निर्लज्ज ! " मी तिच्यावर एकाएकी संतापलो. तोंडाला येतील तितके वाईट शब्द मी तिला बोलून घेतले. ती बापडी गप्प झाली. खाली मान घालून तिथून निघून गेली. मला विलक्षण अस्वस्थ वाटू लागले. किन्हईचा मोह सोडवेना. तिथे राहावे असेही वाटेना. एवढ्यात औंधाहून एका मित्राचे पत्र आले. त्याने लिहिले होते :

" पुढच्या वर्षापासून करिक्युलम् बदलत असल्यामुळे तू या वर्षी परीक्षेस बसावे हे चांगले. "

ते पत्र ही पडत्या फळाची आज्ञा मानून मी एका रात्री गाडीने परत औंधला निघून गेलो. किन्हईत राहण्याची माझी फार इच्छा होती, त्या गावात जन्मभर राहायला मिळाले असते तरी मी राहिलो असतो. पण ते घडले नाही. मला पुन्हा कधीच जाता आले नाही. आजतागायत जाता आले नाही.

तो सुगंधित गाव, तिथला राजवाडा, तिथल्या बागा, तिथली माणसं, तो एकवीरेश्वराचा घाट, टेकडीवर सोने उधळणारी सकाळ, बुक्कागुलालात न्हालेली संध्याकाळ, डोहाच्या पाण्यात विझवलेली जळती दुपार. त्या निष्पाप ग्राम-कन्यकांचे वेडे कटाक्ष – सारे सारे काही मला आठवते. पुनः पुन्हा आठवते. पण कोण जाणे आता किन्हई तशी राहिली असेल की नाही ! पंत पराडकर हृदयक्रिया बंद पडून वारल्याचे मी नुकतेच कुठेतरी वाचले. त्यांची सुगंधशाळा आता किन्हईत कुठून असणार ? अण्णा खेराचा भाऊ मला मुंबईला भेटला होता. त्याने सांगितले,

" अण्णा मरून गेला. " सुगंधशाळेसारखेच आता त्या गावातले बाकीण उदबत्त्यांचे कारखाने बंद झाले असतील. औंध संस्थानच विलीन झाले. कोचे

जाणे, आता तो राजवाडा कसल्या अवस्थेत असेल! ब्रह्मचारी गोपाळ आता संसारी झाला आहे. तो पुण्यातच आहे. गावाबाहेरच्या त्या शिवमंदिरात आता नंदादीप लागला असेल की नाही कोण जाणे! पुष्कळ काळ निघून गेला आहे. बावीस–तेवीस वर्षे निघून गेली आहेत. नकळत माझ्यावर प्रेम करू लागलेल्या त्या मुली आता कुठल्या तरी गावात प्रतिष्ठित सुहासिनी म्हणून नांदत असतील. कधी कधी त्या भेटल्याच तर त्यांचे चेहेरेही मी ओळखू शकणार नाही. त्यांची नावे तर मला कधीच माहीत नव्हती. माझ्या लेखनाच्या दिवाणखान्यात कधी कधी माझ्या मुली तीन-तीन पुष्पपात्रे सजवून ठेवतात. उदबत्त्यांची झाडे चेतवून ठेवतात. त्या सर्वांचा एकत्रित सुगंध मला बधिर करून टाकतो. माझे मलाच वाटू लागते, माझ्या कपाळावर कुरळे केस उडू लागले आहेत. माझी बेडौल अंगलट पुन: गोटीदार झाली आहे. खादीची खाकी हाफपँट आणि पोलो कॉलरचा पोपटी सदरा मी ल्यायलो आहे. माझ्या एका हातात एक खादीचीच पिशवी आहे. डाव्या खांद्यावर एक घोंगडी आहे. घाईघाईने मी एम्. एस्. एम्. रेल्वेच्या रहिमतपूर स्टेशनवर येतो आहे. तिसऱ्या वर्गाच्या डब्यात चढतो आहे. कुणीतरी प्रवासी विचारतो आहे, कुठं जाणार? –मी उत्तरतो —‘ किन्हई !’

“ किन्हई घोणकी ?”

“ अंहं, पंतांची किन्हई !”

॰

११

## नागूदेव

पुरा सहा फूट उंचीचा होता नागूदेव. त्याचा व्यवसाय होता भिक्षुकीचा. पण तो भिक्षुकासारखा दिसायचा नाही. उंचीसारखी त्याची रुंदीही डोळ्यांत भरण्याजोगी होती. दोंदावरले यज्ञोपवीत आणि माथ्यावरची शिखा आळी-पाळीने कुरवाळीत तो उघड्यानेच पंचक्रोशीतून फिरायचा. नेसूच्या करवतकाठी धोतरासारखेच भारी उपरणे कधीमधी त्याच्या खांद्यावर असे, इतकेच.

वर्णाने तो गोरापान होता. त्याच्या भालप्रदेशावर पांढऱ्या चंदनाची वैष्णवी मुद्रा आणि उभा नाम कोरलेला असे. टोचदार नाकाखालची दाभण-काठी मिशी सदैव रेखलेली असायची. तोंड सदा पानाच्या रसाने रंगलेले. त्याच्या खालचा ओठ किंचित पुढे झुकलेला होता. त्या ओठाच्या जाडीवर मधोमध एक उभी चिरणी होती. तिच्यात पानातला पिंक साठलेला असायचा. गावातल्या रस्त्याने, अगर गावाबाहेरच्या रस्त्याने तो निघालेला असता कुणीही पथिकाने विचारावे,

“ कसं काय देवा ? ”

“ संतोष, परम संतोष ! ” हे त्याचे उत्तर ठरलेले.

तसा तो खरोखरीच सुखी ब्राह्मण होता. वाडवडिलार्जित जमीन पुष्कळ होती. सासुरवाडीकडची सारी संपत्ती लेकीवारसाने त्याच्याच घरी आली होती. व्यवसायाच्या विद्येत तो पूर्ण पारंगत होता. नाही म्हणायला या ब्राह्मणाचे पोट मात्र पिकलेले नव्हते. एवढा धर्मनिष्ठ माणूस, देवाने वांझोटा

ठेवला होता. आता मूलबाळ होण्याचा संभव नव्हता, कारण नागूदेवाचे वय पन्नाशीला आले होते. शिखा श्मश्रूच काय, पण छातीवरची रोमावळी देखील चांदीची होऊ लागली होती.

आसपासच्या पाच-सहा खेड्यातील कुलकर्णी मंडळींचे उपाध्येपण नागूदेवाकडे होते. वास्तविक आताच्या जमान्यात धार्मिक कर्मकांडाचे सोयरसुतक कुणाही यजमानाला राहिले नव्हते. पण नागूदेव आपल्या पारंपरिक निष्ठेने सारी विहित कर्मे कटाक्षाने त्यांच्याकडून करवीत होता.

गांधीहत्येच्या गोंधळात पंचक्रोशीतील ब्राह्मण पार खाली होते. कुणाच्याही वाड्याच्या चारी भिंती अफूट उभ्या नव्हत्या. अग्निनारायणाच्या अवकृपेतून वाचलेल्या, शेष वास्तूंतून सर्वांचे संसार खुरडत होते. तरणीताठी पोरे शहराकडे पळाली होती. म्हाताऱ्याकोताऱ्यांना ब्राह्मणेतरांचे पुढारीपण सोसवत नव्हते. आलिया भोगासी सादर होऊन, पांढऱ्या टोप्यांच्या कलाने ते आपली मस्तके डोलवीत होते. ब्राह्मणाघरच्या जुन्या रूढी पार नामशेष झाल्या होत्या. देवांची आठवण बुजली होती, तेथे पितरांना पिंड देतो कोण? श्राद्धापक्षांसाठी उन्हातून पायपीट करीत, यजमानाच्या गावी जाण्याची उपाध्यायाला काहीच आवश्यकता नव्हती. गावच्या गणपतीच्या उत्सवात तमाशे होऊ लागल्याने, ब्राह्मण घराण्यात गणपतीच्या येण्याजाण्याला काही महत्त्व राहिले नव्हते. गणेशाच्या प्राणप्रतिष्ठेसाठी कुलपुरोहिताला बोलावण्याची रूढी आता पूर्ण मोडली होती. ब्राह्मण तरुणांची लग्ने बहुतेक शहरातच जमत होती. शहरातच साजरी होत होती. मंडपदेवतेच्या पूजनापासून उपाध्यायाची संस्कृत आज्ञा ऐकून, त्याचे मराठी भाषांतर त्याच्या तोंडून निघाल्यावरच गंधफूल वाहण्याचा प्रसंग आता अगदी दुर्मिळ झाला होता. अनंतादी व्रते अनंतात विलीन झाली होती. काही यजमानांची मुले पोटाच्या पाठीमागे दिल्लीआग्र्यापर्यंत देशोधडी गेली होती. काशीयात्रेच्या मावंद्याला 'ब्राह्मणा'च्या उपस्थितीची गरज राहिली नव्हती. गावातल्या गावात तग धरून राहिलेले म्हातारे देखील वैद्यकीय उपचाराच्या आशेने मरायला शहरात जात होते. मंत्राग्नीपुरती गीर्वाण वाणी उच्चारण्याची संधी आता सापडत नव्हती. इकडची दुनिया तिकडे झाली होती, पण नागूदेव जुन्याच निष्ठा उराशी

बाळगून होता. या वयातही त्याची स्मरणशक्ती तल्लख होती. कुणा यजमानाघरी काय कार्य केव्हा आहे याची सय करून, तो पूर्वीसारखाच पायी पायी त्याच्या खेड्यावर जात होता. यजमानांच्या मनी नसले तरी त्याच्याकडून धर्मकार्य करवून घेत होता. गांधीवधात त्याचा वाडा, ज्या भलेपणाने वाचविला होता, त्याच भलेपणाने त्याच्या करद्यांनी त्याच्या जमिनी 'सोडल्या' होत्या.

पंताच्या फोंड्या माळावर अकारण बसलेले निंबुरी नावाचे खेडे वैशाखाच्या उन्हात तळत होते. गावाभवतीचे जिराईत काळे रान उसवून फेकल्यासारखे ऐसपैस पडले होते. बागाइतात कुठे कुठे हिरवळ उगवत होती. निंबाच्या काटक झाडावरील नवखी पालवी धुळीने माखून, जुनवट पडली होती. गावठाणात अगदी शुकशुकाट होता. कामकरी कुळवाड्यांची घरे नांदती असून ओसडल्यासारखी दिसत होती. एखाद् दुसऱ्या सोप्यापुढे वाळवण वाळत होते. राखणीला बसलेल्या म्हातारीची काठी सोप्याच्या ओट्यावर खणाखण वाजत होती. गल्ल्यांतून फिरणारी कुत्री देखील तोंड वर करून भुंकण्याच्या मनःस्थितीत नव्हती. पायरस्त्यावरचा फुफाटा रांगोळीसारखा चमकत होता. अनवाणी पाय उंबऱ्यातून बाहेर टाकण्याची सोय नव्हती.

नाना कुळकर्ण्याचे जेवण नुकतेच आटपले होते. धोतराच्या सोग्याने तोंड पुशीत तो बाहेर आला. अंगणातल्या उन्हाने त्याच्या डोळ्यांवर एक जोरकस थप्पड मारली. कातावल्यागत होऊन तो सोप्यातल्या मळक्या बैठकीकडे वळला. काथ्याच्या तक्क्याशी पाठ टेकता टेकता त्याने वळून, पाठभिंतीच्या कोनाड्यातील घड्याळाकडे पाहिले. ते घड्याळ बेटे बंद पडले होते. घड्याळाने सांगितले नाही, तरी उन्हाने नानाला अंदाज दिला की दुपारचा एक वाजून गेला असावा. खलबत्ता अलीकडे ओढून, नानाने पानसुपारीचे तुकडे त्यात टाकले. पान कुटता कुटता त्याने आपल्या पडक्या वाड्याचे आवार अकारणच न्याहाळून घेतले. तो बसला होता तो सोपा आणि आतली दोन खणी खोली सोडली तर काहीच उभे नव्हते. दगडांच्या ढिगाऱ्यात हरणदोडीची वेल वळवळावी, तसे त्या कुटुंबाचे अस्तित्व वळवळत होते.

"नाना—" दरवाज्याच्या पडकातून हाक आली.

" कोण, नागूदेव ? " नाना बसल्या जागेवरूनच ओरडला.

" हो, मीच. " म्हणत घामाघूम झालेला नागूदेव उन्हात सावली यावी तसा आत आला.

पुरोहिताच्या या अनाहूत येण्याने नानाला सुख झाले नाही. नानाच्या तिसऱ्या लेकीचे लग्न गेल्या साली झाले होते, व त्या लग्नासाठी नागूदेवाकडचे हजार रुपये त्याने कर्जाऊ घेतले होते. ते मागण्यासाठीच हा ब्राह्मण उन्हातान्हाचा आला असावा, असा त्याने अंदाज बांधला.

" या देवा " म्हणत त्याने भरघोस स्वागत करण्याचा प्रयत्न केला खरा, पण बोलण्यातले शब्द निर्माल्य होऊनच त्याच्या तोंडून खाली पडले. नागूदेव सोप्यावर आला. नानाने आपला तक्क्या त्याच्यासाठी मोकळा केला व आतल्या बाजूकडे तोंड करून तो ओरडला, " पाणी आण ग जरा प्यायचं. देव आले आहेत "

नानाच्या नानीने स्टेनलेस स्टीलचे तांब्याभांडे बैठकीत आणून ठेवले. पदर टाळीत धरून, नागूदेवांना वाकून नमस्कार केला.

" जयदेव ! " नागूदेव बोलला. बोलताना उजव्या हाताचा पंजा पसरून त्याने उभा हात धरला. नानाची बायको आत निघाली. नागूदेवाने तिला थांबविले.

" लक्ष्मी, हे तांब्याभांडं ? "

" अनंतानं पाठवलं मुंबईहून. "

" संतोष, परम संतोष. पण ब्राह्मणाला यातून पाणी चालणार नाही. "

" का ? " नानाने भुवया उंचावल्या.

" अरे, याचं नावच आहे स्टेनलेस स्टील. हे लोखंडाचं. पितळेच्या गडव्यातून द्या. ते चालेल. "

मुलाच्या देणगीची अपूर्वाई अशी फुकट गेली हे लक्ष्मी-नानींना पचले नाही. त्या तांब्याभांडे उचलून मुकाट्याने आत गेल्या.

" अहो, आता घरोघरी असलीच भांडी झाली आहेत – देवा ! " नाना म्हणाला.

" संतोष परम संतोष. आपल्याला नाही चालत. "

" काळ बदलला आहे. "

" नित्य बदलतो तो. काळ बदलला म्हणून पोपटांनी मांसाशन सुरू केलं आहे का ? सोप्यातल्या हलकडीला टांगलेल्या पिंजऱ्यात एक पोपट डुलक्या घेत होता, त्याच्याकडे अंगुलिनिर्देश करीत नागूदेव म्हणाले. तोवर पितळेचा गडवा आला. नागूदेवाने पोटभर पाणी पिऊन घेतले. मस्तकावर आणि दोंदावर पाण्याचे मार्जन केले.

" स्नान वगैरे ? " नानाने विचारले.

" सर्व झालंय्. "

" जेवण ? "

" आज हरिदिनी. वैष्णव आपण नाना. "

" मग फराळाचं ? "

" काही नको. संतोष आहे. परम संतोष. "

" मधेच बरी मारली दौड उन्हाची ? "

" सांगतो. "

नाना मनातून थोडा बावरलाच. नागूदेवाच्या कामाचा अंदाज त्याने आधी बांधलाच होता.

" देवा, येत्या सप्टेंबर महिन्यात माझा एक विमा पुरा होतोय्. हजार-बाराशे मिळतील. ते हाती आले की प्रथम— "

" नाना ! " त्याच्याकडे टक लावून बघत नागूदेव बोलू लागला, " अरे, एवढी घाई का आहे पैशाची ? मी भिक्षुक ब्राह्मण आहे. कुणी मारवाडी महाजन नव्हे. तुला जमेल तेव्हा दे. माझी काऽही घाई नाही. त्यासाठी आलोच नाही मी. "

" नव्हे पण— "

" तुझं ठीक आहे, पण मी अजून धर्म सोडलेला नाही. आमच्याकडे तरी पैसा आला कुठून ? तुम्ही यजमानांनी दक्षिणा दिली, तेच ना आमचं उत्पन्न ? तुझ्या आज्यानं दिलेली जमीन अजून खातोय् मी. ' दक्षिणेचा बिघाच ' म्हणतात अजून तिला— "

नाना चमत्कारिक हसला आणि गप्प झाला. त्याचं बोलणं थांबलं, पण

जळून गेलेल्या रबराचा वास मागे उरावा, तशी लाचारी त्याच्या मुद्रेवर राहिलीच.

" मी आलो होतो अशासाठी—" नागूदेवांनी विषय बदलला.

" बोला–"

" तुझा सर्वांत धाकटा मुलगा कुठे आहे ? "

" यशवंता होय ? तो गोपाळाजवळच असतो शिकायला, पुण्याला. "

" वय काय त्याचं ? "

" गोपाळचं ? "

" नव्हे यशवंताचं. "

" बारा झाली असतील की ! "

" मग मुंज नाही का करायची ? "

" करू की. "

" केव्हा ? लग्नाच्या वेळी ? अरे, तुम्हा कुणालाच कशी आचारांची शुद्ध राहिली नाही ? ते काही नाही. आता सुट्टी पडली असेल त्याच्या शाळेला. त्याला बोलावून घे. बऱ्याच दिवसांत कार्य झालं नाही निंबुरीच्या ब्राह्मणवाड्यात. "

नाना गप्प बसला.

" विचार कसला करतोस ? मुंज म्हणजे काही लग्न नाही, घरचा मामला. "

" पण—— "

" पण काय ? "

" खर्चाला सवड नाही देवा, यंदा ! "

" मी करतो खर्च. काय दहा-पाच लाख येईल तो. " देवाचा स्वर जरा चढलाच.

" असं कसं ? "

" का ? "

" तुमचे पहिलेच पैसे राहिलेत अजून–"

" ते मागितलेत का मी कधी ? "

आता मात्र नानाजवळ काही उत्तर राहिले नाही. आपले म्हणणे त्याला

आता पूर्णपणे पटले, अशा अर्थाने नागूदेवाने पानाचा डबा अलीकडे ओढला.

"चालतं का पान आज? तुमचे ओठ फिके दिसले म्हणून विचारलं नाही मघा." बोलत बोलत नानाने डब्यातले बऱ्यापैकी पान शोधून काढले.

"बरी आठवण केलीस, आज उपवास आहे. पान नको."

"सुपारी?"

"पंढरपूरची असेल. भरडी?"

"हूं."

"नाही चालत. काही हरकत नाही. नुसता चुना-तमाकू घेतो."

देवाने चुना-तमाकूचा आस्वाद जिभेवर पाझरता ठेवला आणि मग बराच वेळ यजमान-पुरोहितांच्या गोष्टीही रंगत राहिल्या. मुख्यतः नागूदेव बोलत होता. नाना नुसताच नेहमीप्रमाणे "मम" म्हणत होता.

अलीकडच्या पिढीच्या धर्मविषयक उदासीनतेने नागूदेव फार व्यथित झाला होता. त्याचं ठाम मत होते की, वर्णाश्रम व्यवस्था फार दूरगामी विचार करून निश्चित केली होती पूर्वाचार्यांनी. अत्यंत समानता हे एक स्वप्नरंजन आहे. गाडा चालत राहायचा असेल तर कुणीतरी बैल म्हणून जन्माला आलं पाहिजे, कुणीतरी गाडीवानाचा चाबूक घेतला पाहिजे.

विषयाच्या ओघाने नागूदेव पुष्कळ बोलला. बालविवाह, विधवा केशवपन, सोवळं-ओवळं, व्रतवैकल्यं सगळं काही समाजधारणेला इष्टच होतं, असं त्यानं जोरजोरानं प्रतिपादन केलं. शेवटी वैतागानं तो म्हणाला, "आम्हांला संतान झालं नाही तेच बरं आहे. असल्याच विचारांची पिढी माझ्या पोटी जन्माला आली असती तर मी अग्निकाष्ठ भक्षण केलं असतं नाना—!"

फार बोलल्यामुळे नागूदेवाच्या डोक्यावरील घेऱ्याभोवतालचा शिरप्रदेश घामाने थवथबला. मूळचा उकाडा होताच. त्यात नागूदेवाच्या सात्त्विक संतापाची भर पडली होती. खांद्यावरच्या उपरण्याने त्याने आपले मस्तक कोरडे केले. पुनः पाण्याचा घोट घेण्यासाठी तांब्यावरचे भांडे उचलले तोच नानाची एक मुलगी दरवाज्याच्या बाजूने तुरुतुरु चालत सोप्याकडे आली. नाना आणि नागूदेव बसले होते त्या बैठकीवरूनच आत आली. मुलगी मोठी गोड होती. पंधरा एक वर्षांची असेल. तिच्या अंगवेलीची वाढ मोठी जोरदार दिसली.

वर्ण देशस्थाला साजेसाच होता. सावळा. पण तो मोठा मोहक वाटला. तिचे किंचित नकटे नाक तर चिमटीत धरून हालवावेसे वाटले नागूदेवाला. पितृपद कधीच प्राप्त न झालेल्या त्या वृद्ध ब्राह्मणाच्या काळजातले सुप्त वात्सल्य त्या चिमुरड्या पोरीला पाहून एकाएकी उसळल्यासारखे झाले. असे का झाले, ते त्याचे त्याला देखील कळले नाही. त्या पोरीचं नऊवारी नेसणं तर त्याला इतकं आवडलं की, "हे कसं छान दिसतं !" असा शेरा नकळत त्याच्या वाणीतून उमटला.

नागूदेवानं आपल्या मुलीला ओळखलं नसावं अशा कल्पनेने नाना म्हणाला, "सुट्टीला आलीय. बहिणीकडेच असते."

"तुझी का मुलगी ?"

"तर."

"काय नाव हिचं ?"

"सुमन."

"श्शुमन !" नागूदेवाने उगीचच ते मधुर नाव बोबडे उच्चारून पाहिले. कशाने कुणास ठाऊक, त्याच्या डोळ्यांची पाळीं एकदम ओलावून आली. नाकाचा शेंडा लालसर झाला. एक दीर्घ उसासा त्याच्या नाकपुड्यांतून बाहेर पडला.

"का हो देवा ?" नानाने बावरून विचारले.

"काही नाही. संतोष आहे. परम संतोष."

नागूदेव थोडा वेळ गप्प राहिला. काळजात दाटलेले अनोळखी उधाण त्याने अंशतः तरी ओसरू दिले, आणि मग नानाला विचारले,

"जावयाकडे कशाला ठेवलीस हिला शिकायला ?"

"काय करता देवा, इथं शिक्षणाची सोय नाही."

"मुलाकडे ठेवायची !"

"त्यांचे त्यांचे प्रपंच आहेत त्यांना."

"अरे, आपल्या कडगावला नाही का हायस्कूल ?"

"तीन मैलांचा तकाटा कसा सोसवणार पोरीच्या जातीला ?"

"तिथंच ठेवावी."

" कुणाकडे ठेवायची ? दिवस हे असे. बरे, तुमचा गाव तसा."

" आम्ही तिथंच राहतो ना ?"

" तुमचं वेगळं."

" माझ्याकडे राहू दे तुझ्या लेकीला. ब्राह्मणीला सोबत होईल. तुलाही लेक दूर गेल्यासारखं वाटणार नाही. विचारलंच कुणी भाऊबंदांनी, तर सांग, मी महिन्याच्या महिन्याला खर्चाची रक्कम देतो भटाला. मी तिला ती म्हणेल तेवढं शिकवीन. चांगलं घर पाहून तिचं लग्न थाटून देईन. माझ्या लेकी-सारखी सांभाळीन."

नकार देण्याची हिंमत नानाला झाली नाही. सुमनच्या आईनेही आढेवेढे घेतले नाहीत. एक तरी अपत्य आपल्याजवळ राहते आहे या आनंदाने त्या माउलीला बरे वाटले.

वैशाख वद्यात यशवंताची मुंज झाली. मोठ्या कडाक्याने समारंभ साजरा झाला. नानाची चाकरमानी मुले कुरकुरली. नसत्या कार्यात उगीच खर्च केला नानांनी. भाऊबंद म्हणाले, " पोरं मिळवती झालीत. आता काय घरच्या मांजरीचं देखील डोहाळजेवण साजरे करील नाना." नानाला आणि नागूदेवाला दोघांनाच माहीत होतं मुंजीचा खर्च कुणी केला ते. शाळा-कॉलेजचे नवे वर्ष सुरू होताना सुमन शिक्षणासाठी म्हणून जवळच्या तालुक्याच्या गावी कडगावी गेली.

पोरगी घरात आल्यापासून नागूदेवाचा संसार जणू नव्याने सुरू झाला. सुमनही मोठी लाघवी मुलगी. ती सकाळीं उठून नागूदेवाला पूजेचे काढून देऊ लागली. देवाच्या पत्नीला स्वयंपाकात साह्य करू लागली. बरोबरच्या मंडळीत बसून बोलताना दोघेही पतिपत्नी " आमची सुमन, आमची सुमन" असा तिचा उच्चार करू लागली. तिमाही परीक्षेत तिला गणितात किती मार्क पडले ते साऱ्या ब्राह्मण आळीतल्या बायकांना माहीत झाले.

" तीन महिन्यांत आमच्या मुलीने महिम्न मुखोद्गत केलं " हा वाढपणा नागूदेव मोठ्या अभिमानानं सांगू लागला. कधी नव्हे ते नागूदेवाच्या घरात इंग्रजी शब्द घुमू लागले. सारवलेल्या जमिनीवर सुवासिक पीठ पडू लागले. निरनिराळ्या सुवासिक तेलांच्या बाटल्या न्हाणीघराच्या आसपास मिरवू

लागल्या. इस्त्रीची पोलकी हँगरवर लटकू लागली. घरात बॅटरीचा रेडिओ आला. सुमनच्या तारुण्यसुलभ छानछोकीला नागूदेवाने कधीच हरकत घेतली नाही. किंबहुना आधुनिक नखऱ्याबद्दलचा त्याचा तिटकारा जरा लवचिक झाला. नवे सगळे पचवून पोरगी जुन्याची पाळणूक करते आहे, या आनंदाची त्याला सुस्ती जडली.

सुमन तुळशीला पाणी घालू लागली की नागूदेव तिच्याकडे कौतुकाने पाहात राही, शाळेत नेमलेल्या संस्कृत पुस्तकातील एखादे सुभाषित विषद करण्याच्या निमित्ताने तो मूळ ग्रंथाचे महत्त्व तिला पटवी.

"जीव दोंदावरी लोळे प्रपंच सुखाच्या !" अशी नागूदेवाची अवस्था झाली. आनंदाचे उद्यान एकदा मोहरायला लागले की प्रत्येक कोपरा सुगंधासह मोहरतो. सुमन कडगावला येऊन पुरते चार महिने लोटले नाहीत तोच नागूदेवाला एक महत्त्वाचे निमंत्रण आले. दक्षिणेत तिरुपती व्यंकटेशाचलम्वर वेदान्त्यांचा मेळावा भरणार होता. कसे कुणास ठाऊक, दक्षिण महाराष्ट्रातल्या कुग्रामात नांदणाऱ्या नागूदेवाला त्या परिषदेकडून मानाचे निमंत्रण आले.

शेषाचलवासी व्यंकटेश, नागूदेवाच्या साऱ्या यजमानगृहांचा कुलस्वामी. त्याच्या दर्शनाचा लाभ आणि विद्वत्-परिषदेचे निमंत्रण या दोन प्रलोभनांसाठी नागूदेवाला जाणे भाग होते. सुमनने मोठ्या चोखंदळपणे त्याच्या प्रवासाची सिद्धता केली.

"जाताच आहात तर साऱ्या दक्षिण देशची यात्रा करून या ताता." सुमनने सुचविले. घरात राहिल्यानंतर मुलीने आपणास "ताता" अशी हाक मारावी असे नागूदेवानेच सांगितले होते. त्या हाकेमागे त्याच्या अनेक उणेपणाची तृप्ती उभी होती.

सर्व यजमानांच्या घरी जाऊन नागूदेवाने निरोप घेतला. येताना व्यंकटेशाचे पादोदक आणि प्रसाद आणण्याची वचने साऱ्याजणांना दिली. पंचांगात पाहून मुहूर्त मुक्रर केला; आणि तो दक्षिणेकडील यात्रेला निघाला. त्याच्या मनीमानसी संतोष भरून राहिला होता. परम संतोष कोंडून गेला होता. खंत एकच होती की, पुरे तीन महिने लाडक्या लेकीपासून दूर राहावे लागणार. एस. टी. ने नजीकच्या रेल्वे स्टेशनकडे निघताना नागूदेवाला राहावले नाही. निरोपाचा

नमस्कार करायला आलेली सुमन त्याला एकदम लहान दिसली. खणाची चोळी, खणाचा परकर ल्यालेली. कपाळावर आलेले घोडजावळ मागे सारणारी. दोन्ही हातांनी धरून त्याने तिला वर उठवले. निथळत्या डोळ्यांनी तिला वर उठवले. आणि ही दुसऱ्याची पोर आहे याचे भान न राहून त्याने तिच्या गालाचा मुका घेतला. त्या वेळी देवाच्या पत्नीखेरीज अन्य कुणीच जवळ नव्हते. थोडी बावरल्यासारखीच होऊन सुमा बाजूला आली, तेव्हा मात्र नागूदेवाला वाटले, हे चुकले. आपले वागणे वात्सल्यसुलभ खरे, पण ब्राह्मण संस्कृतीला न शोभणारे झाले. झाले ते का झाले हे सांगत बसण्याइतका अवसर नव्हता. 'बस' ची वेळ झाली होती. नागूदेवाने गड्यांना हाका मारल्या आणि त्यांच्या माथ्यांवर प्रवासी सामान देऊन तो स्टँडवर जाण्यासाठी घराबाहेर आला. दारात उभ्या राहिलेल्या पत्नीला जाताना सांगायला तो विसरला नाही – "सुमाला सांभाळ."

ऐन निघायच्या वेळी सुमा त्याच्या दृष्टी पडली नाही. ती कदाचित् नागूदेवाच्या पत्नीच्या आडोशाला उभी असेल.

नागूदेव यात्रेला निघून गेला आणि सुमनला काय झाले कुणाला ठाऊक, ती अबोल झाली. तिच्या वागण्यातला अल्लडपणा पार नाहीसा झाला. मोकळ्या रस्त्याने जाताना देखील ती गर्दीतून जाताना चोरावे तसे अंग चोरू लागली. देवाच्या पत्नीला वाटले, हा तिच्या वाढत्या वयाचा परिणाम असेल. नागूदेवाची पत्रे नित्य येत. सुमा त्याला गोड गोड उत्तरे देत असे. पोस्टात टाकण्यापूर्वी ती देवाच्या पत्नीला वाचून दाखवीत असे.

सुमनची शाळा नेहमीप्रमाणे चालली होती. अभ्यास वक्तशीर होता. घरच्या देवांची पूजा, तुळशीला पाणी, सारे काही व्यवस्थित चालले होते. एके दिवशी सायंकाळी नागूदेवाच्या पत्नीचे डोके गरगरल्यासारखे झाले. आणि ओटीवरल्या ओटीवर ती उभ्या उभ्याच कोसळली. सुमा घरात होती. तिने आपल्या मानलेल्या आईला सावरले. घाबरून आजूबाजूच्या आयाबायांना हाक मारली. दोघी चौघी जमल्या. सगळ्यांनी सांगितले, "डॉक्टरला बोलाव."

सुमा गावातल्या सरकारी दवाखान्याकडे धावली. ती घाबरली होती. बावरली होती.

सरकारी दवाखान्यात एक नवा डॉक्टर नुकताच बदली होऊन आला होता.

त्याला मराठी भाषा ठीकशी येत नव्हती. तो म्हणे निर्वासित होता. वयाने तो तिशी-पस्तिशीत होता. पण दिसण्यात दिसत होता तरुण. घाबऱ्या घुबऱ्या अवस्थेत सुमा त्याच्यापुढे जाऊन उभी राहिली. डॉक्टर एकटाच होता. आपल्या खाजगी खोलीत काही वाचीत बसला होता. त्याच्यासमोर एक सुंदर टेबल होते. त्यावरच्या फुलदाणीत रातराणीच्या फुलांचा उमलता गुच्छ दरवळत होता. सुमा उगीच गोंधळली. 'च्' असा काहीतरी चमत्कारिक आवाज तिच्या तोंडून निघाला. डॉ. ग्वालानीने वर पाहिले. मानेला एक ऊर्ध्वगामी झटका देऊन डॉक्टरने "कोण, काय ?" अशा अर्थी मुका प्रश्न केला. सुमा जास्तच भांबावली. या वेळीं त्या खोलीत आणखी कुणी असते तर बरे झाले असते, असे तिला वाटले. ती गप्प उभी राहिली. देवांनी लहान मुलाचा घेतात तसा मुका घेतल्यावर, तिच्या अंगातून जशी एक शिरशिरी उठून गेली होती तसेच काही तिला आताही झाले. तिच्या ओठांतून शब्द उमटेना. डॉक्टर उठून जवळ आला. बेधडक तिच्या पाठीवर हात ठेवून विचारले,

"कोन तू ? काय पाहिजेल !"

"आ–अ–आजारी !"

"कौन ?"

"नागूदेवांची मंडळी."

डॉक्टर एक क्षण थांबला नाही. आपली औषधाची बॅग घेऊन तो त्वरित तिच्या पाठोपाठ निघाला. झपाटलेल्या माणसासारखी सुमाही त्याच्या पाठोपाठ निघाली.

"तू आगे चल, मकान दिखाव." डॉक्टर हसल्यासारखे करून म्हणाला. ती पुढे आणि डॉक्टर मागे. दोघे भराभर निघाले. दवाखाना ते घर हा रस्ता गावाच्या बाजारपेठेतून होता. तालुक्याच्या गावच्या पेठेत, एक तरुण मुलगी आणि तिच्या मागे डॉक्टर, दोघे धावत गेल्यासारखी गेली. हा विषय पुरेसा विस्मयकारक होता. पेठेतले दुकानदार आणि गिऱ्हाइके सर्वांच्याच डोळ्यांत या दृश्याने सांजवाती पेटल्या. हा डॉक्टर गावातल्या दवाखान्यात कामाला येण्याआधीच त्याची कीर्ती गावात पोहोचलेली होती. निंबुरीकर कुरकरण्याची पोरगी 'माल' दिसते हा ठरावही रिकामटेकड्या मंडळीत पूर्वीच पसार

झाला होता. पेटलेल्या फाणसाभोवती आणि लोंबत्या लामणदिव्याभोवती त्या रात्री बऱ्याच चर्चा झाल्या. सुमनला त्याचा पत्ता लागला नाही. अनोळखी डॉक्टरांनी देवाच्या पत्नीला तपासले, आणि तिला धीर दिला, याचेच नवल तिच्या उमलल्या मनात सुगंधासारखे दरवळत राहिले.

देवाच्या पत्नीचा रक्तदाबाचा विकार हळूहळू ओसरू लागला. डॉक्टर आणि सुमा यांची सलगी वाढू लागली. शाळेतून येता येता ती थेट दवाखान्यात शिरू लागली. बरोबरच्या पोरी तिच्या पाठीवर फिदीफिदी हसू लागल्या.

तीन महिने संपले आणि सेतुरामेश्वरादी दक्षिणदेवस्थानांची यात्रा करून, कन्याकुमारीच्या त्रिसमुद्रात स्नान झालेला नागूदेव परत आला.

त्याची बस कडगावच्या स्टँडवर पोचली तेव्हा रात्री साडेदहा वाजले होते. बायको आणि सुमा स्टँडवर येतील असे त्याला वाटले होते. पण उतरल्यावर त्याला कुणीच दिसले नाही. हमालाच्या डोक्यावर सामान ठेवून तो घराकडे निघाला. बाजारपेठेतल्या दुकानांतून अजून दिवे तेवत होते. नुसत्या आकृतीवरून, अंधारात चालत असलेल्या नागूदेवाला कुणीतरी ओळखले व विचारले,

“ काय देवा, कशी काय झाली यात्रा ? ”

“ संतोष, परम संतोष ! ” देव उत्तरला. थांबून बोलत राहण्याइतका अवसर त्याच्यापाशी नव्हता. लाडक्या सुमासाठी त्याने मदुरेच्या जरतारी साड्या आणल्या होत्या. तिची बालिश खुशी त्याच्या थकल्या डोळ्यांपुढे पाडसासारखी बागडत होती. तिच्या पत्रव्यवहारातील अनेक अवतरणे त्याने ध्यानात ठेवली होती. त्याबद्दल तो तिचे मनःपूर्वक कौतुक करणार होता.

नागूदेव अगदी घराच्या दारात आला. घरातून काहीच हालचाल दिसेना. आपण येणार असल्याचा मजकूर ज्यात होता ते पत्र सुमाला मिळालेच नाही की काय ते त्याला कळेना. तो दरवाज्यातून आत आला. सोप्याच्या पायऱ्या चढला. सोप्यातल्या हलकडीचा कंदील नेहमीसारखाच जळत लोंबकळत होता. सोप्यावर कुणी चिटपाखरू देखील नव्हते. घराच्या वातावरणाला येणारा नेहमीचा उदाधुपाचा वासही आज नाकपुड्यांशी घुटमळला नाही. हमाल सामान ठेवून निघाला. कनवटीचे पैसे देऊन नागूदेवांनी त्याला बिदा केले.

" सुमा !" अशी हाक आता मारणार, इतक्यात उजव्या बाजूच्या अंधाऱ्या दारातून नाना कुलकर्णी बाहेर आला.

" नाना, तू आला आहेस ?"

" हं. "

" का ?"

" वैनी आजारी होत्या. "

" कशानं ?"

" रक्तदाब. "

" सुमानं कुठं लिहिलं नाही मला ?"

एवढ्यात देवाची पत्नीच पुढं आली. तिनं नवऱ्याला वाकून नमस्कार केला. मग नानाही वाकला. नानाची पत्नीही पुरोहिताच्या पायाशी लागली. नंतर कुणीच बोलेना. परक्या माणसादेखत पत्नीच्या प्रकृतीची जादा चौकशी करणे देवाला प्रशस्त वाटले नाही. पण ती बाई निम्मी राहिली नाही हे त्यांच्या ध्यानात आल्यावाचून राहिले नाही.

" हातपाय धुवायचे, संध्येचं मांडत्ये. " देवपत्नी बोलली.

" सुमा कुठाय् पण–"

साऱ्यांची तोंडं गप्प झाली. नागूदेवाला काही बोधच होईना. नानाच्या डोळ्यांत पाणी तरारले. कसली तरी अघोर शंका नागूदेवाच्या डोक्यात लकाकली. तो बेभानपणे ओरडला––

" काय झालं पोरीचं ?"

नानाने तोंड फिरविले. सुमाच्या आईने मान खाली घातली. नागूदेवाला वाटले, आपल्या अंगातले सारे स्नायू सैल पडले. छातीला बोगदा पडला.

" कुठाय् माझी सुमा ?" रडव्या स्वरात तो ओरडला.

" आहे आतल्या खोलीत. " त्यांची पत्नी पुढे होऊन बोलली.

" आजारी आहे ?" थोडका साद उतरवीत त्याने विचारले.

" कपाळाचा आजार !" पत्नी म्हणाली, " चला, सांगते सारं. आताच आला आहात. थोडा विसावा घ्या–"

विस्फारलेल्या डोळ्यांनी, धडधडत्या छातीवर हात ठेवूनच नागूदेव पत्नीच्या पाठोपाठ गेला.

त्याच्या स्वतःच्या अनुपस्थितीत घडलेली घटना त्याच्या पत्नीने त्याला कशी सांगितली राम जाणे. नाना आणि सुमाची आई अच्यारी का बिचारी होऊन सोप्यावरच सुतक्यासारखी बसून राहिली होती. नागूदेव बाहेर आला तो माथे बधिर होऊनच. नानाशी तो काहीच बोलला नाही. फक्त अगदी हळू आवाजात त्याने पत्नीला विचारले, " कुठाय् ती–"

सुमाचा मानलेला पिता लेकराच्या ओढीने वेडा झाला होता. जन्मदात्या बापाने त्याला सांगितले, " कोठीघरात आहे–"

नागूदेवाने कोठीघरात पाऊल घातले मात्र. सुमाने त्याच्या वत्सलतेवर झेप घेतली. त्याच्या सर्वांगावर आपल्या निष्पाप अश्रूंचे मार्जन करीत ती पोर मुक्या पाडसासारखी बिलगली. देवाच्या डोळ्याला धारा लागल्या. धर्माविरुद्ध वर्तन नुसते दृष्टीला पडले तरी आकाश-पाताळ एक करणारा तो वृद्ध ब्राह्मण त्या अश्रूंच्या समुद्रात हतबल झाला. वाहत चालला. खांद्यावरच्या उपरण्याने त्याने सुमाचे डोळे कोरडे केले. तिला धरून त्याने तिला आपल्या समोर उभे केले. अपार वात्सल्याने तिच्या डोळयांत डोकावून पाहिले, परत तिला जवळ घेतली. आपल्या उजव्या कुशीत तिला घेऊन डाव्या हाताने तिची पाठ थोपटीत तो निश्चयी स्वराने म्हणाला,

" नाना, माझी लेक गर्भार आहे. मी तिचं बाळंतपण करणार. इथं या वाड्यात ! "

" देवा—" नानाचा साद थरथरला.

" मी कुणाचं ऐकणार नाही. धर्मशास्त्राचं बंधन अज्ञानाला कसलं ? ही पोर फसली आहे. अघोरी उपायानं तिची सुटका करू पाहणारे तुम्ही पापी आहात. ती भ्रूणहत्या होईल. त्या नीच माणसानं गोहत्येचं पातक केलं म्हणून तुम्ही भ्रूणहत्या करणार. पुण्याचे मोठे डोंगर वाढतील अशानं ! तुम्ही दोघे जा आपल्या आपल्या घरी. मी पाहतो माझ्या लेकीला. तिचं मूल तें माझं नातवंड. मी सांभाळीन त्याला. "

" जग काय म्हणेल ? " नाना तोतरला.

" कोण जग ? हे कुग्राम आणि आजूबाजूची खेडी एवढंच ना तुझं जग ? त्यात नांदणाऱ्या कुणाही माणसापेक्षा धर्म आणि नीती मला जास्त कळते. कोण मला विचारायला येतो ते मी पाहीन – मला नुसतं संतान पाहिजे होतं. परमेश्वरानं नातू देऊ केला–– "

देवाच्या डोक्यावर परिणाम झाला हे नानानं ओळखलं. तो गप्प झाला. कानांत तुळशी घालून पत्नीसह आपल्या खेड्यावर गेला.

नागूदेवानं सुमाचे सारे लाड पुरविले. तिच्या पोटातलं पोर पापाचं आहे याचा उच्चारसुद्धा पुनः केला नाही. त्याची पत्नी घाबरूनच नवरा सांगेल तसे वागत राहिली. जिल्ह्याहून नर्स आणून देवानं लेकीचं बाळंतपण करवलं. सोजीच्या लाड्वासारखा लेक झाला. नागूदेवानं थाटानं त्याचं बारसं केलं. गावातलं कुणी समारंभाला आलं नाही. नागूदेवानं त्याची पर्वा केली नाही. ओसरीवर बसून तो शांतपणे शांतिपाठ करीत राहिला.

नागूदेव आणि गाव यांचा संबंध सुटला. त्याचा वाडा एखाद्या बेटासारखा गावातून निराळा झाला. नानाच्या वतीने कुणी प्रतिष्ठिताने त्या डॉक्टरला लग्नाची गळ घातली. त्याने साफ कानांवर हात ठेवले. कुणाच्या पौरुषाचे कोण फल हे ओळखावयाचे कसे! नागूदेव चक्क आपल्या कुमारी कन्येच्या बाळाला अंगाखांद्यावर खेळवू लागला. नातवाचे मुटकुळे हातावर झुलवीत म्हणू लागला, " हा एक सूर्यपुत्र आहे ! "

नागूदेवाचे पौरोहित्य कुणीच मानीनासे झाले. यजमानाच्या घरी काही कार्ये झालीच तर पंढरपूरचे उपाध्याय येऊ लागले. नागूदेव भ्रमिष्ट झाला याबद्दल साऱ्या पंचक्रोशीची खात्री होऊन चुकली.

मुलगा चार महिन्यांचा झाल्यावर एके दिवशी भीत भीत नाना देवाच्या वाड्यात आला. चौघडीवर झोपलेल्या बाळाला, " इथं इथं बैशले मोला " करण्यात नागूदेव गर्क झाला होता.

" देवा–" नानाने हाक मारली.

" ये, नाना– " नागूदेव म्हणाला. नाना वर आला. त्याच्याबरोबर एक तरुण होता. अगदी शांत दिसणारा, नखशिखान्त खादीची वस्त्रे घातलेला. तोही नानाच्या पाठोपाठ आला.

"बचा म्हणावं." मुलाशी खेळत नागूदेवाने पाहुण्यांना सांगितले.

"देवा–" बैठकीवर बसल्यानंतर नाना हलकेच बोलला.

"काय म्हन्ता आज्योबा?" पोराला मांडीवर घेत नागूदेव म्हणाला.

"हे देशपांडे सुधेवाडीला शिक्षक आहेत."

"अश्श, नमस्काल!" नागूदेवाने त्या बालकाचे हात नमस्कारासारखे जुळविले.

"यांनी मोठे उपकार केले माझ्यावर!" नाना.

"कसले?" नागूदेव.

"सुमनची सारी कहाणी यांना माहीत आहे. आणि तरीही त्यांनी आपणहून मला लिहिले, की हे तिच्याशी लग्न करायला तयार आहेत. या मुलाला आपला मुलगा समजायला तयार आहेत!" नाना भराभरा बोलून गेला. नागूदेवाने ते ऐकले मात्र, मांडीवरचे ते पोर त्याने खाली फेकले. ते जोरात ओरडू लागले. सुमा धावत आली. नागूदेवांची पत्नी दाराशी येऊन थडकली. तो तरुण आणि नाना उठून उभे राहिले. दमगीर झाल्यासारखा नागूदेव हातवारे करीत ओरडू लागला,

"वा ऽ रे समाज! एक वैद्य रुग्णाइताच्या अवस्थेचा फायदा घेतो. औषधासाठी तोंड वेंगाडणाऱ्या पोरीवर बलात्कार करतो. आई-बाप तिच्या पोटचे पोर ठार मारू पाहतात; आणि एक महामूर्ख तरुण त्या बाटलेल्या पोरीशी लग्न करू इच्छितो. संतोष, परम संतोष. सांभाळा तुमचा समाज आणि तुम्ही. आम्ही चाललो. आमच्यासारख्यांना आता जागा नाही इथं —"

काय घडतं आहे हे कळायच्या आधीच नागूदेव वाड्याच्या दारातून बाहेर पडला. वाऱ्यासारखा धावत सुटला. त्याचा पाठलाग करण्याचे कुणाला सुचले नाही.

ता वाऱ्यासारखा धावत आला तो विठ्ठलाच्या देवळात शिरला. देवळात चिटपाखरू नव्हते. नंदादीप तेवत होता. विठ्ठल-रखुमाईच्या सुहास्य मूर्ती कर कटीवर ठेवून निश्चल उभ्या होत्या. त्यांच्यासमोर येऊन तो उभा राहिला. त्याची धाव थांबली. विठ्ठलाच्या डोळ्याशी दिठी भिडवून तो स्थिर उभा

राहिला. बराच वेळ तसाच राहिला. मग त्याने डोळे मिटले. एकदम मोठ्याने ओरडला,

" गतं पापं गतं दुःखं गतं दारिद्र्यमेव च।
आगता सुखसंपत्तिः पुण्योहं तवदर्शनात् ॥ "

आणि त्याने विठ्ठल-रखुमाईसमोर दंडवत नमस्कार घातला. नमस्कारासाठी भूमीवर पसरलेले शरीर परत उभे राहिले नाही. ते लाकडाच्या ओंडक्यासारखे निश्चल झाले.

## १२

# तुपाचा नंदादीप

सारे कोल्हापूर शहर किती तरी बदलून गेले आहे. जुन्या वास्तू इतक्या वेगळ्या दिसू लागल्या आहेत, की नव्याने येणाऱ्या जुन्या माणसाला पूर्वीची ओळखच पटू नये. जगदंबेचे देऊळ देखील बदलले आहे. काशी-क्षेत्राच्या तोडीला तोड म्हणून जगदंबेच्या परिसरात जाग्रत असलेले मनकर्णिका तीर्थकुंड आता संपूर्ण बुजवलेले आहे. ओवऱ्या अदृश्य झाल्या आहेत. तट पाडले गेले आहेत. व्यापारासाठी देवस्थानाचे सान्निध्य पत्करणारी लबाड दुकानदारी, महाद्वारातून आत प्रांगणात आली आहे.

नव्या राजवटीतील लक्षा[illegible] राजांना राजमार्ग मिळावा म्हणून छत्रपतींचा राजवाडा आपण होऊन आकसला आहे. त्या वाड्याच्या महाद्वारातील झुलत्या गजराजांच्या जोडकमानीतील एक कमान ढिली पडली आहे. राजवाड्याच्या माडीवर ‘ शेतकरी संघाची ’ कचेरी आकारली आहे. फार काय, त्या प्रासादाचे प्रांगणच आता रहदारीचा रस्ता होऊन राहिले आहे.

सरदारांच्या वाड्यांना भोके पडून त्यावर चौकटी बसल्या आहेत. मानकऱ्यांना प्रवेश नव्हता तेथे भाडेकरूंचा वावर सुरू झाला आहे.

शहराचे शततीर्थ स्वामित्व सिद्ध करणारी तळी मातीखाली गाडली गेली आहेत. त्या मातीवर राजकीय पुढाऱ्यांचे पुतळे उभे राहिले आहेत. राजवंशातील स्मरणीय विभूतींच्या राखून ठेवलेल्या जागा कलावंतांच्या प्रतिमांनी पटकाविल्या आहेत. एखाद्या मोठ्या घराच्या नावाने ओळखले जाणारे निरुंद

बोळ, त्या मोठ्या घराची तटबंदी कातरून स्वतः फुगले आहेत, ओसाड होते तेथे वसाहत झाली आहे. ओलाड होते तेथे उद्याने फुलली आहेत.

आळशी रहिवाश्यांना माहीतही नव्हते ते माळ इमारतींनी लहडून गेले आहेत, गवत उगवत नव्हते त्या जागी उद्योग-केंद्रे उगवली आहेत. ज्यांना स्वतःची घरे नव्हती आणि लोकांच्या दारांतून आत येणे अवघड होते, त्या पूर्वास्पृश्यांच्या टुमदार वस्त्या उमटल्या आहेत.

अव्यवस्थित होतं ते ते व्यवस्थित झालं आहे. बोंगेबाज होते ते आटोपशीर झाले आहे. जुनाट होते ते नावीन्याने नटले आहे.

नाही म्हणायला महाद्वार रस्त्यावरचे ते मिठाईचे दुकान मात्र आहे तसेच आहे. दुकानाच्या डोक्यावर तीच पिवळी अक्षरांची पाटी आहे. दुकानाच्या आत तीच जुनीपुराणी फडताळे आहेत. वीस वर्षांच्यापूर्वी विकल्या जात होत्या त्याच वस्तू आज त्या दुकानात विकल्या जात आहेत. तराजू तोच आहे, तीच स्वच्छता आहे. तेच व्यावसायिक सच्चेपण त्या दुकानाने कायम ठेवलेले आहे. आतल्या बाजूला गणपतीची मूर्ती आहे. तिच्यापुढे तुपाचा नंदादीप जळत असतो – चोवीस तास जळत असतो.

'दामले आणि मंडळीं'च्या दुकानात आजही खऱ्या खव्याचा पेढा विकला जातो. रत्नागिरीच्या अस्सल आंब्याची बर्फी सोन्याच्या चिपासारखी काटेकोर तोलली जाते. तिथल्या चिवड्यातील प्रत्येक पोहा बेळगावी तुपात न्हालेला असतो. काजूचे नाव सांगून तिथल्या चिवड्याच्या चविष्टपणात घुसण्याची हिंमत शेंग-दाण्याला होत नाही. भाव वाढले आहेत, पण पदार्थांची चव तीच आहे. गिऱ्हाइकी वाढली आहे, पण दुकानाचा विस्तार तेवढाच आहे. मालक बदलला आहे पण धंद्याची सचोटी तीच आहे.

'दामले आणि मंडळी' असे दुकानाचे नाव असले तरी त्या दुकानाची मालकी कोणाही दामल्याकडे नाही. जुना दामले शंभरीला येऊन वारला. त्या बापड्याला संतान झाले नाही. मरणापूर्वी पाचच मिनिटे त्याने सदू सान्याला बोलाविले आणि आधीच स्टँपवर लिहून तयार असलेले दौलतीचे बक्षीसपत्र सदू सान्याच्या हवाली केले.

वीस वर्षांपूर्वी सदू या दुकानात नोकरीला लागला. म्हातारा दामलेमामा आता शेलारमामाच्या वयात आला होता. दुकानाचे सारे काम तो एकटाच

पाहात होता. माल खरेदी करणे, तो तयार करणे आणि विकणे या साऱ्या क्रिया एकहातीच चालल्या होत्या.

' त्वंवाङ्मयस्त्वं चिन्मय: ' असा अथर्वशीर्षाचा पाठ करीत मामा दुकान सुरू करण्याच्या बेतात होते. एवढ्यात एक पोरगा दुकानाच्या दाराशी आला. ते गिऱ्हाईक नव्हे, हे मामांच्या डोळ्यांनी ओळखले. भिकाऱ्यांना पै-पैसा देण्याची त्यांची पद्धत नव्हती.

" कायरे, काय हवंय् ? " नेहमीच्या अनुस्वारवाणीत त्यांनी विचारले. त्या पोराने काहीच उत्तर दिले नाही. त्याचे घारेभुरे डोळे काठोकाठ थबथबले. तो जागचा हलला नाही. मामा जरा पुढे झाले. त्यांची दृष्टी किंचित् मंदावल्यासारखी झाली होती. दाराशी येऊन त्यांनी नीट निरखले. पोरगा अगदी कोवळ्या वयाचा होता. असेल सात एक वर्षांचा. अंगात एक खादीची कोपरी आणि नेसूचा पंचा एवढीच वस्त्रे त्याच्या अंगावर होती. त्याची मुद्रा सुकलेली होती. हातपाय धुळींने भरलेले होते. उपासमारीने वाळल्या गालावर सुकल्या अश्रूंचे चकचकीतपण उमटले होते.

" कुठला तू ?"

" रत्नागिरीचा. "

" कुणाचा ? "

त्या पोराला उत्तर देता आले नाही. तो हुंदके देऊ लागला.

" रडू नकोस हो. ब्राह्मण का आहेस ? "

" हो. "

" ये, आत ये. काय हवंय् तुला ते नीट सांग. "

तो मुलगा आत आला. नीट सांगणे त्याला सुधारले नाही. त्याच्या पोटात मनस्वी दुखत होते. मामा पाठीवर हात ठेवून त्याला आत घेऊन गेले. आपल्या हातांनी थोडी गरम कॉफी करून त्यांनी त्या मुलाला आग्रहाने पाजली. त्याला थोडकी हुषारी आल्यावर त्यांनी प्रेमळ आवाजात विचारले,

" आता सांग बरे, तुला काय हवंय ते ? "

" नोकरी. " त्या मुलाने उत्तर दिले.

" कसली ?"

" कसलीही. "

" तुला आईवडील कुणी आहेत का ?"

" वडील आहेत. "

" आई ? वारली ?"

त्याने नकारार्थी मान डोलावली.

" म्हंजे ?"

" तिने दुसऱ्या माणसाशी लग्न केलं. मला ती सांभाळत नाही. वडील मी दिसलो की मारायला उठतात. " एवढे सांगतो तो त्या मुलाची अगदी दमछाक झाली. तीन ठिकाणी तो अडखळला. हुंदक्यांच्या आधारावाचून त्याचा साद उमटू शकला नाही. मामांनी अधिक विचारले नाही.

" बरं, मग तुझी तू कपबशी विसळून टाक पाहू. " म्हणून त्याला पहिले काम सांगितले आणि सदू सानेची नोकरी सुरू झाली. शालेय शिक्षण सुरू झाले. व्यावसायिक शिक्षणालाही प्रारंभ झाला.

धीरे धीरे चिमुरड्या सदूने मामांची सारी कामे शिकून घेतली. तो पंधरा-सोळा वर्षांचा झाला आणि मामा बाजूला बसले. सारा व्यवहार सदूच पाहू लागला. पितापुत्रात असणार नाही इतका लळा त्या दोघांत उत्पन्न झाला. वीस वर्षांच्या प्रदीर्घ काळात सदूने कधीही मामांकडून बोलणे खाल्ले नाही, की कुणा गिऱ्हाइकाशी त्याची बाचाबाच झाली नाही. मामांचा विद्यार्थी मामासारखाच तयार झाला. दिव्याने दिवा लावला. मामांचा सारा भलेपणा सदूच्या अंगी उतरला. सावलीने वाढणाऱ्या रोपासारखा तो डौलाने वाढला.

दिवसेंदिवस मामांचा देह सुकेळे सुकावे तसा सुकत गेला. पण त्यांच्या वागण्यातील गोडवा त्यामुळे अधिक वाढत गेला. मामा मरेपर्यंत त्याने त्यांच्याकडे पगार मागितला नाही. ते देतील तेवढेच त्याने घेतले. " एवढं का ?" असे कधी विचारले नाही.

शेवटी मामांना पार ऐकू येईनासे झाले होते; त्याचा फायदा घेऊन येणारी गिऱ्हाइके त्यांच्या दौलतीसंबंधी चर्चा करीत, तर्क लढवीत

कुणी म्हणे, " पाच लाख तर खरेच. "

दुसरी विचारी, " करणार काय त्याचं ?"

" देईल देवीच्या देवळाला. "

" नाहीतर सरकारचं धन. "

" तेच बरं, घ्यावा कुणी कृपणाचा पैसा. "

" मामा दिसतो कंजुष, पण कंजुष नाही. "

" तुम्हांला काय माहिती ?"

" कोकणात शाळा बांधल्यात त्यानं. "

" आपण नाही बा कुठं वाचलं !"

" गाजावाजाची सवय नाही त्याला. "

एक ना सहस्र – सदूने कधी त्या विषयाची दखल घेतली नाही....

साऱ्याच व्यवहारांचे दानपत्र सदूच्या ओट्यात घालून मामा अगदी शांतपणे " ओम् गणपतये नमः " म्हणाले. सदूला त्या लाभाचे काही वाटले नाही. मामांच्या मरणाने तो सीमेचा दुःखी झाला. एखाद्या तान्ह्या अर्भकासारखा महिनोगणती रडत राहिला. लोकांनी त्याच्या रडण्याला आक्रस्ताळेपणा हे नाव दिले. सदूने त्याला विरोध केला नाही.

" दामले आणि कंपनीचे " दुकान पुनः पूर्ववत सुरू झाले. त्याला नुकते चारपाच महिने झाले होते. तसेच साजूक पदार्थ, तीच सचोटी, तसेच अबोल वातावरण. एवढी मोठी दौलत मिळाली म्हणून सदूने नोकर चाकर ठेवले नाहीत की दुकानाचा व्याप वाढवला नाही. त्याच्या कमरेचा पंचा गुडघ्याखाली लांबला नाही की अंगातल्या कोपरीला हातोटे फुटले नाहीत.

लोकांनी त्याला ' सदाशिवराव ', ' सानेशेठ ' वगैरे नावे ठेवली. पण सदू स्वतः मात्र सदूच राहिला.

पेढे खरेदी करण्याच्या निमित्ताने मामांचे वकील देशपांडे एकदा दुकानात आले. तेही अनुभविक वृद्ध गृहस्थ होते. ' सच्चा वकील ' म्हणून त्यांचा साऱ्या जिल्ह्यात लौकिक होता. वयाच्या वडीलकेने ते सदूला म्हणाले, " अरे सदू , तू तरी आता लग्नविघ्न कर. का मामासारखा ' कोरडाच ' राहणार ?"

" कोण मुलगी देणार मला, अण्णासाहेब ?" सदू म्हणाला

" तू तयार आहेस का ? मी शोधतो मुलगी. "

सदू बोलला नाही. देशपांड्यांनी त्या मौनाचा अर्थ ' होकारार्थी ' घेतला आणि स्वतः ' वधूवर सूचक मंडळात ' जाऊन त्यांनी सदू साऱ्याचे नाव नोंदवून टाकले. सदूच्या नावावर पुष्कळ पत्रे येऊ लागली. फोटो-कुंडलीसह चौकशा येऊन धडकू लागल्या.

एके दिवशी भल्या सकाळी एक पाहुणा आला. सदूच्या वयाचा, गोरागोमटा, तसाच निळ्याभुऱ्या डोळ्यांचा. त्याच्या बरोबर त्याची धाकटी बहीण होती. असेल वीस एक वर्षांची. रंगानं गोरीपान, कांतीने लुसलुशीत, हसऱ्या मुद्रेची, शेलाटी पण सुदृढ. सदूने त्यांच्या येण्याचा हेतू ओळखला. त्यांना " बसा " म्हटले. शेजारच्या दुकानदाराला " पाच मिनिटांत आलोच " असे सांगितले आणि तो देशपांड्यांच्याकडे गेला. देशपांड्यांना बरोबर घेऊन परत आला.

वधूपरीक्षा सुरू झाली.

" तुझं नाव ? " देशपांडे वकिलांनी विचारलं.

" सुलभा. "

" शिक्षण किती झालंय ? "

" दोन वर्षांपूर्वी मॅट्रिक झाले. "

" काही कलाकुसर येते ? "

" थोडं गाता येतं, शिवणकाम करते, भरतकामही करते......."

" मुलगा पाहिलासच तू ! "

ती नुसती लाजली.

" अशिक्षित आहे. व्यापारव्यवहारापलीकडे त्याला आणखी कशात गती नाही. हो, नंतर नाराजी नको ! " देशपांडे बोलले.

तिने आपल्या भावाकडे पाहिले.

तो नम्रतेने म्हणाला, " त्याची सर्व माहिती काढलीय आम्ही. "

" मग मुहूर्त ठरवा. " देशपांडे बोलले, " कन्यादान तुम्ही करा, वराचं देवक मी मांडतो. "

देशपांड्यांच्या कुठल्याही आज्ञेला सदूने हरकत घेतली नाही. मोठा मांडव घातला. गावातील साऱ्या प्रतिष्ठितांना निमंत्रणं दिली. स्वत:साठी चांगला पोशाख शिवविला. वधूसाठी दहावीस सहस्रांचे अलंकार घडविले. तिकडचीही दहापाच माणसं आली. इकडे देशपांड्यांचे सारे संबंधित मंडपात उपस्थित राहिले. लग्नसमारंभ थाटात पार पडला. बँडच्या ताफ्यानिशी फुलांच्या मोटारीतून वरात निघाली. वर-वधू जगदंबेच्या पाया पडून आली. वरात परत घरात आल्यावर मामांच्या तैलचित्राशी थबकून देशपांडे वकील म्हणाले, " आज मामा असते तर......."

 अनुक्रम ७९५०१ दि: ... क्रमांक १८९३ ... नोंद दि: २५।३।७० 

" त्यांचा आनंद गगनात मावला नसता. " सदू बोलला आणि त्याच्या डोळ्यांना धारा लागल्या. देशपांड्यांनी स्वतःच्या उपरण्याने त्याचे अश्रू पुसले. त्या वडील माणसाचे आशीर्वाद घेऊन वधू-वर दोघेजण एकांताच्या वाटेकडे वळली. अतिशय सोज्वळपणाने, अत्यंत शालीनतेने त्यांनी समारंभाचा निरोप घेतला.

सुलभा सदूच्या घरात आली, व " दामले आणि मंडळीं " च्या दुकानाचे स्वरूप झपाट्याने पालटले. दुकानाच्या पांढऱ्याभडक भिंती गुलाबी डिस्टेंपरने रंगल्या. कोल्हापुरातील चित्रकारांची निवडक चित्रे त्या भिंतीवर शोभू लागली. विक्रीच्या मालासाठी तऱ्हेतऱ्हेची पायाडी उभी राहिली. सदूच्या पुढ्यात सारी नवी सजावट आली. त्याच्या कोऱ्या कौंटरवर पांढऱ्या रंगाचा टेलिफोन बोलू लागला. दुकानासारखेच आतले घर सजले. महिला संस्थांच्या कार्यकर्त्या मागीलदाराने आत येऊ लागल्या. दामलेमामांची गणपतीची मूर्ती चांदीच्या देव्हाऱ्यात बसली. स्वतः सदू कधी नव्हे तो गाणी गुणगुणू लागला. म्हाताऱ्या देशपांड्यांना धन्य वाटले. त्यांनी त्या नवदांपत्याला आपल्या बंगल्यावर नेले. आपल्या सुनालेकींशी नव्या " साने वैनी "चा परिचय करून दिला. भिंतीवरची चित्रे न्याहाळता न्याहाळता एखादे गिऱ्हाईक विचारी, " हे पेंटिंग कुणाचं हो ? "

सदू हसून म्हणे, " आपल्याला नाही माहीत, हे सारं मंडळींचं काम. पेढ्यांची चव बदलली असली तर मला विचारा ! "

" दामले आणि मंडळीं "च्या दुकानातल्या मालाच्या चवीवाचून सारे बदलले. सदू बदलला नाही, पण त्याचा पोशाख बदलला. तो आता फिन्लेची धोतरे नेसू लागला. रेशमी झब्बे घालू लागला. सारा वेळ कौंटरशी बसून राहणे त्याला जड वाटू लागले. तासातासाने तो आत जाऊ लागला. त्याची तारांबळ ध्यानात येऊन एके दिवशी सुलभेनेच सुचविले, " एखादा नोकर ठेवावा. "

" नाही. " सदू कटाक्षाने म्हणाला.

" का ते ? " सुलभा मान वेळून बोलली.

" मामांनी कधी ठेवला नाही. "

" त्यांनी लग्नही नव्हतं केलं ! " सुलभेच्या लटक्या रागाने सदूची गाळण उडविली. कसल्या तरी रेशमाच्या ताणल्या धाग्यांनी त्याचे सर्व अंग लपेटून

गेले. तो अगदी वेडयागत झाला. स्वत:ला सावरीत तो बोलला, " नोकर आल्यावर मी काय करू ? "

" नवरा-बायकोला मिळून करता येण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत ! "

" नाही जमणार ते ! " सदूने सांगितले. तो दुकानात आला. आजचे तयार पदार्थ दाखविणाऱ्या फलकावरच त्याने आपल्या हाताने लिहिले, " हुशार नोकर पाहिजे. "

तो हुशार नोकर सुलभेनेच निवडला, आठ-पंधरा दिवसांतच त्याच्या हुषारीने स्वतः सदू थक्क झाला. तो घरात नाही ते पाहून सुलभेला म्हणाला, " सुलू, जाहिरात देऊन इतका हुषार नोकर मिळतो का ग ? "

" वधूवर सूचक मंडळात नाव नोंदविल्याने चांगली बायको मिळते, तर जाहिरात देऊन नोकर न मिळायला काय झालं ? " तिच्या बोलण्याने सदू अगदी " मोहरून " गेला.

त्याचे सारे आयुष्यच मोहरलेल्या झाडासारखे देखणे झाले. वयाची गेलेली वर्षे वाया गेली. अक्षता पडल्या तेव्हापासून जगण्याला प्रारंभ झाला असे त्याला मनःपूर्वक वाटू लागले. म्हाताऱ्या मामाच्या छायेत असताना लग्नाचा विचारही त्याच्या मनात येत नव्हता. लग्न झाल्यापासून मामाचीही विस्मृती होऊ लागली. मामाच्या वर्षश्राद्धाची तिथी सुलभेनेच त्याला आवर्जून सांगितली. त्या तिथीच्या निमित्ताने देशपांडे वकील आले, तेव्हा सदूने आपल्या तोंडाने मान्य केले, " वकीलसाहेब, माझं जन्माचं कल्याण केलंत तुम्ही. "

दुपारी चार वाजण्याची वेळ होती. शुक्रवार होता म्हणून की काय न जाणे, आज महाद्वार रस्त्यावरून नुसत्या डेरेदार वेण्या आणि रंगीबेरंगी पातळे पोहत जात होती. कधी नव्हे तो सदू ते सौंदर्य न्याहाळीत होता. त्यांतल्या काही दुकानात येत होत्या, काहीतरी मिठाई घेऊन जात होत्या. दुकानदारीची सारी कामं नवा नोकर श्याम करीत होता. सदू नुसता पाहत होता. आत येणाऱ्या व बाहेरून तरंगत जाणाऱ्या एकाही स्त्रीला सुलभाची सर नव्हती. कुणाही हरिणाक्षीचे डोळे सुलभेसारखे नव्हते. कुणाही सुवासिनीचे नेसणे सुलभेइतके मनोवेधक नव्हते कुणीही सुकेशा सुलभेइतकी केशरचनेच्या शास्त्रात पारंगत नव्हती. कुणाही हंसगामिनीच्या चालण्यात सुलभेची लचक नव्हती. कुणाही गौरांगीचा वर्ण सुलभेच्या अंगरंगाइतका नितळ नव्हता.

कुठल्याही पाठमोऱ्या पौर्णिमेजवळ सुलभेच्या अंबाड्याखालचे मादक आकर्षण नव्हते. कुणाही सन्मुखेच्या उरोज विस्फारात सुलभेचे पुष्टपण मावत नव्हते.

सदू उगीचच कौंटरवरून उठला आणि आत जाऊ लागला. तोच सुलभा बाहेर आली.

" श्याम "– सतारीच्या तारा झंकारल्या.

" जी ! " तबल्यावर थाप पडली.

" हे पत्र टाकून ये. मी देवीला जाऊन येते ! " गतीची उठावण झाली.

" हां जी ! " तबलजीने नुसता ठेका धरला. गत वाजू लागली. मागे वळून तिने एक " मिंड " दाखवली; आणि पुढे ठाय लयीतील स्वरवैभव चालू लागले. स्वच्छ पांढरी साडी, क्रीम रंगाचा रेशमी पोलका, डोक्यातले पिवळ्या गुलाबाचे सपर्ण फूल. गतीने गती घेतली. लयीने द्रुत आविष्कार पकडला, तेव्हा सदूची अगदी समाधी लागली.

' सदाशिवराव "–एका बेसूर सादाने त्याची तंद्री मोडली.

भानावर येऊन तो बोलला, " जी."

" आमच्या बंगल्यावर चार शेर पेढे पाठवायचे आता. मी देवीला जाऊन येते. " तो आवाज खासबागेतील खासनिसांच्या पत्नीचा आहे, हे त्याला कळले. त्याच्यातील प्रामाणिक दुकानदाराने त्वरित आज्ञा फर्मावली, " श्याम, पेढे तोल आणि बाईच्याकडे घेऊन जा. "

" जी. "

खासनीसबाई निघून गेल्यावर पेढे तोलता तोलता श्यामने विचारले, " शेठ, हे पत्र टाकून मग जाऊ का ? "

" ते पत्र दे माझ्याकडे – मी पाठवतो. "

श्यामचे उत्तर आले नाही. पेढ्यांची करंडी भरून तो जायला निघाला तेव्हा सदूला त्याला पुन: विचारावे लागले, " कुठाय ते पत्र ? "

श्याम गप्प राहिला. त्याच्या मख्खपणाचा सदूला संताप आला. कधी नव्हे तो त्याचा आवाज चढला, " अरे, ते पत्र कुठाय ? "

सदऱ्याचा वरचा खिसा चाचपीत श्याम तोतरला, " आहे ना. "

" दे इकडं. "

नाइलाजाने दिल्यासारखे ते पत्र सदूच्या हाती देऊन श्याम सटकला. सदूच्या हाती ते पत्र आले तेव्हा त्याला उगीचच सुलभेचा लुसलुशीत हात हाती घेतल्याचा आठव आला. सुलभा घरात नसती तर त्याने त्या निळ्या लिफाफ्याची लुडबूड दूर उडवली असती. ती नव्हती – सदू तो लिफाफा घेऊन कौंटरजवळ गेला. कपाळावर आलेली सुलूची बट जितक्या हळूवारपणे सारावी तितक्या हळुवारपणे त्याने त्या लिफाफ्याचे तोंड सोडविले. मध्येच तो बिचकल्यागत झाला. त्याच्यावरचा पत्ता त्याने वाचून पाहिला. तिने ते पत्र आपल्या भावालाच लिहिले होते. पत्ता इंदूरचा होता.

नव्याने लग्न झालेल्या बहिणीने भावाला लिहिलेले पत्र वाचण्याचा मोह त्याला आवरला नाही. एकवार त्याच्या पापभीरू मनाने कुरकूर केली. पत्र खाजगी आहे. पतिपत्नीत कसले आले आहे खाजगी, या उत्तराने त्याने त्याला गप्प केले. लिफाफ्यातील कागद बाहेर काढला. सुलूचे बोलणे ऐकावे इतक्या अधीरतेने तो ते पत्र वाचू लागला.

वाचता वाचता त्याच्या भुवया आकुंचित झाल्या – चढल्या. डोळे विस्फारले. छातीत धडधड सुरू झाली. हाताला कापरे भरले. मुद्रेवरचे स्नायू ताठरले. तिच्यावरचा रंग झपाट्याने बदलत गेला. कपाळावर घामाचे पाझर फुटले. त्या घामातून फुटलेल्या शिरा ताडकन् उभ्या राहिल्या. खालचा ओठ दातांखाली चेंगरला गेला. अंगात पिशाच्च संचारल्यासारखा तो ताडकन् उभा राहिला. एवढ्यात सुलभा आली. किंचाळल्यासारखी ओरडली, "अगबाई, माझं पत्र!" तिनं त्या पत्रावर झडप घातली.

सदूच्या अंगी इतकी शक्ती कुठून आली कोण जाणे. त्याने तिचा हात घट्ट दाबून धरला. त्याच्या डोळ्यांतून जणू ठिणग्या उडत होत्या. असाहाय्य सुलभेचे सर्वांग थरथरत होते. सदूच्या नाकातून एक पोळणारा फूत्कार बाहेर पडला. सुलभेच्या हातातील भांडे, करंडा खाली पडला. त्याचा फरशीवर आवाज झाला. करंडा उघडून त्यातील कुंकू रक्त सांडावे तसे जमिनीवर सांडले. भांड्यातील तांदूळ अवती भवती पसरले.

त्या रात्रीच सुलभा माहेरी गेली. श्याम तिच्याबरोबर गेला. सदू रात्रभर रडत होता. ओक्साबोक्शी रडत होता. म्हाताऱ्या दामल्याचे तैलचित्र निश्चल होते. गणपतीपुढचा नंदादीप मुळीच हलत नव्हता.

देशपांडे वकिलांच्या कचेरीत देशपांडे आणि सदू दोघेच आहेत. सदू एखाद्या पुतळ्यासारखा स्थिर आहे. नाकावर चष्मा ठेवून देशपांडे सुलूचे ते पत्र वाचीत आहेत. एकाएकी देशपांडे भडकतात. पत्राचा चोळामोळा करीत संतापल्या आवाजात ओरडतात—

" म्हणजे तो तिचा भाऊ नव्हता ? "

" नाही, तो तिचा नवरा. ते दोघेही ख्रिश्चन आहेत. "

" नवऱ्यानं आपल्या बायकोचं लग्न तिसऱ्याशीं लावलं ? " देशपांड्यांना बोलणेही धड साधेना.

" कटच तो सारा. देवाला जाण्यापूर्वी तिने ब्रॅग भरलेली होती. सारे दागिने त्या बॅगेत घेतले होते. श्याम त्यांचाच माणूस. हे सारे ठरवूनच केलेले होते. " सदू थंडपणाने म्हणाला.

" तू जाऊ का दिलीस तिला गाढवा ? " वकील ओरडले.

" जाऊ दिली नाही, घालविली. मामाची तसबीर घरात आहे. वकीलसाहेब, मामांची तसबीर घरात आहे. गणपतीपुढे नंदादीप आहे. या घराचे भलेपण मला संभाळले पाहिजे. " सदू कळवळून बोलला आणि परत लहान मुलासारखा रडू लागला. भलाईतच वाढलेल्या त्या माणसाला असाह्यतेवाचून दुसरा भावच आणता आला नाही.

" ही केस जगासमोर आली पाहिजे ! " देशपांड्यांचा संताप सरसरून उठला.

सदूला हुंदक्यामुळे बोलता आले नाही. त्याने हातानेच खूण केली. " काही नको, काही नको. मला मामांचं दुकान चालवायचं आहे. त्यांचा लौकिक टिकवायचा आहे... "

" ते काही नाही, त्या बदमाशांनी मला, एका वकिलाला फशिवलं; मी त्यांची पाळ-मुळं उखडीन, मी फाशीवर लटकवीन त्यांना.... " वकील कडाडत राहिले.

" त्यापेक्षा मला वाचवा; मला वाचवा. मी अब्रूदार माणूस आहे. एका भल्या माणसानं आपल्या भलेपणाची ठेव माझ्याजवळ ठेवली आहे, ती मला संभाळली पाहिजे. " बोलत बोलत सदू उठला आणि त्याने वकिलाच्या हातातील

पत्र हिसकले. डोळ्याचे पाते लवते ना लवते एवढ्यात त्याने त्या पत्रा तुकडेतुकडे करून टाकले. निर्बल होऊन तो धाडकन् एका कोचात पडल वकिलाकडे न पाहताच चमत्कारिक आवाजात म्हणाला, “ ती मेल्याचं ए पत्र तीच पाठविणार आहे. तसं तिनं मामांच्या तसबिरीसमोर कबूल के आहे. झालेलं सारं दुःख मी तिच्या नावानं रडून मोकळं करीन. कुणाला का कळणार नाही. मामा जगले तसाच मी जगेन. एकटा; एकटा.......”

देशपांडे वकिलांना त्याचे बोलणे काहीच ऐकू आले नाही. जणू त्यांच श्रवणशक्तीच संपली होती. पार नाहीशी झाली होती.

सारे कोल्हापूर बदलले आहे महाद्वार रस्त्यावरचे ते दुकान मात्र आं तसेच आहे. दुकानाच्या डोक्यावर तीच पितळी अक्षरांची पाटी आहे दुकानाच्या आत तीच जुनी पुराणी फडताळे आहेत. वीस वर्षांपूर्वी विकल्य जात होत्या, त्याच वस्तू आज त्या दुकानात विकल्या जात आहेत. बैठक त्याच आहेत. तराजू तोच आहे. तेच व्यावसायिक सच्चेपण त्या दुकानां कायम ठेवले आहे. एखादे स्त्री-गिऱ्हाईक येते आणि उगीचच सुलभेचं आठवण काढते.

सदूची मुद्रा काळवंडते. ते गिऱ्हाईक निघून गेल्यावर तो मामांच्या गणपती समोर जातो. आपल्या हातून घडलेल्या पापाची क्षमा मागतो. गणपतीपुढचं नंदादीप क्षीण झाला असल्याची त्याला शंका येते. दुकानाच्या मालासाठ आणलेले साजूक तूपच तो समईत ओततो. मुळाशी काजळीने काळवंडलेलं वात तुपामुळे उजळपणे तेवत राहते. त्या वातीचा उजेड मामांच्या तैलचित्राल उजळीत राहतो.

REFBK-0015125

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 95924